मूल्य ३० रु./पृष्ठे १०४ । फेब्रुवारी २०१९ । वर्ष १२ वे/अंक २


# राष्ट्रवादी

स्वाभिमानी आधार! राष्ट्रवादी विचार!!



## अनुक्रमणिका


- वैचारिक स्वातंत्र्याची हेळसांड — संपादकीय — ६
- महागठबंधन रॅली, कोलकाता, भाषणे...
  - १) एकजुटीने मोदी सरकार हटवू — शरद पवार — १०
  - २) मोदी सरकारचा अंत निश्चित! — ममता बॅनर्जी — १४
  - ३) सर्वांच्या साथीने नवपरिवर्तन घडवू — शत्रुघ्न सिन्हा — १६
  - ४) धोकादायक मोदी सरकारला हटवा — यशवंत सिन्हा — १८
  - ५) मोदी-शहांना हटवूनच 'अच्छे दिन' — अरविंद केजरीवाल — १९
- मतांच्या जोगव्यासाठी खैरात (नवी दिल्ली वार्तापत्र) — आकाश — २०
- सत्तेच्या हव्यासापोटी मोकाट सरकार (सीबीआय- पोलिस संघर्ष,कोलकाता) — गहिनीनाथ — २४
- निर्धार परिवर्तनाचा, संपर्क यात्रा, शुभारंभ सभा, भाषणे... — ३०
  - १) ओबीसी व मराठा समाजात भांडणे लावण्याचा प्रयत्न — छगन भुजबळ — ३२
  - २) जातीयवादी पक्षांचा पराभव केल्याशिवाय गरिबांना न्याय अशक्य — अजित पवार — ३६
  - ३) विरोधकांचे कंबरडे मोडण्यासाठी सर्व व्यवस्थांचा वापर — जयंत पाटील — ४०
  - ४) भाजपचे सरकार नालायक तर शिवसेनेचे मंत्री कोण? — सुनील तटकरे — ४४
  - ५) भाजप सरकार खड्ड्यासारखे बाजूला करा — धनंजय मुंडे — ४६
  - ६) आगामी निवडणुकीत परिवर्तन अटळ — नवाब मलिक — ५०
  - ७) थापेबाज सरकारला जनता विटली — चित्रा वाघ — ५१
- निर्धार परिवर्तन संपर्क यात्रेतील भाषणांचे संकलन...
  - १) भाजप सरकार सर्वच आघाड्यांवर फेल — छगन भुजबळ — ५४
  - २) सत्ताधाऱ्यांचा दबाव झुगारून राष्ट्रवादीला साथ द्या — अजित पवार — ६४
  - ३) सरकारला निवडणुकीत योग्य जागा दाखवा — जयंत पाटील — ७६
  - ४) इमान विकत घेण्याचा भाजपचा जळगाव पॅटर्न — दिलीप वळसे-पाटील — ८०
  - ५) 'अच्छे दिना'ची आता गावागावांत टिंगल — धनंजय मुंडे — ८२
  - ६) आरक्षणावरून भांडणे लावण्याचा उद्योग — जितेंद्र आव्हाड — ८८
  - ७) आता लाट मोदी हटवायची — भास्कर जाधव — ९१
  - ८) भाजप सरकार दहशतवादी — फौजिया खान — ९२
  - ९) सेना-भाजपचे सरकार उलथवून टाकूया — समीर भुजबळ — ९५
- चव्हाटा (हलके-फुलके राजकीय किस्से) — घंटाकर्ण — ९६
- शेवटचे पान (दिंड्या दोन दिशांच्या...) — हेमन्त टकले — १०२


**संचालक**
हेमन्त टकले

**प्रबंध संपादक**
दिलीप वळसे पाटील

**संपादक**
डॉ. सुधीर भोंगळे

या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी प्रबंध संपादक, संपादक व संचालक सहमत असतीलच असे नाही.

**संपादकीय पत्रव्यवहार**
ठाकरसी हाऊस,
जे.एन.हेरेडिया मार्ग,
बॅलार्ड इस्टेट, मुंबई-४०० ०३८
०२२-३०२३५५३०/५५/५६

**कला निर्देशन**
धनंजय सस्तकर

**सजावट व मांडणी**
दिलीप रोडे

**वर्गणीचे दर-**
वार्षिक रु. ५००/-

**वर्गणीचा धनादेश**
'हेमन्त मल्टिमीडिया ओपीसी प्रा.लि.'
या नावाने काढावा.

www.ncp.org.in
यावर मासिक उपलब्ध

**मुद्रक, प्रकाशक**
हेमन्त प्रभाकर टकले यांनी
'हेमन्त मल्टीमीडिया ओपीसी प्रा.लि.'
च्या वतीने
मीडिया आर ॲण्ड डी.,
१३, अमृत मधुरा, प्लॉट नं. ३,
सेक्टर-३,आरएससी-२८, चारकोप,
कांदिवली (पश्चिम), मुंबई-४०००६७
येथे छापून ७८, रेशमभवन, ६ वा
मजला, वीर नरिमन रोड, चर्चगेट,
मुंबई-४०००२० येथून
अंक प्रकाशित केले.
**संपादक-**
डॉ. सुधीर जगन्नाथ भोंगळे

# अहंकाराने फुगलेला बेडूक क्षणार्धात फुटतोच

खोटं बोलणं ही तशी अवघड कला आहे. पण एकदा का ती अंगवळणी पडली की मग अवघड काहीच नाही. मग सगळं सोपं आहे. फक्त खोटं पचविण्यासाठी वारंवार खोटं बोलावं लागतं. खोट्याची उतरंड रचावी लागते. सत्य कायमचं गाडून टाकावं लागतं. असत्य नेहमीच अशुद्ध असतं, दुर्बल असतं. गोबेल्स तंत्र वापरुन ते सतत जिवंत ठेवावं लागतं. सत्य आणि असत्याचा लढा जगात सर्वत्र कायम चालू असतो. सत्याचा विजय अंतिम असतो असे आपण कायम म्हणत आलेलो असलो तरीही असत्य बोलून लोकांना फसविता येतं, मूर्ख बनविता येतं आणि असत्यातून सत्ता हाती आली की ती मनमानी पद्धतीने, हुकुमशाहीच्या मार्गाने वापरुन, ठोकशाहीचा अवलंब करुन, प्रसंगी संविधानाला जाळून कारभारावरती आपली मांड किती पक्की आहे याचे डोळे दिपवून टाकणारे दर्शन घडविता येते हे पंतप्रधान मा. नरेंद्र मोदींच्या कारभारावरुन आपण गेली साडेचार वर्षे रोज अनुभवित आलो आहोत. मनात येईल तसा अंदाधुंद म्हणजे हिटलरशाही कारभार मोदींनी देशात मनापासून राबविला. जनतेचे जेवढे म्हणून वाटोळे करता येईल, तेवढं करण्याचा प्रयत्न केला. लोकशाहीची चौकट मोडून तोडून भारताची राज्यघटनाही धाब्यावर बसविण्याचा प्रयत्न केला. मोठ्या विचारांन्ती, ध्येयाने व कष्टपूर्वक उभारणी करुन मजबुती दिलेल्या केंद्रीय नियोजन मंडळ, विद्यापीठ अनुदान आयोग, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, प्राप्तिकर विभाग, आर्थिक गुन्हे अन्वेषण विभाग, सीबीआय, सर्वोच्च न्यायालय व न्यायाधीश नियुक्तीची कॉलेजियम यंत्रणा, संरक्षण विभागाची खरेदी यंत्रणा आणि यासारख्या अन्य अनेक व्यवस्था एका रात्रीत मोडून टाकल्या. जणू काही हा देश म्हणजे आपल्या बापाची खासगी प्रॉपर्टी आहे या पद्धतीने वागून संपूर्ण देशाची नियोजनपूर्वक बसविलेली घडी मोदींनी अस्ताव्यस्त करुन टाकली आहे. देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यापासून डॉ. मनमोहन सिंग यांच्यापर्यंत झालेल्या सर्व पंतप्रधानांनी जी विचारपूर्वक पाऊले टाकली होती ती उलटी फिरविण्याचे काम करुन मोदींनी देशाचे प्रचंड नुकसान केले आहे. विकासात हा देश मागे रेटला आहे आणि हे सगळे जाणीवपूर्वक केले आहे. एवढे करुन त्यांचे अजून समाधान झालेले नाही. आजही निर्लज्जपणाने ते आपल्या चुकीच्या निर्णयांचे समर्थन करीत आहेत. देशाला खड्ड्यात घातलेल्या धोरणांचा उदोउदो करीत आहेत. त्यांच्या मंत्रीमंडळातला नितीन गडकरींसारखा एखादा खरं बोलणारा मंत्री वगळला तर सगळं मंत्रीमंडळ आंधळेपणाने लाचार व लोचट बनून मोदींची रोज आरती ओवाळते आहे. खोटं बोलण्यालादेखील काही सीमा असावी याचे भान भाजपच्या नेत्यांना राहिलेले नाही.

## सुरुवातीचे



नोटाबंदीमुळे, घरे स्वस्त झाली, भ्रष्टाचार आम्हीच रोखला, येत्या 70 वर्षांत देशाचा काहीच विकास झाला नाही. यासारखी असंख्य भंकप व भोंगळ विधाने करुन मा. मोदींनी आपल्या अभ्यासाची, वकूबाची, बुद्धीच्या झेपेची लायकी सिद्ध केली आहे. इतका भंपक व खोटारडा पंतप्रधान देशाला यापूर्वी कधीही मिळाला नव्हता. नोटाबंदीने देशाची संपूर्ण अर्थव्यवस्था कोलमडून पडली. 8 नोव्हेंबर 2016 ला लागू झालेल्या नोटबंदीने शेतकरी, उद्योजक, व्यापारी, कामगार, नोकरदार वर्ग, वित्तीय संस्था, हातावर पोट असणारे मजूर, लघुउद्योग, मोठी कारखानदारी सगळे उध्वस्त झाले. एकाही वर्गाला काडीचाही फायदा नोटबंदीचा झाला नाही. सगळे बिल्डर झोपले. त्यांची बांधकामे अर्थवट स्थितीत बंद पडली. अनेक बिल्डर तर जेलमध्ये गेले. काहींनी दिवाळखोरी जाहीर केली. लोकांचे व बँकांचे पैसे बुडविले. काहींनी आत्महत्या केल्या. काही परदेशात पळून गेले. कसल्या आणि कुठल्या घरांच्या किंमती कमी झाल्या? मोदींनी खोटं बोलताना निदान आपल्या भाजपातल्या नेत्यांना तरी खरं मत विचारावे. खासगीत भाजपचे सगळे नेते नोटाबंदीच्या निर्णयाला किती शिव्या देतात आणि किती मूर्खपणाचा हा निर्णय आहे याची वर्णने करुन उदाहरणे सांगतात. कुणीतरी मोदी साहेबांना ही भाजपच्या अंतर्गत गोटातली चर्चाच टेप करुन ऐकवावी म्हणजे तरी आपल्या सहकाऱ्यांचे आपल्याबद्दल खरं काय मत आहे ते तरी त्यांना कळेल. अर्थात त्यापासून ते काही बोध घेतील याची सुतराम शक्यता नाही. अहंकाराने प्रचंड फुगलेला बेडूक क्षणार्धात फुटतो ही गोष्ट लहानपणी आपण शाळेत शिकलेलो आहोत. त्याची पुनरावृत्ती आता होणार आहे.



# सरकारच्या निष्क्रियतेमुळे दुष्काळाचे संकट गहिरे

एकीकडे निवडणुका जवळ येऊ लागल्या आहेत. दुसरीकडे दुष्काळाची तीव्रता वाढू लागली आहे. मार्चच्या पहिल्या आठवड्यात लोकसभा निवडणुकीची घोषणा होऊन मतदानाच्या तारखा जाहीर होतील आणि त्याच दिवसापासून आचारसंहिताही सुरु होईल. आचारसंहितेचा बागुलबुवा उभा करुन प्रशासनातले अधिकारी नकारघंटेचा नाद सुरु करतील. मग जनतेचे प्रश्न आणखीनच बिकट होतील. केंद्र व राज्य सरकारने तर केव्हाच जनतेला वाऱ्यावर सोडून दिले आहे. त्यामुळे भीषण संकट काळात ते दुष्काळग्रस्त जनतेकडे काही सहानुभूतीने पाहतील व त्वरित निर्णय करुन मदतीचा हात देतील आणि दुःखात होरपळत असलेल्या जनतेला त्यातून बाहेर काढण्यासाठी आपली तिजोरी, मोठ्या खुल्या व मोकळ्या मनाने खाली करतील अशी सुतराम शक्यता दिसत नाही. केंद्राने दुष्काळाशी दोन हात करण्यासाठी दिलेला चार हजार कोटींचा निधी एकट्या मराठवाड्यालासुद्धा पुरणार नाही. बरं, सगळी रक्कम काही अजून आलेली नाही. केंद्र सरकारही महाराष्ट्राला मदत करताना हात आखडूनच धरते आहे. केंद्रीय कृषिमंत्री तर महाराष्ट्राच्या पूर्ण विरोधात आहेत. महाराष्ट्राला काहीही मदत किंवा योजनेचे पैसे देण्याची वेळ आली की, "महाराष्ट्रको पहले बहुत दिया है । अब कुछ नहीं देना ।" अशी राधामोहनची बासरी वाजते. मा. शरद पवार साहेबांनी केंद्रिय कृषिमंत्री असताना महाराष्ट्राला दुष्काळाच्या काळात भरभरून मदत केली. कधीही हात आखडता घेतला नाही. पण म्हणून आता संकटात सापडलेल्या महाराष्ट्राला मदत देऊ नका हे कृषिमंत्र्यांचे म्हणणे कितपत रास्त आहे? भाजपच्या महाराष्ट्रातील नेत्यांना तरी पटणारे आहे का? मग ते का मूग गिळून बसले आहेत? पवार साहेबांनी मदत देताना असा दुजाभाव कधीही केला नाही. खरं खोटं करायचे असेल तर मा. पंतप्रधान नरेंद्र मोदींनाच हा प्रश्न विचारा. ते गुजरातचे मुख्यमंत्री असताना पवार साहेबांनी त्यांना केंद्रातून भरभरुन आर्थिक मदत दिली. इतकेच नव्हे तर समस्या सोडविण्यासाठी काही उपाययोजनाही सुचवून मार्गदर्शन केले असे स्वतः मोदी यांनी 2011 साली राष्ट्रवादी मासिकाला दिलेल्या मुलाखतीत जाहीरपणाने सांगितलेले आहे. असे असताना आज मात्र महाराष्ट्राचा केंद्र सरकार का दुस्वास करते आहे. वास्तविक करांच्या रुपाने सर्वाधिक रक्कम महाराष्ट्र केंद्राच्या तिजोरीत टाकीत आहे. तरी देखील महाराष्ट्राला दुष्काळात मदत करताना केंद्राचा हात का कंप पावतो आहे? महाराष्ट्रातल्या जनतेने मोठ्या आशेने तुम्हाला केंद्र व राज्यातली सत्ता दिली. त्या सत्तेच्या बदल्यात तुम्ही जनतेच्या ओट्यात काय घातले? सगळा शेतकरी समाज उध्वस्त केला. नोटाबंदी व निर्यातबंदी करुन सगळ्या मालाचे भाव पाडले. लोकांच्या खिशातला होता नव्हता तेवढा सर्व पैसा काढून घेऊन त्यांना भिकेला लावले. माल खरेदी करायला सुद्धा ग्राहक बाजारात येईना. बहुतांश लघुउद्योग बंद झाले. बिल्डरांनी दिवाळे काढले. बांधकामे ठप्प झाली. उद्योजकांनी कामगार कपात केली. कोट्यावधी लोकांच्या नोकऱ्या जाऊन त्यांचे संसार रस्त्यावर आले. नोटबंदीने मारलेले असतानाच जीएसटीने पछाडले. पूर्ण होतं नव्हतं ते उध्वस्त झाले. त्यातून थोडं सावरावं तर दुष्काळाने जाळे टाकले. आता प्यायलाच पाणी नाही. मग शेतात काही पिकणं तर दूरच. आजच मराठवाड्यात 100-125 कि.मी. वरुन टँकरने पिण्याचे पाणी आणावे लागते आहे. फेब्रुवारीत ही स्थिती आहे. एप्रिल, मे, जून या काळात निवडणुका रंगात असेल तेव्हा जनतेचे काय हाल होतील याचे सरकार कधी विचार करणार आहे? नियोजन तर शून्य आहे. निष्क्रिय सरकारच्या उदासीपणामुळे दुष्काळाचे संकट अधिक गहिरे होणार आहे तेव्हा आपण आत्तापासूनच सावध झाले पाहिजे.

**प्रबंध संपादकीय**



# वैचारिक स्वातंत्र्याची हेळसांड

## संपादकीय



हल्ली महत्त्वाचा प्रश्न निवडणुका हा आहे. जरी निवडणुका महत्त्वाच्या असल्या तरी त्याबरोबर एका महत्त्वाच्या प्रश्नाने समाज अस्वस्थ झाला आहे. तो म्हणजे वैचारिक स्वातंत्र्य जपण्याची जबाबदारी सर्वांनी घेण्याचा. याला निमित्त झाले ते यवतमाळ येथे झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला उद्घाटक म्हणून ज्येष्ठ साहित्यिक मा. नयनतारा सहगल यांना आधी बोलाविण्यात आले. ऐनवेळी त्यांचे निमंत्रण रद्द करण्यात आले. या विषयीची खंत सर्वच क्षेत्रात व्यक्त झाली आहे. त्यानंतर त्यांचे भाषण लिखीत रुपात सर्वांना मिळाले. त्यामध्ये त्यांनी वैचारिक स्वातंत्र्य आपण सर्वांनी जपले पाहिजे याविषयी भूमिका मांडली आहे. सहगल यांचे नाते महाराष्ट्राशी विशेष आहे. त्यांचे वडील रणजित पंडित हे संस्कृतचे विद्वान होते. त्यांनी विशेषतः मुद्राराक्षस, ऋतुसंहार, राजतरंगिणी या तीन अभिजात संस्कृत ग्रंथांचे इंग्रजीत भाषांतर केले. राजतरंगिणी या ग्रंथात काश्मिरच्या राजांचा इतिहास आहे. ब्रिटिश राजवटीत तुरुंगात असताना त्यांनी हे लेखन केले. सहगल यांचे कुटुंब राष्ट्रीय चळवळीत सहभागी झालेले होते. त्यांच्या आई विजयालक्ष्मी पंडीत या होत्या. त्यांचे वडील बॅ. मोतीलाल नेहरू हे राष्ट्रीय प्रवृत्तीचे होते. त्यांनी ब्रिटिशांच्या राजवटीत स्वातंत्र्यासाठी तुरुंगवास भोगला. त्यांचे कुटुंब राष्ट्रीय चळवळीशी समरस झाले. हे सर्व यासाठी सांगितले इंग्रजी भाषेत लेखन करणाऱ्या त्या ज्येष्ठ व श्रेष्ठ भारतीय लोखिका आहेत. त्यांनी आपल्या भाषणात पहिला प्रश्न समाजाला विचारला आहे तो हा की आज आपल्या स्वातंत्र्याची आपल्याला काही किंमत वाटते का? कारण आज हे स्वातंत्र्य धोक्यात वावरते आहे. आपल्या सगळ्या हालचालींवर कुणीतरी लक्ष ठेवते आहे. त्यामुळे वातावरणातला मोकळेपणा नाहीसा झाला आहे. खरे तर भारतीय बहुसांस्कृतिकता हे आपल्या देशाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य आणि ते आपले यश आहे. कारण धर्मनिरपेक्ष राज्यघटना स्वीकारताना आपण जे काही आदर्श घेतले होते त्यांनाच आज लाथाडले जात आहे. यासाठी त्यांनी अनेक उदाहरणे दिली आहेत. आदिवासींच्या हक्कांसाठी लढणाऱ्या 5 जणांना देशाविरुद्ध कट करण्याचा आरोप ठेवून अटक करण्यात आली ! गोहत्येच्या अफवेवरुन माणसे मारली जात आहेत. आज या प्रकारचा दहशतवाद अधिकृत ठरत असेल तर माणसांनी न्याय मागायचा कोणाकडे? हे सहगल यांनी अत्यंत जळजळीत वास्तव मांडले आहे. अलिकडेच त्यांच्या दोन कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या आहेत. या संदर्भात नयनताराजींनी एक अत्यंत महत्त्वाचा मुद्दा मांडला आहे तो असा,

''सध्याच्या राजकीय परिस्थितीत सर्जनशीलता, कल्पनाशक्ती, अभिव्यक्तिस्वातंत्र्य यांना स्थान नाही. जिथे विचारस्वातंत्र्य नसते, तिथे लेखन ही धाडसी कृती ठरते. स्टॅलिनच्या काळात 'सोव्हिएत युनियनसाठी काही ठोस योगदान देणारी नसेल, तर ती कविताच नव्हे,' असे मानून ब्रॉडस्कीला तुरुंगात टाकण्यात आले, तर सरकारवर टीका करणारा सोल्झेनित्सिन यांना सायबेरियात सक्तमजुरीची शिक्षा ठोठावली गेली. आपल्याकडेही विचारवंतांच्या हत्या झाल्या. 'आमच्या भावना दुखवाल, तर तुमची कला, तुमचे चित्रपट, तुमची चित्रे उद्ध्वस्त करू', अशा प्रकारे धमकावले जाते. शंभर कोटी लोकांना एकाच पद्धतीने विचार करायला लावणे केवळ अशक्य. काय चूक आणि काय बरोबर, हे भावनांवर ठरत नाही. भावना दुखावण्यावर बंदी असती, तर आपण आजही विधवा स्त्रियांना जाळत राहिलो असतो.''

सध्या इतिहास सरकारच्या नियंत्रणाखाली कशाकरिता आणता आहेत कोणास ठाऊक? हिंदुत्ववादी मानसिकतेतून वेगळाच इतिहास लिहिण्यात आला आहे. आश्चर्य म्हणजे आधुनिक भारताची पायाभरणी ज्यांनी केली त्या पंडीत नेहरुंचे उल्लेखही काही ठिकाणी काढून टाकण्यात आले. आश्चर्य म्हणजे ज्या आधुनिक जगाने महात्मा गांधीजींचा आपण होऊन स्वीकार केला. गांधीजींच्या अहिंसा तत्त्वाच्या प्रभावाखाली निग्रो चळवळीचे मार्टिन ल्युथर किंग ते अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष बराक ओबामापर्यंत या साऱ्यांना चुकीचे ठरविले जात असून निष्कारण काही तरी वेगळे निर्माण केले जात आहे. विविध क्षेत्रात हे घडत असताना आपण साहित्यिक म्हणून गप्प बसणार आहोत का? याला नयनतारा सहगलजींनी दिलेले उत्तर अत्यंत मननीय आहे आणि ते म्हणजे अशा परिस्थितीत आपण लिहू शकतो. लेखक हस्तींदंती मनोऱ्यात राहात नाहीत. त्यांच्या लेखनातून ते योग्य काय आणि अयोग्य काय याचे नेमके दिग्दर्शन करतात. म्हणून उत्तम साहित्यिक पिढ्यान्‌पिढ्या लोकांच्या हृदयाला स्पर्श करतात. समाज नेमका कुठे उभा आहे ते दाखवतात, त्यामुळे कल्पनेत आणि रसिकांनी या सगळ्या प्रश्नांचा नीट विचार केला पाहिजे. अशा वातावरणात चित्रपट सृष्टी गप्प का आहे? हा नयनतारांचा सवाल विचार करण्यासारखा आहे. त्यांनी स्वच्छ सांगितले आम्ही हिंदुस्थानी आहोत. कर्नाटकातल्या पत्रकार गौरी लंकेश यांच्या जन्मदिनी आपण सगळे एकत्र आलो किंवा तमिळ गायक टी. एम. कृष्णा यांनी समाजातील अघोरी प्रथा नष्ट करण्यासाठी आपल्या तामिळ सुरेल गीतातून जी वाचा फोडली ती महत्त्वाची आहे. पुष्पा भावे यांनी सातारा नाट्यसंमेलनात सांगितलेल्या ज्ञानपीठविजेते कवी विं. दा. करंदीकर यांच्या एका मुद्द्याची आठवण करुन दिली. त्यात त्यांनी महात्मा गांधींची हत्या हे पहिले पाप आहे. दाक्षिणात्य लेखक पोलिस संरक्षणात फिरत आहेत. हे सारे आपल्या डोळ्यांसमोर घडत असताना लेखक कलावंतांचे मौन कधी

सुटायचे? त्यामुळे सहगल यांनी स्पष्टपणे सुनावले भारतात अघोषित आणीबाणी आहे हे लक्षात ठेवा.

याचा सगळा विचार करता आजचा काळ सोशल मिडियाच्या प्रभावांचा आहे. काही वेळा अर्धवट माहितीच्या आधारावर आपण चुकीच्या प्रतिमा निर्माण करतो. परंतु नयनतारा सहगल सारख्या पुरोगामी लेखिकेचे निमंत्रण मागे घेऊन आम्ही एका अर्थाने अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी केली आहे. हा प्रश्न केवळ चर्चेने सुटणार नाही तर सर्वसामान्य समाजाने या प्रश्नाचा गांभीर्याने विचार केला पाहिजे. महात्मा गांधीजींनी हिंदु धर्म म्हणजे काय? हे एक अत्यंत महत्त्वाचे पुस्तक लिहिले आहे. त्यामध्ये यंग इंडिया आणि हरिजन यातील काही भाषणांमधील चिंतन आहे. गांधीजींनी स्पष्ट म्हटले आहे, सत्य व अहिंसा ही माझी धर्मश्रद्धा आहे. माझ्या दृष्टीने मी असे म्हणेन अहिंसेच्या मार्गाने सत्याचा शोध म्हणजे हिंदु धर्म होय. एखाद्या मनुष्याचा ईश्वरावर विश्वास नसेल तरीही तो स्वतःला हिंदु म्हणवून घेऊ शकतो. कारण धर्म म्हणजे सत्याच्या शोधाची अविश्रांत साधना.

आज हा धर्म मरणासन्न निष्क्रिय झाला असून तो विकासोन्मुख राहिला नाही. त्याचे कारण हेच आहे की आपण क्लान्त झालो आहोत. (क्लान्त म्हणजे आळशी, थकलेलो). हा थकवा दूर केला पाहिजे. तर हिंदूधर्म अधिक तेजाने उजळून निघेल. हिंदु धर्म इतर सर्व धर्मांपेक्षा अधिक सहिष्णु व सर्वसमावेशक आहे. जगातील सर्व धर्मातील प्रेषितांच्या पूजेला त्यात स्थान आहे. हिंदु धर्माने नानाविध जातीजमाती सामावून घेतल्या आहेत. तुमची जी श्रद्धा असेल किंवा तुमचा जो धर्म असेल त्यानुसार तुम्ही ईश्वराची उपासना करा असे हिंदु धर्म सांगतो. त्यामुळे तो सर्व धर्मांसोबत सलोख्याने, शांततेने राहू शकतो. सगळ्यांना समान वागणूक यातूनच ईश्वरी अस्तित्त्वाचा स्पर्श आहे.

धर्माच्या नावाखाली वाईट गोष्टी चांगल्या करणे हे गांधीजींना पसंत नव्हते. त्यांचे प्रसिद्ध वचन आहे. "जर मला माझ्या बिछान्यात चरखा फिरवता आला आणि त्यायोगे माझे मन जर मी ईश्वरचरणी अधिक लीन करु शकलो तर मी नक्कीच जपमाळ बाजूला टाकून चरखा हाती धरीन." या त्यांच्या वाक्याला फार महत्त्वाचा अर्थ आहे. तो लक्षांत घेतला पाहिजे. तो असा आहे, जोपर्यंत माझ्या देशातील गरिबी आणि उपासमार नष्ट होत नाही तोपर्यंत मी नक्की चरख्याची निवड करेन. चरखा हीच माझी पूजा आहे. ती मला सेवाधर्म शिकविते. सेवाधर्माचे आचरण न करता मला अहिंसा धर्म पाळता येणार नाही. अहिंसेशिवाय मला सत्य शोधता येणार नाही. म्हणून 'सत्यमेव जयते' हा उदात्त विचार देवून म. गांधींनी मानवतेची सेवा केली. त्यांनी सगळ्यांना बरोबर घेऊन शाश्वत मार्गाची निवड केली आणि तोच मार्ग शांतीच्या तत्त्वाकडे घेऊन जाणारा महत्त्वाचा मार्ग ठरला.

श्रद्धा आणि भक्ती यावाचून ईश्वरकृपा लाभत नाही. म्हणून तुलसीदासांनी रामनामाची महती गायली आहे तर शुक्राचार्यांनी भागवतात 'ओम नमो भगवते वासुदेवाय' या मंत्राचा जप शिकविला आहे. श्रद्धा म्हणजे कृतीत्मक विवेकाचे भान आणि भक्ती म्हणजे जीवनातली स्वाभाविक जाणीवेची चिंतनशील गरज. या व्याख्या गांधीजींना आवडत. त्यामुळे हिंदुत्व ही एक जीवनपद्धती आहे असे त्यांना वाटे. हिंदूधर्माची भव्यता त्याच्या सर्वसमावेशक तत्त्वात आहे. प्रत्येकाला देवपूजेचे स्वातंत्र्य आहे. देवांची प्रार्थना शांतता आणि सलोखा शिकविते. इथे कुठल्याही मतप्रणालीचा आग्रह नाही. जरी सर्व धर्मात अहिंसा ही आहे तरी हिंदू धर्मात तिचा अविष्कार आणि आचार उच्च कोटीचा आहे. हिंदू धर्म हा ऐतिहासिक काळापासून चालत आलेला आहे. हिंदू धर्माला कुंठितावस्था मान्य नाही. तो विकासशील आहे. हे विचार जाणत्याला नक्कीच प्रगल्भ करतील. नयनतारा सहगल यांनी सुद्धा हा विरोध अहिंसक मार्गाने पण शांततापूर्ण वातावरण ठेवत केला हे महत्त्वाचे आहे. गांधींच्या प्रतिमेला, फोटोला गोळ्या घालून गांधी मरत नसतात. गांधी आजही जीवंत आहेत हे सांगण्याची गरज आहे का? बंदुकीच्या गोळ्यांनी जर विचार मेले असते तर सगळ्या जगाने असहिष्णुतेचाच मार्ग स्वीकारला असता. गांधींच्या स्वप्नातला भारत आजही आपण निर्माण करु शकलो नाही. याचे कारण आपल्या समाजात जे विविध जातीय कप्पे निर्माण झाले आहेत त्यामुळे अशा प्रकारचे अविचार फोफावत आहेत. कुणी काहीही बोलत सुटतो. आम्हाला आमच्या जगण्याचे अर्थ अजूनही कळत नाहीत. आपल्याला देश पुढे न्यायचा आहे की समाज मागे न्यायचा आहे? म्हणून मध्यंतरी हिंदू राष्ट्राचा प्रचार हा ठराविक लोकांच्या स्वार्थासाठी केला जात आहे. हिंदू राष्ट्राची संकल्पना अकारण संकुचित केली जात आहे हा इशारा संविधान समितीच्या शेवटच्या बैठकीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिला होता ही आठवण निवृत्त न्यायाधीश अभय ठिपसे यांनी आपल्या भाषणातून करुन दिली. सबरंग इंडिया, लेट मुंबई ब्रीथ, इंडसना फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने नेटीझन फॉर डेमॉक्रसी या कार्यक्रमात ते बोलत होते. बहुसंख्य लोकांचे राज्य म्हणजे लोकशाही असे होत नाही. तर लोकशाही म्हणजे सर्वांना त्यांचे विचार किंवा त्यांचा आवाज मांडण्याची मुभा असणे याची आठवण न्या. ठिपसे यांनी करुन दिली आहे. उगाचच वृत्तपत्रांचे आवाज दाबून टाकायचे आणि जगण्याचे संकुचितपण मिरवायचे हे योग्य नव्हे. हे नुसते पाहून चालणार नाही. त्याकडे थोडे विचारपूर्वक पाहिले पाहिजे. यातूनच विषमता वाढते आहे. शेतकरी आणि समाज यात दरी निर्माण होत आहे.

यवतमाळ साहित्य संमेलनाच्या उद्घाटनात एका शेतकऱ्याच्या पत्नीने जी व्यथा मांडली ती फार महत्त्वाची आहे. म्हणजे साहित्यिकांनी समाजाचे दुःख मांडतांना पिडीतांच्या व्यथांना आणि यातनांना समान स्थान दिले पाहिजे. साहित्य संमेलनाच्या उद्घाटनाच्या आमंत्रणाचा घोळ झाल्यानंतर एका शेतकऱ्याच्या पत्नीच्या हस्ते उद्घाटन केले. ''आपली साहित्यिक प्रतिष्ठा जपण्यासाठी शेतकऱ्याच्या दुःखाचा वापर करणं, हे दुर्दैवी आहे,'' असे विचारवंत डॉ. आ. ह. साळुंखे यांनी एका भाषणात सांगितले. विचार कुंठित होत गेला की मानवी जीवनाचे सर्व आडाखे चुकत जातात. त्यातून काहीही साधले जात नाही. आपण काय करतो ते ही कळत नाही. याचा विचार नीट केला पहिजे.

या संदर्भात एक नवीन ॲप तयार झाला आहे. तो व्हॉटस्‌अपवर फिरतो आहे. यातून त्याला सुचवायचे आहे...

समाजमाध्यमांवर नकारात्मक प्रतिक्रिया, अपमानास्पद वक्तव्य, मानसिक-लैंगिक शोषण, हिंसा होत असल्यास तक्रार

करण्यासाठी ‘हेट हटाओ’ ॲप सबरंग इंडिया आणि सिटिझन्स फॉर जस्टिस अँड पीस यांनी हे ॲप बनवले आहे.या ॲपद्वारे आलेल्या तक्रारींचे गांभीर्य लक्षात घेऊन त्या त्या संस्थांना कळविण्यात येईल आणि कायदेशीररीत्या सोडवण्याचा प्रयत्न करण्यात येईल. cjp.org.in WZ ‘हेट हटाओ’ ॲप ३० जानेवारीपासून सुरू झाले आहे. या ॲपवर जाऊन तक्रार नोंदवण्याची सोय आहे.

देशात धर्माच्या नावाखाली आपण माणुसकी तोडून टाकत आहोत. ही नसिरुद्दीन शहा यांची अस्वस्थता लक्षात घेण्यासारखी आहे. राजकीय आणि सामाजिक वातावरणाविषयी चिंता व्यक्त करताना त्यांनी “हक्क मागणाऱ्यांना कोठडी दाखविली जाते. त्यामुळे कलावंतांना, विचारवंतांना, अभिनेत्यांना मोकळा श्वास घेणे कठीण झाले आहे. याबाबत पत्रकारही गप्प आहेत. अन्यायाविरुद्ध उभे राहणाऱ्यांचा आवाज बंद करण्यात येत आहे. आपला देश नेमका कुठे चालला आहे? जिथे केवळ श्रीमंत आणि धनदांडग्यांचेच ऐकले जाते. गरिबांचा आवाजच पोहोचत नाही,'' अशा शब्दात त्यांनी आपली खंत व्यक्त केली.

ज्येष्ठ लेखक जावेद अख्तर यांनी एका भाषणात म्हटले की, राष्ट्रवादी कोण? आणि राष्ट्रद्रोही कोण? यातच आपण गुंतलो आहोत. हा आमचा देश आणि हा त्यांचा देश हा भेदभाव कशासाठी? खरे तर राष्ट्रवाद ही जगण्याची रीत आहे. त्यात देशाप्रती कर्तव्य अपेक्षित आहे. परंतु हे कर्तव्य आम्हाला कधी कळलेच नाही. या संदर्भात त्यांनी मांडलेला विचार महत्त्वाचा आहे तो असा, राष्ट्रवादापेक्षा आज आपल्याला सद्भावनेच्या राष्ट्रवादाची गरज आहे. दुदैवाने ते आज घडताना दिसत नाही. राष्ट्रवादाच्या केवळ घोषणा देऊन हे होणार नाही. देशभक्ती आणि खरे देशप्रेम महत्त्वाचे आहे. या साऱ्यात आपण सामाजिक बांधिलकी विसरत चाललो आहोत. सामाजिक बांधिलकीचा उद्घोष करुन काहीही निर्माण होत नाही. मी सर्व समाजाचे देणे लागतो. मला सारे भारतीय माझे वाटतात. त्यांच्यासाठी मी काही तरी सत्कार्य केले पाहिजे. ही भावना मनात असण्यापेक्षा कृतीत उतरायला पाहिजे. माझ्या व्यक्त होणाऱ्या प्रामाणिक भावनांना योग्य तो आविष्कार देण्यासाठीचा जो एक विशिष्ट प्रकारचा अवकाश असतो त्याला कलावंताचे स्वातंत्र्य म्हणतात. पंजाबी लेखिका कवलप्रीत कौर यांनी विविध शैक्षणिक संस्थांमध्ये जो राजकीय दहशतवाद पसरविला जात आहे त्यावर प्रखरपणे टीका केली आहे. त्यांच्या मते, “देशातले बुद्धीवादी तुरुंगात आहेत. देशाचे भविष्य सांगणारे विद्यार्थी, देशद्रोहाचे आरोप झेलत आहेत. ज्या विद्यापीठात ज्ञाननिर्मिती झाली पाहिजे तिथे खोटा इतिहास तरुणांपर्यंत पोहचवून त्यांची माथी भडकविली जात आहेत. म्हणून त्यांच्या भाषणात दिल्ली विद्यापीठात विद्यार्थ्यांनी घोषणा दिली, ‘नफरत नहीं, अधिकार चाहिऐ।''

या सगळ्यावर प्राधान्याने जो नैतिक वचक असायला पाहिजे तो आज नाही ही दुदैवाची बाब आहे. अधिकाराने बोलणारा माणूस आज काही यात नाही. काय करु देवा सत्ता नाही हाती असे म्हणणारे तुकाराम आज हवे आहेत. महामंडळावर साहित्याचा सा सुद्धा माहित नसणारे असे महाभाग आहेत आणि ते या सन्माननीय जागा अडवून बसले आहेत याचे आश्चर्य वाटते आणि साहित्य परिषदेचे सो कॉल्ड म्हणविणारे ‘इन टूक’ सभासद त्यांना मते देतात यात कोणाची किव करावी असा प्रश्न आम्हाला पडला आहे. केवळ राजीनामा देऊन कुणालाही क्लिन चीट मिळत नाही. ही वरवरची नाटके आता पॉप्युलर झाली आहेत. सहगल यांनी उद्घाटनासाठी येऊ नये म्हणून जे काही एकूण षड्यंत्र रचण्यात आले त्यामध्ये दबाव आणणारे, दबावाखाली झुकणारे असे सगळे माननीय पुन्हा संमेलनात मिरविले गेले आहेत. साहित्य महामंडळाच्या घटनेत नेमके काय असावे याचा सुद्धा योग्य तो निर्णय करता येत नाही याबद्दल काय म्हणावे? तिथे आपापसातल्या लोकमतांचा हेवादावा आणि त्यांचे सुप्त वाद हे सारे बाजूला ठेवून सगळ्यांनी एकमताने योग्य तो निर्णय घेणे म्हणजे मराठी संस्कृतीचे हित जपण्यासारखे आहे. एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करण्यापेक्षा अर्धवट प्रतिक्रिया देऊन लोकांची दिशाभूल करण्याचे कार्य अलिकडच्या साहित्य संमेलनात नित्य नेमाने होत आहे. यामध्ये कोणाची साखळी किती लांब आहे हे जरी कळले नाही तरी या साऱ्यात किती ढिसाळपणा आहे हे मात्र जाणत्यांच्या लक्षांत आले आहे. दबाव आणणाऱ्यांना कितपत साहित्य कळते हा वेगळा अग्रलेखाचा विषय आहे. लोकांच्या भावना आज इतक्या सवंग झाल्या आहेत काय? की भावनेच्या नावाखाली क्षुल्लक प्रश्नांना राष्ट्रीयतेचे स्वरुप द्यायचे आणि खऱ्या विवेकाची होळी करायची हे योग्य नाही. स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नाही. निर्भयता म्हणजे निर्लज्जपणा नाही. आणि बेडरता म्हणजे निलाजरेपणा नाही. या विशिष्ट मर्यादांनाही सामाजिक सभ्यतेच्या मर्यादा आहेत. त्या आपल्याला टाळता येत नाहीत. विचारांन्ती केलेले निर्णयही पुन्हा पुन्हा तपासावे लागतात. असे भारतीय दर्शनकारांचे महत्त्वाचे मत आपण विचारात घेतले पाहिजे.


अयोध्येतील राम मंदिराचा प्रश्न निष्कारण चिघळत ठेवलेला आहे. आतापर्यंत किती वेळा न्यायाधीश नेमले, बदलले. त्यांचेही एकमत होत नाही. या साऱ्याबद्दल गोंधळाची परिस्थिती आहे. हा प्रश्न आजच्या राष्ट्रीय समस्या पाहिल्यानंतर निष्कारण वाढविला जाण्याची काहीही गरज नाही. निवडणुकीच्या तोंडावर मतांचा बाजार विकत घेण्यासाठीच्या या सगळ्या खेळी काय साधणार आहेत. आज महाराष्ट्रात पाण्याची बिकट समस्या आहे. गुरांच्या चाऱ्याचा गंभीर प्रश्न सर्वत्र निर्माण झालेला आहे. चारा आणि पाण्याशिवाय गुरे जगूच शकणार नाहीत. अशा भाकड गुरांना सांभाळणे किती कठीण आहे हे शेतकऱ्यालाच माहिती. ही समस्या लक्षात न घेता जनतेचे लक्ष विचलित करण्यासाठी गोरक्षणाचा कायदा करण्यात आला आहे. याची या काळात खरोखर गरज होती का? याचा पुनर्विचार करण्याची वेळ आली आहे. शेतीतल्या कर्जांनी शेतकऱ्याचे कंबरडे मोडले आहे. जमिनीची मशागत करता करता तो मेटाकुटीला आला आहे. त्याचा विचार कृषीखाते करणार की नाही? कि नुसते शेतकऱ्यांचे पैसे खात व वाटीत बसणार? अर्थसंकल्पातल्या सरकारच्या घोषणा व्यर्थ आहेत. शेतमजुराला महिन्याला 500 रु. पेन्शन देणार. आज 500 रुपयांत काय मिळते? हे साध्या माणसालाही कळते. बेरोजगारीने उच्चांक गाठला आहे. सर्वेक्षणासकट आपण हे वाचलेले आहे. सगळ्या क्षेत्रात मंदी आहे. माणसे कामावरुन कमी करताहेत. असे सगळे हे हात जर निकामी झाले तर उद्या काय होईल? याची कुणालाच काही चिंता नाही.

शेवटी आपली स्थिती 'ना घर का ना घाट का' अशाकडे चालली आहे. त्यात निवडणुकांच्या घोषणा. जर निवडणुका लागल्या तर लगेच आचारसंहिता लागू होईल. याचा परिणाम सगळी सरकारी कामे ठप्प होणार. आज अशी स्थिती झाली आहे, 'सरकारी काम सहा महिने थांब.' आचारसंहिता लागू झाल्यानंतर तर माणसे कामेच करणार नाहीत. अशा परिस्थितीत सामान्य माणसाने जगायचे कसे? त्याचा कोण वाली आहे? हे ही आम्हांला कळायला हवे. हे प्रश्न डोळ्यासमोर ठेवून सरकारने कुठलीही दूरदृष्टी न ठेवता निवडणुकीतील आश्वासनांच्या मृगजळांना निष्कारण अर्थसंकल्पात भर दिला आहे. अर्थसंकल्पाचे लेखानुदान मंजूर करुन घेण्यासाठी तेवढ्यापुरतेच अंदाजपत्रक हवे. कारण लगेच पुढचे सरकार आले तर ते सगळे हे मान्य करतीलच असे नाही. म्हणजे पुन्हा धोरणे बदलतील. पुन्हा नवीन अर्थसंकल्प मांडावा लागेल. 'नवी विट्टी नवे राज्य.' जनतेच्या जीवाशी पुन्हा नवीन खेळ. या साऱ्यामध्ये राष्ट्रहित आणि राष्ट्राच्या समस्या कधी आपण गांभीर्याने घेणार आहोत की नाही असे वाटते. यामुळे आमची विकासाची दिशा अंधाराकडे चालली आहे. केव्हा प्रकाश दिसेल तो दिसो? आता तर देवावर विश्वास ठेवण्यापेक्षा देवाच्या मंदिराबाबत काय करावे हीच एक समस्या होऊन बसली आहे.

सबरीमाला मंदिरात केरळमध्ये किती हिंसाचार चाललाय. स्त्रीला मंदिरात प्रवेश देण्यासाठी पोलिसदल आणावे लागते. एका फ्रेंच बाईलाही जगन्नाथ पुरीच्या मंदिरात 1955 मध्ये प्रवेश नाकारण्यात आला. तिचा अध्यात्माचा अभ्यास चांगला असूनही तिला प्रवेश न देणारे हे स्वतःला काय समजत होते ते त्यांनाच विचारायला हवे. आचार्य विनोबा भावे पुरीच्या मंदिरात यासाठी देवदर्शनाला गेले नाहीत. हा निषेध देवांबद्दल नव्हता. समाजाने निर्माण केलेल्या चुकीच्या प्रथेबद्दल होता. आपण काय करीत आहोत याचेही भान नसणे आणि तरीही स्वतःला समाजकर्तव्याचे भान आहे हे दाखविणे हा केवढा मोठा दांभिकपणा आहे. स्त्रीयांना प्रवेश दिला म्हणून जर देव बाटला असता तर देवाने कौसल्येचा राम किंवा यशोदेचा कृष्ण किंवा अनुसुयेचा मुलगा दत्तात्रय अशी नावेच घेतली नसती. गणेशाला पार्वतीनंदन हे म्हणणे फार प्रिय होते. मंगलकार्याची जी आद्य देवता आहे ती सुद्धा आपल्या आईचे नाव पहिल्यांदा लावते मग आपले नाव लावते. पूर्वी तर काही राज्यात मातृसत्ताक कुटुंबपद्धती चालत आलेली होती. तिथे संपूर्ण घराची मालकच आई होती. तिचे स्थान अग्रभागी होते. तिला सर्वत्र मान होता. देवीचे नवरात्र आपण पाळतो. विविध गावी देवीच्या यात्रा भरतात. प्रत्येक घराला कुलस्वामिनी दिलेली आहे. शेवटी ती शक्ती आहे. आणि पुरुष शिव आहे. म्हणून आजही संसाराचे रहाटगाडगे चालू आहे. शिवशक्ती मिळून संसार होतो हे वैश्विक सत्य आहे. शिव म्हणजे पुरुष तत्त्व आणि शक्ती म्हणजे स्त्रीतत्व. यांचे अद्वैत म्हणजे संसार. संसारामध्ये नेहमी दांपत्यमूल्य नसते. आपण देवाची पूजा करताना सुद्धा लक्ष्मी नारायण म्हणतो. ही दोन तत्वे विश्वाचे दोन हात आहेत. वेदात वचन आहे 'यत्र नार्यस्तु पूज्यंन्ते रमन्ते तत्र देवताः' असा भारतीय संस्कृतीने स्त्री शक्तीचा गौरव केलेला आहे. मुलाला शाळेमध्ये पहिल्यांदा 'अ अ आईचा' शिकविला जातो. हे सगळे इतके स्वच्छ असताना आपल्या वागण्यात इतकी विषमता का असावी? यात कसली कर्मठता आली आहे. देव कधी तरी भ्रष्ट होतो का? त्याचे देवपण अखंड असते. ते कोणालाही नाकारता येत नाही. तरीही अशा कुप्रथा समाजाने का पाळाव्यात? त्यामुळे समाज मागासपणाकडे झुकतो आहे. स्त्री आणि पुरुष या दोघांचाही विकास समृद्धपणे झाला पाहिजे अशा घोषणा करायच्या. मातृदिन थाटामाटात साजरे करायचे. तेवढ्या दिवसापुरते फोटो काढून त्यांचे सत्कार करायचे, त्यांचा सन्मान करायचा आणि पुन्हा हा कर्मठ ढोंगीपणा चालूच आहेच.

आज भारतीय संरक्षण क्षेत्रात कितीतरी आघाड्या महिला सांभाळताहेत. त्या ज्या जिद्दीने कामे करताहेत त्याला तोड नाही. सैनिकांबरोबरच त्या आमच्या राष्ट्राच्या मानबिंदु आहेत. त्यांचा अधिकार केव्हाही मोठा आहे. त्या आपला संसारही सांभाळतात आणि देशाच्या संसारालाही मदत करतात. अशा विविध प्रांतातील कर्तबगार महिला आज देवतासमान आहेत. मानवजातीच्या हितासाठी काही महिला शास्त्रज्ञांची संशोधने आज विज्ञानाला उपकारक ठरली आहेत. जिथे प्राणवायू मिळत नाही तिथे महिला पोहोचल्या आहेत. ही नुसती साहसाची कामे नाहीत. त्यांचे धैर्य आणि त्यांचे शौर्यही खरोखर अभिमानास्पद आहे. महत्त्वाचे सल्ले देण्याबाबत त्यांची समर्थ प्रगल्भता आजही विचारात घेतली जाते. माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांचा युनोवर जो वचक होता त्यामुळे जगाचे नेते त्यांना मानत असत. मार्गारेट थॅचर बाईंनी ज्या आर्थिक संकटातून ब्रिटनला सोडविले त्यामुळे बाईंचा राष्ट्रीय दबदबा फार वेगळ्या अर्थाने निर्माण झाला होता. जर्मनीच्या पंतप्रधान अंजली मार्केल बाईंनी चौथ्यांदा निवडून येऊन जर्मनीच्या पुढच्या तीस वर्षांचा वीजेचा प्रश्न सोडवून टाकून राष्ट्र मजबुतीने उभे केले. इंग्लंडच्या पंतप्रधान थेरेसा मे यांना ब्रेक्झिटच्या पार्श्वभूमीवर जो लढा द्यावा लागतो आहे ती ही महत्त्वाची बाब आहे. या सर्वांचा आपण गांभीर्याने विचार केला पाहिजे.

वैचारिक स्वातंत्र्य जर दुबळे पडले तर त्यामुळे हे सगळे गोंधळ निर्माण होतात. या सगळ्यांना बरोबर घेऊन जाणारा नेता जर समंजस नसेल तर काय होते हे आज आपण मोदींच्या रुपाने पाहतोच आहोत. राजकारणात हट्टीपणा चालत नाही. सगळ्यांचे टीमवर्क नीटच असले पाहिजे. ते एकमेकांना पूरक असायला हवे. चौघांची तोंडे चारही दिशेला गेली तर निर्णयांचा गोंधळ माजतो. राष्ट्राला वाचावीर नको असतात. कर्तृत्त्वाची ग्वाही देणारा व प्रत्यक्ष कृती करणारा कणखर नेता लागतो. त्याचे धोरण दूरगामी असावे लागते. त्याच्यात सहृदयतेचा आणि सकारात्मकतेचा भाव असावा लागतो. त्याच्यासमोर श्रीमंत आणि गरीब अशी दरी नको. त्याच्यासमोर माझ्या देशातला माणूस निर्भयपणे जगला पाहिजे. त्याला त्याची भाकरी सुखाने खाता आली पाहिजे. त्याला त्याचे वैचारिक स्वातंत्र्य आबादित राखता आले पाहिजे. हा दृष्टिकोन असावा लागतो. दडपशाहीने कोणतेही तत्त्वज्ञान टिकत नाही. हा आजपर्यंतचा इतिहास आहे. हे सारे जर लक्षात घेतले तर आता आत्मचिंतनाची व सरकार बदलण्याची हीच योग्य वेळ आहे हे भान देण्यासाठी आम्ही कळकळीचे आवाहन करीत आहोत. सावध! ऐका पुढल्या हाका!



# एकजुटीने मोदी

पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या पुढाकाराने २० जानेवारी २०१९ रोजी कोलकाता येथे महागठबंधन रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली जातीयवादी व धर्मांध एनडीए सरकारला सत्तेवरून खाली खेचण्यासाठी आगामी लोकसभा निवडणुकीत सर्व धर्मनिरपेक्ष शक्तींनी एकत्र येऊन संघटितपणे निवडणूक लढविण्याचे ठरविले आहे. त्यासाठी अनेक राजकीय पक्षांचे नेते आपापसातले मतभेद विसरून एकत्र आले असून, भाजपचा या निवडणुकीत पराभव करायचा या उद्देशाने त्यांनी आपापसांत युती करून जागा वाटून घेऊन एकजीवाने लढण्याचे ठरविले आहे. या सर्व विरोधकांच्या एकजुटीचे दर्शन या रॅलीतून घडले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी केलेले हे भाषण.



# सरकार हटवू

## शरद पवार

पश्चिम बंगालच्या लोकप्रिय मुख्यमंत्री व आमच्या दीदी ममता बॅनर्जी, व्यासपीठावरील सर्व मान्यवर आणि लोकशाहीचे रक्षण करण्यासाठी लाखोंच्या संख्येने जमलेल्या माझ्या बंधू-भगिनींनो... मला खूप आश्चर्य वाटतंय की गेल्या पाच तासांपासून आपण इथे बसलेले आहात. देशातील विविध भागांतून आलेल्या नेत्यांचं म्हणणं आपण शांतपणे ऐकून घेत आहात. ज्या तऱ्हेने आपण एकतेचे दर्शन घडवत आहात त्यामुळे व्यासपीठावर बसलेल्या आम्हा सर्व नेत्यांचा उत्साह आणि अपेक्षा खूप वाढल्या आहेत. आमची जबाबदारीही वाढली आहे. त्यामुळे सर्वप्रथम आपणा सर्वांना धन्यवाद देतो. आपल्याला एवढ्या मोठ्या संख्येने संघटित करण्याचे काम ममतादीदींनी केलं याबद्दल त्यांचेही मनःपूर्वक आभार!




गेल्या पाच वर्षांत भारतीय जनता पक्षाच्या हातात देशाची सत्तासूत्रे गेली. ज्या विश्वासाने जनतेने त्यांना सत्ता प्रदान केली त्या जनतेचाच विश्वासघात करण्याचं काम या मोदी सरकारने केलं या निष्कर्षाप्रत देशातील जनता आली आहे. लोकशाहीमध्ये संस्थांना फार महत्त्व आहे. लोकशाही मजबूत करण्याचे काम संवैधानिक संस्था करत असतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अत्यंत मेहनतीने देशाची राज्यघटना तयार





केली. आज या राज्यघटनेवरच हल्ला होत आहे. तिची विटंबना केली जात आहे. देशातील महत्त्वपूर्ण संस्था मग ती रिझर्व बँक असो; न्यायव्यवस्था असो; प्रसारमाध्यमे किंवा सीबीआयसारखी महत्त्वाची संस्था असो; या संस्था कमजोर करण्याचे काम मोदी सरकारच्या माध्यमातून होत असल्याचे आपण सर्व पाहत आहोत.

मोदी सरकारने नोटाबंदी, नवी करप्रणाली यासारखी पावले उचलली. मात्र अविचाराने घेतलेल्या या निर्णयांमुळे होणारे दुष्परिणाम आपण भोगत आहोत आपणा सर्वांची म्हणजे लाखो नागरिकांची भूक जे भागवतात ते गावोगावचे शेतकरी आत्महत्या करू लागले आहेत. असे या निर्णयांचे भयानक दुष्परिणाम आहेत. उद्योग बंद, बेरोजगारी ही स्थिती ज्या लोकांनी या देशात पैदा केली त्यांना सत्तेवरून हटवणं, हे तुमचं आणि आमचं कर्तव्य आहे. यासाठीच ममतादीदींनी आम्हा सर्वांना इथे एकत्र बोलावलं आहे. यानिमित्तानं मी



आम्हा सर्व नेत्यांच्या वतीने ममतादीदींना अशी खात्री देतो, की आम्ही सर्व एकत्र येऊन लोकभावना पूर्ण करण्याचा प्रयत्न करू त्यासाठी आवश्यक असलेली एकजूट आम्ही निश्चितपणे दाखवू. भाजपचे नेते टीका करताना म्हणतात, की ही महाआघाडी टिकणार नाही. या आघाडीतील नेत्यांमध्ये पंतप्रधानपदावरून भांडणे होतील. मी आपणा सर्वांना ठामपणे सांगू इच्छितो, की कुठल्याही पदाची अपेक्षा ठेवून आम्ही एकत्र आलेलो नाही. आपणा सर्वांच्या हितरक्षणासाठी देशात चांगला बदल घडवण्यासाठी आम्ही एकत्र आलो आहोत. आज या निमित्ताने मी आपणा सर्वांना आश्वासन देतो की माझ्यासह सर्व समविचारी पक्षांची ज्येष्ठ सहकारी नेते एकजूट दाखवून देऊ. आम्हा सर्व नेत्यांवर सर्वसामान्य जनतेने भरपूर प्रेम केले. मला गेली पन्नास-साठ वर्षे लोकसभा आणि विधानसभेवर जनतेने सलगपणे निवडून दिलं आहे.जनतेच्या प्रेमामुळेच मी



महाराष्ट्राचा चार वेळा मुख्यमंत्री झालो. भारत सरकारमध्ये अनेक वर्षे काम करण्याची संधी मला मिळाली. आता मला व्यक्तिशः काहीही नको. आम्हाला जनतेच्या हिताचे रक्षण करायचे आहे. शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण करायचे आहे महिला दलित अल्पसंख्यांक बांधवांचे हितरक्षण आम्हाला करायचे आहे. युवकांचे भविष्य आम्हाला उज्वल करायचे आहे. त्यासाठीच आम्ही आपणा सर्वांना आश्वासन देतो, की आम्ही एकत्र राहून आपल्या हितरक्षणासाठी संघर्ष करू. मोदी सरकार हटवण्यासाठी आपणा सर्वांच्या मदतीनं आम्ही सर्वतोपरी मेहनत करू, असा विश्वास मी आपणाला या निमित्ताने देतो. जय हिंद! जय बांगला!!

## देशात मोदींविरोधी लाट

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, केंद्रीय तपास यंत्रणा (सीबीआय), प्राप्तीकर विभाग, सर्वोच्च न्यायालय, यांसारख्या महत्त्वाच्या संस्थांवर व त्यांच्या स्वायत्ततेवर सतत हल्ले करुन त्यांचा वापर आपल्या व पक्षाच्या राजकारणासाठी करण्याचे धोरण जे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अवलंबिलेले आहे त्यामुळे देशाची लोकशाही धोक्यात आलेली आहे. आणीबाणी सदृश्य परिस्थिती मोदींनी देशात निर्माण केली असून 'हम करे सो कायदा' या पद्धतीचा अवलंब केल्यामुळे जनतेचे स्वातंत्र्य धोक्यात आले आहे. ब्रिटिशांविरुद्ध आपल्या जनतेने जो प्रखरपणे १५० वर्षे लढा दिला तो स्वातंत्र्यासाठीच होता. स्वातंत्र्यातच जनतेचा विकास होऊ शकतो. दडपशाहीने अराजक माजून मूठभरांचे फावते पण देश उध्वस्तीकरणाच्या दिशेने जातो हे जगाने अनेकदा पाहिलेले आहे. हिटलर, मुसोलिनी, सद्दाम हुसेन यांसारखे अनेक हुकुमशहा जगाने पाहिले आणि त्यांच्या मनमानी कारभाराने देशाचे किती प्रचंड नुकसान झाले हेही अनुभवले. आपला भारत देश हा त्या दिशेने जाऊ नये, तो एकसंघ राहावा, सर्व जाती-धर्माच्या लोकांमध्ये ऐक्य व शांतता नांदावी आणि सर्व समाजांना प्रगतीची संधी मिळावी यासाठी तसे आवश्यक असणारे शांतता, सलोखा व धर्मनिरपेक्षतेचे वातावरण तयार करण्यासाठी मोदी सरकार सत्तेवरुन घालविणे आवश्यक आहे यासाठी सर्व विरोधी पक्षांची एकजूट होणे अनिवार्य होऊन बसले आहे. देशात मोदींच्या विरोधी लाट आहे.

# मोदी सरकारचा अंत निश्चित!

**ममता बॅनर्जी**

व्यासपीठावर जमलेल्या सर्व मान्यवर नेत्यांचे मी आभार मानते. व्यासपीठावर 'युनायटेड इंडिया'चे दर्शन आज घडत आहे. या सर्व नेत्यांना एकत्र पाहिल्यावर 'सारे जहाँ से अच्छा हिन्दोस्ता हमारा...'ची प्रचिती येत आहे. या मेळाव्यामध्ये २५-२६ पक्षांनी भाग घेतला आहे. औषधाची जशी 'एक्सपायरी डेट' असते, तशी आमच्या या एकजुटीमुळे आगामी काळात मोदी सरकारची मुदत संपणार आहे. त्याची एक्सपायरी डेट संपल्याची खात्री पटते. त्यामुळे आगामी निवडणुकीनंतर नवप्रभात उजाडेल. त्यासाठी आवश्यक एकजुटीचे दर्शन आम्ही सर्वजण घडवू, याची खात्री मी आपणा सर्वांना देते.

ही बंगालची भूमी पवित्र भूमी आहे. साहित्यिक, शिल्पकार, चित्रकार, समाजसुधारक, स्वातंत्र्यसैनिक, राजकीय नेते, संसदपटू या भूमीने दिले. या भूमीने विविध आंदोलने पाहिली विविध आंदोलनांद्वारे जनजागरण घडवण्यामध्ये बंगाल अग्रभागी आहे. सध्याच्या केंद्रातील सरकारने भारतातील लोकशाही व्यवस्था धोक्यात आणली आहे. त्याविरुद्धही याच बंगालच्या भूमीवरून देशव्यापी चळवळीची आज सुरुवात होत आहे.


आत्ताच अरविंद केजरीवाल म्हणाले, त्याप्रमाणे पाकिस्तानने जेवढे आपले नुकसान केले, त्यापेक्षाही जास्त नुकसान गेल्या चार वर्षांत मोदी सरकारने केले आहे. देशातील लोकशाहीप्रणित संस्था नष्ट करण्याचे काम या सरकारने केले. रिझर्व बँक, सीबीआय, करप्रणाली, अर्थव्यवस्था, लोकशाही व्यवस्था कमजोर करून भारतीय जनता पक्ष एकटाच प्रबळ होण्याचा प्रयत्न करत आहे. या संस्था बदनाम केल्या जात आहेत. बीएसएफ-सीआरपीएफसारख्या सुरक्षा दलासंदर्भातही राजकारण केले जात आहे .नोटाबंदी आणि जीएसटीसारखे अन्यायकारक निर्णय घेऊन मोदी सरकारने देशाला लुटले आहे. नोटाबंदीमुळे दोन कोटी लोक बेरोजगार झाले आहेत. पूर्वेकडील राज्यांमध्ये अन्यायकारक नागरिकत्व विधेयक या सरकारने आणल्याने असंतोष आहे. प्रत्येकाच्या खात्यात १५ लाख देण्याचे आश्वासन मोदीजींनी दिले



होते. बेरोजगारांना रोजगारी भत्ता देण्याचे आश्वासन त्यांनी दिले होते. पण कोणालाही काहीही दिले नाही. जनतेने त्यांना चांगली संधी दिली होती. मात्र, त्यांनी ती गमावली आहे.

अशा या अन्यायकारक मोदी सरकार विरुद्ध त्याच्या सर्व विरोधकांनी एकत्र आले पाहिजे मी सर्व समविचारी पक्षांना आणि त्यांच्या नेत्यांना आवाहन करते, की हे मोदी सरकार हटवण्यासाठी आपण एकजुटीचे दर्शन घडवायला हवं. मोदी आमच्यावर टीका करताना विचारतात, की आमचा नेता कोण आहे? मी त्यांना सांगू इच्छिते, की आमच्या या महाआघाडीमध्ये प्रत्येक जण नेता आहे. भारतीय जनता पक्षच नेतृत्वहीन झाला आहे. त्यांच्याकडे फक्त पंतप्रधान आणि पक्षाचे अध्यक्ष आहेत; इतर नेत्यांना काहीही महत्त्व नाही. मात्र, महाआघाडीमध्ये प्रत्येक नेता कुशल संघटक आहे. प्रत्येक जण कार्यकर्ता आहे. देशहित जपण्यासाठी समविचारी पक्षांनी एकत्र आलेच पाहिजे. सामूहिक नेतृत्वावर आमचा दृढ विश्वास आहे. पंतप्रधानपदाची निवड निवडणुकीनंतर सर्वसंमतीने करण्यात येईल. मोदी सरकार हटवणे, हे आमचे पहिले कर्तव्य आहे.

या अहंकारी मोदी सरकारने स्वपक्षातील ज्येष्ठ नेत्यांकडे सुद्धा दुर्लक्ष केले. सध्याच्या भारतीय जनता पक्षाने जसवंत सिंग, अरुण शौरी, यशवंत सिन्हा, शत्रुघ्न सिन्हा या आपल्या ज्येष्ठ नेत्यांकडे दुर्लक्ष करून त्यांचा अपमान केला आहे. खरं तर या पक्षात सध्या असलेल्या राजनाथ सिंह, सुषमा स्वराज, नितीन गडकरी या ज्येष्ठ नेत्यांनाही मान दिला जात नाही. आगामी निवडणूक झाल्यानंतर त्यांना बाजूला केले जाईल. या अहंकारी मोदी सरकारने सर्व अधिकार स्वतःकडे एकवटण्याचा प्रयत्न चालवला आहे. केंद्र सरकार ज्याप्रमाणे निवडणुकीद्वारे निवडून येते, त्याचप्रमाणे राज्य सरकारही निवडणूक प्रक्रियेतून निवडून येतात; मात्र विरोधी पक्षांच्या राज्य सरकारांना तुच्छ लेखण्याचे काम, या सरकारांना सत्तेवरून घालवण्याचे प्रयत्न मोदी सरकार करत आहे. कर्नाटकमध्ये कुमार स्वामी सरकार घालवण्यासाठी आमदारांना आमिषे



दिली जात आहेत. मोदी सरकार इतिहास बदलत आहे, भूगोल बदलत आहे, राज्यघटना बदलत आहे, आपले प्रजासत्ताक बदलण्याचा प्रयत्नही त्यांनी चालवला आहे. असे चुकीचे बदल घडवणाऱ्या सरकारला मी सांगू इच्छिते, 'बहार बदले...मौसम बदले...दुनिया का हर चीज बदले...तो फिर भाजपा का सरकार क्यू न बदले?' त्यामुळे हे सरकार आपल्याला बदलायचे आहे. त्यामुळे ज्या भागात जो शक्तिशाली नेता आहे त्याला पाठिंब्याद्वारे ताकद देण्याची गरज आहे. त्यासाठी एकत्र येऊयात.


हिंदू म्हणजे त्याग, मुसलमान म्हणजे इमान, ख्रिश्चन म्हणजे प्रेम, शिख म्हणजे बलिदान. अशा सर्वांचा मिळून आपला प्रिय हिंदुस्तान झाला आहे. सर्वांना घेऊन जो राजकारण करेल, तोच देशाचा नेता होऊ शकेल. बंगालमध्ये रथयात्रा काढून येथील सामाजिक, जातीय सलोखा धोक्यात आणला जात आहे. आम्हाला श्रीकृष्णाचा, जगन्नाथाचा रथ माहिती आहे. बंगालमध्ये रथयात्रा वगैरे काढून भाजपाचा येथे दंगल घडवण्याच्या हेतू आहे.आम्ही हे कदापिही घडू देणार नाही. उत्तर प्रदेश, बिहारमध्ये भाजपा असेच प्रयत्न करेल. मात्र, विरोधकांनी पुरेशी काळजी घ्यावी. उत्तर प्रदेशमध्ये अखिलेशजी आणि मायावतीजी एकत्र आले आहेत. काश्मीरमध्ये फारूक अब्दुल्ला, उमर अब्दुल्ला आमच्याबरोबर आहेत. बिहार मध्ये लालूप्रसाद, तेजस्वी यादव आमच्याबरोबर आहेत. गुजरात मध्ये हार्दिक पटेल आणि जिग्नेश मेवाणी या युवक नेत्यांना माझे आवाहन आहे, की तुम्ही दबावाला बळी पडू नका. आम्ही तुमच्याबरोबर आहोत. गेगांग अपांग भाजपा सोडून आमच्याबरोबर आलेत. बंगाल, बिहार, दिल्ली, उत्तरप्रदेश, काश्मीर, पंजाब, तामिळनाडू, आंध्र प्रदेश, आसाम, अरुणाचल, नागालॅंड अशा सर्व राज्यांमधील जनतेची मानसिकता या सरकारविरोधी झाली आहे. आता कितीही प्रयत्न केले तरी भारतीय जनता पक्षासाठी 'अच्छे दिन' येणार नाहीत. जर या देशाला सुस्थितीत राखायचं असेल, या देशातील शेतकऱ्यांचे हित साधायचं असेल, युवकांचे भवितव्य उज्ज्वल ठेवायचं असेल, कामगारांना-मजुरांना रोजगार हवा असेल तर, सर्व जाती-धर्मांत सलोखा हवा असेल तर मोदी सरकार पुन्हा सत्तेवर येता कामा नये. हे सरकार जर पुन्हा आलं तर देश बुडेल.भाजपाला आगामी निवडणुकीत एकही मत देऊ नका. ते सत्तेवरून हटवणंच देशासाठी मंगलकारक असेल. सरफरोशी की तमन्ना अब हमारे दिल मे है । देखना है जोर कितना बाजू ए कातिल में है... ।। बदल दो, बदल दो दिल्ली सरकार बदल दो...बीजेपी हटाओ देश बचाओ. वंदे मातरम्!

# सर्वांच्या साथीने नवपरिवर्तन घडवू

इतकी जानदार, शानदार आणि दमदार सभा याआधी मी पाहिली नव्हती. हा चमत्कार बंगालच्या भूमीतील आमची बहीण आणि बंगालची क्रांतिकारी नेता मुख्यमंत्री ममतादीदी बॅनर्जी यांनी घडवून आणला आहे. राज्यघटनेच्या रक्षणासाठी, देशाच्या रक्षणासाठी, देशाला योग्य आणि नवी दिशा देण्यासाठी देशाच्या अपेक्षांच्या अनुरूप चांगले आणि नवे नेतृत्व देण्यासाठी, आम्ही येथे एकत्र आलो आहोत. व्यासपीठावर उत्तर-दक्षिण-पूर्व-पश्चिम अशा सर्व भागांतून आलेले नेते विराजमान आहेत. त्यांचे विचार आपण ऐकले. या सभेद्वारे मी आपल्या देशाचा मूड पहात आहे. आपणा सर्वांचे एकच लक्ष्य आहे. ते म्हणजे परिवर्तन! नव्या नेतृत्वाच्या मार्गदर्शनानुसार देशात योग्य दिशेने परिवर्तन घडवून आणावे, असे आपणा सर्वांना मनापासून वाटत आहे. या सभेत मी तरुण मोठ्या संख्येने पाहत आहे. त्यांच्यात हा बदल घडविण्यासाठीचा जबरदस्त जोश आहे. चैतन्य दिसत आहे.

मला अनेकजण विचारतात, की तुम्ही भारतीय जनता पक्षात असूनही भाजपविरुद्ध का बोलता? अशी बंडखोरी तुम्ही का करता? जर सत्य बोलणं बंडखोरी असेल, तर होय मी बंडखोर आहे. मी या क्षणापर्यंत भाजपमध्ये आहे. परंतु आत्ताच माझे सहकारी आणि माजी अर्थमंत्री-परराष्ट्रमंत्री यशवंत सिन्हा यांनी सांगितलं, की या सभेनंतर तुला भाजपमधून काढून टाकतील. खरं तर मला पक्षातून काढलं तरी चालेल. भारतीय जनता पक्षाच्या आधी मी भारतीय जनतेशी बांधील आहे. मी जनतेशी एकनिष्ठ आहे. मी जे काही बोलतो, करतो किंवा जे काही बोलेल आणि करेल ते केवळ जनहितासाठीच असेल. व्यक्तीपेक्षा मोठा पक्ष असतो. पक्षापेक्षा देश मोठा असतो आणि देशापेक्षा दुसरं मोठं काहीही नसतं. त्यामुळे मी देशहितासाठी काम करतो त्यावेळी मी पक्षासाठीच काम करत असतो. ही लोकशाही आहे. येथे एककल्ली कारभार चालणार नाही. मला विचारलं जातं, की श्रद्धेय अटलबिहारी वाजपेयी यांच्यात आणि सध्याचे नेतृत्वात तुम्हाला काय फरक दिसतो? वाजपेयींच्या काळामध्ये लोकशाही होती. सध्याच्या काळामध्ये हुकूमशाही आहे. असं कदापिही चालणार नाही.

त्यांनी एका रात्रीत तुघलकी फर्मान काढून नोटा बंदीचा निर्णय घेतला. मात्र रोजंदारी करणारे, दोन वेळचं खाणं मिळणं मुश्कील असणाऱ्या पदपथावरील गरीब, शेतकरी मजूर यांच्यावर या निर्णयाचा काय दुष्परिणाम होईल, याचा त्यांनी विचारही केला




नाही. कुणालाही न विचारता हा निर्णय घेण्यात आला. त्यावर मी टीका केली, तेव्हा मला आमच्या पक्षातले म्हणाले, की हा निर्णय आपल्या पक्षाने घेतला आहे. मग तुम्ही टीका का करता? त्यांना मी सांगितलं, की हा निर्णय पक्षाचा निश्चितच नव्हता. जर तो तसा असता तर त्यांना गुरुस्थानी असणाऱ्या अडवाणींना, तसेच मुरलीमनोहर जोशी, यशवंत सिन्हा, अरुण शौरी आणि अगदी मलाही या निर्णयाची पूर्वकल्पना मिळाली असती. लोक तर असं म्हणतात, की देशाच्या अर्थमंत्र्यांनाही हा निर्णय ठाऊक नव्हता. पंतप्रधान कार्यालयाने एकट्याने एवढा मोठा निर्णय घेऊन टाकला. परिणामी एटीएमपुढे रांगा लागल्या. या रांगेत उभे राहून काही जण मृत्युमुखी पडले. आत्महत्या झाल्या. हृदयविकाराच्या झटक्याने काही जणांना आपला प्राण गमवावा लागला. व्यापारी, छोटे कारखानदार, रोजंदारी करणारे, गृहिणी सर्वजण या निर्णयाने अडचणीत आले. चांगल्या हेतूने अडल्यानडल्या वर उपयोगी पडेल या हेतूने गृहिणी घरात ठिकठिकाणी पैसे साठवून ठेवतात. या एका निर्णयाने त्यांचे पैसे बुडाले. हे चुकीचे आहे. हा अन्याय आहे. नोटाबंदीच्या धक्क्यातून सावरत होतो, तोच गुंतागुंतीची करप्रणाली असलेला जीएसटी लादून आपल्याला धक्का दिला गेला. काँग्रेसच्या अध्यक्षपदी येऊन वर्षभरात तीन मोठ्या राज्यांत विजय मिळवणाऱ्या राहुल गांधींनी या जीएसटीचे वर्णन 'गब्बरसिंग टॅक्स' असं केलं आहे, ते अगदी योग्यच आहे. या करप्रणालीमुळे व्यापारी बुडाले. वर्षांमध्ये ३६५ दिवस असतात. मात्र जीएसटीमध्ये आत्तापर्यंत ३६७ दुरुस्त्या झाल्या आहेत. अगदी अविचाराने हा निर्णय घेतल्यानेच त्यांना असं करावं लागत आहे. पंतप्रधान मोदी गुजरातच्या मुख्यमंत्रिपदी असताना त्यांनी जीएसटीला कडाडून विरोध केला होता. मात्र, पंतप्रधान झाल्यावर ते पलटले आणि त्यांनी जीएसटी लागू केला. संसदेत जीएसटी मंजूर करताना त्यांनी दुसरे स्वातंत्र्य मिळत असल्याची घोषणा केली. अहो हे कसले दुसरे स्वातंत्र्य? खरं तर यामुळे देशातील जनता गुलामगिरीच्या खाईत ढकलली गेली आहे. या निर्णयाचा फायदा फक्त सीएंना झाला. अगदी मंदिरातल्या दक्षिणाही बंद होऊन, पुजारी अडचणीत आले आहेत तर गुरुद्वारामधल्या लंगरवरही जीएसटी लागू केला आहे. हा काय तमाशा आहे? नोटाबंदी आणि जीएसटी म्हणजे कडूलिंबाला कारले आल्यासारखे आहे.

या सरकारच्या काळात तसे अनेक गैरप्रकार झाले आहेत मात्र सर्वाधिक वाईट राफेल विमानांच्या खरेदीतील गैरव्यवहार आहे. या प्रकरणी कोण दोषी अथवा निर्दोष, या तपशीलात मी जात नाही. मात्र, हे प्रकरण तुम्ही जितके दाबाल, तितका तुमच्यावर देशवासीयांकडून आरोप होईल, की चौकीदार चोर आहे... यासंदर्भात विचारवंत एन. राम यांनी असे सांगितले आहे, की या व्यवहारांमध्ये देशाला ४१ टक्के तोटा झाला आहे. म्हणजेच कोणी तरी त्याचा गैरफायदा घेतला आहे. राफेलप्रकरणी तीन प्रश्नांची उत्तरे मोदी सरकारला द्यावी लागतील. पहिला प्रश्न म्हणजे १२६ विमानांची गरज असताना ३६ विमाने का घेतली? दुसरा प्रश्न : ५३० कोटींची विमाने सोळाशे कोटींना म्हणजे तिप्पट भावाने का खरेदी केली? तिसरा प्रश्न : सुखोईसारखी विमाने बनवणाऱ्या आपल्या देशातील एचएएल या कंपनीला हे काम न देता दहा-बारा दिवसांपूर्वी स्थापन झालेल्या आणि ज्या कंपनीने सायकलचे साधे चाकही बनवले नाही अशा कंपनीला हे काम कसे सोपवले गेले? या तीन प्रश्नांची उत्तरे हे सरकार देणार नाही, तोपर्यंत 'चौकीदार चोर है' हा आरोप तुमच्यावर होतच राहणार. हे सरकार फक्त आश्वासने देत आहे. त्यांच्याकडून भरीव कामगिरी होत नाही. स्टार्ट अप इंडिया, मेक इन इंडिया, जनधन योजना, मुद्रा योजना, उज्वला गॅस योजना अशा योजनांच्या एका वरचढ एक घोषणा करण्यात आल्या. मात्र, प्रत्यक्षात काहीही भरीव झालेले नाही. गॅस सिलेंडर महाग होत आहेत. चिनी उत्पादनांप्रमाणेच गुणवत्ता आणि वाजवी दरामध्ये आपली भारतीय उत्पादने अद्याप खूप मागे आहेत. त्यामुळे परिस्थितीत कुठलाही बदल झालेला नाही. आता निवडणुकीचा काळ आहे. या काळात आणखी मोठमोठी नवी आश्वासने दिली जातील. देशासमोरील प्रश्नांवरून लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न होईल. भलत्याच प्रश्नांकडे लक्ष वळवले जाईल. अयोध्येतील राम मंदिराचा प्रश्न सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असताना पुन्हा उकरून काढला जाईल. मुळात नदीच नसताना त्यावर पूल बनवण्याची खोटी आश्वासने दिली जातील. या सर्व पार्श्वभूमीवर आपण सर्वांनी सावध राहून एकजूट राखण्याची गरज आहे. आपल्यात एक वेळ मतभेद झाले तरी चालतील मात्र मनभेद होता कामा नये. सर्वांना एकत्र घेऊन आपण वाटचाल करू. तसे केल्यास कवितेच्या पुढच्या ओळी सार्थ ठरतील.

**दाद देती है गर्दिश ए दौरा**
**जिंदगी एहतराम करती है।**
**इश्क जब मौत से टकराता है**
**मौत झुक कर सलाम करती है।**

व्यासपीठावरील सर्व मान्यवर नेत्यांच्या नेतृत्वाखाली आपण सर्वांना बरोबर घेऊन वाटचाल करू आणि देशात नवपरिवर्तन नक्कीच घडवून आणू. हम होंगे कामयाब! जय बंगाल!! जय हिंद!!!

# धोकादायक मोदी सरकारला हटवा



## यशवंत सिन्हा

मी ममता बॅनर्जी यांचा खूप आभारी आहे त्यांनी येथे निमंत्रित करून मला येथे दोन शब्द बोलण्याची संधी दिली. आज देशातील मोठ-मोठे नेते या व्यासपीठावर एकत्र आले आहेत. हे सर्व येथे एकत्र कशासाठी आले आहेत? विद्यमान सरकारला हटवणे, हे आम्हा सर्वांचे ध्येय आहे. मी जरी भारतीय जनता पक्ष सोडला असला, तरी आजची आपली ही सभा पाहून भाजपच्या नेत्यांची काय प्रतिक्रिया असेल, हे मला चांगले ठाऊक आहे. ते म्हणतील, की हे सर्वजण एका व्यक्तीला हटवण्यासाठी एकत्र आले आहेत. देशाचे पंतप्रधान मोदी यांना हटवण्यासाठी आपण सर्व एकत्र आल्याची टीका भाजपकडून होईल. मात्र, मी आपल्याला हे ठामपणे सांगतो, की हा एका व्यक्तीचा प्रश्न नाही. हा प्रश्न एका विचारधारेचा आहे. त्या विचारधारेला विरोध करण्यासाठी आम्ही येथे एकत्र आलो आहोत.

गेल्या छप्पन्न महिन्यांमध्ये जे घडले आहे, त्यामुळे देशातील लोकशाहीला मोठा धोका निर्माण झाला आहे. देशात आता अशी कुठलीही लोकशाहीप्रणीत संस्था उरलेली नाही; जिला या सरकारने बरबाद केलेले नाही. त्यामुळे लोकशाहीचे रक्षण करण्यासाठी आम्ही सर्व येथे एकत्र आलो आहोत. आपल्या समोर 'मोदी' हा मुद्दा नसून; त्यापेक्षाही विविध अतिशय महत्त्वाचे मुद्दे आहेत. मोदी हा विरोधाचा मुद्दा करण्याऐवजी आपण देशासमोर उभ्या असलेल्या अनेक महत्त्वाच्या प्रश्नांना हात घालायला हवा. जशी देशाची लोकशाही व्यवस्था धोक्यात आली, तशीच अर्थव्यवस्थाही डबघाईला आली आहे

स्वातंत्र्यानंतर देशातील हे पहिले सरकार आहे, जे आकडेवारीचा खोटा खेळ करत आहे. आम्हीही सरकारमध्ये होतो परंतु आम्ही कधीही आकडेवारीचा खोटा खेळ केला नाही. आमच्या काळात कधी आकडेवारी अनुकूल असायची, कधी ती प्रतिकूलही असायची. मात्र, आम्ही ती जशीच्या तशी देशासमोर मांडायचो. मात्र, हे सरकार आकडेवारी सजवून धजवून सादर करते. खोटी आकडेवारी अथवा आकडेवारी फुगवून सांगितली जाते. आपली दिशाभूल करण्याचा हा प्रयत्न आहे. आपण सर्व जमिनीवर पाय असलेले आहोत. त्यामुळे वास्तव काय आहे याची आपणा सर्वांना जाणीव आहे.

याशिवाय सामाजिक फूट पाडण्याचा सामाजिक सलोखा धोक्यात आणण्याचा या सरकारचा इरादा आहे. ह्या सरकारने सत्तेवर येताना 'सबका साथ; सबका विकास' असा नारा दिला होता. प्रत्यक्षात त्यांनी सगळ्यांची साथ तर घेतली, मात्र सगळ्यांचा विकास करण्याऐवजी विनाश केला. त्यामुळे आपल्या देशाला या सरकारपासून वाचवायचे आहे.

या सरकारला जर कोणी विरोध केला तर त्याला त्वरित देशद्रोही ठरवले जाते. सरकारची चापलुसी करणे, चमचेगिरी करणे म्हणजे देशप्रेम आणि सरकारला विरोध करणे म्हणजे देशद्रोह अशी अजब तऱ्हा आहे. येथे जम्मू-काश्मीरचे फारुख अब्दुल्ला उपस्थित आहेत त्यांच्याशी काश्मीर प्रश्नावर चर्चा होत असते. काश्मीरचा प्रश्न बंदुकीच्या गोळीने नव्हे, तर प्रेमाच्या बोलीने होणार आहे. म्हणजे या प्रश्नी चर्चा-सुसंवाद गरजेचा आहे. प्रेमाच्या दोन शब्दांनी काश्मीर प्रश्न सुटण्यास मदत होईल. अशी मांडणी मी जेव्हा केली, तेव्हा मी देशद्रोही आहे, पाकिस्तानचा एजंट आहे, असा आरोप माझ्यावर करण्यात आला. प्रेमाच्या संवादातून हा प्रश्न सोडवण्याचा आग्रह धरणे म्हणजे पाकिस्तानची एजंटगिरी करणे आहे का?

अशा तऱ्हेने देश आता अत्यंत धोकादायक वळणावर उभा आहे. या व्यासपीठावर जमलेल्या सामर्थ्यशाली नेत्यांना मी असे आवाहन करू इच्छितो की माझी वाटचाल आता संन्यासाश्रमाकडे सुरू झाली आहे. मला आता माझ्या जीवनात काहीही नको आहे. या अविचारी सरकारला हटवणे आणि देशाला वाचवणे, या एकाच उद्देशाने माझा संघर्ष सुरू आहे. यासाठी व्यासपीठावर उपस्थित सर्व नेत्यांना मी आवाहन करतो, की आगामी निवडणुकीत प्रत्येक लोकसभा मतदारसंघात भारतीय जनता पक्षाच्या उमेदवाराविरुद्ध आपल्या महाआघाडीचा एकच उमेदवार उभा करावा. असं शक्य झाल्यास भारतीय जनता पक्षाचा पूर्ण देशातून निःपात होईल. माझ्या या आवाहनाला सर्व नेते प्रतिसाद देतील आणि आज जसे आपण या व्यासपीठावर एकत्र येऊन एकजुटीचे दर्शन घडवले आहे तसेच आगामी निवडणुकीतही एकजुटीचे दर्शन आपण घडवून या सरकारला हटवू.

# मोदी-शहांना हटवूनच 'अच्छे दिन'



**अरविंद केजरीवाल**

बंगालच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या आबालवृद्धांना तसेच देशाच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या विविध पक्षांच्या आदरणीय नेत्यांना माझा विनम्र प्रणाम! भारतीय राजकारणाच्या दृष्टीने हा अतिशय महत्त्वाचा ऐतिहासिक दिवस आहे. गेल्या पाच वर्षांमध्ये नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांनी या देशाचे वाटोळे चालवले आहे. या जोडीने आपल्या देशाचे खूप नुकसान केले आहे. त्यामुळे जनता त्रासली आहे.

देशातील युवक समस्याग्रस्त आहेत बेरोजगारीच्या प्रश्नाने ग्रासलेले आहेत. मोदीजींनी युवकांना रोजगार देण्याचे आश्वासन दिले होते. त्यांच्या आश्वासनावर विश्वास ठेवून युवकांनी त्यांना भरघोस मते दिली. मात्र, प्रत्यक्षात सत्तेवर आल्यावर मोदीजींनी रोजगार तर दिला नाहीच. उलट त्यांच्या नोटाबंदीच्या निर्णयामुळे या देशातील सव्वा कोटी नोकऱ्या संपुष्टात आल्या. भारतीय जनता पक्षावर देशातील शेतकरी प्रचंड संतप्त आहेत. शेतकरीवर्ग हलाखीचे जीवन जगत आहे. शेतकऱ्यांच्या पिकाचे नुकसान झाल्यावर मोदी आणि शहा ही जोडी त्यांना विमा कंपन्यांकडे सोपवते. असे नुकसान झाल्यास विमा कंपन्यांकडे जा, असे ते शेतकऱ्यांना सांगतात. या विमा कंपन्या मोदींच्या मित्रांच्या आहेत. शेतकरी जेव्हा या विमा कंपन्यांकडे जातात तेव्हा त्यांना एक पैसाही नुकसानभरपाई मिळत नाही. मात्र, विमा कंपन्यांनी हजारो कोटींचा नफा कमवला आहे. भाजपचे नेते सोशल मीडियाच्या माध्यमातून महिलांना अत्यंत गलिच्छ शिव्या देतात मात्र या देशाचा पंतप्रधान या नेत्यांना ट्विटरच्या माध्यमातून फॉलो करत असतो, याची मला शरम वाटते. देशातील दलितांवर अत्याचार होत आहेत त्यामुळे या देशातील दलितवर्ग अत्यंत दुःखी आहे. देशात ठिकठिकाणी जमावाने केलेल्या हल्ल्यात दलितांचे बळी जात आहेत. देशातील अल्पसंख्याक मुस्लिम बांधव भेदरलेले आहेत. त्यांच्यावर देशात ठिकठिकाणी अत्याचार झाले आहेत. होत आहेत.

आपला देश स्वतंत्र झाल्यापासून गेल्या सत्तर वर्षांमध्ये त्याला कमजोर करण्याचे अनेक प्रयत्न अनेकांकडून झाले. आपल्या देशाचे तुकडे करण्याचे प्रयत्न पाकिस्तानकडून अनेकदा झाले. मात्र, गेल्या सत्तर वर्षांत त्यांना यामध्ये यश आले नाही. पण गेल्या पाच वर्षांमध्ये मोदी आणि शहा ही जोडी यासंदर्भात मात्र यशस्वी झाली आहे. या जोडीने गेल्या पाच वर्षात या देशातील नागरिकांच्या मनामध्ये विषपेरणी केली. हिंदूहिंदूला मुस्लिमाविरोधात आणि मुस्लिमाला ख्रिश्चनाविरोधात लढण्याचं पातक मोदी-शहा जोडीने जोडीनं केलं. ही जोडी देशाला बरबाद करून टाकेल. याबाबत मी जितका विचार करतो तेवढा माझा थरकाप उडतो.

२०१९ च्या निवडणुकीनंतर जर पुन्हा मोदी आणि शहा यांची जोडी सत्तेवर आली तर मित्रांनो हा देश अस्तित्वात राहणार नाही. ते या देशाला बरबाद करतील. देशाचे विभाजन घडवून तुकडे तुकडे करतील. या सभेला लाखोंच्या संख्येने जमलेल्या जनसमुदायाच्या हृदयामध्ये मोदी-शहा यांच्या सरकारला उखडून टाकण्याचे एकच स्वप्न आहे. याच उद्देशाने आपण सर्व एवढ्या मोठ्या संख्येने एकत्र आला आहात. काही दिवसांपूर्वी अमित शहा यांनी अशी वल्गना केली होती, की २०१९ च्या निवडणुकीत जर आम्ही जिंकलो, तर २०५० पर्यंत आमचा कोणीही पराभव करू शकणार नाही. अमित शहा यांनी अशी वल्गना का केली? त्यामागे त्यांचे हेतू फार कुटील आहेत. धोकादायक आहेत. २०१९ मध्ये मोदी-शहा जोडी सत्तेवर आल्यास ते आपली राज्यघटना बदलून टाकतील. या देशातील निवडणुका बंद करून टाकतील. १९३१ मध्ये हिटलर जर्मनीचा चान्सलर बनला होता. काही दिवसांतच त्याने जर्मनीची राज्यघटना बदलून टाकली. त्याने निवडणुका बंद केल्या. मरेपर्यंत तोच जर्मनीचा चान्सलर राहिला. जर्मनीत जसे हिटलरने केले, तसेच मोदी आणि अमित शहा भारतात करू इच्छितात. ते या देशाचे संविधान म्हणजेच राज्यघटना बदलून टाकतील. त्यांना या देशातील लोकशाही संपुष्टात आणायची आहे. मित्रहो काहीही करा, परंतु २०१९ मध्ये या जोडीला पुन्हा सत्ता मिळू देऊ नका. मला अनेक जण विचारतात की जर मोदी नसतील, तर या देशाचे पंतप्रधानपदासाठी कोण लायक आहे? त्यांना मी सांगू इच्छितो, की २०१९ची निवडणूक कोणाला पंतप्रधान करण्याची निवडणूक नसून, मोदी आणि शहा यांना हाकलून देण्याची निवडणूक आहे. जो खरा देशभक्त आहे, ज्याच्या हृदयात ओतप्रोत देशप्रेम आहे त्या जनसमुदयातील सर्वांना आणि व्यासपीठावरील सर्व आदरणीय नेत्यांना माझे आवाहन आहे, की काहीही करा आणि २०१९ च्या निवडणुकीत मोदी-शहा जोडीला स्थान देऊ नका त्यांना सत्तेवरून हटवून टाका. आमच्यासह सर्व देशवासीय ममतादीदींचे ऋणी आहेत. त्यांनी आम्हा सर्वांना येथे एकत्र आणले. येथे येण्यापूर्वी माझ्या मनात साशंकता होती. मात्र, लाखोंचा जनसमुदाय आणि व्यासपीठावर एकत्र आलेले नेते पाहून मला खात्री पटली आणि मी निश्चिंत झालो आहे. मोदी आणि शहा यांचा पराभव आता अटळ आहे. आता देशात खऱ्या अर्थाने 'अच्छे दिन' येणार आहेत.

राष्ट्रवादी स्वाभिमानी आवाज! राष्ट्रवादी विचार !!

# मतांच्या जोगव्यासाठी खैरात!



## ना धड अर्थसंकल्प, ना धड लेखानुदान, सर्व अर्धवट

लोकसभेची निवडणूक केवळ तीन महिन्यांवर असताना आणि त्यानंतर नवीन सरकार सत्तेत येण्यासाठी फक्त चार महिन्यांचा काळ उरलेला असताना मावळत्या सरकारने केवळ लेखानुदान सादर करणे अपेक्षित असते. त्यामध्ये कोणत्याही धोरणात्मक घोषणा किंवा लोकांचा अनुनय करणाऱ्या सवलतींची घोषणा न करण्याचा लोकशाही संकेत आहे. आजतागायत जेवढी सरकारे देशात म्हणजेच केंद्रात सत्तेत आली त्यांनी या संकेताचे पालन केलेले आढळते. परंतु उर्मट व उद्दाम आणि लोकशाही संकेतांची पायमल्ली करणाऱ्या निर्बुध्द व बेमुर्वत नेतृत्वाकडून लोकशाही संकेतांच्या पालनाची अपेक्षा चुकीची आहे. निगरगट्टपणे अर्थसंकल्प सादर करण्याचा प्रकार नुकताच झाला. त्यामध्ये गरीब शेतकरी, असंघटित कष्टकरी आणि पगारदार मध्यमवर्गीय यांना मधाचे बोट लावण्यात आले. त्याला मधाचे बोटच म्हणावे लागेल कारण देशाचा राज्यकारभार सिनेमास्टाईलमध्ये व वेळोवेळी धक्कातंत्राचा वापर करुन चालविणाऱ्या फिल्मी नेतृत्वाने 'हा फक्त ट्रेलर आहे, मुख्य सिनेमा बाकी आहे' असे त्याच फिल्मी सडकछाप पध्दतीने जाहीर केलेले सर्वांनी ऐकले असेलच !

**आकाश**
**नवी दिल्ली**

वर्तमान सरकारने अर्थसंकल्प सादर केला खरा परंतु तोही अर्धवट स्वरुपाचा ! ना धड पूर्ण अर्थसंकल्प ना धड लेखानुदान ! सर्व अर्धवटपणा या अर्थसंकल्पात आढळून येतो. अर्थसंकल्पाचे काही मूलभूत पैलू असतात. सरकारकडे महसूल जमा कसा होतो, त्याचे स्रोत कोणते म्हणजे साध्या भाषेत सरकारकडे जमा होणारा रुपया(पैसा) आणि त्याचा खर्च व त्याचे तपशील की 10 पैसे शेतीवर, 2 पैसे संशोधनावर, 3 पैसे शिक्षणावर इ.इ. त्याचप्रमाणे सरकारतर्फे नवीन प्रकल्प, कार्यक्रम किंवा योजना किंवा सवलती यांची घोषणा केली जात असते व त्यासाठी साधनसंपत्तीची तरतूद काय असू शकते याचे तपशील असतात. यानंतर आगामी आर्थिक वर्षासाठीच्या आर्थिक वाटचालीची दिशा, आर्थिक उद्दिष्टे यांचेही तपशील अर्थसंकल्पात दिले जातात. सरकारने फार मोठा गाजावाजा करुन सादर केलेल्या या अर्थसंकल्पात काही किरकोळ सवलती आहेत परंतु त्यासाठी पैसा कोठून येणार याचे तपशील नाहीत. त्याचप्रमाणे प्राप्तीकरातील सवलतही पुढील वर्षी अमलात येणार आहे. असंघटित क्षेत्रातील कष्टकऱ्यांसाठी अर्थसाह्याची करण्यात आलेली घोषणा आणि लहान शेतकऱ्यांच्या खात्यात थेट दोनहजार रुपये दर चार महिन्यांनी म्हणजेच वर्षाला सहा हजार रुपये भरण्याची योजना जाहीर करण्यात आली आहे. यासाठी वार्षिक 75 हजार कोटि रुपयांचा अंदाजे बोजा सरकारी तिजोरीवर पडणार आहे आणि हा पैसा येणार कोठून याचा तपशील सरकारने दिलेला नाही. तसेच ही योजना 2017-18च्या आर्थिक वर्षाच्या अखेरच्या चार महिन्यांपासून सुरु होण्याची घोषणा असल्याने त्यासाठी वीस हजार कोटि रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

आता वस्तुस्थिती काय आहे याचा आढावा घ्यावा लागेल. सहा हजार रुपये वर्षाला म्हणजे महिन्याला पाचशे रुपये होतात. शेतकऱ्यांचे कुटुंब पाचजणांचे असल्याचे गृहीत धरले जाते. म्हणजेच त्या शेतकरी कुटुंबातील दरडोई साह्य दरमहा 100 रुपये होते. म्हणजेच दिवसाला सुमारे तीन रुपये 40 पैसे येतील. तीन रुपये चाळीस पैशात हल्ली कपभर चहा तरी मिळतो का असा प्रश्न स्वतःलाच विचारल्यास या योजनेची निरर्थकता लक्षात आल्याखेरीज राहणार नाही. दुर्बल व गरीब अल्पभूधारक शेतकऱ्यांची देशातील संख्या सुमारे बारा कोटि असल्याचे सरकारचे म्हणणे आहे. आता तज्ञ मंडळी या संख्येबद्दल प्रश्न करु लागली आहेत. त्याचप्रमाणे घोषणेची अंमलबजावणी हेही सर्वात मोठे प्रश्नचिन्ह असेल. कारण बारा कोटि शेतकऱ्यांची पूर्ण जंत्री सरकारकडे उपलब्ध आहे काय आणि त्या सर्वांची बँकांची खाती असणे तसेच ते खरोखर लहान शेतकरी याची खातरजमा यानंतरच प्रत्यक्ष पैसा जमा करण्याची बाब विचारात घ्यावी लागेल. म्हणजेच एकप्रकारे ही चलाखी आहे असे म्हणावे लागेल. आता चलाखी क्रमांक 2 -- प्राप्तीकरामध्ये सरकारने फार मोठी सवलत दिल्याचा आव आणलेला आहे. पाच लाख रुपयांपर्यंतचे वार्षिक उत्पन्न असलेल्यांना प्राप्तीकर भरावा लागणार नाही असे सरकारने जाहीर केले आहे. परंतु बारकाईने या तरतुदीचे अध्ययन केल्यास काही गोष्टी लक्षात येतात. प्राप्तीकर सवलतींच्या लाभासाठीच्या सर्व कपाती करुन जर तुमचे करपात्र उत्पन्न पाच लाख रुपये किंवा त्याहून कमी असेल तर तुम्हाला प्राप्तीकर भरण्याची आवश्यकता नसेल. परंतु सर्व सवलती व कपाती करुनही तुमचे उत्पन्न पाच लाखांपेक्षा अधिक असल्यास तुम्हाला प्राप्तीकराच्या वर्तमान दरानेच कर भरावा लागेल. म्हणजेच वीस टक्क्यांनी कर भरावा लागेल. वर्तमान कर-भरणीच्या ज्या विविध श्रेण्या आहेत त्यानुसार तीन लाख रुपयांपर्यंतचे उत्पन्न हे करमुक्त आहे. तीन लाख 1 रुपये ते पाच लाख रुपयांपर्यंत पाच टक्के प्राप्तीकर आकारला जात होता. पाचलाख 1 रुपयांपासून दहा लाख रुपयांपर्यंत वीस टक्के दर आकारला जातो आणि त्यानंतरच्या उत्पन्नावर तीस टक्के कर आकारला जातो. थोडक्यात सरकारने पाच टक्क्यांच्या श्रेणी रद्द केली आणि थेट वीस टक्के दराच्या श्रेणीपासून सुरुवात करण्याची ठरवलेले दिसते. ही कर-आकारणी पध्दती पूर्णतया अशास्त्रीय मानली जाते. सध्या पाच लाख ते दहा लाख रुपयांपर्यंतच्या उत्पन्नाच्या चौकटीत कथित मध्यमवर्गीयांचा समावेश होतो. हा वर्ग मोठा आहे आणि त्याला कोणताही दिलासा यामध्ये देण्यात आलेला नाही. त्याचप्रमाणे पाच लाख रुपयांपर्यंतच्या उत्पन्नावर सरकार केवळ पाच टक्केच कर आकारत होते व तो फक्त रद्द करण्यात आला आहे. म्हणजेच सरकारने मध्यमवर्गीयांची निव्वळ फसवणूक केली आहे. तसेच पाच लाखांपर्यंतचा दरही किरकोळ पाच टक्के होता व तो दूर करुनही

त्या उत्पन्नगटाला फार मोठा दिलासा दिला आहे असे काहीही नाही. त्यामुळेच हा अर्थसंकल्प नसून निव्वळ 'अशी ही फसवा फसवी' या नाटकाचा प्रयोग आहे.

आता वर 'फसवा फसवी'चा प्रयोग झाला. आता 'लपवा-लपवी'चा प्रयोग पाहू. एका बाजुला लोकांचा अनुनय करण्यासाठी आणि त्यांची मते पदरात पाडण्यासाठी नैतिक अधिकार नसतानाही हंगामी अर्थसंकल्प म्हणत म्हणत सवलतींची खैरात करण्याचा बेमुर्वत प्रकार करायचा, पण मग, निदान आकडेवारी व सर्वच क्षेत्राचा आढावा तरी संसदेसमोर म्हणजेच देशासमोर सादर करण्याचे धाडस या 56 इंची छाती असलेल्या सरकारने दाखवायला हवे होते. प्रत्यक्षात मात्र पळताभुई व्हावी तसा प्रकार हे सरकार.... सरकार म्हणण्यापेक्षा या सरकारचे नेतृत्व करणारे महानायक करीत आहेत. सर्वसाधारणपणे अर्थसंकल्पापूर्वी वर्षभराच्या आर्थिक स्थितीचा अर्थसंकल्पपूर्व पाहणी अहवाल (इकनॉमिक सर्व्हे) संसदेला सादर केला जात असतो. यामध्ये मावळत्या आर्थिक वर्षाच्या आढाव्याबरोबरच आगामी आर्थिक वर्षात येणाऱ्या आव्हान व मुद्यांवरही प्रकाशझोत टाकलेला असतो. यावर्षी या महान सरकारने त्यालाही फाटा दिला. म्हणे हा हंगामी अर्थसंकल्प आहे आणि नवीन येणाऱ्या सरकारतर्फे जो पूर्ण स्वरुपाचा अर्थसंकल्प मांडला जाईल तेव्हाच हा अहवाल सादर करण्यात येईल. ही निव्वळ 'लपवा लपवी' आहे. याचे प्रमुख कारण या अहवालाद्वारे अर्थव्यवस्थेच्या खालावलेल्या आरोग्याचे दर्शन ऐन निवडणुकीच्या तोंडावर होऊ नये आणि आपली आर्थिक अब्रू चव्हाट्यावर येऊ नये यासाठी हा अहवाल या सरकारने सादर होऊ दिलेला नाही. देशाची वित्तीय तूट किंवा राजकोषीय तूट ही आटोक्यात ठेवण्यात या सरकारला अपयश आलेले आहे. जमा व खर्चातील तफावत म्हणजे ही तूट. थोडक्यात सरकारचे उत्पन्न किंवा प्राप्ती आणि सरकारतर्फे केला जाणारा खर्च यातील तफावत म्हणजे राजकोषीय तूट असते. ही तूट 2018-19 अखेर 3.1 ते 3.2 टक्क्यांवर आणण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. परंतु सरकारला त्यात अपयश आले आणि या तुटीचे प्रमाण 3.4 टक्के नोंदले गेले आहे. आयात-निर्यातीमधील तफावत (करंट अकांउंट डेफिसिट)वाढलेली आहे.

आणि हो.... रोजगाराचा मुद्दा विसरुन कसे चालेल ? वर्षाला इतके लाख रोजगार निर्माण करु, बेकारी दूर करु, गेल्या सत्तर वर्षातील सरकारांनी केली नाही अशी कामगिरी करु अशा फुशारक्या व बढाया महानायकांनी मारलेल्या होत्या. जेव्हा रोजगारनिर्मिती तर दूरच पण नोटाबंदीचा आत्मघातकी निर्णय करुन 'महानायक साहेब' नामक नेत्याने अर्थव्यवस्थेची तर पुरती वाट लावलीच पण किरकोळ व असंघटित म्हणजेच अनौपचारिक क्षेत्रातील व्यापार-उदीम पार बसवून टाकला नव्हे नष्टच करुन टाकला. भारतात या क्षेत्राची व्याप्ती जवळपास ऐंशी ते नव्वद टक्क्यांपर्यंत मानली जाते आणि सर्वाधिक रोजगार निर्मिती करणारे




राष्ट्रवादी स्वाभिमानी आधार! राष्ट्रवादी विचार !!

क्षेत्र म्हणून ते ओळखले जाते. ते क्षेत्रच 'साहेबां'नी नेस्तनाबूत केल्यानंतर रोजगार निर्मिती कोठून होणार म्हणून ' सर्वज्ञानी साहेब' असे बोलते झाले, 'एखाद्याने चाय-पकोड्याचा धंदा सुरु केला तर तोही रोजगारच आहे !' किती हुशार आणि बुध्दीमान आहेत महानायक ? त्यांनी त्यांच्या कुशाग्र बुध्दीमत्तेने जगाला दिपवून टाकले. परंतु महानायकांचे दुर्दैव की त्यांच्याच सरकार अंतर्गत असलेल्या राष्ट्रीय संख्याशास्त्र आयोगाच्या प्रमुखांनी रोजगाराच्या आघाडीवरील या सरकारच्या 'दिव्य' कामगिरीवर प्रकाश टाकणारा जो अहवाल तयार केला होता तो महानायकांतर्फे दाबून ठेवण्याच्या निषेधार्थ पदाचा राजीनामा दिला. **गेल्या 45 वर्षात झाली नव्हती अशी विक्रमी बेकारी गेल्या चार वर्षात निर्माण झाली आहे असा निष्कर्ष राष्ट्रीय संख्याशास्त्र आयोगाच्या अहवालात काढण्यात आला आहे. 2017-18 या वर्षात म्हणजेच नोटबंदी नंतरच्या काळात गेल्या 45 वर्षात नव्हती अशी विक्रमी म्हणजे 6.1 टक्के या प्रमाणात बेकारी वाढली असे या अहवालात नमूद करण्यात आले आहे. नॅशनल सँपल सर्व्हे, पीरियॉडिक लेबर सर्व्हे आणि राष्ट्रीय संख्याशास्त्र आयोग या सरकार अंतर्गत संस्थांचा हा निष्कर्ष आहे.** म्हणजेच ज्या बेमुर्वत निगरगट्टपणे नोटबंदीचे गुणगान महानायक ठिकठिकाणी गात असतात तो किती शुध्द खोटारडेपणा आहे हे या अहवालावरुन ढळढळीत स्पष्ट होते. परंतु आपले पितळ उघडे पडू नये म्हणून तो अहवाल सादर होणार नाही याची खबरदारी महानायकांनी घेतली. तो अहवाल दाबून टाकला. या प्रकरणी सरकारच्या दोन प्रमुख संख्याशास्त्रज्ञांनी राजीनामे देऊन टाकले. म्हणजेच महानायक किती हिंमतवान आहेत हे यानिमित्ताने स्पष्टही झाले आणि त्यासाठी या सरकारने सुरु केलेले 'लपवा लपवी'चे प्रयोग देखील लोकांच्या समोर आले आहेत. याबाबत सरकारकडे ना उत्तर आहे ना काही ! अर्थसंकल्प मांडताना हंगामी अर्थमंत्री पियुष गोयल यांनी अर्थव्यवस्थेच्या विकासदाराचा हवाला देऊन विकास होत असेल तर रोजगार निर्माण होणार नाही असे कसे होऊ शकते असा भ्रामक युक्तिवाद करण्याचा लटका प्रयत्न केला.

सध्या अमेरिकेत उपचार घेत असल्याने अर्थसंकल्प मांडू न शकलेले अर्थमंत्री अरुण जेटली हे मुकाट्याने उपचार घेण्याऐवजी आपले अस्तित्व दाखविण्याची धडपड करीत आहेत आणि सरकार व नेतृत्व यांच्या प्रशंसेचे पूल बांधत आहेत आणि विरोधी पक्ष कसे हिणकस आणि नकारात्मक आहेत हे दाखविण्याचे केविलवाणे प्रकार करीत आहेत. अत्यंत अतार्किक असे आणि ओढूनताणून सरकारची बाजू मांडायची म्हणून विविध तर्क देणारे व केवळ वकिली युक्तिवाद करणारे ब्लॉग लिहून स्वतःची सक्रियता दाखविण्याची धडपड करीत आहेत. या अर्थसंकल्पात नैतिक अधिकार नसताना आणि लोकशाही संकेत म्हणून अर्थसंकल्प न मांडता केवळ लेखानुदान घेणे आवश्यक असताना सरकारने लोकांना सवलती जाहीर करुन एकप्रकारे या लोकशाही




संकेतांचा भंग केल्याच्या टीकेला उत्तर देताना कायदेपंडित आणि आता अर्थपंडितही झालेल्या अरुण जेटली यांनी घटनेत कुठेही हंगामी अर्थसंकल्प अशी नोंद नाही आणि जरी निवडणुका तीन महिन्यांवर आलेल्या असल्या तरी सरकारला पूर्ण अर्थसंकल्प सादर करण्यापासून कुणी रोखू शकत नाही वगैरे मखलाशी करणारा ब्लॉग लिहिला. एवढेच नव्हे तर युपीए सरकारचे लेखानुदान मांडताना तत्कालीन अर्थमंत्री प्रणव मुखर्जी यांनी 'बेल आउट पॅकेज' म्हणजेच अर्थव्यवस्थेपुढे त्यावेळी उभ्या ठाकलेल्या मंदीच्या संकटातून सुटकेसाठी एक मदतयोजना जाहीर केली होती असा संदर्भही विद्वान जेटली यांनी दिला. जेटली यांनी हे मुद्दाम लिहिले की त्यांना खरोखरच माहिती नाही किंवा विषय कळत नाही कुणास ठाऊक ? पण त्यावेळी जागतिक पातळीवर आर्थिक मंदीची स्थिती निर्माण झाली होती. त्यामुळे भारतातल्या अर्थव्यवस्थेला 'बेल आउट पॅकेज' म्हणजे अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी काही चाकोरीबाह्य उपाययोजनांची निकड-गरज होती. ती अर्थव्यवस्थेची अनिवार्यता होती आणि त्या असाधारण परिस्थितीत सरकारने ते पाऊल उचलले होते. लोकांवर सवलतींची खैरात करुन आपल्या पक्षाला मते कशी मिळवता येतील अशा खुज्या, संकुचित हेतुने ते पाऊल उचललेले नव्हते. परंतु लपवा लपवी करणाऱ्या या सरकारकडून स्पष्ट अशा भूमिकेची अपेक्षा करणेच चूक आहे. थोडक्यात अर्थसंकल्प मांडण्याचा अधिकार नसतानाही तो मांडणे, त्यामध्ये लोकानुनय करुन मते पदरात पाडण्यासाठी सवलतींची खैरात करणे व त्यांचा गाजावाजा करुन मते मागणे असे लोकशाही संकेतांना हरताळ फासणारे प्रकार करणारे हे सरकार व नेतृत्व आहे. लोकशाही संकेतांचा विधिनिषेधही त्यांना नाही. दिलेल्या सवलतींचा गाजावाजा अधिक आणि प्रत्यक्षात मात्र कण्हत कुथत काहीतरी तुटपुंजे देण्याचा हा प्रकार आहे आणि त्यातून मते मिळण्याऐवजी एका मोठ्या वर्गाची नाराजी ओढवून घेण्याचा धोकाच अधिक संभवतो!

# सत्तेच्या हव्यासापोटी मोकाट सरकार!

हातातली सत्ता न जाण्यासाठी सर्व राज्यकर्ते प्रयत्नशील असतात. सत्ता टिकविण्यासाठी लोकांची मनधरणी करणे, लोकांवर सवलतींची खैरात करुन त्यांना आपलेसे करणे हे सर्वसामान्य उपाय केले जात असतातच. परंतु राज्यकर्ते सत्तेत कायम टिकून राहण्यासाठी विरोधकांना नेस्तनाबूत करणे, त्यांच्यामागे ससेमिरा लावणे असे प्रकार सुरु करतात तेव्हा तो राजकीय सूडबुध्दीचा प्रकार असतो. लोकशाहीला हरताळ फासून ती हुकुमशाहीकडे वाटचाल असते. देशाच्या वर्तमान विष्णु अवतारी महानायक उर्फ ब्रह्मांडनायक महोदयांनी अलीकडेच गुजरातमध्ये का अन्य कोठेतरी बोलताना ते सत्ता



सहजासहजी सोडणार नसल्याचे सूतोवाच केल्याचे ऐकिवात आहे. एवढेच नव्हे तर जे विरोधक 'सध्या बेल वर आहेत, त्यांना जेलमध्येही टाकायला मागेपुढे पाहणार नाही' असा सडकछाप दम द्यायलाही या महानायकाने मागेपुढे पाहिलेले नाही. अत्यंत हलकेपणा व हीनपणाची ही लक्षणे आहेत. त्यामुळेच प्रियंका गांधी यांचा सक्रिय राजकारण प्रवेश आणि आगामी लोकसभा निवडणुका लक्षात घेऊन त्यांचे पति रॉबर्ट वड्रा यांनाही पध्दतशीरपणे वेळ साधून टार्गेट करण्यास सुरुवात झाली आहे.

कलकत्त्यात नुकतेच घडलेले नाट्य हा याचाच प्रकार होता. गेली पावणेपाच वर्षे ब्रह्मांडनायकांना व त्यांच्या आधिपत्याखालील तपाससंस्थांना पश्चिम बंगालमधील 'सारदा चिट फंड' घोटाळ्याची फारशी आठवण झाली नव्हती. यामध्ये पश्चिम बंगालमधील सत्तारूढ तृणमूल कॉंग्रेसचे अनेक नेते गुंतल्याचे प्रकाशात आले. काहींना राजीनामे द्यावे लागले



**गहिनीनाथ**




तर काहीजण जेलमध्येही गेले. अद्याप चौकशी व तपासाचे काम सुरुच आहे. हे प्रकरण सीबीआयकडे आहे. आता गेली पावणेपाच वर्षे सीबीआय किंवा ही केंद्रीय राजवट काय झोपलेली होती की काय कुणास ठाऊक ? जशी लोकसभा निवडणूक जवळ येऊ लागली तसे या घोटाळ्याच्या तपासाची निकड केंद्र सरकारच्या नेतृत्वाला भासू लागली. मग काय सीबीआयला नुसते छू करण्याचाच अवकाश मंडळी लागली कामाला ! मग आता हल्ला करायचा तो पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्र्यांच्या निकटवर्ति अधिकाऱ्यांवर ! मग सीबीआयने आपले काम

सुरु केले. सारदा चिट फंड घोटाळ्याच्या चौकशीसाठी पूर्वी नेमलेल्या 'एसआयटी'चे प्रमुख असलेले पोलिस अधिकारी राजीव कुमार यांना सीबीआयने 'टार्गेट' करण्याचे ठरविले. राजीव कुमार आता कलकत्त्याचे पोलिस आयुक्त आहेत. ज्याप्रमाणे सर्व राज्यांच्या राजधान्यांचे पोलिस आयुक्त हे त्या मुख्यमंत्र्याच्या मर्जीतले व विश्वासातले असतात










त्याचप्रमाणे राजीवकुमार हे मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचे विश्वासू आहेत. सीबीआयने या घोटाळ्याबाबत कोर्टात सादर केलेल्या आरोपपत्रात राजीवकुमार यांचा समावेश नाही. परंतु एसआयटीचे माजी प्रमुख आहेत आणि या प्रकरणाचा त्यांनी तपास केलेला असल्याने केवळ साक्षीदार या नात्याने त्यांच्याकडे चौकशी करणे एवढेच सीबीआयच्या मूळच्या निवेदनात म्हटलेले होते. साक्षीदाराला चौकशीसाठी अटक केली जात नाही. परंतु नव्या व बदलत्या परिस्थितीत व कदाचित 'वरुन आलेल्या आदेशा'नुसार सीबीआयने आपल्या भूमिकेत बदल केला आणि राजीवकुमार हे या घोटाळ्यातील काही आरोपींना वाचविण्यासाठी पुरावे नष्ट करण्याच्या कामात असल्याचा आरोप सीबीआयने लावला. त्यासाठी त्यांना ताब्यात घेणे, अटक करणे येथपर्यंत सीबीआयने मजल गाठली. राजीव कुमार यांच्यावर दबाव टाकण्याच्या हेतुने सीबीआयचे पथक जेव्हा राजीवकुमार यांच्या निवासस्थानी पोहोचले तेव्हा त्यांच्याकडे सर्च वॉरंट म्हणजेच झडतीचे वॉरंट नव्हते तसेच अटकेचे वॉरंटही नव्हते. म्हणजेच त्यांना ताब्यात घेऊन व त्यांच्यावर दबाव आणून त्यांच्याकडून पाहिजे ते बोलून घेण्याचा सीबीआयचा डाव होता असा आरोप कुणी केला तर तो गैर किंवा चुकीचा मानता येणार नाही. त्यामुळे हा हेतु मनात ठेवून सीबीआयचे पथक जेव्हा कलकत्त्यात राजीव कुमार यांच्या निवासस्थानी पोहोचले तेव्हा त्यांना बाहेर अडविण्यात आले. त्यांच्याकडे संबंधित कागदपत्रे नसल्याने त्यांना तेथून जाण्यास सांगण्यात आले. परंतु त्यांनी जबरदस्ती करण्याचा प्रयत्न केला असता त्यांना चक्क कलकत्ता पोलिसांनी अटक करुन पोलिसठाण्यात नेऊन ठेवले. हा चक्क दादागिरीचा प्रकार होता. या प्रकरणात सीबीआयला मदत करणारे दुसरेतिसरे कुणी नसून पश्चिम बंगालचे राज्यपाल होते असे एका वर्तुळातून सांगितले जात आहे. हा प्रकार लक्षात येताच पश्चिम बंगालच्या 'वाघीण मुख्यमंत्री' ममता बॅनर्जी खवळणे स्वाभाविकच होते. त्यांना केंद्र सरकारविरुध्द आयता मुद्दाच

मिळाला आणि मग काय ? त्यांनी थेट या मुद्यावर कलकत्त्यात धरणे आंदोलनच सुरु केले. त्या स्वतः त्याचे नेतृत्व करीत होत्या. पहिल्या दिवशी तर व्यासपीठ किंवा तंबूही नसताना त्यांनी धरणे सुरु केले. मग तेथे तंबू व व्यासपीठ उभारण्यात आले. सुमारे तीन दिवस त्यांनी धरणे धरले. या तंबूतच त्यांनी त्यांच्या मंत्रिमंडळाची बैठकही घेतली. दरम्यान, सीबीआयने राजीवकुमार यांच्याविरुध्द नव्याने आरोप करणारे निवेदन सर्वोच्च न्यायालयात सादर केले. परंतु राजीवकुमार हे पुरावे नष्ट करीत असल्याचे सिध्द करणारे कोणतेही तपशील सीबीआय देऊ शकत नसल्याची टिप्पणी न्यायालयाने केली. राजीवकुमार यांना ताब्यात घेणे किंवा प्रसंगी अटक करण्याची परवानगी न्यायालयाने दिली नाही. मात्र राजीवकुमार यांनी चौकशीसाठी सीबीआयला उपलब्ध राहून सहकार्य करावे असा निर्णय दिला. यानंतर ममतादीदींनी धरणे आवरते घेतले.

आता एक आठवण ! सीबीआयचे माजी प्रमुख आलोक वर्मा आणि त्यांचे 'नंबर २' असलेले राकेश अस्ताना यांच्यात संघर्ष सुरु झाल्यानंतर केंद्र सरकारने अस्ताना यांच्या बाजुने भूमिका घेतली होती. अस्ताना हे गुजरात केडरचे अधिकारी आहेत हे सांगितल्यावर ते कुणाचे निकटवर्ति असतील हे सांगण्याची गरजच नाही. तो वाद कोर्टात गेला





होता. त्यानंतर आंध्र प्रदेशाचे मुख्यमंत्री चंद्रबाबू नायडू यांनी एक निवेदन दिले होते. सीबीआय ही केंद्र सरकारच्या अधिकारातील केंद्रीय तपास संस्था आहे. या संस्थेला तपासासाठी विविध राज्यांमध्ये जाणे भागच असते. परंतु त्यासाठी संबंधित राज्याची पूर्वपरवानगी आवश्यक असते. आता दरवेळी व दर प्रकरणात राज्याची परवानगी मागत बसणे हा किचकट प्रक्रिया टाळण्यासाठी बहुतेक राज्ये विशिष्ट मुदतीसाठी म्हणजेच सर्वसाधारणपणे सहा महिन्यांसाठी सीबीआयला जर आवश्यकता असेल तर राज्यात येऊन चौकशीची सरसकट परवानगी देऊन टाकत असतात. हा जुना प्रघात आहे. परंतु केंद्रातले एखादे सरकार जर सूडबुध्दीने वागू लागल्यास राज्ये सीबीआयवर लगाम लावू शकतात आणि मग त्या परिस्थितीत प्रत्येक प्रकरणाच्या चौकशीसाठी सीबीआयला प्रथम राज्याकडे परवानगी मागण्याची पाळी आणली जाऊ शकते. नायडू यांनी त्याचेच सूतोवाच करुन आंध्र प्रदेशात सीबीआयला मुक्तद्वार नसेल असे निवेदन केले होते. त्यांना तत्काळ पाठिंबा ममतादीदींनी दिला होता आणि इतरही काही विरोधी पक्षांच्या मुख्यमंत्र्यांनी त्याची री ओढली होती. ही सुरुवात होती. ममतादीदींनी सातत्याने मोदी-शहा या राजकीय दुकलीच्या विरोधात भूमिका घेतलेली आहे. एवढेच नव्हे तरभाजपच्या पराभवासाठी त्यांनी कंबर कसताना सर्व भाजप-विरोधी राजकीय पक्षांना एका व्यासपीठावर आणण्यातही त्या बहुतांशी यशस्वी झालेल्या आहेत. विरोधी पक्षांचे नेतृत्वच जवळपास त्यांच्याकडे आल्यासारखे चित्र निर्माण झाले.

हे कुठेतरी महानायक व त्यांचे सहनायक यांना खुपू लागले तर नवल नव्हते. त्यात ज्या ईशान्य भारतातील पंचवीस लोकसभा जागांवर भाजपच्या चाणक्यांची नजर होती व ती खिशात घालण्यासाठी आपला खिसा ढिला सोडला होता तेथील परिस्थितीने अचानक वळण घेतले. सिटिझन्स रजिस्टर आणि विदेशी हिंदूंनाही आपोआप नागरिकत्व देण्याच्या मुद्यावर ईशान्येकडील राज्यांनी केंद्र सरकार व भाजपच्या विरोधात भूमिका घेतल्याने चाणक्यांचे धाबे दणाणले. त्याचप्रमाणे आतापर्यंत पश्चिम



बंगालमध्ये पाय रोवू न शकल्याने तेथेही पक्षाचा विस्तार करण्याच्या हेतुनेही भाजप-चाणक्यांनी प्रयत्न सुरु केलेच होते. पश्चिम बंगालमध्ये मुस्लिम लोकसंख्या लक्षणीय आहे. त्यामुळे धार्मिक ध्रुवीकरण आणि हिंदुत्वाचा आक्रमक प्रचार या मार्गाने हे राज्य काबीज करायचा चंग चाणक्यांनी बांधला व ते प्रकार सुरु केले. त्यात महानायकांनी पश्चिम बंगालचे सरकार कसे भ्रष्टाचारात लिप्त आहे असा प्रचार सुरु केला. या दुहेरी हल्ल्यापुढे ममतादीदी नरमतील आणि शरण




येतील किंवा आपण त्यांचा राजकीय खात्मा करु अशी स्वप्ने महानायक व चाणक्य पहात आहेत. त्यातूनच सीबीआयचा हा नाट्यमय प्रयोग करण्यात आला. दुर्दैवाने तो फार यशस्वी झाला असे म्हणता येणार नाही कारण ममतादीदी याही लोकप्रिय नेत्या आहेत आणि त्यांच्या शब्दावर विश्वास ठेवणारी जनताही आहे. त्यामुळे ममतादीदींनी त्यांच्यावरचा हा हल्ला परतवून लावला आहे. मात्र असे हल्ले निवडणुकीपर्यंत होत राहतील. त्यामुळेच त्यांना सर्व विरोधी पक्षांनी पाठिंबा दिला आहे आणि त्यामुळेही केंद्र सरकार हे राज्यांच्या स्वायत्ततेवर आघात करु पहात असल्याचा एक संदेश देशभरात गेला आहे. महानायकांचे हे सरकार जी राज्ये त्यांना शरण जाणार नाहीत त्यांच्या जिवावर उठायला मागे पुढे पाहणारे नाही हा संदेशच यानिमित्ताने गेला आहे. केंद्र-राज्य संबंध, सहकार्यावर आधारित संघराज्यवाद या संकल्पना विधिनिषेधशून्य रीतीने उधळून लावण्याचे प्रकार सरकारने सुरु केले आहेत. संघर्ष




पेटवून त्या आधारे मते पदरात पाडण्याची ज्वालाग्राही रणनीती चाणक्यांनी आखल्याचे स्पष्ट झाले आहे.

अत्यंत हुशारीने महानायक व चाणक्य यांनी योजना तयार केलेली आहे. संघपरिवार, विश्व हिंदू परिषद आणि तमाम बाकीच्या हिंदुत्ववादी संघटना, धर्मसंसद व







साधु-संत यांनी राम - राम करीत राममंदिराचा, आक्रमक हिंदुत्व आणि मुस्लिम विरोध यांच्या आधारे रान पेटवायचे आणि महानायकांनी 'विकास-विकास, प्रगती-प्रगती'चा जप करायचा अशी ही दुटप्पी व दुहेरी रणनीती आहे. पश्चिम बंगालमध्ये धार्मिक ध्रुवीकरणासाठी योगी आदित्यनाथ यांना पाठवायचे आणि त्यांनी तेथे जाऊन हिंदुत्व आणि मुस्लिमविरोध बरळायचा

राष्ट्रवादी स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार !!



हे प्रकार सुरुच करण्यात आले आहेत. तर महानायक त्यांच्या गुजरातमध्ये जाऊन देशाची अतिप्रचंड अशी प्रगती 'गेल्या पावणेपाच वर्षात' कशी झाली आहे आणि २०१४ पूर्वी भारत देश अस्तित्वातच नव्हता आणि तो बहुधा पाषाणयुगात होता असा प्रचार करीत हिंडू लागले आहेत. पण 'गेल्या सत्तर वर्षात काहीच झाले नाही' हा त्यांचा अपप्रचार आता अंगाशी येऊ लागला आहे आणि लोकं आता त्यावर हसायला लागली आहेतच पण त्याची चेष्टाही होऊ लागली आहे. परंतु भाजपच्या काही अंतःस्थांच्या म्हणण्यानुसार प्रगती व विकासाच्या मुद्याला प्राधान्य द्यायचे की हिंदुत्व, धार्मिक ध्रुवीकरण आणि त्यासाठी राम मंदिराच्या मुद्याला प्राधान्य द्यायचे याबाबत भाजप व संघ परिवारात मतभिन्नता आढळून येत आहे.



परिवाराच्या मते हिंदुत्व व राम मंदिर आणि धार्मिक ध्रुवीकरण हा हमखास यशाचा मार्ग आहे. परंतु महानायक आणि चाणक्यांच्या मते दोन्ही मुद्यांचा म्हणजे विकास आणि धार्मिक ध्रुवीकरण यामध्ये प्राधान्यक्रम ठरविता येणार नाही. त्यासाठी कोणत्या राज्यात कोणत्या मुद्याला आग्रक्रम द्यायचा ते तेथील परिस्थितीवर अवलंबून ठेवावे लागेल. त्यामुळेच पश्चिम बंगालमध्ये मुस्लिमांना राज्य सरकारकडून मिळणारे झुकते माप व मुस्लिमांची लक्षणीय संख्या लक्षात घेऊन तेथे विकास व प्रगतीपेक्षा ध्रुवीकरणाला प्राधान्य द्यावे अशी भूमिका आहे. त्यामुळेच योगी आदित्यनाथ यांना तेथे पाठविण्यात आले. ममतादीदींनी त्यांना सभेला परवानगी नाकारुन त्यांना वेसण घातली. या मतभिन्नतेला आणखी एक कंगोरा आहे. संघ परिवाराची तीव्र इच्छा आहे की स्वतः महानायकांनी राममंदिराच्या मुद्याचा पुरस्कार करावा. अद्याप महानायकांनी त्या मुद्याला हात घातलेला नाही. उलट याबाबत कोर्टाच्या आदेशानुसार काम होईल अशी भूमिका त्यांनी घेऊन संघपरिवाराला नाराजच केले. त्याचप्रमाणे केंद्र सरकारने ताब्यात घेतलेली (बाबरी मशिदीची वास्तू वगळून) ६३.५ एकर जमीन संबंधितांनी परत करावी अशी मागणी धर्मसंसदेने करुनही केंद्र सरकारने त्याबाबत भूमिका घेतली नाही व त्याबाबत कोर्टाचे मत मागून एकप्रकारे वेळकाढूपणाची भूमिका घेतली असा समज झाल्याने हिंदुत्ववादी मंडळी महानायकांवर नाराज आहेत. अर्थात अजून वेळ गेलेली नाही. जर परिस्थिती खरोखरच अवघड, प्रतिकूल आणि पराभवाची दिसून आल्यास शेवटच्या क्षणी देखील महानायक व त्यांचे चाणक्य टोपी फिरवू शकतात आणि हिंदुत्वाचा उघड पुरस्कार करणारी भूमिका घेऊन मते पदरात पाडून घेऊ शकतात या आशेवर राममंदिरवादी मंडळी आहेत. विश्व हिंदू परिषदेने राम मंदिरविषयक आंदोलन चार महिन्यांसाठी स्थगित करण्याचा निर्णयही यादृष्टीने सूचक मानला जातो. त्यामुळे पुढील तीन महिन्यात राजकीय परिस्थिती कसा आकार घेते त्यावरही अनेक गोष्टी अवलंबुन आहेत.

आगामी लोकसभा निवडणुकीत कोणत्याही परिस्थितीत विजय मिळविणे आणि इतर मित्रपक्षांच्या मदतीने का होईना परंतु सरकार स्थापन करायचेच या जिद्दीने भाजपचे नेतृत्व इरेला पेटलेले आहे. त्यासाठी विरोधी पक्षनेत्यांच्या विरोधातील फुटकळ असलेली प्रकरणे देखील पध्दतशीरपणे उकरली जात आहेत आणि त्याआधारे त्यांना तपास व चौकशी संस्थांसमोर उभे करण्याचे प्रकार अनियंत्रित पध्दतीने सुरु करण्यात आलेले आहेत. सार्वजनिक जीवनातील व्यक्तींच्या दृष्टीने ही बाब संवेदनशील असते. निरपराधीपणा सिध्द करायला भरपूर विलंब लागत असतो व तोपर्यंत महानायक व त्यांचे चाणक्य विरोधकांना बदनाम करुन स्वतःच्या पदरात मते पाडून घेऊ शकतात. ममता बॅनर्जी, अखिलेश, मायावती यांच्या विरोधातील केसेस अचानक आठवल्यासारख्या पुनरुज्जीवित करणे आणि त्यांच्यामागे तपास संस्थांचा ससेमिरा लावणे ही युक्ति सध्या अवलंबिली जात आहे. परंतु ही रणनीती विशिष्ट मर्यादेपर्यंत यशस्वी होते. मर्यादेनंतर ती उलटते. वर्तमान राज्यकर्त्यांना या मर्यादेचे भान राहिलेले नाही व ते मोकाट सुटलेले आहेत. विरोधकांना संपविण्याच्या अतिरेकी इच्छेने त्यांना पछाडलेले आहे व त्यामुळेच येत्या काळात या मोकाट राज्यकर्त्यांचा राजकीय धुमाकूळ कोणते रूप धारण करतो तेच लोकांना पहावे लागणार आहे !!

केंद्र व राज्यात सत्तेवर असलेल्या भाजप
नेला असून, सर्वसामान्य माणसांना जीवन
मोदी-फडणवीस जोडगोळीने भरमसाट
पूर्ण केले नाही. लोकांची फसवणूक
आता जनतेचा विश्वास राहिलेला नाही.
राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने १० जानेवारी,
महाराजांच्या समाधीचे दर्शन घेऊन निर्धार
यात्रेची पहिली सभा रायगड जिल्ह्यातील महाड येथे






सरकारने देश आणि महाराष्ट्र पूर्णपणे अधोगतीला
जगणे मुश्किल झाले आहे. सत्तेवर येण्यापूर्वी
आश्वासने दिली. त्यातले एकही आश्वासन
केलेल्या या धर्मांध व जातीयवादी सरकारवर
त्यामुळे त्यांना सत्तेवरून खाली खेचण्यासाठी
२०१९ पासून रायगडावरील छत्रपती शिवाजी
परिवर्तनाचा या संपर्क यात्रेला प्रारंभ झाला आहे.
झाली. या सभेत झालेली भाषणे....



# विमाने बनविण्याचे कंत्राट अंबानींना कसे काय देता? त्यांनी अजून खेळातले सुद्धा विमान बनविले नाही!




'निर्धार परिवर्तनाचा' ही यात्रा येथून(महाड) सुरू होऊन संपूर्ण महाराष्ट्रात जाणार आहे. परिवर्तन करायचे आहे ते केंद्रातले करायचे आहे, राज्यातले करायचे आहे आणि त्यासाठी शुभारंभाचे ठिकाण हे रायगड निवडण्यात आलेले आहे. त्याचे काही कारण आहे. ते कारण हेच की, इतिहासामध्ये जे जुलमी राज होते, त्या जुलमी राजांच्या तडाख्यातून सोडविण्यासाठी छत्रपती शिवरायांनी जी राज्यक्रांती केली, परिवर्तन केले आणि स्वातंत्र्यानंतर, या देशात सर्वांना समान न्याय मिळावा म्हणून, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक क्रांती केली व चवदार तळ्यावर मनुस्मृती जाळण्याचे काम करून सांगितले, की लोकांना असमान वागणूक देणारा, महिलांवर अन्याय करणारा, शूद्रांवर अत्याचार करणारा, बहुजनांना शिक्षणापासून वंचित ठेवणारा, असा हा मनुचा कायदा. मनुस्मृती चवदार तळ्यावर जाळण्यात आली. एका कवीने म्हटले आहे–

दोनच राजे इथे गाजले, कोकणच्या पुण्यभूमीवर।
एक त्या रायगडावर, एक चवदार तळ्यावर॥
रायगडावर शिवरायांचा राज्याभिषेक जाहला।
दलितांनी दलितांचा राजा, महाडी घोषित केला॥
दोन मर्द असे झाले, दोन्ही शूर असे बराबर।
एक त्या रायगडावर, एक चवदार तळ्यावर॥
एक राजाचा असे पुत्र, दुजा सुभेदाराचा।
दोघांचा संदेश होता उद्धाराचा, कोकणातले ते डोंगर।
एक त्या रायगडावर, एक चवदार तळ्यावर॥

म्हणून ज्यांनी राज्यक्रांती केली, सामाजिक क्रांती केली, जेव्हा आपण निर्धार परिवर्तनाची यात्रा काढण्याचे ठरविले तेव्हा त्याची सुरुवात करण्यासाठी या ठिकाणाची निवड करण्यात आली. हे परिवर्तन करण्यासाठी सर्वांना बरोबर घेऊन जावे लागेल. शिवाजी महाराजांनीही सर्वांना बरोबर घेऊनच त्या काळी राज्यक्रांती केली. बाबासाहेब आंबेडकरांनीसुद्धा 25 डिसेंबर 1927 रोजी ज्या वेळेला मनुग्रंथ अग्नीत जाळला तेव्हा बाबासाहेबांना दादासाहेब

तुम्ही चहा विकत होता,
तर मी भाजी विकत होतो, आता
चहाच विका, देशाला विकू नका!

# ओबीसी व मराठा समाजात भांडणे लावण्याचा प्रयत्न



## छगन भुजबळ यांचा आरोप

गायकवाड व स्थानिक मंडळींनी समर्थन दिले. त्यात ब्राह्मण समाजातील लोकही होते. आज मनुवाद पुन्हा उफाळतोय. आत्तापर्यंत ह्यांनी सगळं काढून घेतले आणि आता हे देतो, ते देतो, असे म्हणू लागले आहेत. आता म्हणे दहा-दहा हजार रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात टाकणार, असे ऐकतोय. पण, निवडणुकीचा जुमला आहे. कदाचित टाकतीलही. पण, ते जर परत आले तर तुमच्याकडून दहापट वसूल करतील. त्यांना सत्तेचा माज आलेला आहे. त्यांना मी सांगू इच्छितो-

गर तुझे गुर्रर है सत्ता का इस कदर।

तो हम भी तख्त पलटनेका हुनर रखते है॥

आता ते आरक्षण देणार असे म्हणतात. आरक्षण सगळ्यांना मिळायला पाहिजे. आजच्या वर्तमानपत्रात आले आहे. ओबीसीचे आरक्षण रद्द करा म्हणून याचिका दाखल केली गेली आहे. सरकारी वकिलाने ओबीसीची बाजू घेऊन भांडायला हवे होते की, सर्वोच्च न्यायालयाच्या 9 न्यायमूर्तींच्या खंडपीठाने निर्णय घेतल्याने ओबीसींना आरक्षण मिळाले आहे, असा युक्तिवाद त्याने करायला हवा होता. मात्र, सरकारी वकिलाने येथे कचखाऊ भूमिका घेतली. वास्तविक पाहता ती केस दाखल करून घ्यायलाच नको होती. परंतु, आज सरकार दोघांनाही खेळवत आहे. ओबीसी व मराठा समाजात भांडणे लावली जात आहेत. त्यामुळे ओबीसीं लोकांनी सांभाळून राहिले पाहिजे आणि मराठा समाजालाही सांभाळून राहावे लागेल. तुमची आमची लढाई एकमेकांविरुद्ध नसून दाणे टाकून झुंजविणाऱ्यांविरुद्ध आहे. ती लढाई आपण एकत्रितरीत्या लढूया! आरक्षण सवर्णांना दिले आहे. टिकावे अशी आमची इच्छा आहे.

बेरोजगारीचा प्रश्न! किती लोकांना रोजगार मिळाला? पेपरमध्ये आलेय की, ज्यांना रोजगार होता, त्यातील एक कोटी बेरोजगार झाले. नोटाबंदी केली. अतिरेक्यांकडे काळा पैसा असल्याने ते हल्ले करतात, त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी नोटाबंदी केल्याचे सांगण्यात आले. काय झाले? अतिरेकी मेले नाहीत पण, बँकांच्या रांगेत उभे राहून गोरगरीब मात्र

हकनाक मेले. काळा पैसा सापडला. गुजरातच्या बँकांमध्ये! 7-7, 8-8 हजार कोटी रुपये कोठून आले? सगळ्या गोष्टींची यांनी वाट लावली आहे. काय गोष्ट सांगतात, मैंने देखा गटर की नाली थी। एक आदमी गटर के नाली के पास चाय बना रहा था। मैने पुछा गटर के नाली के पास आपने चाय की दुकान कैसी डाली? उसने कहा गटर जो है, उसमे पाईप डालता और उधरसे गॅस आता और उस गॅसपर चाय बनती है।

घरघर नाली, घरघर गॅस
जिसकी काठी, उसकी भैस।
बनेगा पकोडा, बनेगा चाय
स्कूल, कॉलेज भाड मे जाय।
आम आदमी से मन की बात
उद्योगपतीयोंसे धन की बात।
वारे शासन तेरा खेल,
न्याय माँगे तो, हो गई जेल।

ते म्हणतात, मै चाय बेचता था। तू चाय बेचता था तो मैभी भाजी बेचता था। चाय बेचता था तो सिर्फ चाय बेचो, देश को मत बेचो।

मघाशी कोणी सांगितले, 'सॉफी टेन' मध्ये सीएमशी शिवसेनापक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट झाली. अमित शहा म्हणाले, साथ मे आव, नही तो पटक देंगे। बाळासाहेब ठाकरे असते तर, त्यांनी त्याच्या 'इथे' लाथ घातली असती, त्यामुळे ते मुंबईला परत आलेच नसते. ते सांगतात, पहारेकरी चोर आहे. उद्धव ठाकरे, सांगा ना, पहारेकरी कोण आहे? देशाचा पहारेकरी म्हणजे, पंतप्रधान. त्यांना ते चोर म्हणतात व त्यांच्याबरोबर राहतात. तुझे माझे जमेना...अशी अवस्था झाली आहे. तुम्ही जे निर्णय घेतले व त्यामुळे जनतेला जो त्रास झाला, त्याला कोणी एक जबाबदार नाही. मंत्रिमंडळात बसलेल्या तुम्हा सगळ्यांची सामूहिक जबाबदारी आहे. कोणा एकाला जबाबदार धरता येणार नाही. तुम्ही दोघेही जबाबदार आहात. तुम्हाला(उद्धव ठाकरे) वाल्या कोळ्याच्या नातेवाईकांच्या भूमिकेत जाता येणार नाही.

शेतकऱ्यांची कर्जमाफी हा महाघोटाळा आहे, हे उद्धव ठाकरे म्हणाले. ते सरकारमध्ये आहेत. त्यांच्या हातात कागदपत्रे आहेत. ते म्हणतात म्हणजे, त्यावर विश्वास ठेवलाच पाहिजे. या वेळी मात्र कोणत्याही परिस्थितीत परिवर्तन होणार म्हणजे होणारच!

2014 ला विकासाचे नाव घेत होते. आता विकासाचे नाव का घेत नाहीत? राहुल गांधी तुम्हाला राफेलच्या संदर्भात प्रश्न विचारत आहेत, तुम्ही त्याचे उत्तर का देत नाही? तुमची प्रत्येक गोष्ट फेल गेलेली आहे. यांची डिग्री फेल, यांचा चहाचा धंदा फेल, गुजरात मॉडेल फेल, नोटबंदी फेल, मेक इन इंडिया फेल, डिजिटल इंडिया फेल, स्मार्ट सिटी फेल आणि आता 'रा'फेल. एकच प्रश्न राहुल गांधी विचारतात, 550 कोटीचे विमान 1650 कोटीपर्यंत कसे पोहोचले? नाशिकजवळ हिंदुस्थान एरोनॉटिक कंपनी आहे, एचएएल! तिथे सुखोई, मिग सगळी विमाने तयार केली जातात. त्याचे



राष्ट्रवादीचे रायगडचे जिल्हाध्यक्ष प्रमोद घोसाळकर व जयंत महाडीक हे पुष्पगुच्छ देऊन प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांचे स्वागत करताना. शेजारी छगन भुजबळ व गणेश नाईक



जे कंत्राट होते ते एचएएल कंपनीऐवजी अनिल अंबानींच्या कंपनीला ताबडतोब कसे दिले? त्या अनिल अंबानीने खेळण्यातलेही विमान अजून बनवलेले नाही. एकाही प्रश्नाचे उत्तर त्यांनी दिले नाही.

सगळीकडे यांची दादागिरी सुरू आहे. बाबासाहेबांनी आम्हाला जे संविधान दिले आहे, त्यात लिखाणाचे स्वातंत्र्य दिले, बोलण्याचे स्वातंत्र्य दिले आहे. आता कोणी काय खायचे हे ते सांगणार. कोणी काय बोलायचे हे ते ठरविणार. हे मीडियावाले मोदींच्याविरुद्ध एक शब्द जरी बोलले तरी त्यांचे चॅनेल आऊट! निखील वागळेचं तेच झालं, राजदीप सरदेसाईचं तेच झाले, बरखा दत्तचं तेच झालं, प्रणव रॉयचं तेच झालं, तरुण बाजपेयीचं तेच झाले. जे जे त्यांच्याविरुद्ध बोलले, त्यांचे तेच झाले. कामावरून काढून टाकले नाहीतर त्यांचे चॅनेल बंद केले. लिखाणाचे स्वातंत्र्यही नाही. परवाचीच गोष्ट. साहित्य संमेलनाला नयनतारा सहगलला बोलावले. त्यांची मामी इंदिरा गांधी. आणीबाणीच्या वेळी इंदिरा गांधींच्या विरुद्ध सुद्धा नयनतारा सहगल उभ्या राहिल्या. नयनतारा सहगल यांनी आपले भाषण पुस्तिकेच्या स्वरूपात छापण्यासाठी लिहून पाठवले. त्यात त्यांनी लिहिले, या देशात बजबजपुरी माजली अराजकतेची स्थिती निर्माण झाली आहे. जो तो मनाला येईल तसा वागतोय. हे वाचल्यावर इकडच्या लोकांनी त्यांना सांगितले, तुम्ही येऊच नका. त्यावर त्या म्हणाल्या, असे होईल असे मला वाटलेच होते. येथे लिखाणावर बंधन आहे, बोलण्यावर बंधन आहे, हे आपोआपच सिद्ध झाले.

'महाराष्ट्र सदन', 'महाराष्ट्र सदन' कोणी म्हटले 25 हजार कोटी रुपये खाल्ले. कोणी म्हणाले, दहा हजार कोटी खाल्ले, कोणी म्हणाले, साडेआठशे कोटी खाल्ले. कंत्राट केवढ्याचे? तर शंभर कोटीचे! खाल्ले किती तर म्हणे साडेआठशे कोटी. अरे कसे खाणार? महाराष्ट्र सदनमध्ये बसून मिटिंगा घेतात व म्हणतात, महाराष्ट्र सदन बहोत सुंदर! और बनानेवाला अंदर। ज्या कंत्राटदाराने ते बांधले, त्याला अजून एक नयापैसा दिला नाही. पाच फुटाची म्हैस व्याली तर त्याला 15 फुट उंचीचे रेडकू कसे होईल? मलाही कळेना का अटक झाली व त्यालाही कळेना का अटक केली. फक्त तोंड बंद ठेवा, नाहीतर तुमचा भुजबळ होईल. पण, अशी दादागिरी हाणून पाडली पाहिजे–

सख्शियात उनकी होती है,  
जिनके इमान डगमगते है।  
जिनके दिलमे नेकी है,  
उनके सामने मंजिलेभी सर झुकाते है।

सुनील तटकरेजी, मागच्या वेळी तुम्ही 2100 मतांनी पडलात. 2100 बूथमधून एकेक मत जरी पडले असते तरी तुम्ही विजयी झाला असता. पण, त्या वेळी हर हर मोदी, घर घर मोदी या वातावरणात ते झाले. आता ते डोक्यातून काढून टाका. येथून तुम्हालाचा तिकीट मिळेल, याची आम्हाला खात्री आहे. तुमचाच विजय झाला पाहिजे. विजयाची ज्योत येथे पेटली पाहिजे. आजपासूनच निर्धार करा की, निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस व समविचारी पक्षांनाच मतदान करायचे. कोठे नेऊन ठेवला हिंदुस्थान माझा! रिझर्व बँक खड्ड्यात गेले, सीबीआय खड्ड्यात गेले, स्वामिनाथन कमिशन खड्ड्यात गेले, सर्वोच्च न्यायालय रस्त्यावर आले. आता बाकीच्यांना रस्त्यावर आणण्यापूर्वी तुम्हालाच घरी पाठवायची वेळ आलेली आहे. 'घर वापसी'ची वेळ आली आहे.


साद राष्ट्रवादीची... साथ महाराष्ट्राची

# जातीयवादी पक्षांचा पराभव केल्याशिवाय गरिबांना न्याय मिळणे अशक्य

## अजित पवार यांचे विचार



महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांच्या व राजमाता जिजाऊ माँ साहेबांच्या चरणस्पर्शाने पावन झालेल्या या रायगडच्या भूमीत 'निर्धार परिवर्तनाचा' ही यात्रा सुरू झाली आहे. पहिल्याच सभेला आपण प्रचंड मोठ्या संख्येने उपस्थित राहिल्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतो. आता थांबायचे नाही. आता गप्प बसायचे नाही. जोपर्यंत आपण केंद्रातले व राज्यातले सरकार उलथून टाकू शकत नाही, तोपर्यंत आपण आपला लढा चालूच ठेवायचा आहे. सकाळी युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराजांचे दर्शन घेण्यासाठी गेलो होतो, राजमाता जिजाऊ यांचे दर्शन घेण्यास गेलो होतो, चवदार तळ्याचे दर्शन घेण्यास गेलो होतो. याच्यामागे हेतू काय? तर, खऱ्या अर्थाने जातीभेद, धर्मभेद, अस्पृश्यता याविरुद्ध संघर्ष करण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले होते आणि त्यांनी ज्या भूमीतून हा संघर्ष केला, त्याच भूमीतून आज राष्ट्रवादी काँग्रेस 'निर्धार परिवर्तनाचा' ही यात्रा सुरू करीत आहे. मनुस्मृतीचे दहन डॉ. आंबेडकरांनी ज्या चवदार तळ्याच्या काठावर केले, त्याच भूमीतून ही निर्धार परिवर्तनाची लढाई सुरू होत आहे.

ही लढाई कशासाठी आहे? आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने लोकशाहीच्या रक्षणासाठी, राज्य घटनेच्या सन्मानासाठी, देशाच्या अखंडतेसाठी, सर्वसामान्य जनतेला जगण्याचा हक्क मिळवून देण्यासाठी, महागाई कमी करण्यासाठी, बेरोजगारीने पोळलेल्या जनतेला न्याय देण्यासाठी, बळीराजाला सन्मानाचे जीवन जगण्यासाठी ही निर्धार परिवर्तनाची यात्रा काढली आहे.

आज काय अवस्था आहे? बरीचशी आश्वासने देऊन आज ही मंडळी केंद्रात व राज्यात सत्तेवर आली आहेत. दिलेल्या आश्वासनांपैकी त्यांनी एक तरी आश्वासन पूर्ण केले आहे का? हा प्रश्न एक जबाबदार नागरिक म्हणून स्वत:ला विचारा. प्रत्येक वेळी फसवेगिरी, भूलथापा. निवडणुकीपूर्वी पंतप्रधानांनी सत्तेवर आल्यावर शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्याचे आश्वासन दिले होते. मग अद्याप कर्जमाफी का झाली नाही? महागाई कमी करणार, दोन कोटी रोजगार दरवर्षी निर्माण करणार अशा घोषणा केल्या पण, दिल्या का नोकऱ्या? ज्यांना नोकऱ्या होत्या, त्यांच्या जाण्याची पाळी आली. अठरापगड जातींना न्याय दिला जात नाही. जाती-जातीमध्ये तणाव निर्माण केला जात आहे. धनगर समाजाला आरक्षण मिळाले नाही. मुस्लिम समाजाची आरक्षणाची न्याय मागणी मंजूर झाली नाही, मराठा समाजाच्या आरक्षणाबाबत वेगवेगळे बोलले जाते.

आता 3 किंवा 7 मार्चला आचारसंहिता लागणार आहे आणि पंतप्रधानांनी जाहीर केले की, आर्थिक मागासलेल्यांना आम्ही 10 टक्के आरक्षण दिले आहे. आर्थिकदृष्ट्या मागासलेले जे कोणी असतील त्यांना आरक्षण दिले जाईल. आपल्याला माहिती आहे का, सवर्णांना आठ लाखापर्यंतची मर्यादा आहे. ज्या माणसाला महिन्याला 66 हजार 660 रुपये मिळतात, त्याला आरक्षण दिले आहे. पण, ज्याला महिन्याला दीड-दोन हजार रुपये मिळतात, त्याला काय दिले? आरक्षण द्यायचे होते तर गरिबांना द्यायचे होते. वर्षाला आठ लाख उत्पन्न असणारा माणूस इन्कमटॅक्स भरतो की नाही? म्हणजे, इन्कमटॅक्स भरणाऱ्याला आरक्षण आणि दिवसभर काम केल्याशिवाय ज्याच्या घरची चूल पेटत नाही, अशा गरिबांचा वाटाण्याच्या अक्षता! आम्ही पहिल्यापासून सांगतोय की, हे शेतकरीविरोधी सरकार आहे, सूटबूटवाल्यांचे सरकार आहे. आपल्याला कोणत्या विचारांचे सरकार पाहिजे, याचा विचार आपण केला पाहिजे. यापुढे दोन महिन्यात अशाच भूलथापा तुम्हाला ऐकायला मिळणार आहेत, त्याला तुम्ही फसू नका, हेच सांगण्यासाठी येथे आलो आहोत.

पाच वर्षांपूर्वी मोदी साहेबांची लाट होती. संपूर्ण देशात त्यांच्या विचारांचे खासदार निवडून आले. पण काय केले? डॉ. आंबेडकरांचे स्मारक पूर्ण झाले? युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाची एकतरी वीट रचली गेली? अनेक दिवसांपासून मुख्यमंत्री सांगत आहेत, आम्ही 72 हजार रिक्त जागा भरणार. किती जागा भरल्या? काहीच पत्ता नाही. याचे उत्तर तुम्हाला मिळाले पाहिजे. आता नवीन टूम काढली...2022 मध्ये सगळ्यांना घरे देणार. अरे 2019 चे बोला ना!

मागच्या वेळेस राष्ट्रवादी काँग्रेसने सुनील तटकरे यांना उमेदवारी दिली होती. काँग्रेस पक्ष बरोबर होता. इतर समविचारी पक्ष होते. फक्त 2100 मतांनी पराभव झाला होता. अर्थात पराभव तो पराभवच. एका मताने काय किंवा लाख मतांनी काय? त्यांनी या मतदारसंघासाठी काय कमी केले होते? येथून निवडून जाणारे अवजड उद्योग मंत्री इतकी वर्षे येथून निवडून जातात. त्यांनी कोकणाला काय दिले? साधा मुंबई-गोवा रस्ता करता आला का? किती वर्षे झाली? पाठिमागे मी अर्थमंत्री होतो, जयंतराव होते, सुनील तटकरे होते, तेव्हा कोकणाला भरभरुन देण्याचे काम या कोकणच्या सुपुत्राने केले. पण, तशा प्रकारची दानत इतरांच्यात नाही. म्हणून, आपल्याला 'निर्धार




परिवर्तनाचा' ही यात्रा काढायची वेळ आलेली आहे. जागा वाटपाबाबत काँग्रेसबरोबर चर्चा चालू आहे. राष्ट्रवादी काँग्रेसने रायगडची जागा मागितली आहे. जर ही जागा राष्ट्रवादीला मिळाली तर, सुनील तटकरे यांना उमेदवारी देण्याचा निर्णय प्रांताध्यक्ष जयंत पाटील यांनी घेतला आहे.

मित्रांनो!, दिवस कमी आहेत. आता आपल्याला गाफील राहून चालणार नाही. मागच्या वेळेला शेतकरी कामगार पक्ष आपल्याबरोबर नव्हता. आता शेतकरी कामगार पक्षाची ताकद आपल्याबरोबर आहे. त्यांची तसेच काँग्रेसचीही आपल्याला मदत होणार आहे. इतर ठिकाणी आपलीही त्यांना मदत होणार आहे. समविचारी पक्षांच्या मताची विभागणी होऊ न देता आपल्याला या जातीयवादी विचारांच्या पक्षांचा पराभव करायचा आहे. त्या शिवाय गरिबाला न्याय



मिळणार नाही. त्यांच्या मंत्र्यांना काय बोलावे, कसे बोलावे हे कळत नाही. वाचाळवीरांची संख्या वाढली आहे. या देशात बळीराजाचे राज्य यावे यासाठी हा निर्धार परिवर्तनाचा आहे. या जातीयवादी, कामगारविरोधी, शेतकरीविरोधी तसेच, लोकशाहीविरोधी धोरणे आखणाऱ्या भाजप सरकारला तसेच, शिवसेनेला सत्तेपासून दूर ठेवण्याचा निर्धार समविचारी पक्षांना बरोबर घेऊन आम्ही केला असून त्याची मुहूर्तमेढ या रायगडमध्ये रोवली आहे.







## जयंत पाटील यांचा आरोप

# विरोधकांचे कंबरडे मोडण्यासाठी सर्व व्यवस्थांचा सरकारकडून संपूर्ण वापर

ज्यांच्या हातात साडेचार वर्षांपूर्वी जनतेने सत्ता दिली, त्यांच्याच कचाट्यातून हा महाराष्ट्र व देश सोडविण्याची गरज आहे, या भावनेने आम्ही सगळ्यांनी सकाळी छत्रपती शिवाजी महाराजांचे दर्शन घेतले व आपणापुढे आलो आहोत. महाराष्ट्रातील जनता आता सरकारला विचारू लागली आहे की, कुठे नेऊन ठेवला आहे आमचा महाराष्ट्र? पाच वर्षांपूर्वी जी जाहिरात भाजप-शिवसेनेची मंडळी करीत होती, त्यांना महाराष्ट्राच्या कोपऱ्या कोपऱ्यातून माणसे हा प्रश्न विचारायला लागली आहेत. राज्याच्या प्रमुखांना ठिकठिकाणी राज्यातील युवक-युवती प्रश्न विचारू लागली आहेत, की तुम्ही आमच्यासाठी काय केले? दोन दिवसांपूर्वी औरंगाबादला काही लोकांनी प्रश्न विचारायला सुरुवात केली, तेव्हा राज्याचे मुख्यमंत्री म्हणाले,'यांना गप्प बसवा, नाहीतर त्यांच्यावर आम्हाला कारवाई करावी लागेल.' मुख्यमंत्र्यांनी या वर्षी पंढरपूरला जाणे टाळले. राज्यातील वेगवेगळ्या समाजाला आश्वासने दिली. आता तो समाज उभा राहून मुख्यमंत्र्यांना विचारायला लागला आहे, की तुम्ही दिलेल्या आश्वासनाचे साहेब काय झाले? त्यामुळे महाराष्ट्राच्या कोणत्याही भागात मुख्यमंत्र्यांचा दौरा असेल तर, त्या भागातल्या लोकांना राज्याचे प्रमुख तुरुंगात ठेवण्याची व्यवस्था करू लागले आहेत. जळगावच्या ज्या धर्मा पाटलाने मंत्रालयात विष घेऊन आत्महत्या केली, त्या धर्मा पाटलांच्या पत्नीला तरी मुख्यमंत्र्यांनी घाबरण्याचे कारण नव्हते. मुख्यमंत्री जेव्हा जळगावला गेले तेव्हा धर्मा पाटलाच्या पत्नीला व त्यांच्या चिरंजीवाला दिवसभर तुरुंगात ठेवण्याची व्यवस्था केली होती.

शेतकऱ्यांनी आत्महत्या केली आहे, तुमच्या सरकारने काही केले नाही. त्यांच्या विधवा पत्नीला तुरुंगात टाकण्याची आवश्यकता काय होती? त्यांची आता काही तुमच्याकडून अपेक्षाही नाही. तुम्ही मात्र जाल तिथे लोकांना तुरुंगात टाकायला लागले आहात. दोन दिवसांपूर्वी देशाचे पंतप्रधान सोलापूरला आले. आमच्या पक्षाच्या अध्यक्षांनी पंतप्रधानांना काळे झेंडे दाखवणार म्हणून नोटीस दिली. पोलिसांनी असे करता येणार नाही, असे सांगितले. कार्यकर्त्यांनी माझ्याशी संपर्क साधल्यावर मी सोलापूरच्या पोलीस आयुक्तांशी बोललो तेव्हा झेंडे दाखवा पण, काळे नको असे ते म्हणाले. त्यावर आम्ही काळे झेंडे नाहीत तर, राष्ट्रवादीचे झेंडे दाखवून निषेध करू. बोलण्यात व कृतीत अंतर असणारा देशाचा पंतप्रधान



राजमाता जिजाऊंच्या रायगडावरील समाधीचे जयंत पाटील दर्शन घेताना, शेजारी आदिती तटकरे व अनिकेत तटकरे.

आहे. बोलण्यात व कृतीत अंतर असलेला राज्याचा मुख्यमंत्री आहे. म्हणून ही परिवर्तनाची यात्रा आम्ही येथे घेऊन आलो आहोत.

आज रायगडाच्या पायथ्यापासून, या चवदार तळ्याच्या प्रांगणात आम्ही महाराष्ट्रात परिवर्तनाचे पहिले पाऊल टाकतो आहोत आणि मला अभिमान आहे, ज्यांनी आमचे नेतृत्व उत्तमपणाने केले. मागच्या 10-15 वर्षांत कोकणपट्टीच्या विकासाचे श्रेय जर कोणाकडे जात असेल तर, केवळ सुनील तटकरे यांच्याकडेच जाते. त्या सुनील तटकरेंना मागच्या निवडणुकीत 2100 मतांनी पराभव स्वीकारावा लागला. त्या वेळी मोदी लाट होती. आता लाट वगैरे काही राहिली नसून आता केवळ वाट लागली आहे. त्यामुळे आता दिल्लीत काम करण्याची जबाबदारी आपण सुनील तटकरे यांच्यावर सोपवाल, असा मला विश्वास आहे.

लोकसभेच्या निवडणुका फार लांब नाहीत. काँग्रेसशी आमची चर्चा चालू आहे. चर्चा अंतिम टप्प्यात आहे. राहुल गांधी व पवार साहेब यांची दोन दिवसांपूर्वी चर्चा झाली आहे आणि मला खात्री आहे, महाराष्ट्रातील सर्व ठिकाणचे उमेदवार आम्ही लवकरात लवकर जाहीर करू. राष्ट्रवादी काँग्रेसला ही जागा मिळणार आहे. कारण, आमचा उमेदवार फार कमी मतांनी हरलेला आहे. तसेच, या जिल्ह्यातील काँग्रेसचे सर्व सहकारी सहकार्य करतील, याबद्दल माझ्या मनाची खात्री आहे. म्हणून, सुनील तटकरे यांना लोकसभेवर पाठविण्याची आपण जय्यत तयारी करावी व त्यासाठी कामाला लागावे.

या देशातील सर्व व्यवस्था वापरण्यात आल्या. त्या गरिबांसाठी नाही तर, विरोधकांचे कंबरडे मोडण्यासाठी! कोणत्या व्यवस्था नरेंद्र मोदींनी वापरल्या? कधी इन्कमटॅक्स वापरले, कधी सीबीआय वापरले, सर्वोच्च न्यायालयातील 4 न्यायमूर्तींना देखील लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या पत्रकारांसमोर येऊन आपले गाऱ्हाणे मांडावे लागले. सीबीआयच्या संचालकांना नेमण्याची पद्धत आहे व काढण्याचीही पद्धत आहे. ज्या वेळी नरेंद्र मोदींना रात्री वाटले की, सीबीआयचा संचालक राफेलप्रकरणी आपल्याविरुद्ध एफआयआर दाखल करेल, त्याच रात्री पहाटे दोन वाजता सीबीआयचे संचालक अलोक वर्मांची उचलबांगडी करण्यात आली. काल परवा सर्वोच्च न्यायालयाने त्याला परत आणून बसवले. एवढी नामुष्की आत्तापर्यंत भारताच्या कोणत्याही पंतप्रधानांवर आली नव्हती, हे आपण सगळ्यांनी लक्षात घेतले पाहिजे.

काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसच्या आघाडी सरकारने गेल्या 15 वर्षांत महाराष्ट्रात ज्या वेगाने विकास केला, पायाभूत सुविधा दिल्या, त्या महाराष्ट्राची अधोगती देवेन्द्र फडणवीस व नरेंद्र मोदी यांनी गेल्या साडेचार वर्षांत केली. देवेन्द्र फडणवीस व उद्धव ठाकरेंच्या सरकारने महाराष्ट्रावर 5 लाख

कोटी रुपयांचे कर्ज करून ठेवले आहे. ही तुमच्यामाझ्यासाठी चिंतेची बाब आहे. गेले काही दिवस पाहतोय, उद्धव ठाकरे हे भाजपच्याविरोधी बोलत आहेत व भाजप त्यांच्याविरोधी! लातूरला अमित शहा यांनी शिवसेने को उखाड के फेक देंगे अशी भाषा वापरली. माझा प्रश्न असा आहे की, जर तुमच्यात इतकी भांडणे असतील तर, दोन दिवसांपूर्वी 'सॉफी टेल' नावाच्या हॉटेलमध्ये मुख्यमंत्र्यांना भेटायला उद्धव ठाकरे नाक घासत रात्री उशीरा का गेले होते? या प्रश्नाचे उत्तर त्यांनी द्यावे. अरे, बाळासाहेब ठाकरेंचे रक्त असेल तर, उद्या सकाळी मंत्रिमंडळातून बाहेर पडण्याचे धाडस दाखवा, महाराष्ट्र तुमचे थोडेफार तरी कौतुक करेल.

या राज्यात व दिल्लीत काँग्रेस-राष्ट्रवादीच्या विचारांचे सरकार आणले पाहिजे. यासाठी पवार साहेब, देशातील सगळ्या समविचारी पक्षांना एकत्रित करायला लागले आहेत. महाराष्ट्रातही आम्ही सर्वांनी तो प्रयत्न केला आहे. मला खात्री आहे, भाजप-शिवसेनेचा पराभव करण्यासाठी या राज्यातील समविचारी पक्ष एकत्रित आल्याखेरीज राहणार नाहीत.आणि त्या परिवर्तनाची सुरुवात महाडला चवदार तळ्याच्या शेजारी करीत असून ही परिवर्तनाची यात्रा सर्व जिल्ह्यात जाणार असून भाजप-सेनेला सत्तेतून उखडून टाकल्याशिवाय राहणार नाही, असा विश्वास व्यक्त करतो.

# सॉफिटेलमधली गोपनीय गळाभेट

**मुंबईच्या बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्समध्ये 'सॉफिटेल' नावाचे पंचतारांकित हॉटेल आहे. अमेरिकन ॲम्बसीच्या समोर असलेल्या हॉटेलात ८-९ जानेवारीच्या दरम्यान रात्री बारानंतर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि शिवसेनेचे कार्याध्यक्ष उद्धव ठाकरे यांची भेट झाली. भेट झाली असे म्हणण्यापेक्षा दोघांनी गुप्तपणे या हॉटेलात एकमेकांची भेट घेतली आणि गुफ्तगू गेले. दोघांत काय चर्चा झाली ती अजून गोपनीय आहे. पण भेट गोपनीय राहिली नाही. रात्रीलाही डोळे आणि कान असतात असे म्हणतात. त्यामुळे भेटीची वार्ता राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या पर्यंत कुठून व कशी का होईना पण पोहोचलीच. मग ते गप्प थोडे राहणार? त्यांनी महाडच्या जाहीर सभेत प्रचंड जनसमुदायासमोर या गुप्तभेटीचा बॉम्ब फोडला. अगोदरच भाजप-शिवसेनेत युती होणार का नाही यामुळे प्रचंड अस्वस्थता आहे. कार्यकर्ते संभ्रमावस्थेत आहेत. शिवसेनेचे उद्धव ठाकरे, संजय राऊत व इतर नेते भाजपचे रोज वस्त्रहरण करताहेत. भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष अमित शहा यांनी तर लातूरच्या सभेत शिवसेनेला 'पटक देंगे'ची भाषा वापरली. अत्यंत अपमानास्पद वागणूक भाजप नेत्यांकडून शिवसेनेच्या नेत्यांना व कार्यकर्त्यांना दिली जात आहे. मुख्यमंत्री फडणवीस रोज शिवसेनेला जोड्याने हाणून त्यांचे वाभाडे काढीत आहेत. तरी देखील लाचार होऊन उद्धव ठाकरे सॉफिटेल हॉटेलात मुख्यमंत्र्यांना गुप्तपणे भेटण्यासाठी का गेले हा प्रश्न सर्वत्र जोरदारपणे चचलिा जात आहे. खोटं, लुटूपुटीचं भांडण करून जनतेला मूर्ख बनविण्याचा व शेवटच्या क्षणी युती करण्याचा हा डाव तर नाही ना? अशी शंका कार्यकर्त्यांच्या मनात आहे. जनतेला पुन्हा एकदा फसविण्याच्या खेळाची ही भेट नांदी होती हे आता जनतेला कळून चुकले आहे.**



# भाजपचे सरकार नालायकांचे आहे तर सत्तेत बसलेले शिवसेनेचे मंत्री कोण आहेत?

**सुनील तटकरे यांचा सवाल**



साडेचार वर्षांपूर्वी या देशात एक वेगळे वातावरण निर्माण झाले होते. परिवर्तन झाल्यास या देशातील जनतेला अच्छे दिन येतील, अशी हवा निर्माण करण्यात भाजप-शिवसेना यशस्वी झाली होती. या देशात जणूकाही पंडित जवाहरलाल नेहरूंनी काही केले नाही, लालबहादूर शास्त्रींनी काही केले नाही, इंदिरा गांधींनी काही केले नाही, राजीव गांधींचेही काहीच योगदान या देशासाठी नाही, जे काही झाले ते भाजपच्या नव्या नेतृत्वामुळे होत आहे, असा आभास निर्माण करण्यात भाजपचे नेते यशस्वी झाले. एका बाजूला भाजपचा उद्‌घोष चालू असताना, आज उद्धव ठाकरे म्हणतात, "देशात चोरांचे सरकार बसलेले आहे, देशात व राज्यात नालायकांचे सरकार आहे." जर, हे सरकार चोर व नालायकांचे सरकार असेल तर, साडेचार वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या सरकारमध्ये शिवसेनेचे जे मंत्री आहेत, ते कोण आहेत?, हे आता जनतेला सांगण्याखेरीज तुम्हाला गत्यंतर नाही. देशभरातील रयतेची पूर्णपणे फसवणूक झाली, अच्छे दिनचा प्रयोग फसलाच पण, देशात दरवर्षी दोन कोटी रोजगार निर्मितीची जी घोषणा केली होती, त्यापैकी किती रोजगार निर्माण झाले, रायगड भागात किती उद्योगधंदे आले, किती तरुणांना रोजगार मिळाला, याचा विचार करण्याची वेळ आली आहे.

या कोकणात रेल्वे यावी हे बॅरिस्टर नाथ पै, मधु दंडवते, जॉर्ज फर्नांडिस यांचे स्वप्न होते. त्या काळात पवार साहेब राज्याचे मुख्यमंत्री नसते तर, गोवा, कर्नाटक व महाराष्ट्राचा हिस्सा पूर्णपणे भरला गेला नसता व कोकणात रेल्वे आलेली तुम्हाआम्हाला पाहावयास मिळाली नसती. तीन-चार पिढ्यांपूर्वी आमच्या वाडवडिलांनी लावलेला आंबा, कोकणातला आंबा हा मुंबईच्या मार्केटवर अवलंबून होता. पवार साहेबांनी त्या काळात रोजगार हमी योजनेची व फलोद्यान योजनेची सांगड घातली. त्यामुळे आज कोकणात चार लाख हेक्टर जमीन फळबाग योजनेखाली आलेली पाहायला मिळते. जेएनपीटी पोर्ट असेल, रसायनीचा कारखाना असेल, इंडिया पेट्रो केमिकलचा कारखाना असेल, या साऱ्या काही गोष्टी औद्योगिकीकरणाच्या माध्यमातून या जिल्ह्यात आल्या, त्याचे श्रेय पवार साहेबांनाच दिले गेले पाहिजे. कारण, त्यांच्याच नेतृत्वामुळे या गोष्टी या जिल्हयात आल्या.

आज हा जिल्हा भाताचे कोठार म्हणून ओळखला जातोय. एकीकडे औद्योगिकीकरण या जिल्ह्यात वाढतेय. एका गोष्टीचा आवर्जून उल्लेख करावा वाटतो, वाजपेयी सरकार 2004 साली सत्तेवर होते व पवार साहेब राज्याचे मुख्यमंत्री होते. त्या वेळी भाताला वाजपेयी सरकारने 450 रुपये दर प्रति क्विंटल दिला होता. पवार साहेब या देशाचे कृषी मंत्री झाले व त्यांनी दरवर्षी भाताच्या दरात दोनशे-तीनशे रुपये वाढ दिली. 2014 साली पवार साहेबांनी कृषी मंत्रिपदाची सूत्रे खाली ठेवली तेव्हा भाताचा भाव 1550 रुपये प्रति क्विंटल होता. गेल्या चार वर्षांत भाताची किमान आधारभूत किंमत वाढली नाही. रोजगाराची निर्मिती झाली नाही, परिवर्तन आम्ही का मागतो आहोत? केवळ सत्तेसाठी नाही. 'सत्ता हे उपभोगाचे साधन असू शकत नाही तर, लोकांच्या कल्याणासाठीचे ते अस्त्र आहे', ही भूमिका डॉ. आंबेडकरांनी त्या काळात मांडली.

गेली 30 वर्षे गिते साहेब आमचे संसदेत नेतृत्व करीत आहेत. आज अवजड खात्याचे मंत्री असलेल्या गिते साहेबांकडे एक काळ ऊर्जा खातेही होते. तेव्हा ते वाजपेयीच्या मंत्रिमंडळात होते. सुशीलकुमार शिंदे साहेबांकडेसुद्धा 2010 मध्ये ऊर्जा खाते आले. एनटीपीसीचा प्रकल्प त्यांनी सोलापूरच्या परिसरात आणला. गिते साहेबांनी त्यांच्या कारकीर्दीत एकही प्रकल्प आणण्याच्यादृष्टीने पावले टाकलेली नाहीत. उलट त्यांनी एका मुलाखतीत सांगितले की, मोदी साहेबांची परवानगी नसल्याने मला रायगड जिल्ह्यात कारखाना आणता आला नाही. गिते साहेब, आपण बाळासाहेबांच्या आशीर्वादाने 5-6 वेळा खासदार झाला. 2014 साली आपण बाळासाहेबांचे नाव घेत नव्हता. मोदीऽऽमोदी करीत होता. आणि आता तुम्ही म्हणता, मोदी साहेबांमुळे प्रकल्प आणता आला नाही. हे जर खरे वास्तव असेल तर, ते वास्तव रायगड जिल्ह्यातील जनतेची फसवणूक करणारे आहे. मधल्या काळात मोदी सरकारवर अविश्वासाचा ठराव आला. तो अविश्वासाचा ठराव मोदी सरकारवर होता, मोदी साहेबांवर नव्हता. तुम्ही त्या अविश्वाच्या ठरावाच्या वेळी अनुपस्थित राहिलात. ज्यांचा स्वत:वर विश्वास नाही, ते जनतेला काय विश्वास देऊ शकतात, ही भूमिका जनतेपुढे मांडणे आवश्यक आहे. नोटाबंदी करून फसवणूक करणाऱ्या या सरकारला हटविण्यासाठी पवार साहेबांच्या मार्गदर्शनाखाली व जयंतराव यांच्या नेतृत्वाखाली निर्धार परिवर्तनाचा ही यात्रा सुरू करण्यासाठी रायगडची भूमी निवडण्यात आली. आपल्यामुळे या मतदारसंघात मला काम करण्याची संधी मिळाली, विविध खाती सांभाळताना वेगवेगळ्या योजना या भागात आणू शकलो.

मी या निमित्ताने आपणास विनंती करतोय. मला अद्याप पक्षाने अधिकृत उमेदवार म्हणून जाहीर केलेले नाही. पण, आज आपण निर्धार करूया, गेली 30 वर्षे या परिसरात निष्क्रीय पणे काम करणाऱ्या शक्तीना हटविण्यासाठी, रायगड जिल्ह्यात परिवर्तन घडवून आणण्यासाठी, महाराष्ट्रात धर्मनिरपेक्ष शक्तींची ताकद वाढविण्यासाठी आपण सगळ्यांनी सज्ज राहावे.

मागच्या वर्षी डिसेंबर महिन्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने विदर्भाच्या मातीतून या सरकारविरुद्ध हल्लाबोल केला आणि या वर्षी होणाऱ्या लोकसभा व विधानसभा निवडणुकीचा निर्धार व तयारी करण्यासाठी 2019 च्या जानेवारीच्या 10 तारखेला, हिंदवी स्वराजाचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राजधानीतून शिवरायांना मानाचा मुजरा करून, राजमाता जिजाऊ माँ साहेबांना नतमस्तक होऊन, आज महाडला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मृतीस वंदन करून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने निर्धार परिवर्तनाची लढाई हिंदवी स्वराज्याच्या राजधानीतून सुरू केली आहे. परिवर्तनाचे व रायगडाचे नाते काय? वयाच्या 16 व्या वर्षी रायरेश्वरास रक्ताचा अभिषेक करून हिंदवी स्वराज्य स्थापन करण्याची परिवर्तनाची पहिली लढाई दिल्लीच्या तख्ताविरोधात या देशात जर कोणी केली असेल तर, ती फक्त युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराजांनी केली. म्हणूनच या परिवर्तनाचासुद्धा आमचा जो लढा आहे, तो लोकशाहीमध्ये दिल्लीत बसलेल्या हुकूमशहाच्या विरोधात आहे. महाराष्ट्रात बसलेल्या हुकूमशहाच्या विरोधात आहे. 2014 च्या निवडणुकीच्या काळात, पंतप्रधान मोदी हे छत्रपती शिवाजी महाराजांचा आशीर्वाद घेण्यासाठी येथे आले.

संबंध देशात परिवर्तनाची लाट होती. आशीर्वाद घेतला. देशातील जनतेने देशाची सत्ता दिली. राज्यातील सत्ता राज्यातील जनतेने दिली. देशात व राज्यात सत्तेवर आलेल्या भाजपने युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराजांचा काय सन्मान केला, याचाही विचार आम्ही या परिवर्तनाच्या निमित्ताने करतो आहोत. ज्या वेळी आम्ही छत्रपतींना मानाचा मुजरा करीत होतो, त्या वेळी आमच्याही मनात कुठेतरी दुखत होते, ज्यांनी साडेचार वर्षांपूर्वी युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराजांचा आशीर्वाद घेतला, याच साडेचार वर्षांत छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमानही करायचा यांनी कमी केले नाही. आशीर्वाद घेऊन साडेचार वर्षे झाली आणि दिल्लीच्या सिंहासनावर बसले. पण, शिवाजी महाराजांच्या आंतरराष्ट्रीय स्मारकाची साधी विटही यांना साडेचार वर्षांत रचता आली नाही.

राज्यात कर्जमाफीची घोषणा केली. त्या घोषणेला छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव दिले. कर्जमाफी कोणाला मिळाली नाही. घोषणा फसवी ठरली. शिवाजी महाराजांचा अवमान करण्याचे पाप राज्यातील व केंद्रातील सरकारने केले. या चवदार तळ्यावर डॉ. आंबेडकरांपुढे नतमस्तक होत असताना, तिथे चार वाक्य लिहिलेली आहेत- 'हा संघर्ष पाण्यासाठी नाही. तर हा



# भाजप सरकार, खड्यासारखे बाजूला करा

**धनंजय मुंडे**



संघर्ष सामान्य माणसांच्या हक्कासाठी आहे.' बाबासाहेबांनी या हिंदुस्थानला दिलेल्या घटनेमुळे आपण ताठ मानेने जगू शकतो, लिहू शकतो, बोलू शकतो, मनासारखे खाऊ शकतो. आज तीच घटना मोदी साहेबांच्या राज्यात धोक्यात आलेली आहे. यापूर्वी देशात कधीही कोणाची देशाची घटना जाळायची हिंमत झाली नाही. पण, या देशाच्या राजधानीत घटना जाळायची हिंमत आता होतेय. आणि ज्यांनी घटना जाळली, त्यांच्यावर कोणताही गुन्हा दाखल केला गेला नाही. घटना जाळल्याबद्दल पंतप्रधानांनी साधा खेदही व्यक्त केला नाही, याच्यापेक्षा दुसरे दुर्दैव कोणते!

या देशातील जनतेला अच्छे दिनच्या नावाने फसवले. विदेशातील काळा पैसा आणून प्रत्येकाच्या खात्यात 15 लाख जमा करण्याचे स्वप्न दाखवले. हे 15 लाख कोणाकोणाच्या खात्यात जमा झालेले आहेत, हे विचारायला आम्ही या निमित्ताने आलेलो आहोत. ज्या मोदींनी सांगितले, न खाऊँगा न खाने दुंगा' त्या मोदींच्या नेतृत्वाखालील केंद्रातील व राज्यातील भाजप सरकारने साडेचार वर्षांत तुमच्या खिशातील लूट कशी केली आहे ते बघा. त्या वेळी पेट्रोल 50 रुपये होते आता 80 रुपये झाले आहे. रोज एक लिटर पेट्रोल लागते असे गृहीत धरले तरी रोज तुमच्या खिशाला 30 रुपयांचा फटका बसतो आता साडेचार वर्षातले दिवस मोजा व किती झळ बसली हे पाहा आणि झोप लागली तर, मला कळवा. 375 रुपयांची सिलेंडरची टाकी आज 960 रुपयांना मिळतेय. आता गेल्या साडेचार वर्षांत भाजप-सेनेने किती लूट केली याचा विचार करा. तुम्ही तरुणाईला फसवले, व्यापाऱ्यांना फसवले, नोटबंदी करून देशातील जनतेला फसवले, जीएसटी आणून सामान्यातील सामान्य व्यापाऱ्यांपासून मोठ्या व्यापाऱ्यांपर्यंत सर्वांना फसवले. आता मात्र विकासाच्या मुद्द्यावर हे मत मागणार नाहीत. शिवसेना सत्तेत सोबत आहे. कालच मी शिवसेना कार्याध्यक्ष उद्धव ठाकरे यांचे एक विधान ऐकले, युतीबिती गेली खड्ड्यात! बरे झाले लवकर कळाले. नाही तरी या राज्यातील जनता युतीला खड्ड्यात घातल्याशिवाय राहणार नाही. माझी उद्धव ठाकरेंना विनंती आहे, त्यांनी शिवसेनच्या फलकावर वाघाचे चित्र काढलेले आहे, ते काढून आता शेळीचे चित्र लावा. आज शेळीचे चित्र लावा म्हणतानाही आम्हाला लाज वाटते. जमले तर सशाचे चित्र लावा. ही परिवर्तनाची लढाई आहे. ही लढाई रयतेच्या राजधानीतून अगोदर सुरू झाली पाहिजे. म्हणूनच, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने छत्रपती शिवाजी महाराजांना मानाचा मुजरा करून परिवर्तनाचा निर्धार केला आहे. परिवर्तन कुठे व्हावे? तर इथे व्हावे. मागच्या वेळी सुनील तटकरे लोकसभेच्या निवडणुकीस उभे राहिले. असल्या मोदीच्या लाटेत फक्त 2100 मतांनी पराभूत झाले. आज इथला जो लोकप्रतिनिधी लोकसभेत बसला आहे, तो जेव्हा निवडणूक काळात तुमच्याकडे मत मागायला येईल तेव्हा त्याला विचारा, आपण आज केंद्रात ज्या अवजड उद्योगाचे मंत्री आहात, पूर्वी त्याच खात्याचे आमचे प्रफुल पटेल मंत्री होते. त्यांनी त्यांच्या कारकीर्दीत 'भेल' सारखा प्रकल्प त्यांच्या मतदारसंघात आणला, तसा एखादा तरी प्रकल्प आपण कोकणात आणला आहे का? याचा विचार तुम्ही करणे आवश्यक आहे. ज्या समाजाच्याबाबतीत ते सांगतात, त्या कुणबी समाजाचे असंख्य प्रश्न आहेत. आमदार असो नसो, खासदार असो नसो, तटकरे साहेबांनी कुणबी समाजाचा एक प्रतिनिधी विधान परिषदेत आणून त्यांचे प्रश्न मांडले, याचा मला अभिमान वाटतो. आणि आज या कोकणाला, रायगडाला देशाचे प्रतिनिधित्व तटकरे साहेबांसारखे पाहिजे, हे सांगायला आम्ही येथे आलो आहोत.

दीड वर्षापूर्वी सरकारवर हल्ला केला. तो हल्लाबोल राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा होता. काँग्रेसने आक्रोश केला. आता निर्धार परिवर्तनाचा आहे. परिवर्तन काळाची गरज आहे. परिवर्तन हा निसर्गाचा नियम आहे. जे सरकार सर्वसामान्याचे नाही, ते सरकार खडयासारखे बाजूला करण्याची वेळ 2019 मध्ये होणाऱ्या लोकसभा व विधानसभा निवडणुकीत आली आहे. या निर्धार परिवर्तनाच्या निमित्ताने आज आम्ही सगळेजण आपले आशीर्वाद घेण्यासाठी आलो आहोत. हल्लाबोल आंदोलन आम्ही आई तुळजाभवानीचा आशीर्वाद घेऊन सुरू केले. आणि हा निर्धार परिवर्तनास प्रारंभ युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराजांचा आशीर्वाद घेऊन केली असून या रयतेच्या राजधानीतून, रायगडमधून तटकरे साहेबांना निवडून देऊन परिवर्तनाची सुरुवात रायगडमधूनच करावी. सभेत रायगड जिल्हा परिषदेचे माजी विरोधी पक्षनेते सुभाष निकम, चंद्रकांत जाधव, अपेक्षाताई कारेकर यांची भाषणे झाली. छायाताई म्हात्रे व त्यांच्या संचाने गीते सादर केली. जिल्हाध्यक्ष प्रमोद घोसाळकर यांनी प्रास्ताविक केले. रायगडचे नेतृत्व बदलल्याशिवाय आणि अनंत गितेंचा पराभव करून सुनील तटकरे यांना निवडून आणल्याशिवाय रायगडचा विकास होणार नाही, असे ते यावेळी म्हणाले. श्री. मंगेश यांनी छत्रपती शिवाजी महाराजांवरील 'राजयोगी' ही कविता सादर केली. ■■



**Nanded City**, Pune

*The Maximum City*

Sinhagad Road, Pune

A 700 Acre Mega Township on Sinhagad Road, Pune.

# प्रत्येक घराला एक मन असतं.
# प्रत्येक शहराला एक व्यक्तिमत्व असतं.

आमच्या प्रत्येक घराचं मन आहे उत्साही, चैतन्यशील, आशावादी, जगण्याच्या ऊर्जेने पुरेपूर भरलेलं, आणि आमच्या शहराचं व्यक्तिमत्व आहे अभिरूचिसंपन्न, सुसंस्कृत, सर्वसमावेशक, निसर्गप्रेमी आणि भविष्यसन्मुख. कारण आम्ही आहोत नांदेड सिटी, ७०० एकर्सचं अतुलनीय जग, जिथे आहे संपूर्ण कुटुंबाच्या आणि कुटुंबातल्या प्रत्येकाच्या सुखाचा, सुरक्षिततेचा, आरोग्याचा आणि आनंदाचा सखोल विचार.

## आनंदी संकुल



**कुटुंबासाठी प्रफुल्लित, प्रदूषणमुक्त पर्यावरण**

- इको पार्क व ऑक्सिझोन
- १३,२०० पेक्षा जास्त झाडांची लागवड
- १२० एकर्सची हिरवाई

## CBSE व ICSE शाळा



**विद्यार्थ्यांसाठी प्रगतीशील वातावरण**

- CBSE व ICSE बोर्डाच्या शाळा
- दर्जेदार शिक्षण
- वॉक-टू-स्कूल मॉडेल

## जिमखाना



**तरूणाईसाठी अगदी आदर्श सिटी**

- सायकलिंग व जॉगिंग ट्रॅक्स
- २४,००० स्क्वे. फूट जिम्नॅशियम
- क्रीडांगण-द स्पोर्टस् कॉम्प्लेस (प्रस्तावित)
- विविध खेळांच्या स्पर्धा व कोचिंग

**नांदेड सिटी, उत्साही मन आणि उमदं व्यक्तिमत्व यांचा देखणा मिलाफ!**

tempestadvertising.com

A project by MAGARPATTA CITY ©

*The pride of Pune*

Call: 020-67275300 / 1 / 2

CREDAI PUNE METRO

www.nandedcitypune.com

info@nandedcitypune.com

An ISO 9001:2008, ISO 14001:2004, OHSAS 18001:2007 certified company.



# आगामी लोकसभा, विधानसभा निवडणुकीत परिवर्तन अटळ

## नवाब मलिक यांचे भाष्य

सरकारने या देशातील लोकांना रेशन मिळण्यासाठी 'एपील'(अबॉव्ह पॉव्हर्टी लाईन-दारिद्र्य रेषेवरील) आणि 'बीपीएल'(बिलो पॉव्हर्टी लाईन-दारिद्र्य रेषेखालील) अशी वर्गवारी केली. बीपीएलमधील गरीब लोकांना मोफत उपचाराची सुविधा निर्माण करण्यात आली. गरीब लोकांसाठी तुम्ही अन्य योजनांसाठी जशा अटी व नियम लागू केल्या होत्या, तशा अटी व शर्ती या योजनेसाठी लागू केल्या असत्या तर, या देशातील खुल्या वर्गातील गरीब माणसांना आरक्षणाचा फायदा मिळाला असता. पण, या पद्धतीने अटी व शर्ती टाकण्यात आलेल्या नाहीत. 85 टक्के लोकांना सांगतायेत की, तुम्ही आता 50 टक्क्यांतून निघा व 10 टक्क्यांत जाऊन बसा. त्यामुळे जे प्रस्थापित आहेत, त्यांनाच याचा फायदा मिळणार आहे. बाकी कोणालाही मिळणार नाही.

काही दिवसांपूर्वी मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांनी सांगितले की, आरक्षण हे मानसिक समाधानासाठी होते. म्हणून आम्ही तसा निर्णय घेतो. आमचे असे म्हणणे आहे की, निर्णय घेत असताना, योजनांना ज्या अटी व शर्ती टाकण्यात आलेल्या आहेत, त्यामुळे गरिबांना फायदा होणार नाही.

आमच्या पटेल साहेबांनी, तुम्ही घटनादुरुस्ती करीत असताना राज्यसभेत व लोकसभेत सांगितले की, घटनादुरुस्ती करीत असताना आमच्या पक्षाची मागणी आहे की, मराठा समाजाला जे 16 टक्के आरक्षण देण्यात आलेले आहे, त्याचा तुम्ही समावेश करून घटनादुरुस्ती केली तर, या राज्यातील मराठा समाजाला तो अटळ झाला असता. पण, या लोकांना आरक्षणाचे राजकारण करायचे आहे. गरिबांना काही द्यायचे नाही. देशात वातावरण निर्माण झाल्यानंतर जनतेचे लक्ष विचलीत करण्यासाठी निर्णय घ्यायचे. पण, लोक आता कंटाळले आहेत. लोकांना आता कळून चुकले आहे की, हे फसवे सरकार आहे. त्यामुळे या सरकारच्या विरोधी वातावरण निर्माण झाले आहे. पुढच्या काळात निवडणुका झाल्या तर, मग त्या लोकसभेच्या निवडणुका असो किंवा विधानसभेच्या असोत, परिवर्तन झाल्याविना राहणार नाही.

याच रायगडमधून तटकरे साहेब मागच्या निवडणुकीत 2100 मतांनी पराभूत झाले होते. या वेळी मात्र परिवर्तनाची लाट असल्याने ते एक लाखाहून अधिक मतांनी विजयी होतील, हे स्पष्ट दिसत आहे. या महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीत आपले पहिले खाते कोठे उघडेल तर, ते याच रायगडमधून उघडेल, असा मला ठाम विश्वास आहे.

# खोटारड्या व थापेबाज सरकारला जनता आता विटली आहे



## चित्राताई वाघ यांचे उद्‌गार

मोदी सरकार केंद्रात सत्तेवर आलं याला आता ५७ महिने झाले आहेत आणि देवेंद्र फडणवीसांचं सरकार राज्यात सत्तेवर आलं याला ५१ महिने झाले आहेत. सत्तेवर येण्यापूर्वी मोदी आणि फडणवीस यांनी जनतेला असंख्य वायदे केले होते. प्रत्येकाच्या खात्यात १५ लाख रुपये भरू, शेतकऱ्याला संपूर्ण कर्जमाफी देऊ, त्याचा सातबारा कोरा करू, दरवर्षी दोन कोटी रोजगार नव्याने निर्माण करून बेरोजगारी संपुष्टात आणू. महागाई पूर्णपणाने कमी करू. भ्रष्टाचार संपूर्ण थांबवू. गॅस सिलेंडर निम्म्या किमतीत देऊ. यासारखी असंख्य आश्वासने दिली. प्रत्यक्षात एकही आश्वासन पूर्ण केले नाही. लोकांना फसवून त्यांची मते घेतली आणि प्रत्यक्षात त्यांच्या हाती धतुरा दिला. उज्ज्वला गॅस योजना असे नाव देऊन पंतप्रधान मोदी यांनी स्वतःचा फोटो प्रत्येक पेट्रोलपंपावरती लाऊन घेतला. गॅस कनेक्शन मोफत देऊन असे सांगितले होते. प्रत्यक्षात ४०० रुपये असणारी गॅस सिलेंडरची किंमत मोदींनी ९६० रुपयांवर नेऊन ठेवली. दुपटीने गॅसच्या किमती वाढविल्या. ५ कोटी गॅसचे कनेक्शन दिले, असे मोदी देशभर हिंडून सांगतात. प्रत्यक्षात खरे किती कनेक्शन दिले आणि किती चालू आहेत, याचा तपास केला तर निम्मेसुद्धा कनेक्शन चालू नाहीत. कारण एवढा महागडा गॅस महिलांना काही परवडत नाही. आता आमची मागणी आहे की, ३०० ते ३५० रुपयांमध्ये सरकारने गॅस उपलब्ध करून दिला पाहिजे. गॅस कनेक्शन देण्याच्या नावाखाली रॉकेलचे वाटप बंद करण्यात आले आहे. त्यामुळे महिलांना आता धड गॅसही नाही आणि रॉकेलही नाही, अशी अवस्था आहे. स्वस्त धान्य दुकानातून अंगठा लावला तरच धान्य मिळते, त्यामुळे प्रत्येक बाईला स्वतःला दुकानावर जावे लागते. प्रत्यक्षात अंगठे कामे करून झिजले असल्यामुळे अंगठेच लागत नाही. त्यामुळे रेशन दुकानातून धान्यही मिळत नाही. महिला अत्याचारात ३० टक्के वाढ झाली आहे. असा एनसीआरपीचा रिपोर्ट आहे. हे सरकार बलात्कारी सरकार आहे. भाजपचे आमदार राम कदम म्हणतात की, जी पोरगी पसंत पडेल तिला उचला, मी तुम्हांला मदत करीन. मंत्री गिरीश महाजन म्हणतात की, दारूच्या बाटलीला बायकांचे नाव द्या, म्हणजे दारूचा खप प्रचंड वाढेल. डान्सबारही आता या सरकारने पुन्हा सुरू केले असून, सरकार किती खालच्या विचारांचे आहे हे यावरून आपल्या लक्षात येईल. असल्या सरकारला आता लोक कंटाळले असून, त्यांना सत्तेवरून खाली खेचण्यासाठी जनता एकवटली आहे.



रायगडावरील राजमाता जिजाऊंच्या दर्शनाने प्रारंभ





महाडच्या सभेत विजयाचा निर्धार हात वर करून व्यक्त करताना

# निर्धार परिवर्तनाचा शुभारंभ क्षणचित्रे



महाडच्या परिवर्तन सभेला जमलेला प्रचंड जनसमुदाय





रायगडावर निनादला ढोल–ताशांचा गजर

## निर्धार परिवर्तन संपर्क यात्रेतील भाषणांचे संकलन



# भाजप सरकार सर्वच आघाड्यांवर 'फेल'

**छगन भुजबळ**





हे खरं आहे, या देशातल्या जुलमी राजवटीला घालवण्याचं, परिवर्तन करण्याचं काम छत्रपती शिवाजी महाराजांनी केलं आणि ज्या मनुस्मृतीनं तुम्हाला आम्हाला गेली पाच हजार वर्षे जनावरासारखं वागायला लावलं, ठेवलं, शिक्षणात अधिकार नाही, संपत्तीत अधिकार नाही, फक्त दोन-तीन टक्के लोकांची सेवा करा हे सगळं ज्यांनी केलं, ती मनुस्मृती महात्मा जोतिबा फुल्यांनी सांगितलं होती, महार-मांग निंदा ठावी नाही व्यथा, जाळा मनुग्रंथ अग्नीमध्ये. २५ सप्टेंबर १९२७ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ती मनुस्मृति तिथं जाळली आणि एक परिवर्तन केलं. प्रत्येकाला शिक्षणात अधिकार, नोकरीचा अधिकार, बोलण्याचा अधिकार, लिहिण्याचा अधिकार. अशा या दोन महामानवांना, हे दोनच मानव एवढे गाजले या महाराष्ट्रात, नव्हे देशात, दोनच राजे इथे गाजले महाराष्ट्राच्या पुण्यभुमीवर एक तो रायगडावर, एक चवदार तळ्यावर. हे दोन राजे असे गाजले, त्यांनी या सर्व समाजाचं नव्हे, तर जगाचं मार्गदर्शन

केलेलं आहे.

आता इथं सांगण्यात आलं, की माझ्याबाबतीत सोशल मीडियावर अभद्र असं काही लिहिलं जातं. मला त्यांना सांगायचंय, की मैं नही मांगता भगवानसे, ए भगवान मुझे बडी लंबी उम्र दे, बस् चंद लम्हे दे, मगर कमाल के दे. अरे, छगन भुजबळ शेळीसारखं जगणार नाही. जगेल वाघासारखा आणि मरेल पण वाघासारखा. पण एक लक्षात घ्या, छगन भुजबळच्या छातीत कळ आली नाही सात महिने असं तुमचं म्हणणं आहे, पण छगन भुजबळच्या बोलण्यामुळं, भाषणामुळं तुमच्या छातीत का म्हणून कळा येवून राहिल्या. एवढं काय घाबरायला झालं. अरे, अजून तर खूप बोलायचंय. आत्ता कुठे सुरूवात आहे म्हणाव लेका हो.

नशिकला तुम्ही काय केलंत. सगळं काय नाशिकहून पळवलं. मुंबई-दिल्ली औद्योगिक कॉरिडोअर होणार होता, तो पळवला. फॉरेस्ट डिपार्टमेंटचं मुख्य वन संरक्षक नागपूरला नेलं. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान पीठातलं आयुर्वेदिक, युनानी, होमिओपॅथी हे तिकडं कुठंतरी नेलं. वीजनिर्मिती बंद करण्याचा प्रयत्न सुरू आहे. प्रकल्प स्थलांतरित करण्याचा डाव आहे. नाशिकचे सगळे उद्योगधंदे न्यायचं काम चाललंय. अनेक महत्त्वाची कार्यालये पळवण्याचं काम तुम्ही केलंत. आम्ही तर खूप काम केलं होतं. ते सांगायचं ठरवलं तर खूप वेळ जाईल. केलेले प्रकल्प पळवण्याचं काम तुम्ही केलंत. बोटीसुद्धा पळवल्या.



राहुल गांधी म्हणतात, देश का चौकीदार चोर हैं. उद्धव ठाकरे म्हणतात, पहारेकरी चोर आहेत. इथे आमच्या बोटी चोरून नेल्या. कुणी नेल्या. पाण्याचा प्रश्न, ते पाणीसुद्धा गुजरातमध्ये पळवण्याचा प्रयत्न सुरू आहे. आपल्याला सांगतात, माझ्याकडे देवेंद्र फडणवीस यांच्या सहीचं पत्र आहे, त्याच्यामध्ये हा उल्लेख आहे, काय म्हटलेले आहे, की २५ टीएमसी पाणी आम्ही तुम्हाला तापी खोऱ्यामध्ये




जळगावला देवू. जे शेतकरी, ज्यांना समजतंय त्यांनी लक्षात घ्या. आपल्याला महाराष्ट्राला तापी खोऱ्यातलं जळगाव जिल्ह्याला १९३ टीएमसी पाणी मंजूर आहे, त्यातलं फक्त ९१ टीएमसी पाण्यावर आपण धरणं बांधली, पण १०२ टीएमसी पाणी असंच गुजरातला वाहून जातंय. आता आणखी हे काय म्हणतांयत, की आणखी २५ टीएमसी पाणी आम्हाला गुजरातला द्या, आणि तिकडून २५ टीएमसी तुम्हाला तापी खोऱ्यासाठी वाढवतो. म्हणजे १०२वर १२७ टीएमसी पाणी तिकडे आम्हाला ते देणार कागदावर आणि ते पण सगळं तिकडंच नेणार गुजरातला. कारण, त्याच्यावर आम्ही धरणं बांधलेली नाहीत. आता एकदा आम्ही हे पाणी गुजरातला दिलं, तर पुढे तुम्हा-आम्हाला नाशिक जिल्ह्याला पाणी मिळणार नाही.

हे पाणी आम्ही उचलू शकतं. केवळ नाशिक जिल्ह्यालाच नाही तर मराठवाड्यालासुद्धा हे पाणी आपण देवू शकतो. त्यासाठी मी विधानसभेत धरणं धरलं. अनेक लोक माझ्याबरोबर आले होते. आदिवासींचं काय झालं? लाँग मार्च निघाला. अजूनही हजारो प्रकरणं आदिवासींची पडून आहेत. एक महिन्यात सोडवणार होते. मी त्या मुनगंटीवारांना विचारलं, आदिवासींच्या वनहक्काच्या जमिनीची जी सगळी प्रकरणं आहेत, तुमच्या डिपार्टमेंटमध्ये पडून आहेत. अंगावरच आला गडी. आमचं काम नाही, ते दुसऱ्या डिपार्टमेंटचं आहे असे सांगू लागले. अरे, तुमच्या कार्यालयाकडे असलेली कामे तुम्हाला माहित नाहीत. तुमच्या अधिकाऱ्यांना आम्हाला १३ कोटी झाडे लावायची आहेत, त्यामुळे वेळ नसल्याचे सांगितले. काय चाललेलं आहे. हे सरकार आहे?

पिचड साहेब तुम्ही म्हणता ते बरोबर आहे. हे आदिवासी लोकांना आदिवासी समजत नाहीत, हे वनवासी समजतात. पण लक्षात ठेवा. आम्ही वनवासी नाही. अरे, इथे हे लोक किती

पिढ्यान्‌पिढ्या राहिलेले आहेत. हे वनवासी नाहीत, आदिवासी आहेत आणि आदिवासी असल्यामुळे त्यांचा अधिकार सुद्धा आधीचा आहे. त्यांना तो अगोदर दिला पाहिजे. पण हे काही करणार नाहीत. प्रत्येकवेळी गाजरं दाखवायची कामं.

आता दहा टक्के ओपनला आरक्षण दिलं. कसं काय टिकणार मला माहिती नाही. माझ्या शुभेच्छा. पण एकसुद्धा मोर्चा निघाला नाही. आरक्षण दिलं दहा टक्के. मराठा समाजाचे ५८ मोर्चे निघाले. त्यांना आरक्षण दिलं. त्यावेळी मी सांगत होतो, की दिल्लीला जावून घटनेमध्ये हे टाकून घ्या. त्यावेळेला नाही केलं. तेसुद्धा आरक्षणाचं काय होणार काय सांगता येत नाही. ओबीसीचे आरक्षण हे रद्द करा. हायकोर्टात पाच अर्ज आले आहेत. परत एकदा पाहा. यांचा डाव हा आहे, की या ओबीसीचं आरक्षण कमी करायचं. कारण, सरकारच्या वकीलानं सांगायला पाहिजे होतं, की ओबीसीचं आरक्षण मंडल कमिशनने दिलेलं आहे आणि सुप्रीम कोर्टानं मान्य केलेलं आहे. पण हे गप्प बसले.

आज सातशे कोटी रूपये आम्ही ओबीसींना देणार




असं सांगितलं. सगळा भुलभुलैय्या आहे. अरे, ओबीसीच्या विद्यार्थ्यांची फीसुद्धा चार-चार वर्षे कॉलेजमध्ये येत नाहीये. शिष्यवृत्ती मिळत नाही. ओबीसीचे जे पावणेचारशे मुलं आहेत, ओपनमध्ये पास झाले. त्यांना विचारलं, तुमची जात कुठली. बाजूला केलं गेलं. आम्ही सांगितलं, की हे ओपन आहे. ओपनमध्ये कुणीही जावू शकतो. चार लोक हायकोर्टात गेले. हायकोर्टानं या मुलांना कामावर घ्या असं सांगितलं. हे फडणवीस साहेबांचं सरकार सुप्रीम कोर्टात गेलं हायकोर्टाच्या निर्णयाच्या विरोधात. मला सांगा, ओपन कॅटॅगरी म्हणजे ओपन कॅटॅगरी. त्याच्यामध्ये कुणीही जावू शकतो. गोरगरीब, दलित जातो, आदिवासी जातो, ओबीसी जाईल, मराठा जाईल कुणीही जाईल. ओबीसीची एवढी काळजी आहे, तर या चारशे मुलांना का नोकऱ्या दिल्या नाहीत. आता तुमची घरी जायाची वेळ आल्यानंतर सांगता की सातशे कोटी देवू. कुठून देणार? फक्त जे आहे ते निवडणुकीचे जुमले सुरू आहेत.

आरक्षणाचंसुद्धा तेच. तिकडे राजस्थान, मध्य प्रदेश, छत्तीसगड अशा पाच जिल्ह्यांमध्ये हे सपाट झाल्याबरोबर ताबडतोब सवर्णको दस पर्सेंट आरक्षण. अरे, पण त्यांनी मागितलं नाही तरी देतांय. मागतात त्याला देत नाहीत, मागत नाहीत त्यांना देतात. कशासाठी? कारण तुम्हाला भीती वाटतेय, आता तिकडे गडबड झाली. तुम्हारी चाय फटी, चाय फटी तो आरक्षण बटी. हे खोटं काम जे आहे ते चालू आहे. तोंडं बंद करण्याचं काम चालू आहे.


मला त्यांना सांगायचंय, दादागिरी कमी करा. ना इतराओ इतना बुलंदी को छुकर, वक्त के सिकंदर पहले भी कई बार देखें हैं. जहाँ होते थे राजाओं के महल, वहाँ उनके मकबरे देखें हैं. अरे, ते सिकंदर, पौरस राहिले नाहीत, तुम्ही काय राहणार. गर तुझे गुरूर हैं सत्ता का इस कदर, तो तेरे तख्त का पलटने का भी हुनर हम लोग जानते हैं. किस तरह तुम्हारा तख्त पलटेगा. दादागिरी तुम्ही करणार प्रत्येकाला. अरे, हे जे टीव्हीवाले असतात ना, त्यांच्या अँकरवरती दादागिरी. मोदी दर महिन्याला मन की बात करतात. एकदा उत्तर प्रदेशातील एका महिलेला प्रश्न विचारले, की कैसी हों, तिने सांगितले अच्छी हूँ. फसल अच्छी हुई क्या? अच्छी हुई. पैसा मिला बराबर? बराबर मिला. सुख-शांती हैं घर में? हाँ जी ठीक हैं. एक टीव्ही अँकर प्रसून बाजपेयी, त्यांना वाटलं, की सगळे शेतकरी आत्महत्या करतायंत, आणि हीच बाई कशी काय म्हणते, की सब ठीक हैं. बाजपेयी गेले त्या महिलेच्या घरी. त्यांनी तिला सर्व काही ठीक आहे का विचारलं, पीक चांगलं आलंय का विचारलं. तिनं सांगितलं, कहाँ हुई अच्छी. पैसा अच्छा मिला? कहाँ मिला पैसा. खाने पीने के लिए तरस रहें हैं. अरे, फिर तुमने कैसा बोला की सब ठीक हैं. तर तिने सांगितलं, की वो ऑफिसर लोग आये, उन्होंने बोला, की इधर बैठने का और कोई पूछे तो सब ठीक हैं बताने का. आता हे सगळं जे आहे त्यानं रेकार्ड केलं आणि त्या टीव्हीवर दाखवलं. दाखवल्याबरोबर दिल्लीतून फोन त्या टीव्हीच्या मालकाला. साहेबांच्या विरोधात तुम्ही असं बोलता, ताबडतोब त्याला कामावरून काढून टाका. नाहीतर तुमचा टीव्ही बंद. काढलं ना त्याला कामावरून. राजदीप सरदेसाई काढलं त्याला कामावरून. निखिल वागळे, बरखा दत्त यांनाही काढलं कामावरून. यांच्याविरोधात बोललं की तुमचं तोंड बंद.

काय चाललंय? तुम्ही कोणाला बोलू देणार नाही. काय

खायचं हे ते ठरवणार. काय बोलायचं हे ते ठरवणार. काय लिहायचं ते ठरवणार. परवा यवतमाळ मराठी साहित्य संमेलन होतं. नयनतारा सहगल यांना उद्‌घाटनाला बोलवलं. पंडित नेहरूंची बहिण विजयालक्ष्मी पंडित आणि रणजित पंडित त्यांची ही मुलगी, मोठी लेखिका. वडील स्वातंत्र्यासाठी जेलमध्ये गेले आणि मरण पावले. तिला बोलवले. तिने भाषण लिहून पाठवलं, की हिंदुस्थानामध्ये काय चाललेलं आहे. गोमांस खाण्याच्या नुसत्या शंकेने मारलं जातंय. कुणालाही गोळी घातली जातेय. कोणाला बोलू दिलं जात नाही. काय चाललंय काय. हे भाषण तिचं अगोदर छापायला आलं. ताबडतोब चक्रं फिरली. यांनी सांगितलं, की आप मत आओ. ती म्हणाली, की मी हेच सांगतेय की इथे तुम्हाला बोलायचीसुद्धा चोरी आहे. घाबरले. घाबरले काय ते घाबरटच आहेत.

अरे, ५६ इंचाची छाती, तो अलोक वर्मा नावाचा सीबीआयचा ऑफिसर त्याने नुसती चौकशी सुरू केली की राफेल काय आहे. ताबडतोब त्याला काढून दुसरं काम दिलं. सुप्रीम कोर्टानं सांगितलं, की तिथंच बसवा. आणखीन ५६ इंचाची छाती परत घाबरली, थरारली. २४ तासांत परत मिटिंग घेतली, परत त्यांना काढून दुसरीकडे हलवलं. त्या बिचाऱ्याने राजीनामा दिला. काय झालं? तुमचे हात स्वच्छ आहेत ना. ना खाऊँगा, ना खाने दूंगा, अरे मग होवू दे ना चौकशी. ५५० कोटीचं राफेल १६०० कोटीला का घेतलं ते सांगा. त्यातच एचएएल या सरकारी कंपनीकडं काम द्यायच्याऐवजी अनिल अंबानीला काम दिलं आणि चाळीस हजार कोटी रूपयांचा भ्रष्टचार झाला. उत्तरं द्या म्हटलं तर उत्तरं देत नाहीत. तुमच्या आमच्याबरोबर मन की बात आणि अंबानी, अदानीबरोबर धन की बात. त्या अंबानीने अजून खेळण्यातलं पण विमान बनवलेलं नाही. पोरं कागदाचं विमान बनवून उडवतात. तेसुद्धा त्याला येतं का नाही हे माहिती नाही.

हे सगळं जे काय चाललेलं आहे हे पाहिल्यानंतर आमच्या शेतकऱ्यांना, आपल्या नाशिकमध्ये तर हा प्रश्न महत्त्वाचाच आहे, कांद्याचा. कांदा, आपण म्हणतो, शेवटी ते आपलेच बांधव. रस्त्यावर कांदा फेकून राहिलेत. आमचं सरकार होतं, त्यावेळी मला आठवतं, असाच कांद्याचा प्रश्न निर्माण झाला, सगळ्या महाराष्ट्राचा कांदा ३५० कोटी रूपये खर्च करून खरेदी केला होता. मी उपमुख्यमंत्री होतो. त्यावेळेला २०० रूपये उत्पादन खर्च होता, ३५० रूपये भावाने कांदा घेतल्याचं मला आठवतं आणि आता ८०० रूपये उत्पादन खर्च आहे आणि दोनशे रूपये तुम्ही फेकता. शंभर रूपये तुम्ही फेकता. काय आहे हे? तुम्हाला याचा



विचार करावा लागेल. २०१४ला तुम्ही आलात इथे नाशिक जिल्ह्यात. तुम्ही भाषण केलंत, मैं आपका भेजा हुआ प्याज खाता हूँ और महाराष्ट्र से भेजा हुआ कपास उसका हम कपडा शिलाते हैं. पहनते हैं. कहते हैं ना, जिसका नमक खातें हैं उनको भुलां नहीं करते. तो आज ये किसान तकलीफ में हैं, उसको डेढ गुना पैसा मिलना चाहिये. मिलना चाहिये की नही मिलना चाहिये? मैं आपसे पूछता हूँ. मिलना चाहिये की नही मिलना चाहिये? मिलना चाहिये रे बाबा, पण देतोय कोण? दो करोड युवकोंको रोजगार मिलना चाहिये की नही मिलना चाहिये. अरे, दे ना.

मागच्या आठवड्यामध्ये एका रिपोर्टमध्ये दोन कोटी दरवर्षाला नोकऱ्या मिळाल्या नाहीत, एका वर्षामध्ये ज्यांच्या नोकऱ्या होत्या ते बेकार झाल्याचे म्हटले आहे. सत्तेत आल्यावर काय केलं तुम्ही? नोटबंदी केली. लहान लहान धंदे खल्लास झाले. काळा पैसा शोधायचा होता, दहशतवाद्यांना पकडायचं होतं. काय झालं? काळं धन परत आलं? नाही. बर्बाद झाले सगळे. धंदे बर्बाद झाले. आतंकवादी थांबले? नाही. परवाच्या दिवशी मेजर शशि नायर यांचं प्रेत पुण्याला आणलं. सिन्नरला सुद्धा आमच्या बहिणीचा पती असाच मारला गेला. हे बोलले होते ना, की तुम एक मारो, हम दस मारेंगे. एकेक शहीद होतोय. त्यांना तिरंग्यामध्ये लपटलं जातंय. त्या झेंड्याला सुद्धा वाईट वाटतं आणि तो झेंडासुद्धा विचारतो या राजकारण्यांना, अरे ये मेरा क्या काम हैं. मेरा काम लहराने में जादा हैं, पर वो कम हो रहा हैं, और कफन पे जादा इस्तेमाल हो रहां हैं.

माझ्या बांधवांनो-भगिनींनो, किंमती किती वाढल्या आणि काय वाढल्या. त्यांनी काही चांगली कामं केली. आधार कार्ड बनवा, बँक खात्याला जोडा, मोबाईलला ते लिंक करा, पॅन कार्डला लिंक करा, गॅसला लिंक करा, जुलैच्या अगोदर इन्कमटॅक्स रिटर्न भरा, नोटा बदलून घ्या, बदललेल्या नोटांचा हिशोब द्या. गॅस सबसिडी सरेंडर करा, एटीएममधून जास्त

पैसे काढायचे नाहीत. जास्त पैसे काढले तर दंड होईल. बँक खात्यात पैसे ठेवा. कमी पैसे ठेवले तर दंड होणार, जास्त पैसे असले तर कुठून आले हे विचारणार आणि त्याच्यावर टॅक्स भरा. सामानावर टॅक्स भरा. सर्व्हिसवर टॅक्स भरा, कफनवर टॅक्स भरा. पैसे बँकेतच ठेवा, बँक बुडाली तर सरकार जबाबदार नाही. उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश इकडं बीफ खायाचं नाही. बीफ खायचं असेल तर गोव्याला भाजपचे मुख्यमंत्री बसलेले आहेत, काही हरकत नाही गोव्याला जा, तिकडे वाट्टेल तेवढे बीफ खा. घरात चीनी वस्तू तुम्ही वापरायच्या नाहीत. कारण, चीनी लोकांना हजारो कोटी रूपयांचे कॉन्ट्रॅक्ट सरकार देईल, तुम्ही मात्र, चीनी वस्तू वापरायची नाही. शाळेत मुलांनी योगा करावा, कारण योगावाला बाबा सध्या फॅक्टरी चालवण्यामध्ये दंग आहे. काहीही करा, परंतु सरकारला पैसे द्या. आठशे रेल्वे स्टेशनवर वायफायसाठी साडेचार लाख कोटी रूपये गुगलला दिले. ८० हजार कोटी शेतकऱ्याला द्यायला नाहीत. वायफाय महत्त्वाचं आहे का भाकरी महत्त्वाची आहे? ठरवायचं कोण?

पेट्रोल, डिझेल सगळ्याच्या वस्तूंच्या किंमतीत भरमसाठ वाढ. पेट्रोलने मोदींच्या वयाचा आकडा पार करून आता अडवानी साहेबांच्या वयाची बरोबरी साधली आहे. परमेश्वराला प्रार्थना आहे, की एमडीएचवाल्या बाबाच्या वयाबरोबर पेट्रोलचे भाव होवू देवू नको. नाहीतर पुढे पेट्रोल बाटलीत ठेवून म्युझियममध्ये ठेवावे लागेल पुढच्या पिढीला दाखवायला. त्यानंतर त्याचे नावही बदलले जाईल. सध्या नाव बदलण्याची फॅशन सुरू आहे. पेट्रोलचे नाव पंडित दिनदयाल उपाध्याय बहुमूल्य तरल पदार्थ असे नाव ठेवले जाईल. काय चाललंय कळत नाही. काँग्रेसचे राज्य होतं त्यावेळी खिशात पैसे ठेवून गोणीभर तरी सामान आणायचे. आता खिशात पैसे भरून गेल्यानंतर पिशवीभर सामान कसं तरी येतंय. हे सरकार जर परत आलं ना, तर तुम्हाला पिशवीभर पैसे न्यावे लागतील आणि खिशात सामान आणावं लागेल.

आमच्या दिल्लीवाल्या शेठचं एकही काम होत नाही. याची डिग्री फेल आहे. याचं घर फेल झालं. यांचं लग्न पण फेल झालं, चहाचा धंदा फेल झाला, गुजरात मॉडेल फेल, नोटाबंदी फेल, मेक इन इंडिया फेल, डिजीटल इंडिया फेल, स्मार्ट सिटी फेल, जीएसटी फेल आणि आता राफेल. आता हे सगळं फेल झाल्यानंतर हे भाषण करायला येतात इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये. त्यांनी भाषण काय केलं, मैं जा रहा था रास्ते से, एक नाले के पास एक आदमी चाय बना रहा था, मैने देखा की ये गटर के पास क्यों चाय बना रहा हैं. कितना होशियार था वो, उसने उस गटर के अंदर एक पाईप डाला था, उस गटर मे गॅस तयार होता था. म्हणजे त्या गॅसवर तो चहा बनवत होता, असे सांगतात. अरे, काय चाललंय तुझं. इंजिनिअरिंगच्या पोरांना हे शिक्षण देतो. सगळीच्या सगळी तिकडं जातील ना गटारावरती चाय बनवायला. म्हणून एकानं म्हटलं, की घर घर नाली, घर घर गॅस, जिस की लाठी उसकी भैंस, बनेगा पकौडा, बनेगी चाय, स्कूल-कॉलेज भाड में जाय. वा रे शासन तेरा खेल, न्याय मांगे तो हो गयी जेल. कशासाठी मला पकडलं, काही कळलं नाही. अशा पद्धतीने सूडाचं राजकारण करणाऱ्यांना आता खाली खेचायची वेळ आली आहे आणि परिवर्तनासाठी आपण एकत्र येवूया.

## पी. साईनाथ म्हणतात,
## पीक विम्यात राफेलपेक्षा मोठा घोटाळा

काही वेळा आपण तुळजापूरला भवानीमातेचे दर्शन घेऊन एखाद्या कार्यक्रमाची सुरुवात करतो. काही वेळा कोल्हापूरच्या महालक्ष्मीचे दर्शन घेऊन आपण कार्यक्रमाची सुरुवात करतो. शिवसेनेतही आता तसे आहे. ते एकदा अयोध्येला गेले, तिकडे आरती केली. नंतर, ते पंढरपूरला गेले, तेथे आरती केली. आता ते नाशिकला जाऊन गोदावरीची आरती करणार आहेत. त्यांनीसुद्धा आता आरती करण्याचे काम सुरू केले आहे.

दिंडोरी, पेठ सुरगाणा, इगतपुरी या तालुक्यात आदिवासींचे



मुख्य पिक आहे भात! पण, या सरकारला एवढी भिक लागली आहे की, शासनाकडे बारदाना खरेदीसाठी पैसे नाहीत. परिणामी, भात खरेदी बंद आहे. यांनी जर बारदाने विकत घेतले नाहीत तर, निवडणुकीत यांचाच बारदाना करून टाका, इतकी चीड येते. हे सरकार शेतकऱ्यांच्या मुळावर उठले आहे. आपल्याकडे पिक विमा कर्ज आहे. आपण अनेक लोक पैसे भरतो. माझ्याकडे एकाने व्यथा सांगितली. पावसामुळे त्याच्या पिकाची हानी झाली. पिकाचे दाणे गळून पडले, फक्त झाड उभे राहिले. मी तक्रार केल्यावर पिक विमवाले आले. त्यांनी पाहणी केली व म्हणाले, सगळ्या पिकाचे नुकसान झाले आहे हे मान्य. मात्र, उभ्या पिकाचा विमा दिला जात नाही. ते पत्र मी मुख्यमंत्र्यांना दिले. ते म्हणाले, उभे पिक असल्याने त्याला विमा देता येत नाही. त्यांची सगळी पोलखोल पी.साईनाथ यांनी केली. ते फार मोठे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे कृषितज्ज्ञ आहेत. त्यांनी सांगितले, ही पीक विमा योजना फक्त अंबानीसाठी तयार केलेली आहे. त्यांनी सांगितले, हे सगळे पैसे प्रथम बँकांत येतात. आत्तापर्यंत ६६ हजार कोटी रुपये शेतकऱ्यांनी व सरकारने भरलेले आहेत. भारतातील प्रत्येक जिल्ह्यात सरासरी विम्यापोटी १७३ कोटी रुपये विम्यासाठी भरले जातात आणि शेतकऱ्याला विम्यापोटी ३० कोटी रुपये दिले जातात. म्हणजे, एका जिल्ह्यात १४३ कोटी रुपये शिल्लक राहतात. अशा रीतीने ५५ हजार कोटी रुपयांचा फायदा अनिल अंबानी कंपनीला झाला. म्हणून, पी. साईनाथ म्हणाले, राफेलपेक्षा हा फार मोठा घोटाळा सुरू आहे.

अशोक चव्हाण मुख्यमंत्री असताना नाशिकला मंत्रिमंडळाची बैठक झाली. १२ वळण बंधारे बांधून डोंगरापलिकडे क्लबला जाणारे पाणी आपल्याकडे आणण्याची योजना होती. त्याच्यातील एक प्रकल्प मांजरपाडा येथे आहे. डोंगरात १० किलोमीटर लांबीचा बोगदा करायचा होता. त्या पैकी ९.५ कि.मी. लांबीचा बोगदा तयार झाला होता. दोन-तीनशे मीटरचा फक्त खडक फोडायचा होता. आमचे सरकार गेले. काम थांबले. शेवटी ते आल्यानंतर मांजरपाडा सुरू झाले. पण, त्याच वेळेस लक्षात आले की, नव्या सरकारने ५ वळण बंधारे पैशाचे कारण दाखवून रद्द केले आहेत. मी तुम्हाला सांगू इच्छितो, नारपारचे एक थेंब पाणीही गुजरातला जाऊ देणार नाही. रद्द केलेल्या पाचच्या पाच वळण बंधाऱ्यांचे काम पुन्हा सुरू करणार-

अरे घेऊ शपथ, पूर्ण करू मांजरपाडा व इतर प्रकल्प ।<br>
शहीद झालो तरी बेहत्तर, सोडणार नाही अपूर्ण लढा ।<br>
विकासाचा पेलत नाही, या सरकारला गाडा ।<br>
म्हणून, भाजप-शिवसेना सरकारला शिकवा धडा ।<br>
आणि परिवर्तन यात्रेत एकच करा निर्धार ।<br>
या सरकारला खड्ड्यात गाडा ॥

काय वाट्टेल ते झाले तरी चालेल, पण, आम्ही मांजरपाडा व अन्य बंधाऱ्यांचे पाणी देणार नाही. नाशिकहून आदिवासी लोकांचा मोर्चा निघाला. काय जादू केली कोणास ठाऊक! हे देतो, ते देतो असे सांगितले व बाकीचे महिन्यांनी! मी महिन्यांनी मुनगंटीवार यांना विधानसभेत विचारले, तुम्ही महिन्यांनी आदिवासींना देणार होता, त्याचे काय झाले? ते म्हणाले, हा विषय माझ्याकडे नाही. त्यांना मी सांगितले, आदिवासी खात्याने सगळ नावे, पत्ते व्यवस्थित करून महसूल खात्याकडे, तुमच्या वनखात्याकडे पाठविले आहेत. आता तुम्हाला सही करायला वेळ मिळत नाही? वन खात्यातील बाकीचे अधिकारी सांगतात, १३ कोटी झाडे लावायची आहेत, त्यामुळे आम्हाला वेळच नाही. सगळीकडे भुलभुलैय्या आहे. म्हणून त्यांचे कारस्थान समजले पाहिजे.

राजस्थान, मध्य प्रदेश, छत्तीसगडमध्य काँग्रेसचे सरकार आले व शब्द दिल्याप्रमाणे पहिल्या दिवशी शेतकऱ्यांचे कर्ज माफ केले. कांद्याचे भाव पडले तेव्हा राज ठाकरे म्हणाले, ''मंत्री दिसला तर, त्याला कांदे फेकून मारा.'' पण, मंत्री दिसला तर पाहिजे ना! आजच वर्तमानपत्रात छापून आले की, ३२ लोकांची ज्येष्ठता डावलून दोघांना सर्वोच्च न्यायालयात नियुक्त करण्यात आले. सर्वोच्च न्यायालयात न्यायमूर्तींची नेमणूक करण्यासाठी एक समिती असते. त्यांनी केलेल्या शिफारसी डावलून या नियुक्त्या करण्यात आल्या. कारण, आपल्याला अनुकूल निकाल लागावेत हा त्यांचा उद्देश आहे. सीबीआयमध्ये अलोक वर्मांनी राफेलची चौकशी सुरू करताच, त्यांना हटविण्यात आले. पेट्रोलचे भाव किती वाढले? मोदी साहेबांच्या वयापेक्षा जास्त झाले आणि अडवाणींच्या वयाशी बरोबरी केली ना? पाच राज्यांत आपटी खाल्ल्यानंतर, ज्याला जे पाहिजे ते न मागता दिले जाऊ लागले.

माझी आपणास विनंती आहे, मराठा असेल, ओबीसी असेल, आदिवासी असेल, दलित असतील, त्यांनी ह्यांच्या नादाला लागू नये. आपापसात भांडू नका. शिवसेनेचे काय चाललेय मला कळत नाही. आज अमित शहाही म्हणाले, हमारे साथ नही आयेंगे तो पटक देंगे। आता भाजप आणि त्यांच्याबरोबर शिवसेनेला घरी पाठवा. तुमचे प्रश्न सोडविण्यासाठी आम्ही परिवर्तन यात्रेस निघालो आहोत. या परिवर्तनात तुम्ही सगळे सहभागी व्हा!

आमचे सुनील तटकरे यांच्यासंदर्भात पवार साहेबांनी भास्करराव जाधव यांना बोलावले व त्यांच्यावर सुनील तटकरे यांना लोकसभेवर निवडून आणण्याची जबाबदारी सोपविली. इतकेच नव्हे तर, केवळ तटकरेच नव्हे तर, रत्नागिरी जिल्ह्यातून राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वच्या सर्व आमदार निवडून आणण्याचीही जबाबदारी त्यांच्यावर सोपवली. ही जबाबदारी पवार साहेबांनी माझ्यासमोर भास्कर जाधवांवर टाकली व त्यांनीही पवार साहेबांना शब्द दिला.

नोटाबंदीचा निर्णय दहशतवाद्यांचा बंदोबस्त करण्यासाठी घेतल्याचे सांगण्यात आले. मात्र दहशतवाद कमी झाला नाही. दहशतवाद्यांशी होत असलेल्या चकमकीत आपले १-२ जवान रोज शहीद होत आहत. अलिकडे २-३ महिन्यांत येवला भागात दोन जवान शहीद झाले. त्यांना तिरंग्यात लपेटून अंतिम निरोप दिला जातो. कधी कधी त्या तिरंग्यालाही मायूस वाटत असेल. तो दु:खी होऊन सरकारला विचारत आहे-

ये मेरा क्या हाल है?, मेरा काम<br>
लेहराना और फडकना जादा है।<br>
लेकीन, कफन मे मेरा इस्तेमाल<br>
जादा हो रहा है॥

पाकिस्तानात हे न बोलवता जातात व इकडे पाक सैनिक आपल्या हद्दीत घुसखोरी करीत आहेत. चीनचे अध्यक्ष साबरमती काठी ढोकळा खात होते व तिकडे डोकलाममध्ये चिनी सैनिक घुसत होते. हा कसला कारभार आहे?-

हे तिरंग्या हमे माफ कर देना।<br>
और बीजेपी को साफ कर देना॥

त्यांना माझे सांगणे आहे की, कसली दादागिरी करता? हिटलरही राहिला नाही, बाकीच्यांचे काय?


परिवर्तन म्हणजे नेमके काय? शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत, त्या थांबल्या पाहिजेत, हे ते परिवर्तन आहे. महिलांवर अत्याचार होत आहेत, ते थांबले पाहिजेत, हे ते परिवर्तन आहे. बेरोजगारांना रोजगार नाही. त्यांना रोजगार मिळाला पाहिजे, हे ते परिवर्तन आहे. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली पाहिजे, हे ते परिवर्तन आहे. सत्ता ही उपभोगासाठी नसून रयतेच्या सेवेसासाठी आहे. अशा पद्धतीने राज्य कारभाराची अपेक्षा आहे. ते येथे होत नाही. महाराष्ट्र सदन प्रकरणात माझी आजोबा-पणजोबांपासूनची वडिलोपार्जित संपत्ती जप्त केली. माझी वडिलोपार्जित संपत्ती तुम्ही जप्त केली पण, जनतेचे माझ्यावरील प्रेम तुम्ही जप्त करू शकणार नाही. मला त्यांना एवढेच सांगायचे आहे गर्व करू नका-

ना टकरावो इतना बुलंदीयोंको छूकर<br>
वक्त के सिकंदर पहलेही कई हुए है।<br>
अरे जहाँ होते थे कभी शहेनशहा के महल,<br>
अब वहाँ मकबरे हुए हुवे दिखाई रहे है।

योगी और मोदी साब का एकही नारा है,'ना घर बसा है हमारा, ना बसा देंगे तुम्हारा।'

ज्यांनी सरकारला निवडून दिले, त्यांनीच जनतेला अडचणीत आणण्याचे काम गेल्या साडेचार वर्षांपासून केले आहे. धमकावण्याचे काम सुरू आहे, दादागिरीचे काम सुरू आहे. मी एवढेच म्हणेन-

मुश्कील नही है कुछ इस दुनियामे,<br>
तू जरा हिंमत तो कर।



ख्वाब बदलेंगे हकीकत मे,
तू जरा सब्र तो कर।
आँधीयाँ सदा चलती नही,
मुश्कीले सदा रहती नही।
मिलेगी तुझे तेरी मंझील,
जरा कोशिश तो कर।
उडने दो मिट्टी को,
आखिर कहाँतक उडेगी?
हवाओंने जब साथ छोडा,
तो जमिनपरही तो गिरेगी।
और सबर जितना कठीन होता है,
मंझीले उतनीही शानदार होती है।

आता हवा बदलली आहे, हवेने त्यांची साथ सोडल्याने ते जमिनीवर आले आहेत. देशातही जमिनीवर आले असून त्यांना घरी पाठविण्याचे काम तुम्हाआम्हाला करायचे आहे.

काँग्रेस व राष्ट्रवादीच्या काळात भ्रष्टाचार नव्हता, असे मी म्हणणार नाही. ते जेव्हा सत्तेत आले होते तेव्हा एक रुपयाचा भ्रष्टाचार होता, आता पाच रुपयांचा आहे. कल्याण-डोंबिवली एमआयडीसीने कारखान्यांना लाखो रुपयांची मालमत्ता कराची बिले पाठवली आहेत. डोंबिवली फेज १ व २ मध्ये ४५० कारखाने या महापालिकेत होते. कल्याण-डोंबिवली महापालिकेत १३ हजार रुपये मालमत्ता कर होता तो आता लाख ते दीड लाख झाला आहे. कसे उद्योगधंदे वाढणार?, आरोग्याची व्यवस्था नाही. बोलाची कढी, बोलाचाच भात, काहीही होत नाही. तुम्ही काही बोलाल तर, ते पाकिस्तानात जा म्हणून सांगितले जाते. नासीरुद्दीन शहा! कलाकार आहेत. ते म्हणाले, मी मुसलमान आहे. माझी पत्नी हिन्दू आहे. मात्र, मी मुलांना कट्टर हिंदुत्ववाद किंवा कट्टर मुस्लीमवाद शिकवला नाही. जो येतो तो विचारतो, तुमचा धर्म कोणता आहे? हे या देशात काय चालले आहे? लगेच त्यांना पाकिस्तानात जा म्हणून सुनावण्यात आले. जणुकाही सगळा हिंदुस्थानचा सात-बारा यांच्या नावावर केला आहे.

अरे तुमनेही कहाँ था, आझादी की लढाई लढी थी।
तू क्यू हमे कह रहे हो की, चले जाव पाकिस्तान?
जब आझादी की लढाई हिंदू और मुस्लीम
हात मे हात डाल के लढ रहे थे,
फाँसी जा रहे थे।
तब तो तुम घर मे बैठे थे भाई।

सरकारने ८०० रेल्वे स्टेशनवर मोफत वायफाय दिले असून त्यासाठी गुगलबरोबर साडेचार लाख कोटीचा करार केला आहे. मात्र, शेतकऱ्यांना द्यायला ८० हजार कोटी रुपये नाहीत. आता भाकरी महत्त्वाची की, वायफाय महत्त्वाचे, हे तरी एकदाचे ठरवा. आता पेट्रोल इतके महागणार की, ते बाटलीत ठेवून नातवांना दाखवावे लागेल, याला पेट्रोल म्हणतात म्हणून नातवाला सांगावे लागेल. त्या पेट्रोलचे नाव बदलून 'पंडित दीनदयाळ उपाध्याय बहुमूल्य तरल पदार्थ! असे ठेवण्यात आले आहे.

त्यांची आता घरी जाण्याची वेळ आली आहे. म्हणून, ते आता राम मंदिराचा विषय काढत आहेत. २०१४ साली ते राम मंदिराचा विषय काढत नव्हते. तेव्हा फक्त विकास,




राष्ट्रवादीत प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांचा छगन भुजबळ यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यावेळी शेजारी मधुकरराव पिचड, धनंजय मुंडे, समीर भुजबळ व इतर कार्यकर्ते.

विकास आणि विकासचा नारा होता. यांनी काय केले? मला सांगा त्यांनी चार वर्षांत चार धरणे तरी बांधली का?, चार हॉस्पिटल तरी बांधली का? ४ स्मार्ट सिटी बांधल्या का? चार किलोमीटर तरी गंगा शुद्ध केली का? ह्यांनी काहीच केले नाही. जेव्हा त्यांना कळले, आता आपले काही खरे नाही, तेव्हा त्यांनी राम मंदिर, मस्जिद यात लढाई सुरू करण्याचे काम चालवले आहे. हिंदू-मुसलमान तुम लढो, हम सत्ता की खुर्ची सांभालते है.-

इनको राम मंदिर नही बनाना है।
इनको सरकार बनाना है।
देशमे लोग कितने मूर्ख है।
ये एक बार फिर अजमाना है।

तुम्हाला सांगतो, देशासाठी हिंदूंनी जितके योगदान दिले आहे, तितकेच मुसलमानांनीही दिले आहे. आता ओबीसींना ७०० कोटीची घोषणा झाली आहे. पुन्हा एकदा चुनावी जुमला. पाच वर्षांत तुम्ही ओबीसींना एक नयापैसा दिला नाही आणि आत्ताच तुम्हाला त्यांचा पुळका का आला? ओबीसी विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती, अर्धी फी सरकारने अजून भरलेली नाही. तुम्हाला ओबीसींना फसवायचे आहे. तुम्हाला मराठा-ओबीसी लढाई लावायची आहे. कोरेगाव-भीमाच्या माध्यमातून तुम्हाला सवर्ण-दलित यांच्यात लढाई लावायची आहे. आपण डोळे उघडे ठवा व आपसात भांडू नका.

आता देवांच्या जाती काढायला लागलेत. योगी आदित्यनाथ म्हणतात, हनुमान दलित आहे. दुसरा एकजण म्हणाला, हनुमान आदिवारी दलित आहे. तिसरा थोडा हुशार होता, तो म्हणाला, जसे सलमान, अरमान, सुलेमान तसे हनुमान. मला व्हॉट्स् ॲपवर मेसेज आला,'दलित असलेल्या हनुमानाने ब्राह्मण असलेल्या रावणाची लंका जाळली. कोणासाठी? तर, ओपन कॅटॅगरीतील रामासाठी!

आता त्यांना घरी पाठवले पाहिजे. सुट्टी दिली पाहिजे. तुम्हाला राज्य करता येत नाही, तुम्हाला गरिबांचे अश्रू पुसता येत नाहीत, महिलांचे अश्रू पुसता येत नाहीत, शेतकऱ्यांच्या आत्महत्या तुम्ही थांबवू शकत नाही, बेरोजगारांना रोजगार देऊ शकत नाही, उद्योगधंदे यायचे बंद झालेले आहेत. मला आठवतेय, मी उपमुख्यमंत्री असताना व विलासराव मुख्यमंत्री असताना औरंगाबादला स्कोडा फॅक्टरी आली. त्यानंतर, एकही उद्योग आला नाही.

महिलांना सुरुवातीला ३३ टक्के व नंतर ५० टक्के आरक्षण पवार साहेबांनी दिले. मंडल आयोगाच्या शिफारशी जाहीर होताच महिन्याच्या आत पवार साहेबांनी त्याची महाराष्ट्रात अंमलबजावणी केली आणि त्या आरक्षणामुळे त्या समाजातील लहान लहान मुले-मुली डॉक्टर, इंजिनियर आदि पदावर गेले आहेत. मराठवाडा विद्यापीठास डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव पवार साहेबांनी दिले, या गोष्टी आपल्याला विसरता येणार नाहीत. आजची लढाई संविधानविरुद्ध मोदी अशी आहे.

ज्या संविधानाने सव्वाशे कोटी जनतेला एका धाग्याने बांधून ठेवले, ते संविधान आपल्याला टिकवले पाहिजे. दिल्लीत संविधान जाळले तर, कोणावरही कारवाई नाही. पण, आमच्या राष्ट्रवादीच्या महिलांनी मनुस्मृती जाळली तर, त्यांच्यावर केसेस टाकल्या आहेत. कायदा टिकवणे हे तुमच्या आमच्यादृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. संविधान विरुद्ध मोदी लढाईत तुम्हाला संविधानाच्याबाजूने उभे राहावे लागेल. परिवर्तनाच्या यात्रेत तुम्हाला सहभागी व्हावे लागेल.

तुमच्या भावनांशी भाजपचा खेळ चाललेला आहे. त्यांना घालवल्याशिवाय तुमच्या आमच्या जीवनात परिवर्तन येणार नाही. आम्हाला सत्ता मिळावी, यासाठी ही परिवर्तन यात्रा नाही, तर, या देशातील लोकांचे हाल थांबावेत, त्यांच्या जीवनात खऱ्या अर्थाने अच्छे दिन यावेत, यासाठी ही 'निर्धार परिवर्तनाचा' यात्रा आहे. त्यात आपण मोठ्या संख्येने सहभागी व्हा, अशी मी आपणा सर्वांना विनंती करीत आहे. हे मनुवादी सरकार, शेतकऱ्यांवर अन्याय करणारे, महिलांवर अत्याचार करणारे, विद्यार्थ्यांवर अन्याय करणारे, अल्पसंख्याक व दलितांवर अन्याय करणारे सरकार घालविण्यासाठी पवार साहेब, देशभर फिरतायेत. एक क्षणसुद्धा ते गप्प बसत नाहीत. फुले-शाहू-आंबेडकरांचा वारसा त्यांना घरातून मिळाला आहे. संविधानाचे रक्षण झाले पाहिजे, कायद्याचे रक्षण झाले पाहिजे, शेतकऱ्यांचे राज्य स्थापन व्हायला पाहिजे. म्हणून, पवार साहेब रात्रीचा दिवस करतात. आपल्या भागातले मंत्री, हे आमचे मित्र आहेत. राजकारणात आमचे विरोधक असणाऱ्यांना आम्ही मित्रच मानतो. ते आम्हाला शत्रू मानतात, ही गोष्ट वेगळी. आमचे मित्र जलसंपदा मंत्री आहेत. मला त्यांना एक विचारायचे आहे, आपल्या जिल्ह्यातील राष्ट्रवादीच्या काळातले जे प्रकल्प अपूर्ण राहिले, ते प्रकल्प आपल्याकडे जलसंपदा खाते असूनही का पूर्ण झाले नाहीत? हे सरकार एक मिनीटही सत्तेवर राहण्याच्या पात्रतेचे राहिले नाही. आता अच्छे दिन नाही, लोक विचारतात, बचे कितने दिन? आता एकच निर्धार करा. या सरकारला घरी पाठवा. येत्या मार्च महिन्यांत आचारसंहिता लागू झाल्यावर मोदी सरकारचा सिनेमा संपणार आहे.

# सत्ताधाऱ्यांचा दबाव झुगारून राष्ट्रवादीला साथ द्या

**अजित पवार**





# निर्धार परिवर्तन संपर्क यात्रेतील भाषणांचे संकलन

आपण सर्वांनी आधीच्या वक्त्यांनी केलेले मार्गदर्शन ऐकले. आम्हीदेखील शेतकरी आहोत. आम्ही काय भाजप सरकारप्रमाणे खोटं नाटं सांगून जनतेचा विश्वासघात करण्याच्यासाठी इथं आलेलो नाही. कारण, तुमची-आमची जातच मुळात शेतकरी जात आहे. काहीजण जाती-जातीमध्ये, धर्मा-धर्मामध्ये तेढ निर्माण करून राजकीय पोळी भाजण्याचा प्रयत्न करत असतात. आम्हाला मात्र आदरणीय पवार साहेबांनी तशी शिकवण दिलेली नाहीये. पवार साहेबांची गेल्या ५२ वर्षांची राजकीय कारकिर्द आपण पाहिली, तर चांद्यापासून बांद्यापर्यंत पवार साहेब कशा प्रकारे राजकारण आणि समाजकारण करतात, हेदेखील आपण पाहिलं.

पण त्याउलट भाजप-शिवसेना आज काय करते. सत्ता मिळवल्यानंतर एवढं खोटं बोलतात, रेटून बोलतात, फसवणूक करतात, गाजर दाखवण्याचे धंदे करतात, लोकांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करतात. मधल्या काळात सत्तेवरती येण्यासाठी यांनी बरीच काही आश्वासने दिली होती. एकसुद्धा आश्वासन नरेंद्र मोदी साहेब किंवा त्यांच्या सरकारला पूर्ण करता आलेलं नाही. मध्यंतरी त्यांनी जाहीरात जोरात केली. देश बदल रहा हैं. लोकांनासुद्धा वाटलं, की इतके वर्षे काँग्रेसचं सरकार किंवा इतरांची सरकारं आली, परंतु कुणी असं म्हटलं नव्हतं. देश बदल रहा है असं आपल्याला कुणी सांगितलं नव्हतं आणि लोकांनी मोठ्या विश्वासानं १९८४ सालानंतर पहिल्यांदा एका पक्षाला पूर्ण बहुमत दिलं आणि ते म्हणजे भारतीय जनता पक्षाला. गल्लीपासून दिल्लीपर्यंत सगळीकडं भाजपा आणि शिवसेना हे आपल्याला पहायला मिळालं. नगरपालिका, जिल्हा परिषद, तालुका पंचायत, महानगरपालिका, विधानसभा, लोकसभा सगळीकडं हे चित्र आपण कमी अधिक प्रमाणात पाहिलं. लोकं आशेनं बसली होती, की देश बदल रहा हैं.

पंतप्रधान दर आठ दिवसांनी या देशातनं त्या देशात जायचे. लोकांना वाटलं, की आपला देश बदलणार आहे आणि मोदी साहेबांच्या डोक्यात, देश बदल रहा हैं म्हणजे या देशातनं त्या देशात जायचं, ते त्या पद्धतीनं देश बदलत होते. त्यांनी त्याच्यातनं वेगळा अर्थ काढला. तुम्ही त्याच्यातनं वेगळा अर्थ काढला. आणि त्याच्यामुळं गेल्या साडेचार वर्षात ५ हजार कोटी



रूपये खर्च करून नरेंद्र मोदी साहेबांनी ९२ देश बदलले. म्हणजे जो पाकिस्तान सातत्यानं आपल्याकडं वाकड्या नजरेनं बघतो, तुमचे माझे जवान शहीद होतायंत. त्यामुळे पाकिस्तानबद्दलची आपली भूमिका आक्रमक असते. पण त्या पाकिस्तानच्या पंतप्रधान नवाज शरीफ यांचा वाढदिवस होता, आणि मोदी साहेब दुसऱ्या कुठल्यातरी देशातनं चाललेले होते, त्यांना कुणीतरी वाढदिवसाबद्दल सांगितलं, त्यांनी पायलटला सांगितलं, की चल विमान तिकडं घे. तिकडे गेले, उतरले. त्यांना मिठी मारली आणि त्याठिकाणी शुभेच्छा दिल्या. कशासाठी? जर तो देश सातत्यानं अतिरेकी कारवाया करतोय, नक्षलवादी कारवाया करतोय, आपल्या देशात देशद्रोही घटना करण्याच्याकरता तिकडनं काही लोकांना पाठविले जातंय, आपल्यातले काही लोकं फोडण्याचा प्रयत्न करतोय. आणि हे घडत असताना तुम्हाला तिथं जायचं कारण काय?

तुम्हीच सांगितलं होतं, ५६ इंच छाती आणि त्यावेळेस मोदी साहेबांनी सांगितलं होतं, की त्यांनी आपल्या देशातला एक जवान मारला, तर आम्ही त्यांचे दहा जवान मारू. कधी मारले? असं भावनिक लोकांशी खेळण्याचा प्रयत्न त्याठिकाणी झाला. या गोष्टीचा विचार त्याठिकाणी कुठंतरी झाला पाहिजे. मोदींनी सत्तेवर आल्यानंतर तुमचा माझा देश चालविण्याऐवजी वेगवेगळे देश बदलण्याचा आणि वेगवेगळ्या देशांमध्ये जाण्याचा प्रयत्न केला. याच्यामध्ये तुम्हीच काय तो अर्थ काढा.

आज संपूर्ण राज्यातली आणि देशातली जनता काकुळतीला आलेली आहे. व्याकूळ झालेली आहे. माझ्या महाराष्ट्रामध्ये तर जे काही दुष्काळाचे सावट आहे, आमच्याही पंधरा वर्षांच्या कारकिर्दीमध्ये दुष्काळ पडला, अतिवृष्टी झाली, गारपीट झाली, अनेक प्रकारच्या घटना त्याठिकाणी झाल्या. त्यावेळेस आम्ही जनावरांच्या छावण्या दिल्या. चारा डेपो दिले. कुठे हयगय केली नाही. पवार साहेब दिल्लीमध्ये होते. साहेब तिकडनं मदत करायचे. आम्ही सरकारमध्ये होतो. आम्हाला शेतकऱ्यांच्या व्यथा माहिती आहेत. कारण, आमची स्वत:ची शेती आहे. जयंतरावांची शेती आहे. धनंजयची शेती आहे. त्यामुळं कुठं अडचण येत नव्हती. आज मात्र तशा प्रकारची परिस्थिती पाहायला मिळत नाही. गावागावांत पाण्याच्या टँकरची मागणी होत आहे. गावागावांतील रस्त्यांची अवस्था अतिशय बेकार झाली आहे. पाच पाच वेळा मतदारसंघातून निवडून गेल्यानंतर अशा प्रकारची परिस्थिती कशी काय राहू शकते. आम्ही देखील सरकारमध्ये होतो. जयंतराव नऊ वर्षे अर्थमंत्री होते. मी चार वर्षे अर्थमंत्री होतो. सरकारची तिजोरी आमच्या हातामध्ये होती. आम्ही त्याचं वाटप करत होतो. आम्ही कोणत्याही पक्षाचा सार्वजनिक कार्यक्रम असला तरी मदत करत होतो.

भाजप शिवसेनेकडून सत्तेचा गैरवापर सुरू आहे. कुणाविरूद्धही गुन्हे दाखल केले जात आहेत. कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी काही समाजकंटकांविरूद्ध कारवाई केली पाहिजे, पण निष्पाप लोकांचे बळी घेवून काय साधणार आहात. मला एक मराठी म्हण आठवते. चार दिवस जसे सासूचे असतात, तसे चार दिवस सुनेचेही येतात. कायम कुणी सत्तेवर राहात नाही, हे त्यांनी लक्षात ठेवले पाहिजे. काही जणांना सत्तेची मस्ती एवढी डोक्यात शिरते की त्यांना वाटते की आपण जावू तिथे आपला विजय होईल. इंदिरा गांधींनाही पराभवाचा सामना करावा लागला. आणीबाणीचा फटका बसला होता. त्यांनी ती चूक सुधारली. ज्या प्रकारचं राजकारण आज चाललेले आहे, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जे संविधान तुम्हाला आम्हाला दिलं ते संविधान बदलण्याची भाषा आत्ताचे राज्यकर्ते करतायंत. का असं घडतंय. का मनुवादी विचार हा पुन्हा लोकांच्यासमोर आणला जातोय. हे तुम्हाला आम्हाला न परवडणारं आहे. जाती जातीमध्ये तेढ निर्माण करणारं आहे. अंतर निर्माण करणारं आहे.

बाबांनो, यांनी जे सांगितलं होतं, त्या कुठल्याच गोष्टी खऱ्या झालेल्या नाहीत. परंतु, आज बेरोजगारी एवढी वाढली, मी ज्या पुणे जिल्ह्याचं नेतृत्व करतो, त्या पुण्यामध्येसुद्धा बेकारांची संख्या प्रचंड वाढली आहे. जळगाव, नाशिक भागांतही बेरोजगारी वाढली आहे. हा सर्व परिणाम नोटाबंदीचा आहे. केमिकल इंजिनिअर झालेली मुलगी नरेंद्र मोदी आणि देवेंद्र फडणवीस यांच्यासारख्या नाकर्त्या सरकारमुळं आज चहाची टपरी चालवत आहे. मुला मुलींना नोकऱ्या मिळत नाही. याचं आत्मपरिक्षण कुठंतरी केलं पाहिजे. दुर्लक्ष करून चालणार नाही.

तुम्हाला कदाचित वाटेल, की हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आहेत, हे इथं येवून असंच सांगणार. भाजप-शिवसेनेचे येवून वेगळ्या पद्धतीनं तुम्हाला सांगण्याचा प्रयत्न करणार. पण आज देश अडचणीमध्ये आहे. अक्षरश: संपूर्ण भारतामध्ये जर अशा





प्रवृत्तीचं सरकार पुढं आलं, तर तुमचं काही खरं नाही. आमचे भुजबळ साहेब सांगतात, आत्ताची परिस्थिती काय आहे. आपण जर खिशात पैसे घेवून गेलो, तर पिशवीमध्ये माल आणतो. परंतु, पुन्हा हे सरकार आलं ना, तर पिशवीत पैसे घेवून जावं लागेल आणि खिशात माल आणावा लागेल. ही वाईट परिस्थिती होईल.

माझा दूध उत्पादक शेतकरी अडचणीत आलेला आहे. कापूस उत्पादक शेतकऱ्याला भाव मिळत नाहीये. पाच हजार रूपये भाव. अहो, आमचे सरकार असताना भाजपची लोकं म्हणायचे, की सात हजार रूपये भाव मिळाला पाहिजे. त्याला पाच वर्षे झाली. मग तो तर आत्ता वाढला पाहिजे. कुणी तुम्हाला थांबवलं? केंद्रात तुमचं सरकार आहे. राज्यात तुमचं सरकार आहे. तुम्ही राज्यकर्ते आहात. तुमचं बहुमत आहे. मग का माझ्या कपास उत्पादक शेतकऱ्याला भाव मिळत नाही. कांदा उत्पादक शेतकऱ्याची काय अवस्था आहे. कांदा राशीवरच शेतकऱ्याची आत्महत्या. एकाच दिवशी तीन शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या, ही बातमी तुम्ही वाचली का नाही माहित नाही. कांद्याला भाव मिळाला नाही म्हणून, काय शेतकऱ्यांनी करावं. सर्वात जास्त आत्महत्या यांच्या काळामध्ये त्याठिकाणी झालेल्या आहेत. याचा विचार तुम्ही सगळ्यांनी यानिमित्तानं केला पाहिजे. मेळघाटमध्ये ९ महिन्यांत पाचशेपेक्षा अधिक बालकांचा मृत्यू. त्या आई वडिलांच्या पोटी बालक जन्माला आल्यानंतर त्याला चांगल्या प्रकारे सुदृढ करण्याच्याकरता महिला बालकल्याण खातं, आदिवासी खातं, वैद्यकीय शिक्षण किंवा सार्वजनिक आरोग्य या सगळ्यांनी मदत करायला पाहिजे. त्याच्यात ही खाती गिरीश महाजन साहेबांच्याकडं. परंतु, काय मदत होत नाही. जन्माला आलेली ती पाचशे बालकं आज मृत्युमुखी पडली. कुणावर ३०२चा गुन्हा दाखल करायचा. विचार झाला पाहिजे. काय त्यांनी पाप केलेलं होतं. काय त्यांची चूक होती. जन्माला आलं ही त्यांची चूक होती. या घटना थांबायला तयार नाहीयेत. यांच्या काळात माझ्या २५ हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. काही काही महिला तर स्वत:चं सरण रचयातंय आणि ते पेटवून त्याच्यावर उडी मारतांयत. पूर्वीच्या काळामध्ये आपण जुन्या गोष्टी ऐकतो, सती जायचा प्रकार. तशा पद्धतीनं काही घटना आज राज्यामध्ये होतायंत. हे शाहू-फुले-आंबेडकरांनी आपल्याला शिकवलं?

युगपुरूष छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श काय होता. निवडणुकीच्या निमित्तानं छत्रपती शिवाजी महाराजांचं नाव घेतलं आणि सत्तेमध्ये आले. पण आज शिवाजी महाराजांना पण ते विसरलेले आहेत. भावनेचा प्रश्न निर्माण करतात. देवा-धर्माला त्याठिकाणी मध्ये आणतात. मधी तर भारतीय जनता पक्षावाल्यांनी सांगितलं, की नरेंद्र मोदी विष्णूचा अकरावा अवतार आहे. आता हे बोलल्यानंतर तुम्हाला हे अकरावा अवतार वाटतं. कशा पद्धतीचा कारभार चाललांय. मी तर महाराष्ट्रामध्ये इतक्या ठिकाणी सांगतो, मोदी साहेब सुरूवातीला सरकार आणण्याच्याकरता सांगायचे, मी फकीर आहे. लोकांना वाटायचं, अरे हे फकीर आहे. हा फकीर माणूस संसारी माणसाला मदतच करू शकत नाही. कारण तो फकीरच आहे. संसारी माणूसच संसारी माणसाला मदत करू शकतो, कारण संसारी माणसालाच संसारी माणसाचे प्रश्न माहिती असतात.

इथे गॅस सिलिंडरची किंमत आमच्या काळात साडेतीनशे रूपये होती. आता ९६० रूपये झाली. इथं जर पवार साहेब केंद्रात असते, आम्ही राज्यात असतो. आम्ही घरी गेल्यानंतर आम्हाला घरच्यांनी सांगितलं असतं. आला का गिळायला, सिलिंडर कुठल्या कुठे वाढलंय. तुम्ही काय करतांय, नुसतं फिरतांय. सरकारमध्ये काम करतांय, असं ऐकावं लागलं असतं. इथं मोदी साहेब घरी गेल्यानंतर त्यांना सांगायलाच कुणी नाही, की गॅस सिलिंडरचा भाव किती झाला. सगळं बिघडलंय ते तिथं बिघडलंय. आणि त्याच्यामुळं तुमची दयनीय अवस्था झालीय.

पेट्रोल वाढतंय, डिझेल वाढतंय. मधी तर एक मंत्री म्हणाले, की आम्हाला पेट्रोल, डिझेलचे भावच माहीत नाहीत. कारण आम्ही पेट्रोल भरतच नाही. सरकार आमचं पेट्रोल भरतंय. म्हणजे आपण काय बोलतोय. आमच्या कराच्या रूपानं तुमचं पेट्रोल भरत असेल, तरीदेखिल पेट्रोल पंपावर लिहिलेलं असतं, पेट्रोलचा दर काय आहे. पेपरला बातम्या असतात, की पेट्रोल इतकं वाढलंय. मधी तर एका मंत्र्यानं सांगितलं, की पंधरा लाख रूपये द्यायचेत बर का प्रत्येकाला. परंतु, रिझर्व्ह बँक आम्हाला अजून पैसे देत नाही. तुम्ही असं नव्हतं सांगितलं, की रिझर्व्ह बँक ऑफ इंडियानं आम्हाला पैसे दिल्यानंतर आम्ही तुमच्या अकाऊंटला पंधरा लाख रूपये टाकू. तुम्ही सांगितलं होतं,

परदेशातून काळा पैसा आणल्यानंतर आम्ही तुम्हाला देवू. आणि आता तर तुम्ही सरळसरळ बदललांय. सरळसरळ खोटं बोलता.

आता नवीन जुमला आला. निवडणुका जवळ येतील, तसं दहा टक्के सवर्णांना आरक्षण आलं ना. एकीकडं सांगतात, ५० टक्क्याचं पुढं आरक्षण कुणालाच देता येत नाही. सुप्रीम कोर्टाचा निकाल आहे. आणि पंतप्रधानांपेक्षा सुप्रीम कोर्ट सर्वोच्च आहे, हे सव्वाशे कोटी जनतेला माहिती आहे. पण त्यांनीच पन्नास टक्क्याच्यापुढचं आरक्षण आणलं. मग तुम्ही त्यावेळेस बोलत होता ते खरं, की आत्ता आरक्षण दिलं ते खरं, याचं उत्तर देशाच्या पंतप्रधानांनी दिलं पाहिजे. आज एका पेपरला बातमी आहे, की शेतकऱ्यांना दरवर्षी मिळणार प्रतिहेक्टर पंधरा




हजार रूपये. प्रश्नचिन्ह आहे. पंधरा हजार हेक्टरी म्हणजे किती झाले माहिती आहे का? पाचशे रूपये महिना. पाचशे रूपये महिन्यामध्ये तो शेतकरी माझा काय करणार आहे? अहो, हे सरकार इतकं नाकर्ते आहे, अक्षरशः निराधार माणसं जी असतात, त्यांच्याकरता आमच्या काळामध्ये संजय गांधी निराधार योजना आली. आम्ही त्यांना सहाशे रूपये देत होतो, परंतु, जयंतरावांनी आणि आम्ही सगळ्यांनी ठरवलं, की आता तो हजारापर्यंत आकडा नेला पाहिजे. कारण, सहाशे रूपये म्हणजे वीस रूपये. वीस रूपयांत काहीच होत नाही. चहाची किंमत दहा रूपये आहे. म्हणजे फक्त दोन चहाची किंमत दिली जाते. एवढी महागाई वाढलीय. आज पाच पाच महिन्यांचे संजय गांधी निराधार योजनेचे पैसे त्या गरीबाला मिळत नाहीत. तुम्ही तुमच्या गावामध्ये संजय गांधी निराधारची यादी बघा. म्हणजे गरीब गरीब होत चाललांय आणि अदानी, अंबानी श्रीमंत होत चालले आहेत. हे यांचं धोरण आहे.

मधी एका घरामध्ये लग्न झालं. कसं लग्न झालं तुम्ही पाहिलं. ठीक आहे. त्यांच्या आई वडिलांनी प्रचंड कमवलं होतं. त्यांच्या मुलीचं लग्न कसं असावं तो प्रश्न त्यांचा आहे. त्याबद्दल दुमत नाही. परंतु, गरीबाचं काय, मध्यमवर्गियाचं काय. दिवसभर काम केल्यानंतर संध्याकाळी ज्याची चूल पेटती, त्याला कोण



न्याय देणार. हे मोदी साहेबांना, देवेंद्र फडणवीस साहेबांना कसं समजत नाही हा खऱ्या अर्थानी प्रश्न आहे.

गेल्या साडेचार वर्षांत जलसंपदाची काय कामे झाली? पाण्याची टंचाई असताना धरणांकडे का लक्ष दिले जात नाही. नितीन गडकरी सांगतात, की मी दरवर्षी राज्याला एक लाख कोटी रूपये द्यायला तयार आहे. आंध्र प्रदेश, तेलंगणाचं जलसंपदाचं बजेट २५ हजार कोटी आहे. आपलं आहे आठ हजार कोटी. अरे, लोकांचे प्रश्न सोडवण्याच्याकरता, आमच्या शेतकऱ्यांना पाणी देण्याकरता, तुम्ही बजेट वाढवा ना. कारण, तुमच्या माझ्या राज्याला साडेचार वर्षात पाच लाख कोटी कर्जाचा डोंगर या राज्यकर्त्यांनी केलांय. दुष्काळ जाहीर केलांय. पण आजही दुष्काळाची जी मदत व्हायला पाहिजे ती झाली नाही. नुसता दुष्काळ जाहीर करून काय उपयोग आहे. जर तिथल्या अडचणीतल्या माणसाला काही मदत होणार नसेल, त्याला रोजगार हमीचं काम तिथं निघणार नसेल, त्याच्या जनावरांना हिरवा चारा किंवा वाळलेला चारा मिळणार नसेल, त्याला पाणी मिळणार नसेल तर त्यांनी प्रपंच चालवावा कसा.

जीएसटी आणला. जीएसटीला पण पूर्वी भाजपने विरोध केला होता. मी उपमुख्यमंत्री म्हणून तुमच्यावतीनं ज्यावेळेस दिल्लीला जायचो, अर्थमंत्री म्हणून जयंत पाटील जायचे, तसं गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून नरेंद्र मोदी साहेब तिथे यायचे. त्यावेळी प्रत्येक वेळेस ते जीएसटीला विरोध करायचे. आम्ही आमच्या काळामध्ये १८ टक्क्यांपर्यंत जीएसटी लावावा, अशा विचाराचे होतो. यांनी २८ टक्के जीएसटी नेला. किंमती वाढवल्या, महागाई वाढवली. आता काहीतरी थोडंसं त्याच्यात काही सवलती देण्याचा प्रयत्न केलांय. निव्वळ आता निवडणुका जवळ आहेत, जनाधार पाच राज्यांमध्ये यांच्याविरोधात गेला आहे. राजस्थान, मध्य प्रदेश, तेलंगणा, छत्तीसगड, मिझोराम या पाच राज्यांमध्ये यांचा पराभव झाला आणि यांना पराभव पाहण्याची कधी सवय नव्हती. परंतु, यांचं विमान जे टेक ऑप

राष्ट्रवादी स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार !!

झाले होते, ते जमिनीवर आले आणि त्यांच्यात सारख्याबैठका चालल्यात, की काय मदत करायची. काय केल्यानंतर लोकं पुन्हा आपल्याला मतदान करतील. काय चुनावी जुमला करायचा. कशा पद्धतीनं लोकांना आपलंसं करण्याचा प्रयत्न करायचा. हे सगळं निवडणुकीवर डोळा ठेवून चाललेलं आहे.

इथं तर वेगळ्या पद्धतीच्या गोष्टी चाललेल्या आहेत. काल जळगावकरांनी मला सांगितलं, की दादा पोलिस खातं, आम्ही काय गोष्टी सांगतोय की इथं असं चाललंय तरी दुर्लक्ष करतात. आमच्या काळामध्ये, आमच्या भागामध्ये कधी चुकीच्या गोष्टी होवू देत नव्हतो. मी विचार केला, की ५२ वर्षे




आम्ही बारामतीमध्ये काम करतो. आमचे बारामतीकर खाऊन पिऊन का होईना सुखी आहेत. त्यांच्या विकासासाठी जे काही करायला लागते, त्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न आदरणीय पवार साहेब, सुप्रिया, मी त्याठिकाणी करतो. माझे कार्यकर्ते करतात. बारामतीच्या बहुतेक संस्था आमच्या ताब्यात आहेत. म्हणून आम्ही विरोधकांनादेखिल कुठलाही त्रास देत नाही. खोट्या केसेस त्यांच्यावर लावत नाही. त्यांना हद्दपारीच्या नोटीसा काढत नाही. त्यांनाही काही मदत लागली तर नियमाप्रमाणे मदत करण्याची आमची तयारी असते. पण तरीदेखील येथील एका मंत्र्यांनी सांगितलं, की माझ्याकडे बारामतीची जबाबदारी द्या. त्यावेळेस माझ्या मनामध्ये पाल चुकचुकली, की बाबा जर मतपत्रिका देवून मतदान झालं, तर मग काय हरकत नाही. पण मशिननी मतदान होणार असेल, तर इथं काय तरी काळंबेरं आहे. कुठतरी पाणी मुरतंय.

मघाशी काही कार्यकर्ते सांगत होते. मागील वेळी धनंजय मुंडेंनी सभा घेतली. त्यावेळी मोठी गर्दी झाली होती. तरी एकाही वॉर्डमध्ये उमेदवार निवडून येवू शकत नाही. असा काय चमत्कार घडला. त्याच्यामुळं काहीतरी गडबड आहे. कुठंतरी कायतरी तिथं तपासून घेतलं पाहिजे. हेदेखिल तेवढंच खरं आहे. पण मला यानिमित्तानं तुम्हाला सगळ्यांना सांगायचंय, ज्या प्रकारे हे सरकार संपूर्ण राज्यात आणि देशात काम करतंय, ते सरकार काम करत असताना माझ्या केळी उत्पादक शेतकऱ्यांच्याकडं पण लक्ष देत नाही. कांदा उत्पादक शेतकऱ्यांनाही भाव देण्यासंबंधीचं त्यांचं धोरणही काही बदलत नाही. २०० रूपये अनुदान देवून त्यांची थट्टा करतात. त्यांची चेष्टा करतात. शेतकऱ्यांशी त्यांना काहीही सोयरसुतक नाही. केळीवर तर सध्या करपा रोग आहे. शेतकऱ्यांचं मोठ्या प्रमाणावर नुकसान झालं आहे. पवार साहेब केंद्रात कृषी मंत्री असताना त्यांनी ३०० कोटी रूपयांचे पॅकेज दिले होते. राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी मिटिंग घेवू असं सांगितलं, पण काहीच घडलं नाही.

अहो, एवढ्या खालच्या पातळीवर चाललेले आहेत, की कशात पण पैसा खायला लागलेत. एकनाथराव खडसे साहेबांनीच आम्हाला सभागृहात सांगितलं, उंदीर मारण्याच्यामध्येदेखिल पैसा खाल्ला. मंत्रालयामध्ये उंदीर मारण्याचं टेंडर काढलं आणि त्याच्यामध्ये पैसा खाल्ला. कुठपर्यंत मजल चालली बघा. धनंजय मुंडेच्या बहिणीनं तर चिक्कीतच पैसा खाल्ला. आता मात्र लोकसभेला आपल्या विचाराचा खासदार आणि विधानसभेला आपल्या विचाराचे जास्तीत जास्त आमदार निवडून आणण्यासाठी काम केलं पाहिजे.

पवार साहेबांना देशाचे पंतप्रधान बनविण्याची इच्छा अनेक कार्यकर्ते बोलून दाखवतात. बाबांनो, आपल्या खासदारांची संख्या बघता एवढं मोठं स्वप्न पाहण्यात काही अर्थ नाही. उगीच कारण नसताना आपण फार काही लोकांना असं सांगून दिशाभूल करण्याचं कारण नाही. एक आहे. आज दिल्लीच्या राजकारणामध्ये जी काही दिग्गज माणसं आहेत, वडीलधारी माणसं आहेत. ज्यांच्याबद्दल इतर पक्षातल्या लोकांनादेखिल आदर वाटतो. अशामध्ये तुमचे आमचे लाडके नेते आदरणीय पवार साहेबांचं नाव पहिल्या क्रमांकावर आहे. साहेबांच्याकडं चर्चा करायला पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी असतील, काँग्रेसचे नेते राहुल गांधी असतील, आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू असतील, जम्मू-काश्मिरचे माजी मुख्यमंत्री फारूक अब्दुल्ला असतील, उत्तर प्रदेशचे माजी मुख्यमंत्री मायावती किंवा अखिलेश यादव असतील, हे सगळीजणं जावून तिथं चर्चा करतात. सीपीएमचे येच्युरी साहेब असतील. हेदेखिल तिथे चर्चा करतात. कारण आज देश ज्या दिशेने चाललेला आहे आणि ज्या पद्धतीचं असहिष्णुतेचं वातावरण संपूर्ण देशामध्ये निर्माण झालेलं आहे. त्याच्यामध्ये हुकुमशाही प्रवृत्ती चाललेली आहे. सरकारच्याबद्दल टीव्हीवाल्यांनी किंवा पेपरवाल्यांनी चांगल्या बातम्या दिल्या तर ठीक, नाही चांगल्या बातम्या दिल्या तर तिथून त्यांना काढून टाकलं जातं किंवा बदललं जातं. अशा घटना कधीही पाठीमागं आपल्या देशात घडत नव्हत्या. त्याच्यामुळं बाबांनो, जर खऱ्या अर्थानी आपण सगळे जर भारतीय आहोत, ही भावना तुमच्या माझ्या मनामध्ये रूजवण्याच्याकरता, वाढवण्याच्याकरता,

आपण सगळे एकसंध राहण्याच्याकरता एकत्र आले पाहिजे.

आज शनिवार आहे. मारूतीचा वार आहे. अहो, हे भाजपवाले इतके पोचलेले आहेत, की यांनी हनुमानाची जात काढली. कधी आपण देवाच्या दर्शनाला गेलो तर आपल्या मनात तरी येतं का की या देवाची काय जात आहे. आपल्या हिंदू, मुस्लिम, शिख अशा कुठल्याही समाजामध्ये अशी शिकवण नाही. पण हे मारूतीची जात काढायला लागले आहेत. तुम्ही पाहा. इतके दिवस प्रभू रामचंद्रांचं नाव उद्धव ठाकरेंनाही आठवलं नाही आणि भाजपालाही आठवलं नाही. परंतु निवडणुका जवळ आल्या, की उद्धव ठाकरे म्हणाले, की रामाचं मंदिर बांधले पाहिजे. अरे, साडेचार वर्षे तुम्ही झोपला होता का. कुंभकर्णाला जागं करायला निघाला तुम्ही. तुम्हाला कुणी अडवलं होतं. आज पेपरला एक बातमी आहे आणि त्यामध्ये भाजपचे एक नेते सांगतायंत, की २०२५ला राम मंदिर उभारायचं आहे. आता



असाच चुनावी जुमला चाललांय. २०२२लाच सगळ्यांना घरं द्यायची. कारण २०१९ला निवडणूक आहे. निवडणूक एकदा पदरात पाडली की पुढंचं पुढं. तशा पद्धतीनं २०२५ला राम मंदिर बांधायचं. अरे, तुम्ही का खोटं बोलता. का दिशाभूल करता. तो मुद्दा तर सुप्रीम कोर्टामध्ये आहे. सुप्रीम कोर्टामध्ये मुद्दा असताना निव्वळ जनतेच्या मनामध्ये धुळफेक करण्याचं काम, संभ्रमावस्था निर्माण करण्याचं काम या राज्यकर्त्यांचं चाललेलं आहे.

गेल्या साडेचार वर्षांत सत्ताधाऱ्यांनी अनेक घोषणा केल्या. पण त्या हवेतच विरल्या. धनगर समाजाला आरक्षण देतो असं सांगितलं. धनगर समाजाला आरक्षण आम्ही देवू शकत नाही असं खासदार सुप्रिया सुळेंच्या लोकसभेतल्या प्रश्नाच्या उत्तरात त्यांनी सांगितले आहे. मुस्लिम समाजाचं आरक्षण आम्ही दिलं. ते आरक्षण शिक्षणाचं मान्य केलं. कुणी, हायकोर्टानी. तरीही आरक्षण द्यायला तयार नाहीत. मुस्लिम समाज तुमच्या माझ्या देशाच्या उभारणीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावत नाही? आज मंत्रिमंडळामध्ये एकदेखिल मुस्लिम प्रतिनिधी तुम्ही घेत नाही. कुठलं गलिच्छ राजकारण तुम्ही करता. कुठल्या थराला तुम्ही जातांय. शेवटी अठरापगड जातीला बरोबर घेवून जायचं असतं ना. ठराविक वर्गाला बरोबर घेवून कसं चालेल. राज्य पुढं जावू शकत नाही. देश पुढं जावू शकत नाही, याची जाणीव सगळ्यांनी ठेवली पाहिजे.

शिक्षणाचा खेळखंडोबा केलांय. काही मुलं आम्ही भाषण करत असताना विचारलं तसं विनोद तावडे यांना कॉलेजच्या मुलांनी विचारलं. ते म्हणाले, ए तुला शिक्षण घ्यायचं नसेल तर घेवू नको. तु नोकरी कर. अरे, त्याचं उत्तर द्या ना. आत्ता तुम्ही मला काय प्रश्न विचारला तर तो समजून घेवून तुम्हाला उत्तर दिलं पाहिजे ना. प्रश्न विचारण्याचा तुमचा अधिकार आहे. उत्तर देण्याचा माझा अधिकार आहे. पण निव्वळ दबावाचं राजकारण. काही दिवसांपूर्वी पंतप्रधान मोदी सोलापूरला आले होते. त्याठिकाणी काँग्रेसचे, राष्ट्रवादीचे कार्यकर्ते विरोध करतील, काळे झेंडे दाखवतील, निदर्शने करतील, लोकशाहीमध्ये निदर्शने केली जातात. कायदा हातात घ्यायचा नसतो. पण त्यांना अटक केली. त्यांना पकडून ठेवलं आणि मोदी साहेबांची सभा झाल्यानंतर सोडून दिलं. काळे झेंडे दाखवलेले पण त्यांना चालत नाही. आम्ही अशा पद्धतीने कधी सत्तेचा गैरवापर केला नाही. आम्ही सत्तेत असताना यांच्या सभा रोखल्या नाहीत.

आज रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे गव्हर्नर, त्यांना काढून टाकले जातात. राजीनामे देतात. नरेंद्र मोदी साहेबांचे आर्थिक सल्लागार त्यांनी स्वत: राजीनामा दिल्यानंतर नोटाबंदीचा निर्णय अतिशय चुकीचा झाल्याचं सांगितलं. जसं राफेलमध्ये ५६४ कोटीचं विमान १६०० कोटीला घेतलं, त्याचं उत्तर नरेंद्र मोदी साहेब देत नाहीयेत. त्या पद्धतीनं नोटाबंदीमध्ये सगळ्यात मोठा भ्रष्टाचार झाला. किती काळा पैसा जमा झाला, किती नकली नोटा आल्या हे सव्वा दोन वर्षांनंतरही काही सांगायला तयार




नाहीत. अरे, देशाला माहिती द्या ना. आता १०००च्या नोटा बंद झाल्यात. का बंद झाल्या. उत्तर द्या ना. तुमच्या मनात आलं, की ही नोट बंद. बंद तर बंद. असं कधी मागं घडलंय. जगामध्येही घडत नाही. नक्षलवाद, दहशतवादी रोखण्यासाठी हा निर्णय घेतल्याचे सांगितले गेले. पण गरीबाच्या हातात पैसा राहिला नाही, हे त्यांना दिसत नाही. धर्मा पाटील या आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याच्या पत्नीला पकडून आणून पोलिस स्टेशनमध्ये ठेवतात. एका महिलेला. आता पण एक महिला माझ्याकडं तक्रार घेवून आली आहे. ती मी घेतली आहे. अशा पद्धतीने आजची महिला सुरक्षित नाही. आमचा मागासवर्गिय सुरक्षित नाही. आमचा आदिवासी सुरक्षित नाही, आमचा मुस्लिम समाज सुरक्षित नाही. समाजातला एकसुद्धा घटक आज या राज्यकर्त्यांच्या काळात सुरक्षित नाहीये.

यांच्या कुणाच्या दमदाटीला घाबरणारी आम्ही माणसं नाही. कुणी कुठंही यावं आणि कशाही पद्धतीने निवडणुका लढवाव्यात. आम्ही लोकशाही मानणारे कार्यकर्ते आहोत. कुणाचा आवाका किती आहे, तो मीसुद्धा बघणार आहे. एकदा मला पण बघायचंय, की काय तुमची ताकद आहे. पवार साहेब नेहमी सांगतात, की निवडणुकांमध्ये यश अपयश येत असतं. निवडणुकीमध्ये यश आलं म्हणून हुरळूनपण जायचं नसतं. सत्तेची नशा, सत्तेची मस्ती, सत्तेचा माज हा डोक्यामध्ये शिरून द्यायचा नसतो. पण पराभव झाला तरी खचून जायचं नसतं. लोकांवर वेगवेगळ्या पद्धतीचा दबाव आणला जातोय. या गोष्टी जरी खऱ्या असल्या, तरी मी सांगितलं, की सद्दाम हुसेनची पण दादागिरी चालली नाही. हिटलरची पण हिटलरशाही नाही चालली. अनेक उदाहरण इतिहासातली तुम्ही घ्या. कुणाचाच मीपणा चालत नाही.

राष्ट्रवादीच्या उमेदवारांच्या पाठीमागे भरभक्कमपणे उभे राहण्याचा प्रयत्न करा. आज माझ्या महाराष्ट्रातल्या आणि भारतातील शेतकऱ्यांची जी अवस्था झाली, बेरोजगारांची जी अवस्था झाली, सर्वसामान्य माणसाची जी अवस्था झाली, या सगळ्यांची अवस्था बदलण्याच्याकरता देशात पवार साहेबांच्या विचाराचं सरकार म्हणजेच यूपीएचं सरकार आणि राज्यामध्ये आघाडीचं सरकार आणण्याच्याकरता आम्हाला सगळ्यांना साथ द्या, आम्हाला सगळ्यांना आशिर्वाद द्या. हीच आग्रहाची, नम्रतेची, कळकळीची विनंती करतो. आज जी परिस्थिती आहे, त्याच्यामध्ये बदल करण्याची ताकद आमच्यामध्ये आहे हा विश्वास तुम्हाला देतो आणि इतक्या मोठ्या संख्येने तुम्ही आलात त्याबद्दल धन्यवाद देतो.

## शेतकऱ्यांच्या मार्केट कमिट्या सरकारकडून मोडीत काढण्याचे काम चालू

यंदाचे हे निवडणुकीचे वर्ष आहे. महाराष्ट्रातील जनता ही भाजप-शिवसेना सरकारच्या कारभाराला कंटाळली आहे. मोठ्या अपेक्षेने लोकांनी देशात नरेंद्र मोदींना व राज्यात देवेन्द्र फडणवीसांना निवडून दिले. त्यांच्याबरोबर शिवसेना गेली. तुम्ही अनेक वर्षे पवार साहेबांचा कारभार बघितला. आम्ही केलेला १५ वर्षांचा कारभार लोकांनी बघितला. पण, आजच्या कारभारावर कोण समाधानी आहे? आज शेतकऱ्यांचा नेता म्हणून देशात एकाच व्यक्तीची ओळख आहे, ती म्हणजे आपले पवार साहेब! आत्ताच्या केंद्रीय कृषी मंत्र्यांचे नावही लोकांना माहिती नाही. शेतकऱ्यांची आज थट्टा चालविली आहे. कृषी मंत्री पांडुरंग फुंडकर यांचे गेल्या वर्षी निधन झाले. आज अखेर कृषिमंत्रिपद रिक्त आहे. ते तात्पुरते चंद्रकांतदादा पाटील यांना दिले आहे. पवार साहेब कृषी मंत्री होते. आमच्या काळात बाळासाहेब थोरात कृषी मंत्री होते. आधीच्या काळात खडसे साहेब कृषी मंत्री होते. कृषी मंत्री हा २४ तास वेळ देणारा व शेतकऱ्यांचे प्रश्न जाणणारा माणूस असावा लागतो. पण, तसे या सरकारला वाटत नाही.

मधल्या काळात ५ पैसे किलो दराने कांदा नासवून टाकला. नाशिक व पुणे हे दोन जिल्हे जास्तीत जास्त कांदा पिकविणारे आहेत. कधी कधी अडचणी येतात. पाठिमागच्या काळात आपल्या विचारांचे सरकार असतानाही अडचणी यायच्या. कधी कांद्याचा शेतकरी अडचणीत आला तर, पवार साहेब तातडीने त्यात लक्ष  घालायचे. पवार साहेबांनी कांदा निर्यातीचे धोरण बदलायला लावले. कांदा उत्पादक शेतकऱ्याला मदत करायचे. जळगावच्या जैन इरिगेशनचे संस्थापक-अध्यक्ष भवरलाल जैन व पवार साहेबांचे स्नेहाचे संबंध. त्यांनी सांगितले की, कांद्यावर प्रक्रिया करणारे काहीतरी उद्योग सुरू करा. आता त्यांची मुले कारभार पाहतात. तुम्ही जाऊन बघा. आता तो प्रकल्प सुरू झाला आहे. मध्यंतरी क्विंटलला दोनशे रुपये वाढवून कांदा उत्पादकांची थट्टा केली. जखमेवर मीठ चोळण्याचाच हा प्रकार आहे. आमच्या काळात ४ कोटी ३० लाख शेतकऱ्यांची ७१ हजार कोटी रुपयांची कर्जमाफी केली. ही देशातील सर्वांत मोठी कर्जमाफी होती. भाजप-शिवसेनेच्या कारकीर्दीत येथे हजर

असलेल्या किती लोकांची कर्जमाफी झाली त्यानी हात वर करावेत. एकही हात वर नाही, याचा अर्थ कोणालाही कर्जमाफी मिळाली नाही. 'यूपीए' सरकारच्या काळात पवार साहेबांनी ७१ हजार कोटी रुपयांची कर्जमाफी केली होती. शेतकऱ्यांची जाण असलेला मंत्री असावा लागतो. तुम्ही मंत्रिमंडळावर नजर टाका. एवढ्या मोठ्या नाशिक जिल्ह्यातील एकही मंत्री करावासा वाटला नाही!

मित्रांनो, उद्याची लोकसभेची व विधानसभेची निवडणूक ही फार महत्त्वाची आहे. आपल्याकडे कांद्याचे जसे वाटोळे झाले आहे, तसेच, टोमॅटोचेही झाले आहे. न परवडल्याने बऱ्याच ठिकाणी टोमॅटो नांगरुन टाकला. खताच्या किंमती वाढल्या, बियाणांच्या किंमती वाढल्या, पॅकिंगच्या किंमती वाढल्या आणि भाव नाही. ही शेतकऱ्यांची अवस्था झाली आहे. मार्केट कमिट्या मोडीत काढण्याचे काम चालू आहे. शेतकऱ्यांच्या मार्केट कमिट्या पण, त्याला खाजगी मार्केट कमिट्यांची स्पर्धा. का? तुम्ही सहकार मोडीत काढायला निघालात? तुम्ही कोणाला संपवायला निघाला आहात? याचे उत्तर देवेंद्र फडणवीस व नरेंद्र मोदी साहेब देऊ शकत नाहीत.

येथे कादवा सहकारी कारखान्याचे चेअरमन श्रीराम शेटे आहेत. २६०० रुपये भाव होता. त्यातील दोन हजार रुपये दिलेत व ६०० रुपये हप्त्याने देणार आहेत. ही अशी वेळ का आली? त्याचे कारण, २९०० रुपये साखरेला दर आहे. तेवढ्या दरात साखर उचलायला टेंडर कोणी भरतच नाही. केवळ एफआरपी द्या म्हणून सांगतात. साहेबांनी गेल्या आठवड्यात सह्याद्रीला मिटिंग बोलावली. साहेबांनी मुख्यमंत्र्यांना सांगितले की, पाठीमागे अशी अडचण आली असता विलासराव देशमुख यांच्या सरकारने साखरेच्या निर्यातीस क्विंटलमागे १०० रुपये अनुदान दिले होते. मात्र, तशा प्रकारचा निर्णय घेण्याची क्षमता आजच्या सरकारमध्ये नाही.

नितीन गडकरी सातारा, सांगली जिल्ह्यात आले. त्यांच्या ताब्यात महाराष्ट्र राज्य सहकारी बँक आहे. त्यांनी खुशाल बँकांना सांगितले की, शेतकऱ्यांना पैसे देऊ नका. तेवढाच धंदा शेतकऱ्यांना दोन पैसे देणारा राहिला आहे. आमच्या भाजीपाल्याला भाव नाही, फळांना भाव नाही, द्राक्ष उत्पादक शेतकरी अडचणीत येतो. कधी कधी आम्ही परदेशात माल पाठवतो. व्यापारी शेतकऱ्यांना फसवतात. त्या शेतकऱ्यांने काय करावे? कोणाकडे बघावे? हे सरकारचे काम नाही का? पण, हे सरकार शेतकऱ्यांकडे लक्ष देत नाही. द्राक्ष उत्पादकांना वायनरीच्या बाबतीत मदत केली जात नाही. पवार साहेबांनी वायनरीचे धोरण आखले ते फक्त द्राक्ष उत्पादकांना फायदा व्हावा म्हणून! साहेबांनी जगाची बाजारपेठ उपलब्ध करून दिली. जळगावच्या केळी पाठविण्यात अडचणी होत्या तेव्हा पवार साहेबांनी वॅगनच्या वॅगन उपलब्ध करून दिली. साहेबांनी कृषी संशोधनासाठी करोडो रुपये दिले. कृषी महाविद्यालये, कृषी विद्यापीठे काढली. शेतकऱ्यांची मुले शिकली पाहिजेत, हा त्या मागील हेतू होता. राष्ट्रीय फलोत्पादन योजना शेतकऱ्यांसाठी राबवली.

आज नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्यापासून वेगवेगळ्या योजना जाहीर केल्या. पण, एकही योजना सर्वसामान्यांच्या उपयोगीची नाही. देशातील वातावरण बदलू लागले आहे. राजस्थान, मध्यप्रदेश, झारखंड, तेलंगणा, मिझोराममध्ये भाजपवाले हरले. आता शेतकऱ्यांना खूष करण्याचा प्रयत्न चालला आहे. शेतकऱ्यांनी पीक विम्यासाठी ४ हजार कोटी भरले. त्यापैकी २ हजार कोटी शेतकऱ्यांना पिक विम्यापोटी मिळाले. बाकीचे दोन हजार कोटी विमा कंपन्यांच्या खिशात गेले. आज ऊस उत्पादक शेतकरी अडचणीत आला आहे. दुष्काळाचे सावट आहे. २५० तालुक्यांत दुष्काळी परिस्थिती आहे. प्यायला व शेतीला पाणी नाही. अनेक प्रकारच्या योजना तेथे बंद पडल्या आहेत. आंध्र, तेलंगणात जलसंपदा खात्यास २५-२५ हजार कोटी रुपये दिले जातात. आपल्याकडे ८ हजार कोटी रुपये. कामे कशी होणार? अक्षरशः गाजर दाखविण्याचे काम चालले आहे. याची जाणिव शेतकरी बांधवांनी ठेवली पाहिजे.

नदीजोड प्रकल्पामध्ये महाराष्ट्राच्या दमणगंगाचे पाणी आमच्या दुष्काळी भागास दिले जात नाही. मात्र, जलतलाव करण्याची घाई चाललीय. त्या मागे नरेन्द्र मोदींना खूष करण्याचा महाराष्ट्र सरकारचा डाव आहे. दमणगंगाचे ३६ टीएमसी पाणी व नारपारचे २० टीएमसी पाणी गुजरातला कायम स्वरूपी द्यायचा करार लवकरच करण्याचा त्यांचा डाव आहे. तुम्ही प्रथम आपल्या लोकांना पाणी द्या ना! माझे चुलते कै. अप्पासाहेब पवार यांनी सांगितले, भविष्यात पाण्यावरून युद्ध होतील. कारण, पाणी हे जीवन आहे. या कराराला राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष भुजबळ साहेबांच्या नेतृत्वाखाली सर्वशक्तीने विरोध करीत आहे. त्याला आम्ही रस्त्यावर, सभागृहात विरोध करू. संपूर्ण पाणी गोदावरी-गिरणा खोऱ्यात वळविण्यात आले पाहिजे. मराठवाड्यात आले पाहिजे. पण, त्याकडे भाजप-शिवसेनेचे


दमणगंगा नदी

सरकार लक्ष देत नाही.

एका टीएमसी पाण्यामध्ये १० हजार एकर जमीन बारा महिने भिजते. ५६ टीएमसी पाणी ५ लाख ६० हजार एकराला बारा महिने पुरते. एवढे पाणी गुजरातला द्यायचा डाव चालला आहे. आम्ही सरकारमध्ये नाही. आम्ही असतो तर, गुजरातला मुळीच पाणी दिले नसते. त्या बदल्यात तुम्ही किती पाणी देणार असे विचारले असते. गुजरात हे आपल्याच देशातले राज्य आहे. पण, आम्ही उपाशी, तहानलेले असताना गुजरातला पाणी कसे देऊ? आम्ही पाणी देणार नाही. पण, हे सरकार पाणी देतेय. हे सरकार लोकांच्या मुळावर उठले आहे. पाच लाख कोटी रुपये कर्जाचा डोंगर या सरकारने करून ठेवला आहे. हा जो कारभार चाललेला आहे, तो आपल्याला थांबवायचा आहे.

अगदी खालच्या पातळीवरचे राजकारण केले जात आहे. जितेन्द्र आव्हाड व भुजबळ साहेबांची सुरक्षा व्यवस्था कमी करण्यात आलेली आहे. आम्ही सरकारमध्ये असताना शिवसेनेला सुरक्षा व्यवस्था द्यायचो, बाळासाहेबांना द्यायचो. ज्यांच्या ज्यांच्या जिवाला धोका आहे, त्यांना सुरक्षा देत होतो. आव्हाड, भुजबळ साहेब सध्या निर्धार परिवर्तनाचा रॅलीत सरकारविरोधी भाषणे करतात, म्हणून त्यांची सुरक्षा व्यवस्था काढून घेण्यात आली आहे. हे सरकार आपल्याला नको आहे. म्हणून, आपल्याला हे घालवायचे आहे. यासाठीच निर्धार परिवर्तनाचा आहे.

हे लोकांना जातीजातीत वाटण्याचा प्रयत्न करीत होते. पाच राज्यांच्या निवडणुकांमध्ये त्यांनी काँग्रेसच्या एका नेत्याचे गोत्रच काढले. काय तर म्हणे, यांचे गोत्र काय आहे? तुम्हाला अजित पवारच्या गोत्राशी काय संबंध आहे का? माझे मी बघून घेईन. आपल्या रोजीरोटीचा प्रश्न सोडवू ना! बेरोजगारांना नोकऱ्या मिळत नाही, त्यांचा प्रश्न सोडवू ना! पण, गोत्र काढून लोकांची दिशाभूल केली जात आहे. मध्यंतरी भाजपच्या एका नेत्याने तर, मोदी हे विष्णुचा ११ वा अवतार आहेत, असे विधान केले. मान्य आहे, ते देशाचे पंतप्रधान आहेत. त्यांच्याबद्दल आदर आहे. पण, तुम्ही त्यांना देवदेवतांच्या रांगेत बसवू लागलात तर, लोक ते सहन करणार नाहीत. प्रत्येकाची कुठे ना कुठे श्रद्धा असते, याबद्दल दुमत नाही. मात्र, लोकांची दिशाभूल सहन केली जाणार नाही.

यूपीएच्या काळातील ५०० कोटीचे राफेलचे विमान आता १६०० कोटी कसे झाले? याचे उत्तर कोणी देत नाही. बोफोर्सचेच काढतात. ते जुने झाले. आता तुमचे सरकार आहे तर, करा ना त्याची चौकशी. चुकीच्या गोष्टीचे आम्ही समर्थन करणार नाही.

जेव्हा आपले सरकार होते तेव्हा देशातील ९९ टक्के जनतेकडे देशातली ५१ टक्के जमीन, जुमला, पैसा होता आणि १ टक्का लोकांकडे ४९ टक्के जमीन, जुमला, पैसा आहे. आता नवीन सर्व्हे आला आहे. दरवर्षी सर्व्हे येतो. नव्या सर्व्हेनुसार ९९ टक्के जनतेकडे फक्त २७ टक्के जमीन, जुमला, पैसा राहिला आहे. आणि एक टक्के लोकांची ७३ टक्के झाली आहे. अदानी, अंबानी हे श्रीमंत झाले आहेत. त्यांनी मध्यंतरी नोटाबंदी करून तुमचे-माझे अतोनात नुकसान केले. जसा राफेलमध्ये भ्रष्टाचार झाला आहे, तसा नोटाबंदीतही प्रचंड भ्रष्टाचार झाला आहे. दोन वर्षे होऊन गेली तरी काळा पैसा किती जमा झाला, याचा हिशोब देत नाहीत. ज्या ज्या देशात हुकूमशाही होती, त्या त्या देशात राज्यक्रांती झाली. दरवर्षी दोन कोटी नोकऱ्या देणार होते. उलट, ज्यांच्या होत्या त्यांच्या नोकऱ्या गेल्या. भुजबळ साहेब नाशिक जिल्ह्याचे पालक मंत्री असताना ज्या वेगाने कामे होत होती, तशी आज होतात का? तर होत नाहीत. कारण, जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणारा मंत्रिमंडळात कोणीच नाही. मग प्रश्न कसे सुटणार? मुस्लीम समाजाचा एकही मंत्री घेतला नाही. देशाच्या उभारणीत त्यांचे काहीच योगदान नाही का?

गेल्या चार-साडेचार वर्षांत पोकळ आश्वासनांमुळे जनतेचा भ्रमनिरास झाला. राज्यातील एकही घटक सरकारच्या कारभारावर समाधानी असताना दिसत नाही. आज शेतकऱ्यांची काय अवस्था आहे? राज्यात सुमारे २५ हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. याला जबाबदार कोण? आता कोणाविरुद्ध ३०२ चा गुन्हा दाखल करायचा? याचे उत्तर सरकारने दिले पाहिजे. पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकीत भाजपचा दारुण पराभव झाल्याने सवर्णांना दहा टक्के आरक्षण मिळाले. अर्थात, हा चुनावी जुमला आहे. आता खऱ्या अर्थाने कामाची जबाबदारी आपली आहे. वेळ कमी आहे. कदाचित लोकसभेबरोबर विधानसभेची निवडणूक लागली तर, आश्चर्य वाटू देऊ नका. राष्ट्रवादीच्या कोणत्याही कार्यकर्त्यांनी आता गाफील राहू नये. आम्हीदेखील राज्याच्या दौऱ्यावर निघालोच आहोत. पवार साहेब दिल्लीत मोठमोठ्या नेत्यांना एकत्र करण्याचा प्रयत्न करीत आहेत. हे नेते एकत्र आल्यानेच भाजप-शिवसेनेचा पराभव होणार आहे, याची खूणगाठ आपल्या नेत्यांनी मनाशी बांधली आहे. मागेल त्याला घर. कोणाला घर मिळाले? मागेल त्याला शेततळे. कोणाला मिळाले? आज महाराष्ट्रावर अडीच लाख कोटीचे कर्ज आहे. कुठे गेले पैसे? कोणाचा फायदा झाला? हा कशा पद्धतीने भ्रष्टाचार चालला आहे? संविधान जाळण्यात आले तरी हे सरकार काही कारवाई करीत नाही. पंतप्रधान मौन पाळत आहेत. पुरोगामी विचारांवर हल्ला करणारे हे सरकार आहे. संविधान बदलण्यासाठीच आम्ही सत्तेत आलो आहोत, असे भाजपचे मंत्री म्हणत आहेत. कोकणवासीयांनो, संविधान राहिले तर, स्वातंत्र्य राहील, समता राहील, आरक्षण राहील, आपले हक्क राहतील. देशात व राज्यात असहिष्णुतेचे वातावरण

पाहायला मिळतेय. त्यात नयनतारा सहगल यांचे निमंत्रण रद्द करणे हा विचार स्वातंत्र्यावर, अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर हल्ला आहे. हे सगळे होत असताना मंत्रिमंडळातला एकही मंत्री हस्तक्षेप करीत नाही, ही अत्यंत लाजीरवाणी गोष्ट आहे. जातीयवादी शक्तीचा पराभव करण्यासाठी आपण सगळ्यांनी सज्ज झाले पाहिजे.

आज सरकार इतक्या योजना जाहीर करतात की, त्यांची आजपर्यंत कोणतीही योजना नीटपणे चालली नाही. आज भिवंडीच्या परिसरात पाण्याचा प्रश्न गंभीर बनत चालला आहे. महाराष्ट्रातही पाण्याची स्थिती गंभीर आहे. पाऊस पडायला अजून सहा महिने अवकाश आहे. आहे, त्या पाण्याचे नियोजन करा. मांडवी असेल, तानसा असेल, भातसा असेल, इतकी धरणे आपल्या भागात असूनही काही नाही. प्रशासन तर या मंत्र्यांना घाबरत नाही. अधिकाऱ्यांवर यांचा वचक राहिला नाही. भिवंडीत आरोग्याचा प्रश्न आहे. महाराष्ट्रातही आहे. आम्ही आमच्या काळात राजीव गांधी जीवनदायी योजना आणली होती. या सरकारने त्या योजनेचा बोजवारा उडवला. भिवंडीच्या परिसरात शैक्षणिक संकुल काढले जात नाही. येथील रोजगाराचा प्रश्न गंभीर बनला आहे. भिवंडीकर, मालेगावकर, इचलकरंजीकर अडचणीत आल्यावर दिल्लीतून कोणी तुम्हाला मदत करतेय? पूर्वी पवार साहेब मदत करायचे आता कोणीही करीत नाही. म्हणून, उद्याची निवडणूक महत्त्वाची आहे.

मयताच्या टाळूवरील लोणी खाणारे हे लोक आहेत. मुंबई ते अहमदाबाद बुलेट ट्रेनची काय आवश्यकता आहे? सव्वा लाख कोटी रुपये त्यासाठी दिले आहेत. त्या ऐवजी, आहेत ती रेल्वे स्थानकांची स्थिती सुधारा. लोकल सुधारा. गरज असेल तिथे मेट्रो सुरू करा. आज कल्याण ते भाईंदर या प्रस्तावित जलमार्गामुळे रेती उत्खनन करणाऱ्या आग्री-कोळी बांधवांवर अन्याय होणार आहे. त्यांचा पारंपरिक मच्छिमारीचा व्यवसाय बंद पडणार आहे. याचे कोणाला काही पडले नाही.

मित्रांनो, या सगळ्या गोष्टींचा विचार आपण केला पाहिजे. शिक्षणाचा खेळखंडोबा केला आहे. कोणतीही गोष्ट नीट होत नाही. लोकसभेसाठी पवार साहेब घड्याळाच्या चिन्हावर जो उमेदवार देतील, त्यालाच आपण निवडून द्यायचे आहे. कांद्याला भाव पाहिजे असेल, टोमॅटोला भाव पाहिजे असेल, द्राक्षाला भाव पाहिजे असेल, पाण्याचा प्रश्न सोडवायचा असेल तर, तुम्हाला परिवर्तन हे करावेच लागेल. निर्धार परिवर्तनाचा करून पवार साहेबांच्या विचारांचे खासदार आपल्याला दिल्लीत पाठवावे लागतील. आम्ही काँग्रेस व मित्रपक्षांना बरोबर घेतोय. या परिस्थितीतून देशाला व राज्याला बाहेर काढण्याशिवाय पर्याय नाही. त्या शिवाय आपल्याला चांगले दिवस येणार नाहीत. विधानसभा निवडणुकीतही राष्ट्रवादीचे जास्तीत जास्त आमदार निवडून द्या. तुमची राहिलेली सर्व कामे पूर्ण करू, असा शब्द मी तुम्हाला देतो.

या भागातील काही ऊस उत्पादक शेतकरी आम्हाला भेटले व म्हणाले, दादा, चोपडा तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मदत करा. मागच्या वेळेला चोपडा कारखान्याला ऊस जास्त होता, त्याच्यातले २ कोटी ४४ लाख रुपये शिल्लक आहेत. यंदा ऊस उभा आहे. तो गेला पाहिजे. कारखाना आत्ता चालू नाही. काही सहकारी माझ्याकडे आले व म्हणाले, दादा, तुम्ही यातून काही तरी मार्ग काढा. पूर्वी पवार साहेब दिल्लीत व आम्ही राज्यात सत्तेत असताना, असा काही प्रसंग आला तर, आपण त्यातून मार्ग काढत होतो. आज सरकारसुद्धा आपण ज्या शेतकऱ्यांच्या मार्केट कमिटीमध्ये बसलो आहोत, त्या मार्केट कमिट्यांच्या विरोधात, बँकांच्या विरोधात, कारखान्यांच्या विरोधात असल्यामुळे कारखान्यांना मदत होत नाही. काही जण म्हणाले, तुम्ही कारखाना चालवायला घ्या. मी चोपड्याच्या जनतेला स्पष्ट सांगतो की, मी काही चोपड्याचा कारखाना चालवायला घेणार नाही. नंदुरबार कारखाना आम्ही लोक चालवतो, कन्नड तालुक्यातील (जि. औरंगाबाद) कारखाना चालवतो, चोपडा भागातील ऊस त्या कारखान्यांनी घेण्याबाबत आम्ही निश्चितपणे प्रयत्न करू. पेमेंटची व्यवस्था करू.

तसेच, पुण्याला गेल्यावर साखर आयुक्तांना भेटून चोपडा कारखान्याकडून ऊस उत्पादकांना जे २ कोटी ४४ लाख येणे आहे, त्याबाबत काय मार्ग काढता येईल, याचा विचार करू. लोकांनी कररूपाने दिलेला पैसा सरकार वेगळ्या कारणासाठी वापरत आहे. यासाठी आपल्याला हे सरकार हटवायचे आहे, त्यासाठी चोपड्यातील जनतेने आम्हाला पाठिंबा द्यावा.



Best

Compliments

# जनतेला फसवणाऱ्या सरकारला निवडणुकीत योग्य जागा दाखवा


**जयंत पाटील**

आज देशामध्ये सामान्य माणसाला दिल्लीच्या आणि मुंबईमधील सरकारवर विश्वास राहिला नाही आणि त्यामुळे या देशात पुन्हा एकदा परिवर्तन करण्याची गरज आहे ही भावना आज सामान्य माणसाच्या मनात जोर धरायला लागलेली आहे. भारतीय जनता पक्ष काय करतंय, काय नाय याचा आमच्या धनंजय मुंडेंनी यथायोग्य समाचार घेतलेला आहे. जळगाव जिल्ह्यातील एक मंत्री सुपारी घेतात, असा त्यांचा नावलौकिक झालेला आहे. पण ते सुपारी कशाची घेतात? या महानगरपालिकेत जावून पैसे खर्च करतो, सगळ्यांना विकत घेतो. त्यांनी धुळ्याची सुपारी घेतली, जळगावची सुपारी घेतली, अहमदनगरची सुपारी घेतली, नाशिकमध्येही हाच कार्यक्रम त्यांनी केला, या महाशयांना संपूर्ण उत्तर महाराष्ट्रात वेगवेगळ्या शहरांत का पाठवलं जातं, हे आता आपल्या सगळ्यांच्या लक्षात आलं असेल.

आज खरं म्हणजे, भारतीय जनता पक्ष अटलबिहारी वाजपेयी आणि अडवानींचा राहिला नाही, हे अनेक घटनांतून आपल्या लक्षात यायला लागले आहे. डोंबिवलीला काल-परवा कुलकर्णी नावाच्या, धनंजय कुलकर्णी नावाच्या एका भाजपच्या उपाध्यक्षाच्या दुकानामध्ये शस्त्रसाठा सापडला. दुसऱ्या दिवशी त्याला कोर्टामध्ये उभं करण्यात आलं, आणि कोर्टानंदेखील जामीनावर त्यांना सोडून देण्याचं काम केलं. काही दिवसांपूर्वी नक्षलवाद्यांचा शिक्का पाहून फक्त नक्षलवादी विचारसरणीची काही पुस्तकं त्यांच्या घरात सापडली म्हणून त्यांना अटक केलेली आहे. ते अजून बाहेर आलेले नाहीत. म्हणजे शस्त्रसाठा सापडणाऱ्याच्याकडं या राज्याचं प्रशासन त्याला दुसऱ्या दिवशी घरी सकाळी सोडून देवू शकतं, पण एखाद्याला आतच घालायचं ठरवलं, तर कशा पद्धतीनं घातलं जातं, हे आपण सगळ्यांनी लक्षात घेतलेलं आहे.

आपल्या राज्यात अनेक प्रश्न भारतीय जनता पक्ष आणि शिवसेनेच्या सरकारला सोडवता आलेले नाहीत. स्वीत्झर्लंडवरून पैसे आणल्यानंतर प्रत्येकाच्या खात्यात १५ लाख रूपये दिले जातील, असं नरेंद्र मोदी निवडणुकीच्या आधी म्हटले. निवडणूक झाल्यानंतर त्यांच्या पक्षाचे अध्यक्ष अमित शहा यांनी मात्र हा चुनावी जुमला असल्याचे सांगून टाकलं. मी एकदा मघाशी सांगितलं, या चौकीदारांच्या डोळ्यादेखत नीरव मोदी गेले, चोक्सी गेले, विजय मल्ल्या पळून गेले. निवडणुकीच्या आधी मात्र, तुम्ही मला चौकीदार बनवा मी हिंदुस्थानच्या तिजोरीला कोणालाही हात लावू देणार नाही, असे आवाहन केले होते. मात्र, आज सर्वदूर चर्चा काय चालली आहे, तर ५४० कोटीचं राफेलचं विमान मोदी साहेबांनी १६७० कोटींना का खरेदी केलं? लोकसभेमध्ये देखील मोदी साहेबांना त्याचं उत्तर देण्याची ताकद राहिली नाही. निर्मला सीतारामन नावाच्या संरक्षणमंत्र्यांना उत्तर द्यायला लावलं, ज्या उत्तरामध्ये राहुल गांधींनी विचारलेल्या बहुतेक प्रश्नांची उत्तरं नव्हती.

ठीक आहे, आपण समजू शकतो, पण आता



# निर्धार परिवर्तन संपर्क यात्रेतील भाषणांचे संकलन

नवी माहिती बाहेर आलीय. यूपीएच्या सरकारनं आपल्यावेळी जे ठरवलं होतं, त्या एका विमानाची किंमत ५४० कोटी होती, १३६ विमानं घेणार होतो, भारतात तयार करणार होतो, पण मोदी साहेबांनी मुळचा करार रद्द केला आणि नवा करार केला, त्यामध्ये एका विमानाची किंमत १६६० का १६७० कोटी झाली. छत्तीसच विमानं साहेबांनी खरेदी केली. अनिल अंबानीला त्याचं कॉन्ट्रॅक्ट दिलेलं आहे. विमानाचं स्पेअर पार्ट पुरविण्याचं ३० हजार कोटी रूपयांचं कॉन्ट्रॅक्ट हे देण्याच्यासाठी नरेंद्र मोदींनी पुढाकार घेतला, अशी देशभर चर्चा आहे. त्याचं उत्तर देशाला पाहिजे. याचंही उत्तर नाही. पण या सगळ्यांची उत्तरं फ्रान्समधून मिळायला लागलेली आहेत. ज्यावेळी नवा करार झाला, नरेंद्र मोदींनी केला, तेव्हाचा फ्रान्सचा राष्ट्रपती, त्या राष्ट्रपतींनी सांगितलं, की भारत सरकारनं आम्हाला रिलायन्सच्या ऐवजी दुसरा कुठलाही ऑप्शन ठेवला नाही. आम्हाला रिलायन्सकडूनच स्पेअर पार्ट पुरविण्याचं काम यांनाच द्यावं लागेल, यावर दुसरा कुठलाही पर्याय ठेवला नाही.



ज्यावेळी पॅरिसमध्ये फ्रान्सच्या राष्ट्राध्यक्षांनी असं विधान केलं, त्यावेळी जगभर लोकांची चर्चा व्हायला लागली, आता गेल्या आठ दिवसांपूर्वी नवी माहिती आलेली आहे, की आपल्या भारतानं खरेदी केलेलं विमान एफ ३ आर किंवा एफ ३ थर्ड व्हर्जन आहे असं म्हणा. अलिकडच्या काळामध्ये गेल्या काही दिवसांत फ्रान्स सरकारनंदेखिल त्या दसॉल्ट कंपनीकडं विमानांची नवी ऑर्डर दिली. फ्रान्स सरकारनं नवी विमानं खरेदी करण्यासाठी जी ऑर्डर दिली, त्या ऑर्डरमध्ये नव्या तंत्राचं, आधुनिक व्हर्जनचं एफ ३ आर खरेदी करण्याचा फ्रान्स सरकारनं निर्णय घेतला आणि त्याची किंमत ५७० कोटी रूपये. जर फ्रान्सच्या सरकारचीच ही किंमत ५७० कोटी असेल, तर नरेंद्र मोदींनी १६०० कोटीच्या पुढचा जो काय व्यवहार केला, त्याचं उत्तर नरेंद्र मोदींना या देशाला द्यावं लागेल. नरेंद्र मोदी हा विषय बोलत नाहीत. आज आपल्या देशाच्या समोर ना खाऊँगा, ना खाने दूँगा असं म्हणणाऱ्या माणसाचं पितळ उघडं पडायला लागलंय हे आपण सगळ्यांनी लक्षात घ्या.

देशातल्या पाच राज्यांत भाजपचा पराभव झाला. नरेंद्र मोदी घाबरलेले आहेत आणि देवेंद्र फडणवीसही घाबरलेले आहेत. सत्ता परत येणार नाही, याची खात्री व्हायला लागलीय. त्यामुळं नरेंद्र मोदी आता पाहिजे ती आश्वासने द्यायला लागलेत. आमच्या राज्यात मुख्यमंत्रीदेखिल पाहिजेल ती आश्वासने द्यायला लागलेत. वेगवेगळे समाज आपल्यापासून दूर गेलेले आहेत, म्हणून अण्णा भाऊ साठे महामंडळाला एवढे पैसे देतो, मराठा समाजाच्या महामंडळाला अण्णासाहेब पाटील महामंडळाला एवढे पैसे देतो, ओबीसी महामंडळाला एवढे पैसे देतो, अशा घोषणा व्हायला लागल्या आहेत. साडेचार वर्षे या राज्यात तुमचे हात कुणी धरले होते. का

तुम्हाला हे सगळे समाज आठवले नाहीत. तुम्हाला पुढच्या तीन महिन्यांनंतर लोकसभेच्या निवडणुका आणि त्याच्याबरोबर जमलं तर विधानसभेच्या निवडणुका घ्यायच्या आहेत आणि म्हणून या राज्यातील जनतेला दिवास्वप्नं दाखवण्याचं काम देवेंद्र फडणवीस महाराष्ट्रात करायला लागले आहेत.

केंद्र सरकारमध्ये नरेंद्र मोदी वेगळं नाही करत. त्यांनी तर आधी एकदम मोठी उडी मारली. त्यांनी सांगितलं, की या देशामध्ये दहा टक्के लोकांना, सवर्ण असणाऱ्या, आर्थिक मागास असणाऱ्या लोकांना मी दहा टक्के आरक्षण देतो. आम्हाला आनंद वाटला. आम्ही त्याचं स्वागत केलं. आमचा कुणाचा विरोध असण्याची गरज नाही. पण नरेंद्र मोदींनी जे दहा टक्के आरक्षण दिलं, ते पन्नास टक्क्याच्या वरचं आरक्षण आहे. पन्नास टक्क्याच्या पुढं जेव्हा जेव्हा आरक्षण दहा टक्क्याचं असो, पंधरा टक्क्याचं असो, सोळा टक्के असो ते वर जातं, त्या त्यावेळी सुप्रीम कोर्टानं एक निर्णय घेतलेला आहे, त्याची माहिती नरेंद्र मोदी २०१४ला कोणत्या शब्दांत देत देतात पहा, नरेंद्र मोदी स्वत: सांगतायंत २०१४ला, की सुप्रीत कोर्ट ५० टक्क्याच्यावर आरक्षण जावू देत नाही. आणि तेच नरेंद्र मोदी पायाखालची वाळू हालायला लागल्यावर या देशातल्या लोकांची दिशाभूल करतायंत.

आम्ही सरसकट कर्जमाफी मागितली. हल्लाबोल आंदोलनाच्या माध्यमातून आम्ही तुम्हा सर्वांच्यासमोर आलो. देवेंद्र फडणवीसांनी कर्जमाफी काय सरळ दिली नाही. सरसकट कर्जमाफी द्यावी ही आमची भूमिका होती. पण देवेंद्र फडणवीसांचं सोडा, नरेंद्र मोदींनी भाजपचे सरकार सत्तेवर येताच पहिल्याच मंत्रिमंडळ बैठकीत शेतकऱ्यांना कर्जमाफी देणार असं आश्वासन दिलं होतं. आता मला सांगा, माणसानं किती खोटं बोलावं. एवढ्या जोरात निवडून आलेलं यांचं सरकार गप्प बसलं असतं तरी लोकांनी एखादवेळी विचार केला असता. पण भारतातल्या जनतेला, राज्यातल्या जनतेला ही फसवणारी लोकं आहेत, याची आता खात्री झालेली आहे.

माझी आपणाला विनंती आहे, खोटं बोलणाऱ्या, लोकांना फसवण्याचा धंदा ज्यांनी कायमचा सुरू केलेला आहे गेल्या साडेचार वर्षांत त्यांना योग्य ती जागा दाखवण्याचं काम येणाऱ्या विधानसभेत आणि लोकसभेत आपण केलं पाहिजे.

आज माझी आपल्याला विनंती आहे, या देशातलं सरकार भ्रष्ट आहे. महाराष्ट्रातलं सरकारदेखिल मंत्रिमंडळातल्या १८-२० मंत्र्यांच्या विरोधात वेगवेगळे आरोप विधानसभेत आणि विधानपरिषदेत आम्ही सगळ्यांनी केले, त्या सगळ्या मंत्र्यांना क्लीनचिट देण्याचं काम हे देवेंद्र फडणवीस राज्याच्या प्रमुखांनी केलं. आपण सगळ्यांनी थोडं बारकाईनं लक्षात घेतलं पाहिजे, आमचं सरकार होतं, काँग्रेस-राष्ट्रवादीचं, दिल्लीतल्या कुठल्या मंत्र्यावर आरोप झाले, महाराष्ट्रातल्या मंत्र्यावर आरोप झाले, त्यात थोडं जरी गांभीर्य दिसलं तर मंत्र्यांना राजीनामा



**तुकाराम दिघोळे हे रोप देऊन जयंत पाटील यांचे स्वागत करताना, शेजारी समीर भुजबळ, चित्रा वाघ, जितेंद्र आव्हाड, छगन भुजबळ, धनंजय मुंडे, फौजिया खान, हेमन्त टकले आणि जयदेव गायकवाड**

द्यायला लागायचा. राज्याचे अन्न नागरी व पुरवठा मंत्री गिरीश बापट यांच्यावर तर कोर्टाने नापसंती व्यक्त केलेली आहे, की तुम्ही असे चुकीचे निर्णय आणि चुकीचं काम कसं करता. पण अजून राजीनाम्याची चर्चा नाही. संवेदनशील सरकार म्हणजे काय हे आपण लक्षात घेतलं पाहिजे. आणि म्हणून माझी आपणाला विनंती आहे, येणाऱ्या काळात आपल्याला या सरकारला बाजूला काढण्याचं काम करायचंय.

भाजपचा सगळा फंडा हा आहे, की आज बोललेलं उद्या माणसं विसरतात. पण आता वेगवेगळी प्रसारमाध्यमं आलेली आहेत. चार वर्षांपूर्वी कोण काय बोललं हे लगेच आपल्या हातात येतं. राज्यातल्या सरकारनं काही दिवसांपूर्वी महिला, शेतकरी, मुलींसाठी काही योजना राबविल्याचं सांगितलं. यामध्ये खरे लाभार्थी कोण होते? शेतकऱ्यांच्या नावे परस्पर कर्ज खुद्द मंत्र्यांनी घेतले. फसवणूक करून कर्जे घेतली. आता कर्जमाफी. या भारतात शेतकऱ्यांना एकाच माणसानं कर्जमाफी दिलं, ते म्हणजे आदरणीय दणका दिलांय, की नरेंद्र मोदींपासून देवेंद्र फडणवीसांपर्यंत सगळे आता घाबरले आहेत.

खरं म्हणजे, या राज्यात भारतीय जनता पक्षाच्या आमदारांनादेखिल माज चढलेला आहे. आमदारांनी वेगवेगळं भाष्य केली. प्रशांत परिचारक तिकडे सोलापूरमध्ये भाजपचे आमदार, बीडचे आमदार सुरेश धस यांनी महिलांवर अतिशय आक्षेपार्ह भाष्यं केली. राम कदम नावाचे आमदार आहेत, त्यांनी दहिहंडीच्या कार्यक्रमात मुलांना सांगितलं, की तुम्हाला कुठली मुलगी पसंत पडेल तिच्याशी लग्न करा, मुलगी तयार नसेल तर तिला पळवून आणून तुम्हाला देण्याची व्यवस्था मी करेन. आता असले आमदार विधानसभेत पाठवायचे जरा बंद करा. देशामध्ये बदल व्हायला लागलांय. लोकांना समाजात जाती-धर्माचे वाद माजवणारी लोकं नको आहेत. मौनी पंतप्रधान म्हणून डॉ. मनमोहनसिंग यांच्यावर टीका करण्यात आली. मात्र, ते लोकसभेत जेवढ्या वेळा बोलले त्याच्या पंधरा टक्केही नरेंद्र मोदी लोकसभेत बोलले नाहीत.



**छगन भुजबळ, अजित पवार, जयंत पाटील, धनंजय मुंडे, अरुण गुजराथी, गुलाबराव देवकर, रविंद्रभैय्या पाटील व इतर नेत्यांना एका मोठ्या पुष्पहाराने सन्मानित करण्यात आले.**

शरद पवार साहेबांनी. मोदींनी मात्र फक्त आश्वासन दिलं. फसवेपणाचा कळस कसा असू शकतो, याचं उत्तम उदाहरण म्हणजे नरेंद्र मोदी आणि देवेंद्र फडणवीसांचं सरकार. पाच राज्यांमधल्या निवडणुकांमध्ये पराभव झालांय, कोट्यवधी रूपये निवडणुकांत खर्च झाले, पण लोकांनी याला दाद दिली नाही. नोटा आल्या म्हणून स्वाभिमानी जनतेने एवढा मोठा आणि म्हणून माझी आपणाला विनंती आहे, की ही सर्व लोकं लोकशाहीच्या विरोधात वागतायत. तुम्हा-आम्हाला या लोकांनी फसवलेलं आहे. फसवणूक करणाऱ्या सरकारला घरी घालवण्यासाठी आम्ही निर्धार परिवर्तनाची यात्रा घेवून तुमच्या दारात आलोय. आम्हाला साथ द्या, आपण सर्वांनी मिळून या फसव्या सरकारला सत्तेवरून खाली खेचूया.

## दिलीप वळसे-पाटील

# इमान विकत घेण्याचा भाजपचा जळगाव पॅटर्न

चाळीसगाव येथे ही सभा होत असताना मला राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना एवढेच लक्षात आणून द्यायचे आहे, की २०१४ ची लोकसभेची निवडणूक असूद्या नाहीतर विधानसभेची असूद्या, भाजप-शिवसेनेच्या वतीने एक प्रश्न विचारला गेला, एक शंका विचारली गेली, की स्वातंत्र्य मिळाल्यापासून ७० वर्षांत या देशात काय झाले? आपल्याला खोटी आश्वासने दिली, खोट्या जाहिराती केल्या आणि इतके आक्रमकपणे हे सगळे केले, ७० वर्षांमध्ये आपल्या पक्षाने काय केले, आपल्या विचाराने हा देश कसा घडविला, आपल्या विचाराने राज्य कसे घडवले, हे सगळे आम्ही कार्यकर्ते व नागरिक विसरून गेलो. आज हे घडले की, खोटी आश्वासने दिली, त्यापैकी एकही आश्वासन पूर्ण करता आले नाही. तुमची-आमची असेल, शेतकऱ्यांची असेल, कामगारांची असेल, तरुणांची असेल, महिलांची असेल, सगळ्यांना फसविण्याचे काम या सरकारने केले आहे. देशात जे घडले, तेच आपल्या जळगाव जिल्ह्यामध्ये घडले. लोकसभेला आपल्याला यश आले नाही. आपल्या चाळीसगाव मतदारसंघातही यश आले नाही. कारणे काहीही असोत, या मतदार संघातून राजूदादांनी जे समर्थपणे विधानसभेत नेतृत्व केले, सरकारमध्ये नेतृत्व केले, या भागाच्या विकासासाठी काम केले, या सगळ्याचे आपल्याला विस्मरण झाले. म्हणून, आज ही परिवर्तन यात्रा येथे आली आहे. याच्याआधी संघर्ष यात्रा आली होती. त्या वेळी काही नेते येऊ शकले, काही येऊ शकले नाहीत. पण, आज येथे भाषणे ऐकल्यानंतर, विचार ऐकल्यानंतर, गावात गेल्यावर काय करणार, हा खरा प्रश्न आहे. परिवर्तन जर करायचे असेल तर, तुम्हालाही निर्धार करायला पाहिजे की, आम्ही याची सुरुवात आमच्या गावापासून, तालुक्यापासून करू. व राष्ट्रवादी काँग्रेसला किंवा काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीला विजयी करू.

लोकसभा निवडणुका तोंडावर आल्या आहेत. लोकसभा व विधानसभा निवडणुका एकत्र होणार की नाही, हा विषय निवडणूक आयोगाचा आहे. उमेदवाराच्या बाबतीत निर्णय घेण्याचा अधिकार पक्षाचा आहे. जर एकत्रित निवडणुका झाल्या नाहीत तर, ऑक्टोबरमध्ये विधानसभेच्या निवडणुका ठरलेल्या आहेत. जर परिवर्तनच करायचे



# निर्धार परिवर्तन संपर्क यात्रेतील भाषणांचे संकलन

असेल, मोदी साहेबांना हटवायचे असेल, त्यांच्या विचारांना हटवायचे असेल तर, आपण चाळीसगावमध्ये काय करणार आहोत, हा खरा प्रश्न आहे. मध्यंतरी जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुका झाल्या. नगर पालिकेच्या निवडणुका झाल्या. आपली राष्ट्रवादी काँग्रेसची इतकी ताकद असताना आपल्याला थोडेसे अपयश आले, मागे राहावे लागले. नगराध्यक्षपदाला आपल्याला मागे राहावे लागले. बहुमत मिळाले. पण, मुख्यपद दुसऱ्याकडे गेल्यामुळे शहराच्या, तालुक्याच्या, जिल्ह्याच्या पातळीवर, राज्याच्या पातळीवर, देशाच्या पातळीवर आपल्याला अडचणी आल्या. त्या दूर करायच्या असतील तर, आपल्याला तयारीत राहायला पाहिजे. या जिल्ह्यात नवीन पॅटर्न आलेला आहे. काय आहे तो, हे माहिती नाही.

मागच्या निवडणुकीच्या वेळी आपण म्हणत होतो 'ईव्हीएम'च्या मशीनमध्ये काहीतरी गडबड आहे, त्याच्यामुळे हे सगळे एकतर्फी झाले आहे. परवा जळगावची महापलिका झाली, धुळ्याची महापालिका झाली, नाशिकची महापालिका झाली आणि तुमचा हा जळगावचा पॅटर्न, तो पॅटर्न दुसरा तिसरा काही नसून माणसांचे इमान विकत घेण्याचा पॅटर्न या जळगाव जिल्ह्याने सुरू केला आणि सूचितेचा आव आणणारा भाजप आज सत्ता संपादन करण्यासाठी कोणत्याही स्तरावर जाऊन, वाट्टेल तेवढ्या पैशाचा व शक्तीचा वापर करून त्यात यश मिळवायला लागले, ही गोष्ट आपण लक्षात ठेवली पाहिजे.

माझी आपणास विनंती आहे, गेल्या वेळेस २००९ मध्ये आपल्या जिल्ह्यात विधानसभेचे आपले सहा आमदार होते. २०१४ ला निवडणुका झाल्या, फक्त पारोळ्याचे अण्णा सोडले तर, कोणतीही जागा आपल्याला जिंकता आली नाही. या वेळेला आपण जे नियोजन केलेले आहे, त्यानुसार, विधानसभेच्या किमान सहा जागा निवडणूक होईल तेव्हा आपल्याला निवडून आणता आल्या पाहिजेत आणि लोकसभेच्या निवडणुकीतही पक्ष देईल तो उमेदवार निवडून आणता आला पाहिजे. त्यादृष्टीने आपण काम केले पाहिजे.

आपले नेते पवार साहेब, दहा वर्षे देशाचे कृषी मंत्री होते. त्यांनी काय काय निर्णय केले? आज मोदी साहेबांनी काय काय केले नाही ते आपण सांगितले. पण, पवार साहेबांनी ७२ हजार कोटी रुपयांचे शेतकऱ्यांचे कर्ज माफ केले होते, शेतमालाच्या किंमती वाढवून दिल्या. राष्ट्रीय कृषी विकास योजनेला सुरुवात केली. फलोद्यान मिशनची स्थापना करून शंभर टक्के अनुदान दिले. मेगा पाणलोट क्षेत्राचा प्रकल्प आणला.



म्हणून, दुसऱ्या हरित क्रांतीचे जनक म्हणून देशाच्या संसदेत पवार साहेबांचा गौरव तत्कालीन पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी केला. पवार साहेबांनी दुग्ध विकासाला २० हजार कोटीचा कार्यक्रम दिला. शेतकऱ्यांना सतत मदत करायची भूमिका पवार साहेब नेहमी घेत होते. शेतकऱ्यांचा राजा दहा वर्षे दिल्लीत होता, म्हणून, शेतकऱ्यांना चांगले दिवस होते. आज दिल्लीत बसलेल्यांना शेतकऱ्यांचे काही पडले नाही. ग्रामीण भागाची काही पडली नाही. ते फक्त बुलेट ट्रेनची भाषा करतात. ते तुम्हा आम्हाला फसवायचे काम करतात आणि आम्ही त्याला भुलून जातो. या सगळ्या आजाराला एकच पर्याय आणि तो म्हणजे, देशात परिवर्तन करणे, राज्यात परिवर्तन करणे, आपल्या जळगाव जिल्ह्यातही आपल्याच पक्षाचा आमदार, कसा निवडून येईल याचा विचार करायचा आहे. उद्याच्या निवडणुकीत आमचे राजूदादा हेच कसे निवडून येतील, हे आपण सगळ्यांनी पाहिले पाहिजे आणि तशीच कामगिरी लोकसभेच्या निवडणुकीतही करून दाखवा, एवढीच अपेक्षा या निमित्ताने करतो.



आज आमच्या सर्वांच्या हातात हा आसूड दिलांय. या भागात याला आसूड म्हणतात, मराठवाड्यात आमच्याकडे चाबूक म्हणतात. याने जास्तीत जास्त बैलावर धाक दाखवता येतो. पण सरकार गेंड्याचं असेल, तर या आसूडानं ते नीट होईल का याचा विचार माझ्या मनात भाषणाच्या सुरूवातीला आला.

रायगडावरून निर्धार परिवर्तन यात्रेची सुरूवात झाली. हिंदवी स्वराज्याची राजधानी, जिथून रयतेच्या कल्याणासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी सिंहासनावरून रयतेचं कल्याण केलं. त्या छत्रपती शिवाजी महाराजांना मानाचा मुजरा घालून, राष्ट्रमाता जिजाऊ मांसाहेबांच्या समाधीस्थळी नतमस्तक होवून, महाडला चवदार तळ्यावर परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मृतिस वंदन करून ही राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची निर्धार परिवर्तन यात्रेची सुरूवात झाली. महाडला पोहोचल्यावर सभा चालू व्हायच्या अगोदर मुंबईच्या एका पत्रकाराने मला फोन केला. निर्धार परिवर्तन यात्रेच्या बाबतीत शुभेच्छा दिल्या आणि शुभेच्छासोबत मला एक प्रश्न विचारला. म्हटले, धनंजय तुम्ही ही निर्धार परिवर्तनाची यात्रा रायगडवरून का चालू करतांय? महाडच्या चवदार तळ्यावरून का चालू करतांय? तुम्ही पुण्यातून चालू करू शकला असता, कोल्हापुरातून चालू करू शकला असता, नागपूरवरून चालू करू शकला असता, औरंगाबादवरून चालू करू शकला असता, नाशकातून करू शकला असतात, रायगडावरूनच का? मी उत्तर दिलं, की या हिंदुस्थानाच्या इतिहासात दिल्ली तख्त शहाजहाँच्या विरोधात पहिली परिवर्तनाची लढाई जर कुणी लढली असेल तर युगपुरूष छत्रपती शिवाजी महाराजांनी ती लढली. सामाजिक आणि मनुस्मृतिच्या विरोधात चवदार तळ्यावरून परिवर्तनाची चळवळ जर या हिंदुस्थानात कुणी उभी केली असेल, तर ती लढाईसुद्धा परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुरू केली. आज आम्ही या दोन

# मोदींच्या अच्छे दिनाची आता गावागावांत व चौकाचौकात चेष्टा व टिंगल



## धनंजय मुंडे

# निर्धार परिवर्तन संपर्क यात्रेतील भाषणांचे संकलन

महामानवांना नतमस्तक होवून परिवर्तनाचा त्यांचा तो आदर्श डोळ्यासमोर ठेवून निर्धार परिवर्तनाची यात्रा रायगड आणि महाडवरून सुरू करतोय.

तीन-चार मुद्यांवर मी आपलं लक्ष या भाषणाच्या निमित्तानं वेधणार आहे. मी माझ्या मागील एका भाषणात पंतप्रधानांची तुलनात एक आमीर खानचा पिक्चर गजनीशी केली. भारतीय जनता पार्टीला फार मिरची झोंबली. त्या पक्षातल्या माझ्या एका जुन्या सहकाऱ्याने मला फोन करून वाद घातला. म्हणे, तु प्रधानमंत्र्यांच्या विरोधात असं कसं बोलतो? म्हटलं, मी काय चुकीचं बोललो. म्हणाला, तु गजनीचा आमीर खान म्हटलांस. मी म्हटलं, खरं आहे. चूक कुठं आहे. २०१४मध्ये नरेंद्र मोदींनी भाषणं केली. ती भाषणं जर मोदी २०१९मध्ये विसरत असतील, तर त्याला आमीर खानचा गजनी म्हणावं नाहीतर काय म्हणावं मला सांगा.

२०१४मध्ये ज्यावेळेस गुजरातचे मुख्यमंत्री नरेंद्रभाई मोदी हे त्यावेळेच्या यूपीए सरकार जीएसटी आणण्याचा निर्णय घेत होतं, त्यावेळेची भाषणं यूट्यबूवरती तुम्ही आजही पाहा, की जीएसटी देश को बर्बाद कर देगा. आरक्षणाच्या बाबतीत निवडणुकीतलं भाषण, की चुनाव से पहले कोई भी पार्टी सत्ता मे होगी, पाच-दस पर्सेंट आरक्षण दे देगी, लेकीन सुप्रीम कोर्टने ये निर्णय दिया है, की पचास पर्सेंट के आगे कोई भी आरक्षण दे नही सकता. आता यांनी दिलं. मग आता गजनीतीला आमीर खान म्हणावं यांना, की काय म्हणावं हे मला तुम्हीच सांगा. ते सोडा, पण २०१४च्या निवडणुकीच्या



काळात एक व्यक्ती या देशाच्या प्रधानमंत्रीपदाचा उमेदवार म्हणून १२५ कोटी जनतेला स्वप्न दाखवत होता आणि १२५ कोटी जनता त्या स्वप्नात रंगत होती.

पहिलं स्वप्न दाखवलं, अच्छे दिनचं. स्टेजवर यायचे. माईकवर बोलायला आले, की समोरच्या लोकांकडे बघून मोदी म्हणायचे, अच्छे दिन, की समोर बसलेले लाखो लोक म्हणायचे, आनेवाले है. आता कसं आहे? आता या अच्छे दिनच्या बाबतीत संबंध देशभरामध्ये गावागावांतल्या चौकाचौकांमध्ये चेष्टा व्हायला लागली आहे. एक तर अच्छे दिन म्हटलं, की समोरचा हसतो. नाहीतर शिवी देतो. बरोबर आहे की नाही? आता ही तुम्ही आम्ही केलेली चेष्टा सोडून द्या. पण नरेंद्र मोदींच्या मंत्रिमंडळात मांडीला मांडी लावून बसणारे महाराष्ट्रातले एक दिग्गज नेते, ज्यांचं नाव माननीय नितीन गडकरी, चार महिन्यांपूर्वी एका हिंदी न्यूज चॅनेलला मुलाखत द्यायला गेले, मुलाखत चालू झाली आणि एक प्रश्न त्या वार्ताहराने नितीनजींना विचारला, की नितीनजी आप बता सकते हैं, की इस देश में अच्छे दिन कब आने वाले हैं? नितीनजींनी उत्तर दिलं, की अच्छे दिन बिच्छे दिन कुछ नहीं होते, उसको महसूस करना होता हैं. मी आज तुम्हा सगळ्यांना विचारायला आलेलो आहे, की आपको अच्छे दिन महसूस हो रहें हैं?

अच्छे दिनच्या नावावर फसवलं. विदेशसे काला धन लाऊंगा, खाते में पंधरा लाख जमा कराऊंगा. आहे इथं एखादा खातेदार, ज्याच्या खात्यावर पंधरा लाख जमा झालेत. पंधरा पैसे सुद्धा नाही. पण आणखीही मोदींचे काही अंध भक्त आहेत. ज्यांनी जनधन योजनेत बँकेत फुकट खाते उघडलंय. काही राहिलेत, ज्यांना आणखीन वाटतंय, आचारसंहितेच्या अगोदर का होईना मोदी पाच पंचवीस हजार का होईना आपल्या अकाऊंटला सारणार. पंधरा लाखाच्या नावावर फसवलं. अरे, २०१४ला भारतीय जनता पार्टी आणि शिवसेनेनी महागाईच्या विरोधात रान पेटवलं. टीव्हीवर जाहीराती दिल्या, वर्तमानपत्रात जाहीराती दिल्या. रेडिओवर जाहीराती दिल्या. त्या आपण वाचल्या, पाहिल्या, ऐकल्या. काय जाहीरात होती? बहोत हो गयी महंगाई की मार, अब की बार...घ्या गोंदून...मोदी सरकार.

पण २०१४ला खरंच महागाई होती का? २०१४ला या देशात ५० रूपये लिटरनी पेट्रोल मिळत होतं. ६० रूपये किलोने डाळ मिळत होती. पावणे चारशे रूपयांनी सिलिंडरची टाकी मिळत होती. आता २०१९ आहे. काय परिस्थिती आहे? आज पन्नास रूपयांचं पेट्रोल ८० रूपयांच्या आसपास गेलंय. बरं झालं, या २०१९मध्ये लोकसभेच्या निवडणुका लागल्या, नाहीतर विराटची ऑस्ट्रेलियामध्ये सेंच्युरी झाली असती का नसती माहीत नाही, पण पेट्रोलने नक्कीच आपली सेंच्युरी केली असती.

आज एक हिशोब तुम्हाला सांगतो. लगेच मोबाईल काढून करू नका, घरी गेल्यावर करा. एका व्यक्तीने आपल्या मोटारसायकलमध्ये रोज, १४मध्ये आणि आत्ताचा फरक बघा, एक लिटर पेट्रोल टाकलं, तर १४च्या आणि आत्ताच्या पेट्रोलच्या भावात ३१ रूपयांचा फरक जर आपण धरला, तर रोज मोदी साहेबांनी तुमची ३१ रूपयांनी नीटनेटकी केलेली आहे. मोदी साहेबांना खुर्चीवर बसून ४ वर्षे ७ महिने झाले आहेत, त्या दिवसांचा हिशोब करा घरी गेल्यावर, गुणिले ३१ रूपये करा, काय हिशोब येतोय बघा आणि झोप आली तर मला फोन करून सांगा, झोप आली म्हणून. पावणेचारशे रूपयांचं सिलिंडर, आज काय भाव आहे? हजार रूपये. पावणे चारशे आणि हजार रूपयांमध्ये फरक आहे सव्वा सहाशेचा. जर आपल्याला एक सिलिंडर महिन्याला लागत असेल, तर मोदी साहेबांनी तुमची नगदी नेट महिन्याला सव्वा सहाशे रूपयांनी...समजून घ्या. ४ वर्षे ७ महिने. एका वर्षात बारा महिने. हिशोब करा, झोपताना आणि झोप लागतीय का सांगा.

अरे, महागाई थांबवतो म्हणून त्यावेळेस बहोत हो गयी महंगाईच्या जाहीराती केल्या आणि त्या जाहीरातींमध्ये एका अक्काबाईला आणलं, आणि ती अक्काबाई म्हणायची, की तुमच्या महागाईनं आमचं कंबरडं मोडलं, जनता तुम्हाला माफ नाही करणार. ४ वर्षे ७ महिने झाले त्या अक्काबाईला शोधतोय, सापडतंच नाही. महागाईच्या नावावर फसवलं. अरे, आज असंख्य तरूण इथं बसलेत. या सभेला आज तरूणाई आलेली आहे. २०१४च्या त्या निवडणुकीमध्ये आम्ही या तरूणाईला विचारायचो, की अरे कुणाला मतदान करणार आहे? आमच्यासोबत राहा. त्यावेळेस ही तरूणाई जमिनीवरून दीड दीड फूट उड्या मारून हर हर मोदी, घर घर मोदी म्हणायचे. खरं हाय की नाय? त्यांचा दोष नाहीये.

एका सभेत मोदीजींनी सांगितलं, नवजवानों, मुझे प्रधानसेवक बनाओ, मैं हर साल में दोन करोड रोजगार निर्माण करूंगा. आता पोरांना वाटलं, काय भारी माणूस आहे. वर्षाला दोन कोटी नोकऱ्या आणणार आहे. म्हणजे एक नोकरी आपल्याला शंभर टक्के मिळणार आहे. नोकरी मिळाली, की छोकरी आपल्याला मिळणार. छोकरी मिळाली, की हम दो-हमारे दो, आपल्या घरात अच्छे दिन येणार. आता तीच पोरं साडेचार वर्षांनी आम्हाला सभेत भेटायला येतात, आज आम्ही म्हणतोय, कसं काय आहे? सोयरीकसुद्धा नाय

म्हणतात साडेचार वर्षांत. या देशातल्या तरूणाईची फसवणूक केली.

अरे, एवढंच नाही. ज्या व्यापाऱ्यांनी मोदींना डोक्यावर घेतलं. २०१४च्या या देशातल्या परिवर्तनामध्ये सिंहाचा वाटा ज्यांनी उचलला, नोटबंदी आणली. उद्ध्वस्त सगळ्यात आधी शेतकरी, शेतमजूर झाला. दुसरा व्यापारी झाला. लहान व्यापारी, मोठा व्यापारी. नोटबंदीत सगळं उद्ध्वस्त झालं. कसा तरी नोटबंदीतून देश सावरतोय, तेवढ्यात मोदींनी लगेच जीएसटी आणला. आज जीएसटीनं कंबरडं मोडलं. आज संबंध देशाची अर्थव्यवस्था पूर्णपणानं बिघडलीय. आणि याच्यात मोदींची स्वप्नं काय? मला एक गोष्ट कळालीच नाही. कुणीतरी समजून सांगावं. अहमदाबादवरून मुंबईला बुलेट ट्रेन. आता त्या बुलेट ट्रेनसाठी महाराष्ट्र २५ हजार कोटी रूपये खर्च करणार आहे. आता बुलेट ट्रेनची कन्सेप्ट मला समजूच शकत नाही या देशामध्ये. ज्या देशात प्रचंड प्रगती आहे, ज्या देशातल्या जनतेकडं काम करायला वेळ कमी आहे, अशा लोकांना कमी काळात लवकर मोठ्या ठिकाणी पोहोचण्याकरता बुलेट ट्रेन समजू शकतो. आता आपल्या देशात आत्तासुद्धा, माझं हे उदाहरण अनुभव घ्या, एखादी जेसीबी मशिन असते ना, ती सुद्धा रिव्हर्स टाकून मागे घ्यायचे म्हटले तर मागं पाच पंचवीस लोकं आन दो, आन दो म्हणत रस्त्यात उभी असतात. आता एवढा वेळ जर आपल्याकडं असेल तर आपल्याला बुलेट ट्रेनची गरज आहे का? कशासाठी?

आज समृद्धी महामार्गाच्या संदर्भात मला निवेदनं लोकांनी दिली. ८० टक्के भूसंपादन केलंय. का, यापूर्वी मार्ग नव्हता का? पण झाला, लोकांनी जमिनी दिल्या. पण दिलेल्या जमिनीसुद्धा आज जर शेतकऱ्यावर अन्याय होत असेल, तर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी कधीही शेतकऱ्यावर अन्याय होवू देणार नाही. आज तुम्ही कामं चालू करतांय आणि कामं चालू करून जर या भागातला शेतकरी जर भूमीहीन झाला, त्यांच्यावर काम करणारे ठेकेदार जर अन्याय करत असतील, आणि या भागातल्या तरूणाईला हक्काचा रोजगार देणार नसतील, तर मात्र काम बंद पडलं तरी हरकत नाही. पण शेतकऱ्यावर अन्याय राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी कधी सहन करणार नाही. विकासाच्या विरोधात आम्ही नाही. पण कुणी शेतकऱ्याला जर विरोध करत असेल, तर मात्र नक्कीच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाही.



धनगराची घोंगडी जयंत पाटील आणि धनंजय मुंडे यांच्या खांद्यावर घालून त्यांचा सत्कार करण्यात आला.

आजच्या कार्यक्रमाच्या निमित्तानं, आजच्या या यात्रेच्या निमित्तानं, राज्य सरकारचंही काय चालू आहे, हे मी आपल्याला दोन मिनिटांत सांगेन. मोदींच्या लाटेनंतर तीच लाट महाराष्ट्रात कायम राहिली. शाहू-फुले-आंबेडकरांच्या या महाराष्ट्रात, छत्रपती शिवाजी महाराजांच्या या महाराष्ट्रात कधी नाय ते भारतीय जनता पार्टीच्या १२२ जागा निवडून आल्या. ६३ जागांवर शिवसेना निवडून आली. भाजपने सरकार स्थापन केलं. एक महिन्यानंतर शिवसेना सोबत गेली. ज्या दिवसापासून भाजप आणि शिवसेनेची युती या महाराष्ट्रात बसली आहे, एक दिवस असा गेलेला नाही जसं एखाद्या घरात

रोज सासू-सुनेची भांडणं असतात, यापूर्वी मी वेगळी उदाहरणे देत होतो. पण मला सांगण्यात आलं, की त्या प्राण्यांचं नाव घेत जावू नका, जे रोज रस्त्यात एकमेकांशी भांडत असतात. त्या कळवंड्या आपण अनेकदा पाहिल्या असतील. ते कुठले प्राणी त्याचं नाव घ्यायची गरज नाही. आपण तेवढे समजदार आहात. रोज भांडण आहे.

या महाराष्ट्राचा विधानसभेच्या निवडणुकीत या राज्याचे प्रमुख ज्यावेळेस भारतीय जनता पार्टीचे अध्यक्ष होते. काय शब्द दिला? सातबारा कोरा, भ्रष्टाचारमुक्त महाराष्ट्र, पारदर्शक नाही? आपल्यापैकी बरेच जण गेले असतील जोडीनं. मी मुख्यमंत्र्यांना म्हटलं, की अरे तुम्ही शेतकऱ्याला जोडीनं कर्जमाफीच्या ऑनलाईनच्या लाईनीत उभं करतांय, नेमकी तुम्हाला कर्जमाफी द्यायची आहे, की तुमच्या घरात झालेल्या सत्यनारायणाच्या पुजेचा प्रसाद द्यायचा आहे, एवढं तरी सांगा. जोडीनं कशाला?

बरं आपण काय संसारिक माणसं आहोत. रोजच आपल्या घरातलं वातावरण चांगलं असेल असं खात्रीलायक कोण सांगू शकत नाही. काय नवरा-बायकोचं रोज कधी



धनगर समाजाला आरक्षण नाकारणाऱ्या भाजप-सेना सरकारविरुद्ध लढण्यासाठी जयंत पाटील आणि धनंजय मुंडे यांना काठी आणि घोंगडं भेट देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यावेळी शेजारी आमदार विक्रम काळे, माजी खासदार गणेश दूधगावकर व इतर मान्यवर.

सरकार. आज मला प्रश्न विचारायचा आहे, राज्याच्या मुख्यमंत्र्याला, अरे, तुम्ही कर्जमाफीची घोषणा केली, तेही राष्ट्रवादी काँग्रेसच्या भीतीपोटी शेतकऱ्याच्या संपापोटी तुम्ही कर्जमाफीची घोषणा केली. घोषणा करताना तर अशी केली, ऐतिहासिक, मला तर एकेदिवशी रात्री वाटलं, की आता सातबारा कोरा म्हणजे त्या सातबाऱ्यावरचं कर्जही साफ होतंय आणि आपलं नावही साफ होतंय की काय. एवढं ऐतिहासिक नाव. नाव छत्रपती शिवाजी महाराजांचं दिलं आणि कर्जमाफीच्या बाबतीत, म्हणाले आता ऑनलाईन कर्जमाफी मिळणार. आणि ऑनलाईनमध्ये खुटी अशी मारून ठेवली, म्हणाले, जे आपल्या पत्नीला ऑनलाईनच्या लाईनीत घेवून येईल त्यालाच कर्जमाफीचा फायदा मिळेल. बरोबर आहे की कधी होतं, पण त्या काळामध्ये उभ्या महाराष्ट्रात दीड लाख शेतकऱ्यांमध्ये त्याच ऑनलाईन भरायच्या काळातच जर अनेक शेतकऱ्यांचं आपल्या बायकोसोबत नसलं जमलं, किती मोठी भानगड आहे? मुकले ना ते कर्जमाफीला. म्हणजे नियोजनाने सरकार चालवायची अक्कल यांना नाही. कर्जमाफी फसवी. भ्रष्टाचारमुक्तीचा विषय केला, या चार वर्षात या महाराष्ट्रात युती सरकारच्या सोळा मंत्र्यांचे ९० हजार कोटी रूपयांचे भ्रष्टाचाराचे घोटाळे पुराव्यानिशी विधानपरिषदेमध्ये मी, टकले साहेब इथे आहेत, पावसकर साहेब इथे आहेत, कुठल्याही पुराव्याला ते खोडू शकले नाहीत. मी मुख्यमंत्र्याला म्हटलं, जर तुम्हाला मंत्र्यांवर कारवाई करायची नसेल, त्यांना क्लीनचिट द्यायची असेल,

तर पहिल्यांदा मी दिलेले पुरावे तुम्ही खोटे आहेत हे ठरवा. तुम्ही राज्याचे मुख्यमंत्री आहात. जर मी दिलेला पुरावा, एकजरी खोटा निघाला तर महाराष्ट्रातल्या कुठल्याही चौकात आम्हाला फाशी द्या. आम्ही फाशी घ्यायला तयार आहे. पण सोळा मंत्र्यांचा ९० हजार कोटींचा घोटाळा मुख्यमंत्र्यांच्या क्लीनचिटच्या आशिर्वादानं या सोळा मंत्र्यांना यांनी वाचवलं. आणि आमच्यावर मात्र तुटून पडता.

कसलं पारदर्शक सरकार आहे? कुठल्या पारदर्शकतेच्या गप्पा तुम्ही मारतांय. अरे, रोज भाजप-सेनेची भांडण अशा पद्धतीनं चालू आहेत, की शेवटी आता शिवसेनेची आणि भाजपची अवस्था पाहिल्यानंतर मला एकजणानं गोष्ट सांगितली, की एक वाघ असतंय, ते जंगलात लय मजेत राहात असतंय. एका दिवशी त्या वाघाला एका मुलीवरती प्रेम होतंय. ती मुलगी वाघाला म्हणते, की मलाही तु आवडतोस. पण तुला नखं आहेत. मला लागतील ना. वाघाला वाटतं, की अरे खरंच मला नखे आहेत. वाघ जातंय, नखं कापून येतंय. मुलगी म्हणते, नखं कापलीस बरं केलंस. पण तुला सुळे दात आहेत. ते मला लागतील ना. वाघ म्हणतो, अरे खरंच मला दात आहेत. वाघ पुन्हा जातंय, दातं पाडून येतंय आणि दातं पाडल्यावर वाघाच्या लक्षात येतंय, अरे, आपण तर जंगलाचे राजे. नखं काढली, दातं पाडली, शिकार करायची कशी, खायचं कसं. वाघ उपाशी मरायला लागतं. वाघाचा कुत्रा होतो. आणि तशा अवस्थेत ती मुलगी पुन्हा वाघाला दिसते. वाघ जवळ जायचा प्रयत्न करतो, तेवढ्यात ती मुलगी काठी हातात घेते, आणि त्या वाघाला कुत्र्यागत बडवते. आता कृपा करून हे वाघ कोण आणि ती मुलगी कोण यांचं नाव मला घ्यायला लावू नका. आपण तेवढे सूज्ञ आहात, समजून घ्यावं एवढी माझी कळकळीची विनंती आहे.



ही आज भाजप आणि सेनेची अवस्था. काल-परवा शिवसेनेचे कार्याध्यक्ष आमच्या बीडला गेले. बीडला गेल्यावर म्हणाले, युती गेली खड्ड्यात. मी म्हटलं, बरं झालं लवकर कळालं. मतदानाच्या अगोदर. नाहीतर मतदानाच्या नंतर या युतीला महाराष्ट्राची १२ कोटी जनता खड्ड्यात घातल्याशिवाय राहणार नाही, एवढं तुम्ही महाराष्ट्राचं वाटोळं केलंय.

आज एका गोष्टीचं वाईट वाटतं. काही कारण नसताना आदरणीय भुजबळ साहेबांना तुम्ही अडचणीत आणलं आणि आजही भारतीय जनता पार्टी सोशल मीडियावर आमच्या नेत्याच्या बाबतीत भुजबळ साहेबांच्या बाबतीत अशी अभद्र टिप्पणी करायला लागलेत, की म्हटले बघा आता सात महिन्यात एकदाही छातीत कळ आली नाही भुजबळ साहेबांच्या. भाजपवाले. किती गलिच्छ आहात तुम्ही. तुमच्या बुद्धिची कीव करावी वाटते. अरे, तुम्हाला काय वाटतं, की आदरणीय भुजबळ साहेबांना तुम्ही अडचणीत आणलं, म्हणजे आम्ही सगळे संपलोत. अरे, राष्ट्रवादी तर राष्ट्रवादी, आदरणीय भुजबळ साहेब सुद्धा तुम्हाला पुरून उरल्याशिवाय राहणार नाहीत हेसुद्धा आज याठिकाणी माझ्यासारखा कार्यकर्ता निधड्या छातीनं सांगायला तयार आहे. तुम्ही काय समजायला लागलात. आज नाशिक जिल्ह्याचा भुजबळ साहेबांनी जो नावलौकिक केलांय, समीरभाऊंनी खासदार असताना नावलौकिक केलांय, हे आपल्याला विसरता येईल?

आज या निर्धार परिवर्तन यात्रेच्या माध्यमातून आपल्याकडे आशिर्वाद मागण्यासाठी आम्ही आलो आहोत. आता बस्स्, एकच निर्धार अब की बार, मोदी की हार. एवढं लक्षात ठेवा. आम्हाला आशिर्वाद द्या. खूप खूप धन्यवाद!

# आरक्षणावरून भांडणे लावण्याचा उद्योग

जितेंद्र आव्हाड

भाजपच्या या राज्यात पुरोगामी विचारांच्या लोकांच्या हत्या होत आहेत. हे सरकार सनातन्यांच्या बाजूने उभे आहे. म्हणूनच अशा प्रकारच्या हत्या होत आहेत. म्हणूनच त्यांच्याविरूद्ध आपल्याला आवाज उठवावा लागेल. हे जातीयवादी सरकार आपण जोपर्यंत घालवत नाही, तोपर्यंत तुमचं आणि माझं आरक्षण सुरक्षित नाही. तुमचं आणि माझं आरक्षण धोक्यात आहे. ओबीसींचं आरक्षण धोक्यात आहे. शेड्युल्ड कास्टचं आरक्षण धोक्यात आहे. शेड्युल्ड ट्राईबचं आरक्षण धोक्यात आहे आणि मराठ्यांना फक्त लॉलीपॉल दिलेला आहे. भांडत बसा आपापसांत. हाच उद्योग सरकार करत आहे.

हे सगळं विसरलं, की साडेचार वर्षांनंतर आपोआप राम मंदिराचा मुद्दा बाहेर येतो. कारण यांना बोलण्यासारखं काहीच नाही. जे जे सांगितलं, ते काहीच केलं नाही. दोन कोटी नोकऱ्या देणार म्हणाले. म्हणजे आतापर्यंत दहा कोटी नोकऱ्या व्हायला पाहिजे होत्या. पण आजपर्यंत फक्त ६१ हजार युवकांना नोकऱ्या दिल्या गेल्यात. आरक्षण दिलंय ना सवर्णांना, नोकरीमध्ये आरक्षण दिलंय ना. या व्यासपीठावरून आम्ही जाब विचारतो. या एचएलमध्ये किती कामगार बेकार होणार आहेत, पुढच्या सप्टेंबरपर्यंत. माझ्याकडे लिहून घ्या, पुढच्या सप्टेंबरपर्यंत एचएल बंद झालेली असेल. तुमच्या माझ्या नाशकातला सर्वात जुना कारखाना, ज्यानं भारताला युद्धसामग्री पुरविली, त्यांच्या हाताला काम मिळणार नाही. जिथं सरकारी उद्योग बंद व्हायला लागलेत तिथं तुम्ही नोकऱ्यांचं रिझर्व्हेशन कुठून देणार.

एवढंच कशाला, मंत्रालयातील अधिकाधिक काम हे आता कॉन्ट्रॅक्ट पातळीवर झालंय. मग कोणाला कुठे दहा पर्सेंट नोकऱ्या देणार हे तरी सांगा मोदी महाशय. जर आरक्षण द्यायचंच होतं, तर लोकसभेच्या पहिल्या अधिवेशनात विधेयक का नाही आणलं. त्या आरक्षणाचं विधेयक तुम्ही शेवटच्या अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी का आणलं. लोकांना फक्त मूर्ख बनवण्याचं काम. लोकांना कुठल्या तरी चर्चेत गुंतवून ठेवायचं. या देशासमोरचे जे खरे प्रश्न आहेत, ते प्रश्नच समोर येवू द्यायचे नाहीत. त्या प्रश्नांवर चर्चाच घडू द्यायची नाही. मूळ संविधानाच्या गाभ्यालाच यांचा विरोध आहे. हे संविधान काय यांनी दिलेले नाही. लोकांनी स्वत:साठी बनविलेले आहे आणि या संविधानाला जेव्हा विरोध होतो, तेव्हा ही लढाई जनसामान्यांची, आपण सारे विरूद्ध मोदी अशी आहे. कारण मोदी हे संविधानाच्या विरोधातलं प्रतिक आहे. कधीही उठतात आणि कोणालाही राष्ट्रद्रोहाचा चार्ज लावतात. तो कन्हैयाकुमार, त्याचे घर म्हणजे कुडाची झोपडी आहे. बोलतो अप्रतिम, मोदीचा खमक्या विरोधक. तो बेगुसरायची निवडणूक लढणार हे जवळजवळ निश्चित झालंय. तो बिहारमध्ये फिरतोय, बिहारचं वातावरण बदलवतोय.

त्याच्याविरूद्ध काल चार्जशीट दाखल झाली. सिटीझनशीप नावाचं एक बिल येतंय लोकसभेमध्ये, ज्याला आसाममध्ये हिंदू आणि मुसलमान दोघंही विरोध करतायंत. एक ८२ वर्षांचा प्रोफेसर आहे, त्याला काल पंधरा दिवसांसाठी जेलमध्ये घेतलं. पुन्हा काय तर राष्ट्रद्रोह. मणिपूरच्या एका माणसाने मोदी आणि तिथल्या मुख्यमंत्र्याच्या विरोधात एक टिपण केलं, तर त्याला गेले आठ महिने जेलमध्ये ठेवलंय. म्हणजे या देशामध्ये अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा उपयोग जो जो करेल, जो जो मोदी साहेबांच्या विरोधात बोलेल, फडणवीस साहेबांच्या विरोधात बोलेल, त्याला हे पोलिस आतमध्ये घेवून जाणार. बोलायचं का नाही बोलायचं. अरे, बायकोसुद्धा नवऱ्याविरूद्ध बोलते की नाय, म्हणून काय नवरा बायकोला घराच्या बाहेर काढतो. घटस्फोटाची भाषा करतो. अरे, का तुम्हाला प्रश्न विचारायचे नाहीत. या देशाची सुरक्षा व्यवस्था तुम्ही बोटावर नाचवतांय.

आजपर्यंत देशात जे घडलं नव्हतं, ते तुम्ही घडवून दाखवलंत. यूपीएच्या काळामध्ये १२६ विमानांचा सौदा झाला. ५२६ कोटींना एक विमान घेण्याचं ठरलं. पण अचानक २०१६मध्ये करार उलटा केला गेला. ३६ विमानं घेतली गेली, त्यासाठी ५८ हजार कोटी रूपये खर्च करण्याचा निर्णय घेतला गेला. म्हणजे बरोबर १६११ कोटी रूपयांना एक विमान पडलं. त्याच्यापेक्षा चांगलं विमान आठ दिवसांनी फ्रान्सनं घेतलं त्याच

# निर्धार परिवर्तन संपर्क यात्रेतील भाषणांचे संकलन

कंपनीचं. किंमत ५८० कोटी. आणि त्याच्यापेक्षा एक दर्जानं खालचं विमान आमचे मोदी साहेब घेतात, १६११ कोटीला आणि म्हणतात, प्रश्न नाही विचारायचा. देशाच्या सुरक्षेसंबंधी बोलायचं नाही. आम्हाला विमानाची माहिती नकोय, आम्हाला फक्त एवढंच विचारायचंय, की या देशाच्या टॅक्सपेअरचा जो पैसा तुम्ही वापरणार आहात, त्या एका विमानाचा भाव काय हे भारतीय जनतेला सांगितलेच पाहिजे. एखाद्या घरात सुनेनं बाजार आणला, तर सासू लगेच भाव विचारते ना. तर मोदींनी तुम्हा आम्हाला भाव सांगायला नको, एवढं घाबरता कशाला?

आणि एवढे घाबरतात, की जो अलोक वर्मा सीबीआयचा प्रमुख होता, सुप्रीम कोर्टानं त्याला परत जागेवर आणून बसवलं, तेव्हा २४ तासांत त्याला घरी पाठवलं. का? तर हा अलोक वर्मा आपल्याविरूद्ध इन्क्वायरी लावेल म्हणून ५६ इंचाची छाती २३ इंचावर आली. कापरं भरलं कापरं. सगळे दौरे रद्द केले. मिटिंग घेतली आणि अलोक वर्माला घरी पाठवलं. आज देशात तुमच्या प्रत्येकाच्या व्हॉटस्‌अ‍ॅपवर येणारे मेसेज टॅप होतायंत. तुम्ही कम्प्युटरवर काय करताय, याची नोंद होतेय आणि हे सगळं मोदींना दाखवलं जातंय. माझ्या सोप्या भाषेत, तुम्ही काय बघताय, ते मोदींना पण बघायचंय. म्हणजे इथला तरूण तरूणीला काय मेसेज पाठवतो, इथला नवरा बायकोला काय मेसेज पाठवतो, इथली आपली बहीण भावाला काय मेसेज पाठवते हे सगळं मोदींना बघायचंय. म्हणजे या देशामध्ये तुमच्या बेडरूमपर्यंत येण्याचं काम मोदी साहेबांनी केलेलं आहे आणि हे भयावह आहे. या देशामध्ये आता सुरक्षित असं काहीच नाही. ही जी लढाई आहे, जी शिवाजी महाराजांनी सुरू केली, तुकाराम महाराजांच्या आशिर्वादानं सुरू झाली, इथल्या चातुर्वण्याविरूद्ध, इथल्या मनुवादाविरूद्ध, इथल्या जातीयवादाविरूद्ध, जी शाहू महाराजांनी पुढे नेली, आणि जिला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाचा मुलामा लावला, त्या संविधानासंबंधीची लढाई, तुमच्या खोट्यारडेपणाविरुद्धची लढाई आम्ही प्राणपणाने लढू. निर्धार केलांय, तुम्हाला इथनं घालवायचा. तो निर्धार आम्ही पुढे घेवून जावू.



## जातीयवादी शक्ती सत्तेवरून घालवून पुरोगामी महाराष्ट्र वाचवावा लागेल

या देवाला जात असते की नसते, हे मला माहिती नाही. पण, या आधुनिक महाभारताच्या रामायणात आधुनिक वाल्मिकी जन्माला आले, त्याने पहिली जात दिली ती हनुमानाला! ते म्हणाले, हनुमान दलित होता. तर, कोणी म्हणाले, तो जाट होता. महाराष्ट्रात कोणी बोलले नाही. कोण म्हणाले, मारुती आदिवासी दलित होता. आज तर कहर झाला. पूनम महाजन नावाची खासदार आहे. त्या म्हणाल्या, प्रभू रामचंद्र हे पहिले उत्तर भारतीय होते, जे महाराष्ट्रात आले. सर्व माध्यमांद्वारे असे जाती विद्वेष तुम्ही किती पसरविणार आहात. मध्यंतरी एक फॅड आले नाम करणाचे! अलाहाबादचे नाव प्रयाग करणार. हे नामकरणविधी सुरू झाले, ते नामकरण करणाऱ्याचे नाव जगाला माहिती नाही. योगी आदित्यनाथ यांचे खरे नाव कोणाला माहिती आहे का? ऊठसूट नावे बदलायची व त्यातून धर्मविद्वेष वाढवायचा. कधी ओबीसीविरुद्ध मराठा लढाई लावून द्यायची. कधी आदिवासींच्या मनात संशय निर्माण करून द्यायचा. संविधानाच्या गाभ्याला हात घालाल तर, इथला दलित, गरीब संभ्रमीत होणार ना! त्याची कल्पना आहे की, डॉ. बाबासाहेबांनी निर्माण केलेले संविधान हे आमचे कवच आहे. या कवचाला हात लावला तर, आमचे काही खरे नाही, असे त्याला वाटते आणि नेमके या संविधानाच्या गाभ्यालाच उघडपणे हात लावण्याचे काम हे सरकार करीत आहे. दिल्लीच्या तख्तावरती या देशाचे संविधान जाळले जाते, पण एक चकार शब्द निघत नाही.

हे संविधान मानायलाच तयार नाहीत. जर, संविधान मानत असते तर, ज्या डॉ.आंबेडकरांच्या संविधानातून सीबीआयची निर्मिती झाली, सर्वोच्च न्यायालयाची निर्मिती झाली, रिझर्व बँकेची झाली, या सगळ्या संस्था निकालात काढण्यास आता सुरुवात झाली आहे. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती बाहेर येऊन सांगतात, हे सगळे आलबेल नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायप्रक्रियेत आता बाह्य हस्तक्षेप सुरू झाला आहे. ही धोक्याची घंटा आहे. जर तुम्हाआम्हाला न्याय मिळणार नसेल तर, न्याय मागायचा कोणाकडे? ज्या पद्धतीने हुकूमशाही राबवली जातेय, ती अतिशय धोकादायक आहे. रिझर्व बँक खड्ड्यात जाण्यास सुरुवात झाली आहे. आरबीआय खड्ड्यात जाणार म्हणनू त्याचे अध्यक्ष उर्जित पटेल राजीनामा देतात. अरविंद सुब्रमण्यम राजीनामा देतात, अरविंद पाणिग्रही राजीनामा देतात. ज्या मोठमोठ्या अर्थशास्त्रज्ञांना मोदींनी लावले होते, त्या अर्थशास्त्रज्ञांनी मोदींना कंटाळून राजीनामे दिले.

पंडित नेहरू, यशवंतराव चव्हाण यांनी नाशिकला स्थापन केलेली एच.ए.एल.(हिंदुस्थान एरोनॉटिक लि.) च्या तोंडातील घास काढून अनिल अंबानीच्या तोंडात घातल्याने एचएएल या सप्टेंबरमध्ये बंद पडली. नाशिकच्या सातपूर औद्योगिक वसाहती मधील क्रॉम्पटन बंद पडली, गरवारे बंद पडली, मायक्रो बंद पडली. आज सातपूर परिसरातील सगळे महत्त्वाचे उद्योगधंदे बंद पडलेत. सटाणा भागातील नामपर येथे ५ पैसे किलोने कांदा विकावा लागला. आता हा कांदा देवेन्द्र फडणवीस व नरेंद्र मोदींच्या नाकाला लावाला लागेल. यांची सत्ता गेल्याशिवाय ते बेशुद्ध पडणार नाहीत.




नुकतेच एका व्यक्तीकडे रिव्हाल्व्हर सापडले. १-२ नव्हे तर, १७० सापडली. त्यात चाकू, गुत्त्याही होत्या. ज्या व्यक्तीकडे सापडल्या त्याचे नाव धनंजय कुलकर्णी असून तो कल्याण-डोंबिवली भाजपचा उपाध्यक्ष आहे.आर्म्स ॲक्टनुसार अटक झाल्यावर त्या व्यक्तीस न्यायालयात हजर केल्यावर पोलीस कस्टडी मिळाली नाही, असे अद्याप देशाच्या इतिहासात कधी घडले नाही. पण, धनंजय कुलकर्णीला जामीन मिळाला व जामीन दणारे न्यायाधीश होते श्रीनिवास कुलकर्णी!

राफेलमध्ये मोदीसाहेब इतके अडकले आहेत की, चौकीदार चोर आहे, अशी ओरड जगभर सुरू झाली आहे. आज जाती पातीच्या नावाखाली आगी लावल्या जात आहेत. धर्मविद्वेष वाढवला जातोय. हे सगळे पाहिल्यानंतर चार वर्षापूर्वी आपण केलेली चूक आता आपल्या किती अंगाशी आली आहे, हे लक्षात येते. २०१४ साली लोकांना मूर्ख बनविण्याचा कारखाना तयार केला होता, त्यात आपण सर्वजण अडकलो. आणि नुकसान मात्र आपलेच झाले. २०१९ मध्ये निवडणुका येत आहेत. आपण निर्धार केला पाहिजे की, या जातीयवादी शक्तींना, भ्रष्टाचाराने बरबरटलेल्या लोकांना, फडणवीस सरकारला आपण सगळ्यांनी एकत्र येऊन बाहेरचा रस्ता दाखवावा लागेल. हा पुरोगामी महाराष्ट्र सुरक्षित ठेवावा लागेल. शाहू-फुले-आंबेडकरांचा महाराष्ट्र, पुरोगागी महाराष्ट्र, शिवरायांचा महाराष्ट्र हा गोळवलकरांच्या विचारांपासून वाचवावा लागेल. तरच महाराष्ट्र वाचेल.

# आता लाट मोदी हटवायची

**भास्कर जाधव**

आपण परिवर्तनाचा निर्धार करून या भूमीत आलेला आहात. पण, मी आपणास थोडे मागे घेऊन जातो. वास्तविक पाहता, हा रत्नागिरी जिल्हा हा पूर्वीपासूनच परिवर्तनाच्या शोधात आहे. पण, या जिल्ह्याला परिवर्तनासाठी पुरेसा वाव मिळत नव्हता. मात्र, आज आपल्या जिल्ह्यात परिवर्तनाला भरपूर संधी आहे. तुम्ही देशात परिवर्तन करायला निघालात, राज्यात परिवर्तन करायला निघाला आहात आणि आम च्यासारखी माणसे आपापल्या मतदार संघात परिवर्तनाची नांदी कायम टिकवून ठेवण्याची हमी देत आहेत. राहता राहिला प्रश्न लोकसभा निवडणुकीचा! मागच्या वेळेला आपण लोकसभा निवडणूक जिंकलीच होती. हा एकच मतदार संघ सोडला तर, बाकीच्या ठिकाणी लोक लाखांच्या मतांनी निवडून आले. पण, इथला उमेदवार फक्त २१०० मतांनी पराभूत झाला. रत्नागिरीमध्ये गुहागर व दापोली हे दोन मतदारसंघ असून त्यांचे निश्चितपणे योगदान होते. याचा अर्थ हा जिल्हा परिवर्तनाची संधी शोधतोय. हा जिल्हा परिवर्तनासाठी आसुसलेला आहे. २००६ साली मी या मतदारसंघात पाऊल ठेवले व २००९ साली तुम्ही मला पहिल्यांदा निवडून दिले. तेव्हापासून आपण सगळ्यांनी मागे वळून कधी पाहिलेच नाही. २००९ ते २०१४ आपल्या पक्षाची सत्ता होती, आपल्या आघाडीची सत्ता होती. २०१४ पासून सत्ता नाही. जिल्ह्यातील विकासकामांचा बट्ट्याबोळ झाला आहे, हे आपणा सगळ्यांना माहिती आहे. गेल्या ७ तारखेला माझी जाहीर सभा झाली. वर्तमानपत्रातल्या माझ्या मित्रांना वाटले, 'हा भास्कर गेल्या चार वर्षांपासून आजारी पडलेला आहे, तो फिरू शकत नाही व आता हा जाहीर सभेत निरोप घेतल्याशिवाय राहणार नाही.' पण, मी त्या वेळी विरोधकांना आव्हान दिले होते, त्यांनी कितीही चक्रव्यूह रचावेत, हा भास्कर जाधव सर्व चक्रव्यूह भेदल्याशिवाय राहणार नाही. जेव्हा डीपीसीची बैठक झाली तेव्हा आम्ही पाचच होतो व ते २५ जण होते. आपण संपूर्ण जिल्ह्याचा आढावा मांडला व हे शिवसेनेचे मंत्री व खासदार जिल्ह्याच्या विकासात कसे मागे पडले हे दाखवून दिले. जिल्हा विकासात मागे पडल्याबद्दल आम्ही अल्पमतात आहे हे माहिती असूनही निषेधाचा ठराव मांडला. पालक मंत्र्यांच्या उपस्थितीत ठराव दाखल करून घेतला. पालक मंत्र्यांनी त्यांच्या सदस्यांना विचारले असता ते सर्वजण म्हणाले, भास्कररावांनी मांडलेली भूमिका योग्य आहे. जिल्हा विकासात मागे असल्याने आम्ही त्या ठरावाचे समर्थन करीत आहोत. तेव्हा ते म्हणाले, तुमचा सगळ्यांचा पाठिंबा आहे तर, मीही त्यात सहभागी होतो, असे तीन वेळा सांगितले. त्याची प्रोसिडिंगमध्ये नोंद आहे. यावरून जिल्ह्यातील विकासाचा किती बट्ट्याबोळ झाला हे दिसून येते. यामुळेच हा जिल्हा २०१४ पासून परिवर्तनासाठी संधी शोधत आहे. आज कोणते लोक सुखी आहेत? महिला नाहीत, पुरुष नाहीत, बेरोजगार नाहीत, शिक्षण नाही, शासकीय कर्मचारी नाही, मच्छिमार नाहीत, कामगार नाही, कोणीही सुखीसमाधानी नाही. अशा या सरकारला उलथून टाकण्याचे काम आपल्याला करायचे आहे. आगामी लोकसभेला पवार साहेबांनी तटकरे साहेबांची उमेदवारी जाहीर केलेली आहे. मागील वेळेस मोदींची लाट असूनही या भागातून आपण मताधिक्य दिलेले होते. आता मोदी हटावची लाट आहे त्यामुळे राष्ट्रवादीचा उमेदवार या वेळी नक्कीच येथून लोकसभेवर जाईल, यात मुळीच शंका नाही.



# भाजप सरकार दहशतवादी

फौजिया खान

आमची परिवर्तन यात्रा महाराष्ट्रात सुरू झाली आहे. असं लक्षात येतंय की परिवर्तनाचा निर्धार देशातील सर्व जनतेने केला आहे. लोकांनाच परिवर्तन करणं आवश्यक असल्याचं लक्षात आलं आहे. समाजातील प्रत्येक घटकाला असं वाटतंय की आज देशाची अवस्था काय झाली आहे. अच्छे दिन कुठेच दिसत नाहीत. केवळ आश्वासनं दिली जात आहेत. सरकार येते, सरकार जाते. मात्र आपण प्रत्येकवेळी हे पाहतो, की समाजातील काही लोक असे असतात, ज्यांना सरकार कोणाचे आहे याचे महत्त्व असते. मात्र, बहुतांश लोकांना कोणाचे सरकार आहे याच्याशी देणेघेणे नसते. २०१४ नंतर मात्र शंभर टक्के लोकांना आपल्याला सरकारशी देणेघेणे असल्याचे वाटू लागले आहे. कारण या सरकारने जे निर्णय घेतले आहेत, त्याचा मोठा परिणाम समाजावर होत आहे. सरकारचे निर्णय आपल्यासाठी बरोबर नाहीत, याची जाणीव लोकांना होवू लागली आहे.

नोटाबंदीच्या निर्णयाने देशातील एखाद्या माणसावर परिणाम झाला नाही, असे दिसून येत नाही. प्रत्येक व्यक्तीवर याचा परिणाम झाला. असा परिणाम झाला, की माणसाच्या जगण्याचा प्रश्न निर्माण झाला. शेतकऱ्यांना बियाणे खरेदी करता आले नाहीत. महिलांची बचत मोडली गेली. एटीएमच्या रांगेत आपला स्वत:चा पैसा घेण्यासाठी उभे राहावे लागले. दीडशे लोकांना जीव गमवावा लागला. याच्यासाठी कोण जबाबदार? मोजक्याच लोकांवर याचा चांगला परिणाम झाला. अमित शहा ज्या बँकेचे संचालक आहेत, त्या बँकेत बारा हजार कोटी रूपये आठ दिवसांत जमा झाले. हा एक मोठा घोटाळा होता. म्हणूनच आज भाजप, शिवसेनेचे लोक इलेक्शनमध्ये मोठ्या प्रमाणात पैशाचे वाटप करत आहेत. आपल्या देशात हुकुमशाह आला आहे. तो कोणताही निर्णय घेवू शकतो. लोकशाहीला तो मानत नाही. त्याचा निर्णय चुकू शकतो हे लक्षात घेतले पाहिजे. दहशतवाद थांबणार, काळा पैसा येणार, प्रत्येकाच्या खात्यावर १५ लाख जमा करणार असे सांगितले गेले, पण एकही आश्वासन पूर्ण झाले नाही.

जीएसटीचाही असाच परिणाम झाला. देशभरातील छोटे मोठे उद्योगधंदे बंद पडले. लोकांची पैसे खर्च करण्याची क्षमता कमी झाली. व्यापाऱ्यांचा धंदा कमी झाला आहे. अतिशय भयानक, नुकसान करणारा परिणाम झाला आहे. हे देशाला जाणवते. सरकारने आधार कार्ड रेशन कार्डाशी जोडणं बंधनकारक केलं. याच्यामुळे या देशात भूकबळी जावू लागले आहेत. अन्न मिळाले नाहीत, म्हणून त्यांना जीव गमवावा लागला. आमच्या सरकारने अन्न सुरक्षा विधेयक आणलं होतं. या देशात कुणीही गरीब राहता कामा नये, कमीत कमी अन्न मिळावे, अशी इच्छा होती. मात्र, आधार लिंकिंगमुळे आज



# निर्धार परिवर्तन संपर्क यात्रेतील भाषणांचे संकलन

गरीबाला अन्न मिळणे अवघड झाले आहे. आजच्या काळात भूकबळी जावू शकतात? मेळघाटमध्ये ५०० बालमृत्यू झाल्याचे पेपरमध्ये वाचनात आले. शेतकऱ्याच्या आत्महत्या या देशात सगळ्यात जास्त महाराष्ट्रात होतात. शासन अपयशी ठरले आहे प्रत्येक आघाडीवर. महिलांना सुरक्षा देवू शकत नाही हे सरकार. बेटी बचाव, बेटी पढाव ही त्यांची घोषणा कुठे गेली? आज भाजपचेच आमदार मुलींना पळवून आणण्याची भाषा करत आहेत. अशी संस्कृती? असे बोलणारे आमचे आमदार? हा काय प्रकार आहे? एका बाजूला बेटी बचाव म्हणता आणि तुमचे आमदार बेटी भगाव असे म्हणतात.

काश्मिरमध्ये आठ वर्षाच्या मुलीवर सामूहिक अत्याचार करण्यात आला. या लोकांच्या समर्थनार्थ भाजपच्या आमदारांनी रॅली काढली. उत्तर प्रदेशातही हीच परिस्थिती. आमदाराचा त्यामध्ये सहभाग.



पीडितेच्या वडिलांची हत्या झाली कोठडीत. वीस आमदार भाजपचे असे आहेत, ज्यांच्यावर बलात्काराचे गुन्हे दाखल आहेत. त्यामुळे या पक्षाला बलात्कारी जनता पार्टी असे नाव लोक देवू लागले आहेत. सरकार जर प्रत्येक स्तरावर अपयशी राहिली तर सरकार काय करत आहे? सरकार निर्णय कसे घेतात. सरकारचे निर्णय जे आहेत ते फील गुड निर्णय आहेत. महसूस करणारे निर्णय होत आहेत. मंदिर, मशिदीचा विषय महसूस करण्याचा आहे. मला सांगा जर पवार साहेब, जवाहरलाल नेहरू, इंदिरा गांधींनी मोठ्या संस्था उभारण्याऐवजी मंदिरं, मशिदी बांधली असती तर फक्त फील गुड झालं असतं. देशाचा विकास झाला नसता.

लोक म्हणतात, की हुकुमशाही सरकार आले आहे. हे सरकार दशहतवादी सरकार आहे. स्वत: सरकार दहशतवाद निर्माण करत आहे, असं माझं म्हणणं आहे. आज सगळ्या चॅनलवर सरकारच्या बाजूने बोललं जात आहे. मीडियाचं काम सरकारवर अंकुश ठेवण्याचं काम असतं. मात्र, हा मीडिया सरकारची स्तुती करण्यात धन्यता मानत आहे. आपलं काम आता एकच आहे, जे सरकार शेतकरी, महिला, व्यापारी, शिक्षण, आरोग्यासाठी चांगले निर्णय घेत होते, ते सरकार सत्तेत आणण्यासाठी परिवर्तन करणं गरजेचं आहे. म्हणूनच हा परिवर्तनाचा निर्धार करायचा आहे. त्यासाठी विनंती करण्यासाठीच आम्ही इथे आलो आहोत. यावेळी जर संविधान संपविण्याचा जो कट रचला जात आहे, त्यांच्या विरोधात लोकशाही वाचवण्यासाठी बदल करण्याची आवश्यकता आहे. २०१९मध्ये ही संधी गेली तर याच्यानंतर आपल्या देशामध्ये इलेक्शनच होणार नाही. कारण, लोकशाही संपली, संविधान संपली तर निवडणूक केव्हा होणार, हिटलरशाहीसारखी हुकुमशाही आपल्या देशात येईल. एकच विनंती आहे, की निर्धार परिवर्तनाचा करा आणि या सरकारला हटवा.

## धर्मनिरपेक्ष शक्तींनी संघटीत होऊन मतविभागणी टाळावी

बेचि जो चाय उसने, तो 'डिलर' बन गया।
भाषण किया जो जमके, तो 'लीडर' बन गया।
नाम विकास का जपकर, 'पॉप्युलर' बन गया।

सपने बिका बिका के, वो 'रूलर' बन गया।
एक और शिडी चढी, तो आगे के शिडीपर।
बाट के दिलोंको, तो 'व्हिक्टर' बन गया।
काट के सरों को, वो 'हिटलर' बन गया।
हिटलर की चाल चलकर,
वो 'प्राईम मिनिस्टर' बन गया।
अब सूटबुट पहनकर,
वो 'मिस्टर' बन गया।

आता मी आपणास नरेन्द्र मोदी आणि हिटलर यांच्यात काय काय साम्य आहे, हे सांगणार आहे. हिटलरने यहुदींच्यासाठी चिकनवर बंदी घातली होती. येथे गोमांसावर बंदी घालण्यात आलेली आहे. हिटलरला रेडिओवर बोलण्याची सवय होती. येथे 'मन की बात' होत आहे. तिकडे प्रत्येक जर्मन नागरिकांच्या घरी रेडिओ असणे सक्तीचे होते. आज शाळेत मन की बात सक्तीने



स्वामी अग्नीवेश यांना हिंदुत्ववादी कार्यकर्ते मारहाण करताना.

ऐकावी लागते. अभ्यासक्रमात हस्तक्षेप करून त्यात बदल करण्याची हिटलरची पद्धत होती. आपल्याकडे अभ्यासक्रमात भगवेकरण आणण्याची चर्चा चालू आहे. जुमलेबाजी, मॉबोक्रसी (गुंडशाही), गर्दी करून लोकांना मारण्याची पद्धती आमच्याकडेही सुरू झालेली आहे. मात्र, मी एका गोष्टीची आठवण करून देऊ इच्छिते, हिटलरने जे काही काम केले, त्याचा परिणाम असा झाला, दुसऱ्या जागतिक महायुद्धाच्या आठव्या दिवशी हिटलरला आत्महत्या करावी लागली आणि जर्मनीचा त्या युद्धात पराभव झाला होता व यहुदींची अवस्था काय आहे? आज यहुदी एक लहान देशाच्यारूपात असा जगापुढे आला आहे की, तो देश जगावर राज्य करीत आहे. तेव्हा आपण कोणाला संपवू शकत नाही.

सदमे हदसे चूप हूँ, तो मुझे पत्थर मत समझना।
दिलपर असर होता है तेरी बात बात का।
पर अब तो हम बोलेंगे, हम जबान खोलेंगे।
खूष रहो या खफा रहो, हमेशा के लिए तुम दफा रहो।

हाच आज आमच्या परिवर्तन यात्रेचा उद्देश आहे. हिटलरशाहीचे उत्तम उदाहरण देणारा एक दिवस असा आला की, आमचे पंतप्रधान टीव्हीवर आले व म्हणाले, आजपासून एक हजार आणि पाचशेच्या नोटा बंद. आजपासून हे कागदी तुकडे झाले आहेत. कोट्यवधी लोकांच्या रोजगारावर त्याचा परिणाम झाला. यंत्रमाग बंद झाले. मालेगावात, भिवंडीत, इचलकरंजीतील कारागिर सर्व उपाशी राहिले. जीएसटी व नोटाबंदीचा कोट्यवधी लोकांवर परिणाम झाला.

जमीर नही काँपता यहाँ, जमीन काँप जाती है।
लिडरी मे भला हुआ उनका,
बंदगी मे भला न हुआ मेरा।




हिटलरशाहीचा आणखी एक निर्णय झाला, तीन तलाकचा! कायदा करण्यात आला. शरीयतमध्ये हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केला गेला. कोणत्याही मुस्लीम महिलेला हे विधेयक नको आहे. प्रत्येक क्षेत्रात हे अपयशी होत असल्याने जनतेचे लक्ष विचलीत करण्यासाठी हे असे करीत आहेत. मी एवढेच सांगेन, या वेळी वातावरण फार चांगले आहे. आम्ही आपल्या विचारांशी सहमत आहोत, असे म्हणत काही पक्ष आपल्याकडे येत आहेत. पण, कदाचित हे भाजपनेच पाठविलेले लोक असावेत. आपण भरकटून जाता कामा नये. आम्हाला धर्मनिरपेक्ष पक्षांबरोबर संघटीतपणे उभे राहायचे आहे. काँग्रेस-राष्ट्रवादीची मजबूत आघाडी आहे. मताची विभागणी होणार नाही, याची काळजी घ्यावी.

# सेना-भाजपचे सरकार उलथवून टाकूया



समीर भुजबळ

खरं म्हणजे गेल्या साडेचार वर्षांमध्ये या राज्यामध्ये सेना-बीजेपीचं सरकार आल्यानंतर, खास करून नाशिक जिल्ह्यामधी फार कमी लोकं जी आहेत, कार्यकर्ते आहेत, ते या पक्षासाठी लढत राहिले आणि झगडत राहिले. त्यांनी कशाचीही अपेक्षा न करता सेना-बीजेपीविरूद्धच्या या लढाईत आजपर्यंत राष्ट्रवादीची ताकद जी आहे, तळागाळापर्यंत जी ताकद आहे, ती भरभक्कम करण्याचं काम केलं आहे. त्यामुळे या विभागामध्ये आज जिल्हा परिषदेचे सदस्य असो, पंचायत समितीचे सदस्य असो, किंवा ग्रामपंचायतीमध्ये असो, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचा झेंड फडकवण्याचं काम या सर्व मंडळींनी केलेलं आहे. मी त्यांचं मनापासून आभार मानतो.

कसाऱ्याचा घाट असो, मुंबई-नाशिकचा रस्ता असो किंवा नाशिक-सिन्नरचा रस्ता असो, नाशिक-औरंगाबाद असो, नाशिक-धुळे असो किंवा नाशिक-सुरत असो या चारही बाजूंनी रस्त्याचं जाळ पसरवण्याचं काम आपण केलं. नाशिक शहराच्या बाजूने फिरणाऱ्या रिंग रोडचं काम केलं. केंद्राकडून निधी आणून घोटीसह अनेक भागात रस्ते केले. अशी अनेक कामे आपण या विभागामध्ये केली. तीर्थक्षेत्र, पर्यटनाच्या बाबतीत सर्वतीर्थ ताकेत असेल, घाटनदेवी असेल, किंवा त्र्यंबकेश्वर इथं निवृत्तीनाथ महाराजांचं मंदिर असो किंवा जुगाडवाडी येथील धबधबा असो, अशा अनेक पर्यटनस्थळे, तीर्थक्षेत्रांचा विकास करण्याचं काम भुजबळ साहेबांच्या मार्गदर्शनातून आपण इथं केलं. खरं म्हणजे विकासाची ही जी गंगा आहे, आदरणीय भुजबळ साहेबांच्या माध्यमातून आपण नाशिकमध्ये आणली. हा विकास साधत असताना आपण वेगवेगळे प्रयोग याठिकाणी करायचं ठरवलं. जेणेकडून इकडच्या युवकांना रोजगार मिळेल, इकडच्या शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीमालाला चांगला भाव मिळेल, यासाठी आपण कार्गोचं एअरपोर्ट सुरू केलं, या एअरपोर्टवरून आपल्याला चांगली विमानं चालू होण्याची अपेक्षा होती. एअरपोर्ट तर आपण बांधलं, पण या साडेचार वर्षांमध्ये या सरकारने तिकडे विमानसेवा चालू न केल्यामुळे आपला कार्गो बंद पडला. केंद्राची एक स्कीम होती मेगा फूड पार्कची. ही फूड पार्कची स्कीम दर राज्यामध्ये दोन देणार होते. पण आदरणीय पवार साहेबांच्या मदतीमुळे तिसरं फूड पार्क जे आहे ते मी नाशिकमध्ये मंजूर करून घेतला. २०१४ साली हे सरकार आलं, फूड पार्क कॅन्सल केला. मंत्रिमंडळाची इथे नाशिकमध्ये बैठक झाली होती, त्या बैठकीमध्ये टर्मिनल मार्केट करण्याचं उद्दीष्ट, ध्येय आम्ही पुढं ठेवलं. हे सरकार आलं, त्यांनी ते टर्मिनल मार्केटसुद्धा बंद केलं. म्हणजे शेतकऱ्यांच्या उपयोगासाठी हे जे मार्केट होतं, जे मेगा फूड पार्क होता, आज जो शेतकऱ्यांना त्रास सहन करावा लागतोय, आज जे कांद्याचे काय भाव पडलेले आहेत, शेतकऱ्यांना अतिशय हाल सोसावे लागत आहेत, आम्ही दोन महिने जे वेगवेगळ्या प्रकारे आंदोलन करत होतो, पण या सरकारला कुठलीही दया माया आली नाही. सरकारने केवळ दोनशे रूपयांचं अनुदान देवून शेतकऱ्यांना भीक देण्याचं काम केलं. पण आघाडीचं सरकार असताना २०१० साली जेव्हा कांद्याचा असाच प्रश्न निर्माण झाला होता, तेव्हा भुजबळ साहेबांनी, जयंत पाटील साहेबांनी, अजितदादांनी साडेतीनशे रूपये भावाने कांदा विकत घेण्याचं काम त्यावेळी केली, हे आम्ही विसरू शकत नाही.

पवार साहेबांच्या नेतृत्वाखालील आघाडीचं सरकार हे शेतकऱ्यांचं सरकार होतं, युवकांचं सरकार होतं आणि त्यांनी खऱ्या अर्थानं नवयुवकांना दिशा देण्याचं काम केलं. शेतकऱ्यांना दिशा देण्याचं काम केलं. साडेचार वर्षांमध्ये मात्र हे पूर्णपणे थांबून गेलं. आज शेतकरी अतिशय वेगळ्या परिस्थितीतून जात आहे. आजही लोडशेडिंग होतेय. एकलहरेचा जो प्रकल्प आहे, इंडिया बुलचा जो प्रकल्प आहे, त्याठिकाणी जे जे नवीन प्रकल्प उभे राहिले तेसुद्धा बंद पडले. खऱ्या अर्थाने ते जर सुरू झाले असते, तर आज लोडशेडिंगमुक्त हा जिल्हा झाला असता. वीज देतानाही फक्त रात्रीचीच वीज देतात. त्यामुळे रात्रीच्या वेळी माझ्या शेतकऱ्याला शेतात जावून पाणी देण्याचं काम करावं लागत आहे. अतिशय हलाखीच्या परिस्थितीतून शेतकरी जात आहे. बेरोजगार युवक इकडे तिकडे भटकतो आहे. आणि म्हणून राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची विचारधारा आपल्याला पुढे घेवून जायचे आहे. येणाऱ्या काळामध्ये परिवर्तनाची ही जी यात्रा आहे, कुठल्याही परिस्थितीमध्ये सेना-बीजेपीचं हे जे सरकार आहे, ते उलथवून टाकल्याशिवाय राहणार नाही आणि त्यासाठी मी आपल्याला विनंती करतो, की अशीच साथ तुम्ही यापुढेही द्यावी. जयहिंद, जय महाराष्ट्र.

## घंटाकर्ण, नवी दिल्ली
# चव्हाटा

## राम की विकास?

भाजप आणि संघ परिवारात सध्या एक वेगळीच द्विधा मनःस्थिती आढळून येते. राम मंदिराचा मुद्दा गरम करुन हिंदुत्वाला प्रोत्साहन देणे आणि त्याआधारे बहुसंख्यक हिंदू मते खिशात टाकण्याची कल्पना संघ परिवारातर्फे पुढे रेटली जात आहे. यात धर्मसंसद, साधू सर्व आहेत. भाजप म्हणजे 'पंतप्रधान व पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष' या दोनच व्यक्ती नुसत्या राम मंदिराच्या मुद्यावर अवलंबुन राहू इच्छित नाहीत. त्यांच्या रणनीतीमध्ये राम मंदिराच्या बरोबरीने विकास व प्रगतीच्या मुद्यालाही बरोबरीचे स्थान असावे असे सांगितले जात आहे.

ही बाब धर्मसंसद आणि साधूंना पटलेली नाही. त्यांच्या म्हणण्यानुसार हिंदुत्वाचे प्रतिनिधीत्व करणारे हे सरकार असताना विकास व प्रगतीची आवश्यकता नाही आणि सरकारने राम मंदिराची घोषणा करुन टाकावी. अद्याप पंतप्रधान किंवा पक्षाध्यक्षांनी याबाबत भूमिका स्पष्ट केलेली नसल्याने अलीकडेच प्रयागराज येथे झालेल्या धर्मसंसदेत भरपूर नाराजी





व्यक्त करण्यात आली. एकाबाजुला कल्याणकारी आणि विकासाचे कार्ड खेळतानाच साधू-संतांकडून राम मंदिर मुद्दा तापवायचा अशी या दोन नेत्यांची योजना आहे परंतु ते स्वतः तो मुद्दा अंगाला लावून घ्यायला तयार नाहीत. घोडे येथेच अडताना दिसते. त्यामुळे याबाबत लवकरात लवकर सरकार व पक्षाने भूमिका स्पष्ट करावी असा दबाव साधु-संतांकडून सुरु झाल्याने नेत्यांची जोडगोळी सध्या अडचणीत आहे. कारण जर त्यांनी जाहीरपणे राम मंदिराचा पुरस्कार केल्यास अनेक सामाजिक समूह त्यांच्यापासून दूर जाऊ शकतात आणि त्याचे प्रमाण किती असेल याचा अंदाज या नेत्यांना येईनासा झाल्याने सध्या मानसिक गोंधळलेपण आले आहे. लवकरच याबाबत काही घोषणा अपेक्षित केली जात आहे !

तोपर्यंत जय श्रीराम!!!!!!!!!!!!!!!

## निधनाचेही हलके राजकारण

शेतकरी-कामगार आणि एकंदरीतच लढाऊ राजकीय नेते म्हणून प्रसिध्द अशा जॉर्ज फर्नांडिस यांचे नुकतेच निधन झाले. विस्मृति व कंपवातासारख्या असाध्य आजारांशी झुंज देतानाच फर्नांडिस यांचे निधन झाले. त्यांची अखेरची तेरा-चौदा वर्षे ही जवळपास अज्ञातवासात गेल्यासारखीच होती. परंतु फर्नांडिस यांचे अनुयायी अद्याप अनेक ठिकाणी आहेत. बिहारमध्ये तर त्यांचा मोठा अनुयायी वर्ग आहे. बहुधा त्यामुळेच असेल अन्न व नागरीपुरवठा मंत्री रामविलास पास्वान यांना फर्नांडिस यांच्या निधनानंतर त्यांचा अतिशय कळवळा येणे स्वाभाविक होते. पास्वान हे बिहारचे आणि समाजवादी परिवारातले! तर आगामी लोकसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवून पास्वान यांनी फर्नांडिस यांना भरभरुन श्रध्दांजलि वाहिली. त्यांच्या अंत्यदर्शनाला गेले. त्यांच्यावर इंग्रजीत एक लहानसा लेखही राष्ट्रीय वृत्तपत्रात लिहिला. फर्नांडिस यांच्या निकटवर्तीयांच्या म्हणण्यानुसार पास्वान हे कधीच फर्नांडिस यांच्या जवळचे नव्हते. फर्नांडिस राजकारणात असताना आणि एकाच पक्षात असताना औपचारिक संबंध व परिचय यापलीकडे त्यांची फारशी निकटता नव्हती. त्यामुळेच त्यांच्या निधनानंतर पास्वान यांना त्यांच्याबद्दल आलेल्या कळवळ्याचे अनेकांना आश्चर्य वाटले. फर्नांडिस





यांचे अंत्यदर्शन घेऊन परतल्यानंतर पास्वान यांनी त्यांच्या निवासस्थानी फर्नांडिस यांच्यासाठी प्रार्थनासभा आयोजित करण्याचा घाट घातला. त्यासाठी त्यांच्या घरातील एक हॉल फुलांनी सजविण्यात आला. या सर्व गोष्टींना प्रसिध्दी आवश्यक होती. त्यामुळे माध्यम प्रतिनिधी व मुख्यतः इलेक्ट्रॉनिक माध्यमांना बोलाविण्यात आले.

पास्वान हे प्रसिध्दीबाबत विशेष जागरुक असलेले नेते मानले जातात. फर्नांडिस यांचे निधन आणि त्यांच्याशी असलेली जवळीक दाखवून बिहारमधील त्यांच्या समर्थक व अनुयायांच्या मनात सहानुभूती निर्माण करणे आणि फर्नांडिस यांचे आपणच वारसदार असल्याचे दाखविण्याची संधी ते कशी सोडणार ? त्यात लोकसभा निवडणूक अगदी जवळ आल्याने तर हे करणे अत्यावश्यक व अनिवार्यच ना? मग पास्वान यांनी फर्मान सोडल्याप्रमाणे हॉल सजला. माध्यम प्रतिनिधी जमले पण त्यांच्या लक्षात हा सगळा बनाव येताच आणि येथे केवळ 'पास्वान शो' असल्याचे लक्षात येताच माध्यम प्रतिनिधींनी हळूहळू काढता पाय घेण्यास सुरुवात केली आणि पास्वान यांची 'एंट्री' होईपर्यंत अगदी मोजके व पास्वान यांचे कृपाप्रसाद लाभार्थी माध्यम प्रतिनिधी केवळ तेथे उरले. सारांश काय ? पास्वान यांचे हे नाटक फसले कारण त्यांना अपेक्षित प्रसिध्दी मिळू शकली नाही !

## लोकसभेचे शेवटचे अधिवेशन

राष्ट्रपतींच्या अभिभाषणाने नव्या वर्षातील पहिल्या संसदीय अधिवेशनाचा प्रारंभ होत असतो. राष्ट्रपति सरकारने तयार करुन दिलेले भाषण वाचून दाखवितात. त्यामध्ये सरकारच्या वार्षिक कामगिरीचा आढावा असतो. परंतु मोदी राजवटीचे हे शेवटचे अधिवेशन असल्याने राष्ट्रपतींनी गेल्या पाच वर्षांचा आढावाच अभिभाषणाद्वारे सादर केला.

2014 पूर्वी पर्यंत देशाची प्रगती संथगति होती परंतु 2014नंतर मात्र प्रगतीने वेग पकडला आणि बघताबघता देशाचा जागतिक पातळीवर बोलबाला होऊ लागला असे या भाषणातून सांगण्यात आले. याच भाषणातील दोन उल्लेखांना विशेष टाळ्या मिळाल्या. त्या टाळ्या लक्षात येण्याचे कारण होते. इतर अनेक मुद्यांना भाजपचे सदस्य बाके बडवून स्वागत करीतच होते. पण सर्जिकल स्ट्राईकचा उल्लेख झाल्यानंतर लक्षात येईल इतक्या वेळ बाके बडविणे लांबवण्यात आले. लक्षात येईल इतक्या दीर्घ टाळ्या वाजविण्यात आल्या. दुसरा उल्लेख होता रफाल विमानांचा ! भारतीय हवाई दलात लवकरच अत्याधुनिक रफाल विमानांचा समावेश होऊन हवाई दलाची मारकक्षमता वाढणार असल्याचे भाषणात सांगण्यात येताच असाच लक्षात




येईल इतका टाळ्यांचा लांबलचक कडकडाट करण्यात आला. मागाहून कानावर आलेल्या माहितीनुसार हे दोन्ही उल्लेख आणि त्यावर मुद्दा लांब असा टाळ्यांचा कडकडाट हे पूर्णतया नियोजित होते. यासंदर्भात विशिष्ट सदस्यांना सूचना देण्यात आल्या होत्या आणि त्यांनी मोजक्या टाळ्या वाजवून न थांबता टाळ्या लांबवायच्या हे ठरवून करण्यात आले होते. भाजपच्या प्रचारयंत्रणेतून ही सूचना दिली गेली होती असे समजले!

जय हो ! मेरा भारत महान !

## नेहमीचे दुर्लक्ष !

मोदी राजवटीची पाच वर्षे संपत आलेली असतानाही 'भाजपचे भीष्माचार्य' लालकृष्ण अडवानी यांना विष्णुअवतार उर्फ ब्रह्मांडनायकांची मर्जी संपादण्यात यश आलेले आढळत नाही. राष्ट्रपतींच्या अभिभाषणानंतर अर्ध्यातासाने लोकसभेचे



कामकाज सुरु होते. कामकाज सुरु होण्यापूर्वी सभागृहात जमलेले सदस्य पक्षभेद विसरुन एकमेकाला भेटत असतात, शुभेच्छा देत असतात. पंतप्रधानही थोडे लवकर येऊन सर्व रांगांमध्ये फिरुन सदस्यांचे स्वागत करीत असतात. मुख्यतः विरोधी पक्षातील नेत्यांच्या आसनांपाशी जाऊन ते त्यांची विचारपूसही करतात. त्यानुसार पंतप्रधान आले आणि काँग्रेसचे नेते मल्लिकार्जुन खर्गे यांच्या आसनापाशी जाऊन त्यांना शुभेच्छा दिल्या. खर्गे व मोदी हे उत्तम मराठी बोलतात. त्यामुळे पंतप्रधानांनी त्यांच्याशी मराठीतूनच संवाद साधला. खर्गे यांनीही मराठीतूनच त्यांना उत्तरे दिली. बहुधा सीबीआय संचालकांच्या नियुक्तीबद्दल काही बोलणे झाले असावे. कारण खर्गे यांनी पंतप्रधानांना उद्देशून 'तुमच्या मर्जीतलाच संचालक होणार' असे म्हटल्याचे ऐकू आले. पंतप्रधान हसतहसत तेथून परतले. परतताना त्यांनी शिवसेनेचे सदस्य चंद्रकांत खैरे, भावना गवळी यांनाही नमस्कार केला. भावना गवळी यांच्यापाशी थांबून ते त्यांच्याशी बोलून आपल्या आसनापाशी परतले. लोकसभेत पंतप्रधानांच्या दोन आसनी बाकावर ते आणि राजनाथसिंग बसतात. पलीकडच्या बाकावर लालकृष्ण अडवानी बसतात. विरोधी पक्षांना शुभेच्छा देऊन पंतप्रधान परतल्यानंतर लालकृष्ण अडवानी हात जोडून उभे राहिले. परंतु पंतप्रधानांनी त्यांच्याकडे पाहिलेही नाही आणि सरळ आपल्या आसनावर जाऊन स्थानापन्न झाले.

काळाचा महिमा !!

पंतप्रधानांनी अडवानी यांचा असा पाणउतारा असंख्य वेळा केलेला आहे. परंतु पत्रकार कक्षातील पत्रकारांनी या प्रकाराची अचूक नोंद घेतली

## लाभे ना नवे ऑफिस??

भाजपने दीनदयाळ मार्गावर आलिशान, अत्याधुनिक साधनसामग्रीने युक्त अशा सप्ततारांकित मुख्यालयाची विक्रमी वेळात उभारणी करुन इतर राजकीय पक्षांवर मात केली. याच परिसरात असलेल्या काँग्रेस पक्षाच्या कार्यालयाच्या बांधणीचे काम अद्याप रेंगाळतेच आहे. परंतु हे नवे कार्यालय थाटल्यापासून पक्षाच्या यशाला मात्र ग्रहण लागल्यासारखे झाले आहे. हे नवे कार्यालय सुरु झाल्याचा समारंभ त्रिपुरा राज्यात पक्षाला मिळालेल्या दणदणीत यशाने साजरा करण्यात आला होता. परंतु त्रिपुराच्या यशाचा फारसा परिणाम होऊ शकला नव्हता. परंतु त्यानंतर मात्र अपयशाची मालिकाच सुरु झाली. उत्तर प्रदेशातील लोकसभेच्या दोन पोटनिवडणुकांमध्ये पक्षावर पराभवाची नामुष्की ओढवली. मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री या दोघांच्या मतदारसंघात पराभव झाला. कर्नाटकात सरकारस्थापनेत यश



येऊ शकले नाही. त्यानंतर तीन हिंदी भाषक राज्यातली सत्ता गेली. त्यामुळे आता कार्यकर्त्यांमध्येही 'अपशकुनी ऑफिस'ची चर्चा सुरु झाली आहे. यापूर्वी भाजपचे मुख्य कार्यालय '11 अशोक रोड' येथे होते. तेथे असतानाच पक्षाला 2014चे यश मिळाले. आता मुख्य कार्यालय दीनदयाळ मार्गावरह स्थलांतरित केल्यानंतर आता 11 अशोक रोड येथे पक्षाची 'वॉर रुम' किंवा 'रणनीती कार्यालय' स्थापन करण्यात आले आहे. त्यामुळे या बंगल्यात आता प्रवेश अशक्यप्राय झाला आहे. याच ठिकाणी 2019 लोकसभा निवडणुकीची रणनीती तयार केली जाते. त्यामुळे या जागेतून तयार केल्या जाणाऱ्या रणनीतीचा लाभ पक्षाला आगामी लोकसभा निवडणुकीत मिळेल काय अशी अटकळबाजी सुरु आहे.

## प्रियंका गांधीं यांच्या एंट्रीचा मुहुर्त!

कानोकानी आलेली माहिती!

प्रियंका गांधी यांच्या एंट्रीसाठी प्रथम 3 किंवा 4 फेब्रुवारीचा मुहुर्त ठरविण्यात आला होता म्हणे ! परंतु त्यापूर्वीच म्हणजे जानेवारी महिन्याच्या शेवटच्या आठवड्यातच त्यांचे पति रॉबर्ट वड्रा यांना अटक करण्याचे संकेत म्हणे मिळू लागले होते



व खात्रीलायकरीत्या ती माहिती समजली होती असेही सांगण्यात येते. ती माहिती समजल्याबरोबर हालचाली सुरु झाल्या आणि प्रियंका गांधी यांची त्या आधीच एंट्री करण्याची योजना आखण्यात आली. त्यानुसार त्यांची एंट्री ॲडव्हान्स करण्यात आली. त्यामुळे खळबळ निर्माण होणे स्वाभाविक होते. कारण प्रियंका या परदेशात आहेत आणि त्या 1 किंवा 2 फेब्रुवारीला भारतात परतल्यानंतर ही घोषणा केली जाणे अपेक्षित असताना त्यांच्या अनुपस्थितीतच ती होणे यामुळे खळबळ निर्माण झाली. मूळ योजनेत त्या परतल्यानंतर त्या व राहूल यांनी लखनौ येथे संयुक्त पत्रकार परिषद आणि त्यानंतर जाहीर सभा किंवा मेळावा घेण्याचेही ठरविण्यात आले होते. मात्र घाईघाईने त्यांच्या सक्रिय राजकारण प्रवेशाच्या घोषणेमागील कारणे ही असल्याचे सांगितले जाते.

## भाजपवर वक्रदृष्टी??

भाजपवर आरोग्यदेवता कोपलेली दिसते. एका मागून एक पक्षाचे नेते रुग्णाईत होताना दिसत आहेत. संसदेचे हिवाळी अधिवेशन संपल्यानंतर लगेचच अचानकपणे अर्थमंत्री अरुण जेटली हे न्यूयॉर्कला गेल्याचे समजले. न्यूयॉर्कहून काहींनी मिळालेल्या माहितीनुसार जेटली हे बहुधा कॅन्सरच्या उपचारासाठी तेथे गेल्याचे सांगण्यात आले. काहीजणांनी केवळ तपासण्या करण्यासाठी ते गेले असल्याचे सांगितले. सरकार किंवा जेटली यांच्या कार्यालयाकडून याबाबत कोणतेही अधिकृत निवेदन जारी करण्यात न आल्याने गोंधळात भर पडली. परंतु जेटली यांनी ते आजारी आहेत किंवा उपचारासाठी न्यूयॉर्कला गेल्याचा कोणताही आभास होऊ दिला नाही. या काळात त्यांनी दररोज किमान एक व काहीवेळेस दोनदोन तीनतीन ब्लॉग लिहून आपण तंदुरुस्त असल्याचे दाखवून दिले.

एवढेच नव्हे तर त्यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे भारतातील उद्योगविषयक परिषदेला देखील संबोधीत केले. जेटलींनंतर लगेचच नंबर लागला तो भाजपचे अध्यक्ष अमित शहा यांचा! अचानक खबर आली की अमितभाई शहा यांना ‘एम्स’मध्ये भरती करण्यात आले ! ‘एम्स’ म्हणजे ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस ! त्यांना स्वाईन फ्लू आजाराने ग्रासल्याचे सांगण्यात आले. या आजारात माणसाला तीव्र ताप येतो व वेळेवर उपचार न झाल्यास प्रसंगी तो प्राणघातकही ठरतो. अर्थात अमितभाईंना सर्व उपचार वेळेवर मिळाले. त्यांना एम्समध्ये दाखल करताना त्यांचे विश्वासू निकटवर्ति सरचिटणीस भूपेंद्र यादव त्यांच्यासमवेत होते. शहा यांच्या तपासण्या चालू असताना देखील ते शहांच्या जवळ





होते. पण डॉक्टर व चिकित्सकांच्या तोंडून जसा ‘स्वाईन फ्लू’चा उच्चार झाला त्यांनी तत्काळ सुरक्षित अंतरावरुनच देखरेखीस सुरुवात केली. हो, उगाच संसर्ग वगैरे व्हायला नको ! शहांच्या पाठोपाठ नव्हे बरोबरीनेच कायदामंत्री रविशंकर प्रसाद यांनाही ‘एम्स’मध्येच विशेष दक्षता विभागात हलविण्यात आल्याची बातमी प्रसारित होऊ लागली. पत्रकार सुध्दा काहीसे आचंबित झाले की भाजपच्या नेत्यांना झाले आहे तरी काय? रविशंकर यांना श्वास घेण्यास त्रास होऊ लागल्याने रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तीन दिवसांनंतर ते बरे झाले. पण या गडबडीत पक्षाच्या संघटनेची सूत्रे सांभाळणारे वरिष्ठ नेते व संघटन सरचिटणीस रामलाल यांचीही प्रकृति अचानक बिघडली. त्यांनाही तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. पण ते गेले एका खासगी रुग्णालयात. कैलाश हॉस्पिटल ! केंद्रीय पर्यटन व संस्कृती विभागाचे मंत्री डॉ.महेश शर्मा यांच्या

मालकीचे हे रुग्णालय आहे. अशी अनेक रुग्णालये त्यांनी उभारली आहेत. त्यामुळे रामलाल यांनी तेथे स्वतःला दाखल करुन घेतले.

अरुण जेटली यांच्यावर काही महिन्यांपूर्वीच मूत्रपिंडरोपणाची शस्त्रक्रिया करण्यात आली होती. त्यानंतर जवळपास तीन महिने त्यांना सक्तीची विश्रांती घ्यावी लागली होती. सध्याही ते संसदेत किंवा इतरत्र लोकांमध्ये मिसळू शकत नाहीत कारण कोणताही संसर्ग किंवा बाधा होऊ नये यासाठी त्यांना ही खबरदारी घेण्यास सांगण्यात आली आहे. संसदेत देखील त्यांच्या बाजुने दोन अंगरक्षक चालत असतात आणि ते लोकांना बाजुला करीत असतात. परराष्ट्रमंत्री सुषमा स्वराज यांच्यावर देखील अशाच प्रकारची शस्त्रक्रिया झाल्यापासून त्यांच्या हालचाली मर्यादित झाल्या आहेत. त्यामुळेच त्यांनी आगामी लोकसभा निवडणूक त्या लढविणार नसल्याचे जाहीर करुन टाकले. माजी संरक्षणमंत्री व गोव्याचे मुख्यमंत्री मनोहर पर्रीकर पित्ताशयाच्या कर्करोगाशी झुंजत आहेत. नितिन गडकरी यांनाही अहमदनगरच्या सभेत अचानक चक्कर येऊन ते कोसळले होते. आता हे सर्व पाहिल्यानंतर उगाचच असे वाटू लागते की भाजपवर आरोग्यदेवता रुसली असावी. अन्यथा एका पाठोपाठ एक नेते रुग्णाईत झाले नसते? चला, आपण त्यांच्या उत्तम आरोग्यासाठी कामना करु या !!!!







## अर्थसंकल्प इच्छा केवळ 'उरी'!

अरुण जेटली हे तातडीने न्यूयॉर्कला रवाना झाले आणि त्यांच्या आजाराबाबत विविध माहिती येऊ लागल्यानंतर सरकारचा हंगामी अर्थसंकल्प सादर करणार कोण असा प्रश्न निर्माण झाला. जेटली यांचा न्यूयॉर्क मुक्काम वाढला तर? 1 फेब्रुवारीला तर हंगामी अर्थसंकल्प व लेखानुदान तर सादर करावेच लागणार! जेटली न आल्यास कोण अशी चर्चा सुरु झाली. जेटली जेव्हा जवळपास चार पाच महिने मूत्रपिंड रोपण शस्त्रक्रियेमुळे सक्रिय नव्हते तेव्हा अर्थमंत्रालयाची तात्पुरती जबाबदारी पियुष गोयल यांच्याकडे देण्यात आली होती. गोयल हे चार्टर्ड अकाउंटंट असल्याने आर्थिक क्षेत्रातले ते माहीतगार आहेत. तसेच भाजपचे ते अर्थमंत्री म्हणजेच पक्षाचे खजिनदार आहेत. उर्दू भाषेत अर्थमंत्र्यांना 'वझिर ए खजाना' असेच म्हणतात. तर जेटली वेळेवर न परतल्यास त्यांच्याऐवजी पियूष गोयल हंगामी अर्थसंकल्प सादर करणार काय अशी चर्चा सुरु झाली.

कुणी तरी अशी पुडीही सोडली की कदाचित विष्णुचे अवतार असलेले पंतप्रधानच हा शेवटचा हंगामी अर्थसंकल्प सादर करतील आणि नेहरू-इंदिरा-राजीव यांच्या पंक्तीत बसण्याचा मान प्राप्त करतील!

याच सुमारास केंद्रीय मंत्रिमंडळाच्या निर्णयाची माहिती देण्यासाठी झालेल्या पत्रकार परिषदेत पत्रकारांनी गोयल यांना अर्थसंकल्पाबाबत प्रश्न विचारुन भंडावून सोडले. परंतु गोयल हे महाचतुर. पत्रकारांनी वारंवार अर्थसंकल्पाबाबत प्रश्न विचारल्यानंतरही ते ऐकून न ऐकल्यासारखे दाखवून वेगळ्याच विषयावर बोलायला लागत. शेवटी त्यांनी हे प्रश्न टाळण्यासाठी पत्रकारांना 'तुम्ही उरी सिनेमा पाहिला का' म्हणून प्रश्न केला. सर्जिकल स्ट्राईकवर आधारित हा सिनेमा फार चांगला आहे असे त्यांनी सांगून त्याची कथाच पत्रकारांना सांगायला सुरुवात केल्यावर पत्रकारांनी ओळखले







की गोयल यांना उत्तर द्यायचे नाही! पत्रकारांनी त्यांचा नाद सोडला.

मात्र हे प्रकार सुरु झाल्याने जेटली यांच्या कार्यालयाने तत्काळ खुलासा जारी केला की जेटली भारतात परतत आहेत आणि हंगामी अर्थसंकल्प तेच सादर करणार आहेत ! परंतु देवाजीच्या मनात काहीतरी वेगळेच असावे ! जेटली यांची हंगामी का होईना पण सरकारचा शेवटचा अर्थसंकल्प सादर करण्याची मनीषा पूर्ण होऊ शकली नाही. जेटली यांना उपचारासाठी अधिक दिवस अमेरिकेत रहावे लागले. तोपर्यंत सरकारने गोयल यांची तात्पुरते अर्थमंत्री म्हणून नियुक्तीही जाहीर केली. जेटलींचे स्वप्न विरलेच !

## अर्थमंत्री की ब्लॉगमंत्री?

अर्थमंत्री अरुण जेटली यांनी प्रकृतीच्या कारणास्तव न्यूयॉर्क गाठले खरे पण सरकारचा बचाव करण्याची जबाबदारी त्यांनी सातासमुद्रापारहून देखील पार पाडली. व्वा, निष्ठा म्हणावी तर अशी! त्यांच्या ब्लॉगचा विषय एक सारखाच होता व तो म्हणजे काँग्रेस पक्ष, राहूल गांधी व त्यांचे कुटुंब यांच्यावर सतत टीका करणे ! त्यांच्या अर्थमंत्रीपदाच्या काळात त्यांच्याकडे त्या मंत्रालयाचे किती अधिकार होते याबाबत नेहमीच प्रश्नचिन्ह राहिले होते. आता मात्र हे स्पष्ट झाले आहे की अर्थमंत्रालयाशी त्यांना फारसे देणेघेणे नसावे. कारण उघड आहे. हंगामी का असेना, अर्थमंत्र्यांना अर्थसंकल्प किंवा लेखानुदान तर सादर करावेच लागणार आहे. त्यासाठीही किमान तयारी ही करावीच लागते. अर्थसंकल्पाआधी कुणीही अर्थमंत्री हा त्यात पूर्ण बुडालेला असतो. त्याला इतर सर्वसाधारण गोष्टी बोलण्यासही फुरसत नसते. पण इथे तर वेगळेच चित्र ! देशाचे अर्थमंत्री एकदम बिनाधास्त आहेत. पूर्वी देखील ते असेच अर्थसंकल्प सादर करण्याच्या आदल्या दिवसापर्यंत त्यांच्या आवडत्या पत्रकारांचा दरबार लावून तासनतास गप्पांचा अड्डा चालवीत असत. याचा अर्थ काय ? अर्थ एकच आणि तोही साधा सोपा सरळ !

अर्थमंत्रालयाशी निगडित कोणत्याही धोरणात्मक बाबींमध्ये त्यांना निर्णायक अधिकार नाहीत किंवा त्यांना विश्वासातही घेतले जात नसावे. सर्वोच्च व महान नेत्याचे अधिकारी अर्थमंत्र्यांसाठी भाषण तयार करतात आणि अर्थमंत्री फक्त ते वाचण्याचे काम करतात असे अनुमान यातून कुणी काढले तर त्यात वावगे काय ? कानोकानी मिळालेल्या खबरीनुसार नोटबंदीचा निर्णय देखील ब्रह्मांडनायकांनी केवळ काही तास आधी अर्थमंत्र्यांना सांगितला होता. तेव्हा जेटली हे सरकार-बचावाचे काम निष्ठेने पार पाडत आहेत कारण त्यांची मुख्य जबाबदारीच ती आहे! जय हो!!





# दिंड्या दोन दिशांच्या...


तसा माझा मुंबई ते नाशिक हा हायवेचा प्रवास आता नित्याचा झाला आहे. म्हणजे गेला बाजार महिन्यातून निदान तीन चार वेळी हा मला करावाच लागतो. इतकं सततच जाण येणं असल्यानं फार उत्सुकतेने बाहेर निसर्ग वगैरे बघावा अशी नवलाई आता राहिली नाही. त्यामुळे एकदा हायवे सुरु झाला की पुस्तकात डोके खुपसायचे किंवा डोळे मिटून झोपेची आराधना करायची हे अंगवळणी पडले होते. पण अचानक गाडीचा वेग कमी झाला किंवा गाडी जागीच थांबली तर मग रस्त्याकडे लक्ष जायचं. गाडी का थांबली



? याबद्दल  बाहेर नजर टाकल्यावर मुंबईहून शिर्डीकडे निघालेल्या पायी दिंडयांमुळे रस्त्यावरच्या ट्राफीकला हळू जाणे भाग पडत होते. या दिंडीपासून गाडीपुढे जाताना बघितले तर बाहेर हे सगळे साईभक्त डोक्यावर टोप्या, अंगावर कोणातरी नेत्याचा / संस्थेचा टी शर्ट, गळ्यामध्ये साईबाबांचा बॅच, हातामध्ये मोबाईल पुढे डी.जे. वर भक्तीगीते मध्यभागी साईच्या पालख्या आणि मागे या भक्तांच्या सोयीसाठी बरोबरचा वाहनांचा तांडा. असे मुंबई राजधानीकडून शिर्डीकडे निघालेले भक्तगण मोठया उत्साहाने मजल दर मजल करीत शिर्डीला पोहचतात. त्यांच्या एकूण श्रद्धेबद्दल आणि भक्तीबद्दल मला खूप आदर वाटतो. तसं बघायला गेले तर हा सगळा वर्ग मुंबईमध्ये नोकरीधंदा करुन आपलं आयुष्य चांगल्या पद्धतीने जगण्यासाठी झगडणाऱ्यांचा. म्हणाल तर ऐहिक गोष्टींची तशी कमतरता नाही. पण हे सगळे असूनही कुठेतरी आपल्याला श्रद्धेच्या ठिकाणी जायला हवे ही जिगर बाळगून निघालेले. राजधानी मुंबईतून आपले स्नेही सोबती सहकारी अशा असंख्य दिंडया मग नेहमी नजरेला पडायला लागल्या. पण एकदा नाशिकहून मुंबईकडे जाताना कसारा घाटातच ड्रायव्हरने गाडी थांबविली. कारण पुढे एक मोर्चा राज्याच्या राजधानीकडे म्हणजे मुंबईकडे पायी निघाला होता. हे सगळे मोर्चेकरी आदिवासी, कष्टकरी आणि किरकोळ जमीन असणारे किंवा अजिबात जमीन नसणारे असे कुटुंब कबिल्यासकट मुंबईच्या दिशेने निघाले होते. त्यांच्यापुढे डीजेचा बँड नव्हता कुठली पालखी नव्हती. खपाटी गेलेली पोटं, अंगावरची लाज झाकण्यापुरती वस्त्र आणि पायात पायताण नसलेली ही मंडळी जगण्याचा हक्क मागण्यासाठी मुंबईकडे निघाली होती. कित्येक मोर्चेकरी महिलांच्या पायाला तळपत्या उन्हाने फोड आले होते. कडेवर किंवा पाठीला मूल होते. पुढे कुठल्याही मुक्कामी काय सोय झालीच तर झुणका भाकर मिळायची, ती नाही मिळाली तरी जिवाच्या आकांताने ही दिंडी पुढे पुढे जात होती. एवढा प्रचंड समाज कित्येक दशकापासून आपल्या जगण्याच्या हक्कासाठी लढतो आहे आणि दाद मागण्यासाठी राज्याच्या राजधानीकडे येतो आहे आणि



त्याचवेळी ज्यांच्यापाशी काही का होईना समृद्धी आहे ते भक्तीमार्गाने आधार शोधण्यासाठी राजधानी मुंबईहून पायी बाहेर पडले आहेत. दिंडया दोन आहेत. दिशा दोन आहेत. लोक वेगळे आहेत. सगळ्यांच्या चेहऱ्यांकडे पाहिल्यावर हा विरोधाभास चटकन लक्षात येतो. या दोन्ही समुहांचे समाधान करु शकेल असा काही जादूई तोडगा कुणाजवळ असेल तर मला नक्की सांगा. नाहीतर अनवाणी पायाने निघालेले भुके कंगाल, भूमीहीन आदिवासी मला स्वप्नात सुद्धा स्वस्थ बसू देणार नाहीत.



## शेवटचे पान



राष्ट्रवादी स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार !!